`31 DEC 2016.

घडवलेले स्मित देऊन, मन आनंदाने आणि आत्मविश्वासाने भरलेले आहे -- असे कशाला दाखवायला हवेय ? आहे तसा येऊ दे फोटो !
( हे माझे स्वगत आहे -- तुमच्यासाठी नाही ! )

मला ते फोटोचे तंत्र जमत नाही --
यापुढे यात वेळ घालवणार नाही --

नवीन वर्षात मटामध्ये ‘ खुली खिडकी ‘ हे सदर सुरू झालेय. त्यातला पहिला लेख, आपला मित्र प्रणव सखदेव याचा आहे. हा लेख मला खूप आवडला – तुम्हीही वाचा. त्यातला हा एक मुद्दा बघा – “ आणखी एक दुभंगलेपण मोठं धुमाकूळ घालतंय. २०१४ सालच्या सत्ताबदलानंतर आलेलं. मी त्याला ‘ बायनरी दुभंगलेपण ‘ म्हणतो. हा दुभंग आहे, सत्ताधाऱ्यांच्या बाजूचे आणि त्यांच्या विरोधातले, यांच्यांत निर्माण झालेला. हे दुभंगलेपण आपल्या वैयक्तिक, खासगी नात्यांमध्ये-मैत्रींमध्ये वितुष्ट निर्माण करू लागलं आहे. त्यामुळे मैत्रीत, नात्यांमध्ये ताणतणाव निर्माण होत चालल्याची उदाहरणं मी स्वतः अनुभवतो आहे आणि आजूबाजूलाही पाहतो आहे. “

--- आपापले विचार फेल होण्याच्या भीतीमुळे तर आपण या असहिष्णुतेच्या मार्गाने जात नाहीय ना ?

एबीपी माझा वरचे एक मजेदार शीर्षक --
‘ आरे ‘ वरून ‘ कारे ‘ ला सुरुवात !

एक – निव्वळ फेकू – काहीच नव्हते – बरेचसे आधी आहेच – हा काय अर्थसंकल्प थोडाच आहे ? – ठिगळे लावली – लोकांच्या तोंडाला पाने पुसली – फसवले – काळा पैसा किती मिळाला ते सांगितलेच नाही – फुकट गेला वेळ –
दोन – जनतेला खूपच दिलासा – गर्भवती महिला, छोटे व्यापारी, लघु-उद्योजक यांच्या फायद्याचे निर्णय – ज्येष्ठ नागरिकांचा विशेष विचार केला आहे – शेतकऱ्यांच्या प्रति संवेदनशील – फारच छान – जगात याला तोड नाहीय --
तीन – तुम्हा दोघांचेही ऐकून मी खूपच प्रभावित झालो आहे ! --
-- चला आता गोट्या खेळायला --

DECEMBER 30

१. आपल्याला दारू फारशी चढत नाही, असा समज असणे.

( दारू एक तासानंतर तिचा पूर्ण प्रभाव दाखवते, हे माहीत नसणे. )

२. कोण जास्त पिऊ शकते याची पैज लावणे.

-- या दोन्ही गधड्या प्रकारांतून मी गेलेलो असून निव्वळ योगायोगाने बचावलेलो आहे.

तसा बचावलो नसतो तर कधीच सहकुटुंब देशोधडीला लागलो असतो.

विचारपूर्वक, योग्य प्रमाणात मजा जरूर करावी, पण -------

वाहनाने परतायचे असेल तर एक न पिणारा चालक बरोबर असावाच्च !

आपल्या वा दुसऱ्याच्या जिवाला धोका निर्माण होऊ नये !

तरी, प्रिय फ्रेंडस, सावध आणि जागरूक राहा – हाच एक आपुलकीचा इशारा !

प्रकाशच पण
भोके पाडणारा
माझ्या प्रिय टेबलाला
आगंतुक
व्हिलनप्रमाणे

ऊठसूट ताळतंत्र
संभाळणारे
माझे प्रियजन नाइलाजाने
प्राणवायूच्या अभावी
परागंदा झालेले

वैविध्याने नटलेला
माझा भूतकाळ
उकिरड्यावर
चघळताहेत गाढवे

नुसता उल्लेख जरी
केला मला मिळालेल्या बऱ्याशा
चमकत्या पुरस्काराचा तरी
छद्मी हसणारे जणू सर्वज्ञ
आणि मान्यताप्राप्त प्रभावी
विचारवंत हमखास
जिंकतात लढाई

मी प्रयत्नही नाही करत
परिस्थिती हाताळण्याचा
--- ००० ---

माझ्या बद्दल काय सांगणार
माझ्या स्थायी भावनांचे वर्णन
करण्यासाठी मला कोमट वाऱ्याचे काप
दाखवावे लागतील किंवा माझ्या
विचारांची निरुपयोगिता
दाखवण्यासाठी अस्ताला जाणाऱ्या
उन्हाची पिसे काढावी लागतील

माझा भूतकाळ आहे एक खंडहर
काळ्या दगडांचा करपलेल्या
जो आज मी सहसा नाही जगत
पण माझे मन म्हणजे
तोच तर असतो वारेमाप
बहुशः स्थगित केलेला

मी असतो मजेत कारण मला
जगण्याचे सार्थक करण्याचा

काचच नाहीय – बाटल्या

माझ्या देखरेखीत पुढे जातात

भरल्या जाऊन टोपणबद्ध होतात

विक्रीलाही जातात

आलेले पैसे होतात माझ्या

डोक्यावरचे केस

मग पुन्हा मी निवांत

हे सगळे

काहीच नसण्यात कसे विलीन होते

ते मी रोज पाहतो – सुंदर !

--- ००० ---

DECEMBER 29

एके काळी मी जसा एक खादाड वाचक होतो तसा आता नाही.

बौद्धिक वजन वाढू नये म्हणून

बौद्धिक आहारनियंत्रण चालू आहे !

ही सर्व अवाढव्य यंत्रणा

चालू करून परमेश्वर

असल्यास मरून

गेला असणार

आता या गुटखा खाल्लेल्या तोंडांना

वाली नाही

श्वासांचे पडदे आता

भक्ष्य होतील

कशाही भरकटणाऱ्या

प्रेरणांचे

रस्ते उपयोगी चालायला
प्रेयसी सुखाला आणि सावरायला
जेव्हा तोल जाऊन पडणे घडेल
आकाशात शेवटाशिवाय

चिकनच्या प्रत्येक घासाला
ठरवायचेय उद्याचे वेळापत्रक
आजचे जगणे तर आता
सोडूनच द्यायचेय
मस्त चढलेल्या
तपशीलांच्या गर्दीत

कर्तृत्व पाहायला कुणीच
नाहीय परमेश्वरासारखे ग्रेट

असे जगून तरी काय चाटायचेय
मनाचे उपस्थित असणे
--- ००० ---

३१ ला रात्री पंतप्रधानांचे टीव्हीवर भाषण आहे, असे एकजण सांगत होता -- लोकांची उतरणार ! पैसे वाया जाणार !

त्याला काही माहीतच नव्हते
त्याला देण्यात आलेल्या बीजातच
ठरलेली होती रचना
त्याच्या शरीरातल्या
दारेखिडक्यांची आणि त्याच्या
भावनांची रसायने
कुठे आगी लावतील याची

ही खेच त्याचे आयुष्य व्यापून
त्याच्या प्रेमसंबंधातही
अंधार पसरवत राहिली
त्याचे आप्त त्याच्या खिशांतल्या
आधीच भरलेल्या अवकाशामुळे
बहिष्कृत राहिले

त्याच्या मेंदूला सतार
चित्र वा शब्द यांची
अतोनात ॲलर्जी होती
तो गप्प असे
त्याचे निर्धारी डोळे
ठरलेली हिंसा करायच्या
संधीची वाट पाहात राहात

त्याला शंकाच नव्हती त्याच्या अंगभूत
रसायनात जळून आणि जाळून
त्याचे आणि जगाचे जगणे
उजळणार होते – निदान हा एक
अटळ न्याय तरी असणार होताच
--- ००० ---

DECEMBER 28

भाषा, जात यांवर आधारित आपापल्या सुरक्षिततेचे समूह आहेत की नाहीत ?
त्या समूहांत संख्याबळाचे महत्त्व असते की नसते ?
तसेच धर्म समूह सुरक्षित मानणारे लोक आहेत की नाहीत ?
जात आणि भाषा योग्य तर धर्म अयोग्य का ?

धर्मात सुरक्षितता शोधणारे तिथल्या संख्याबळाची काळजी करणारच !

-- या असल्या सुरक्षितताच खोट्या, अतार्किक आहेत, असे बुद्धिप्रामाण्यवादी का म्हणत नाहीत ?

माणसाला धर्म म्हणजे नेमके काय हवे असते, यावर का बोलत नाहीत ?

मुळात, धर्म म्हणजे काय -- हा प्रश्न तरी विचारू या -- असे म्हणावे तर कोणतेही विशिष्ट धर्मवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी याला कट्टर खोडा घालतात ! मग, दहा मुले जन्माला घालणे -- या विषयावर जीव खाऊन बोंबलत बसतात !

स्वतःच स्वतःचा किनारा
असलेले मन
तो सोडत नाही
असे म्हणण्यात अर्थच नसतो
ते तर किनाऱ्याच्या रूपातच
जन्म घेऊन
किनाऱ्यावरच मरणार असते

स्मृतिरूप त्याच्या सगळ्याच स्मृती
सतत वापरल्या जात असतात
त्यांतल्या काही वेळोवेळी
असतात अंध पार्श्वभूमी

मनाची वाढ कशी व्हावी
ते मनच ठरवते
मनातल्या मनात हट्टाने
सुरक्षित राहात

ते स्वतःच स्वतःला
धोके निर्माण करू शकते
तसे न होण्यासाठी

त्याच्याच किनाऱ्यावरची
मूल्ये ते वापरते जरी ती पूर्ण
खात्रीची वाटत नसली तरी

त्याचा किनारा अद्वितीय असतो
त्या किनाऱ्यावर ते एकटेच फिरते
घट्ट बिलगून राहात स्वतःला
--- ००० ---

DECEMBER 27

झोपडपट्टी

मुंबईत एकदा, कुठून ते आठवत नाही, पण, कारने सहकुटुंब घाटकोपरला जाताना, मध्यरात्री, आम्ही धारावी झोपडपट्टीत शिरलो होतो. तो परिसर बराच मोठा आहे. मागे फिरणे शक्य नव्हते आणि हा रस्ता योग्य ठिकाणी बाहेर पडेल याची खात्री होती. या झोपडपट्टीत आपण जगलेले तर नसतो. पण, तिथले उद्योगधंदे, गुन्हेगारीचे वातावरण यांची ऐकीव माहिती असते. त्यात आपली कल्पना भरही घालत असते. असा मिळून तो अनुभव सुप्त मनात जमा होतो. ' खरा अनुभव ' असे काही नसते. त्यातच, एकीकडे असेही ऐकलेले असते की अमुक ठिकाणी कारच्या फ्रंट काचेवर अंड्याचा बलक टाकला जातो आणि तुम्ही वायपर चालू केला की तो बलक काचेवर पसरतो आणि तुम्हाला दिसेनासे झाल्याने गाडी थांबवावीच लागते. त्यानंतर तुम्हाला लुटले जाते. आता हेही इकडे जोडले जाते. हा नुसता भयाचा अनुभव वाटत असला तरी कवितेत येताना तो मानवी संबंध आणि मतमतांतरे यांच्या झोपडपट्टीचे रूप घेऊन येतो. सर्व भूमिका आणि मतमतांतरे ही अभावग्रस्ततेतून येतात, याची एक जाणीव असते. इथे कुणी कुणाला कंडेम करणे वा कमी लेखणे नसते. सुप्त मनातले ' खोटे अनुभव ' आणि जगण्याची प्रक्रिया हे एकत्र येऊन एक खोटी, ' निरर्थक ' कविता त्यातून अभिव्यक्त होते. ( हे, काल इथे दिलेल्या कवितेच्या संदर्भातले आहे. ही अर्थातच पूर्ण प्रक्रिया नसणार. तरीही, फ्रेंडसना थोडा अंदाज यावा म्हणून हे इथे दिले आहे. )

आणि माझी गाडी पुन्हा रस्ता
चुकते आता या प्रचंड त्याच
झोपडपट्टीतून जाणे भाग आहे
भयप्रद मधेच कसेही

ट्रक पार्क केलेले
थांबत, मार्ग काढत
जावे लागेल असे
एकमेकांच्या मतांतून

सगळीकडून आक्रमण शक्य
धरणारी प्रथमोपचार दुकाने
जीवरक्षक कपडे पांघरून
चिलखती श्वापदे

सर्वांनाच कळते
अंधारातले डास
आणि काचेवर
कुठूनही पडू शकणारे
असे अंड्यांचे बलक
असाच असणार आहे
शक्यतांचा हिंसक नकाशा

हा कोलाहल माझा मीच
कवच समजून वापरतोय का --
अशा संभ्रमात कसाबसा
हमरस्ता गाठणे
रोजच्या रोज बचावल्याच्या
आनंदात झोपी जाणे
--- ००० ---

DECEMBER 26

राजकीय नेते पक्षबदल करताना आपण पाहतो. ते त्याचे उत्तम समर्थनही करू शकतात.

अशा बदलामुळे त्यांचा कामाचा आवाका वाढणार असतो.

निरनिराळ्या पक्षांचे राजकीय विश्लेषक-समर्थक मात्र असा पक्षबदल करताना फारसे दिसत नाहीत.

तत्त्वांशी प्रतारणा करणे त्यांना जमत नाही, असे म्हणावे की

वाहत्या जीवनप्रवाच्या विरोधात ते उगीचच स्थितिशील तत्त्वांना चिकटून राहतात, असे म्हणावे ?

अशा विचारवंतांनी समर्थनाचे पक्ष बदलल्याची कितपत आहेत उदाहरणे ?

DECEMBER 25

added 2 new photos.

's photo.

's photo.

पार्ले कंपनीने पुण्यात विद्यार्थ्यांसाठी एक चित्रकला स्पर्धा घेतली होती. तीत माझ्या धाकट्या नातीने (वय ११) भाग घेतला होता. तिने काढलेली चित्रे खाली देत आहे. तिच्या या चित्रांनी तिला ३००० मुलांत दुसरा नंबर मिळवून दिला ! ( तिचे नाव चि. श्रेया महेश देशपांडे. ) हे पारितोषिक तिला प्रख्यात चित्रकार शि. द. फडणीस यांच्या हस्ते देण्यात आले !

काल दोन नाटके पाहिली –

१. अपूर्व मेघदूत

' मेघदूत ' हा गणेश दिघे याचा श्वास आहे, असे म्हणावे इतका त्याचा त्या बाबतीतला अभ्यास आहे. त्याची रंगावृत्ती असलेले ' अपूर्व मेघदूत ' काल पाहिले ! दिग्दर्शक होते स्वागत थोरात. हा प्रयोग खरोखरच अपूर्व होता ! हे नाटक सादर करत होते १९ अंध कलाकार ! एक पाऊलही न चुकता, आगमन-निर्गमन वेळा आणि हालचाली बिनचूक ठेवत ! यासाठी , अर्थातच सर्वांनी काही महिने अथक मेहनत घेतलेली होती ! आपण जगण्याच्या मुख्य प्रवाहातून कायम बाहेरच राहणार, असे वाटणाऱ्या या कलाकारांना घेऊन हे सादर करणे सोपे नव्हते. नाटकानंतर त्या सर्व कलाकारांना वाटणारे समाधान पाहून धन्य वाटले ! प्रयोग अंधांचा आहे म्हणून निर्मिती साधी, काटकसरी करू, असा विचार नव्हता ! जबरदस्त कपडेपट, आवश्यक ती सर्व प्रकाश योजना, गाण्यांचे उत्तम रेकॉर्डिंग, आणि आवश्यक ते सर्व मुखवटे आणि साधनसामुग्री यांनी युक्त असा हा एक समृद्ध प्रयोग होता ! आपण या सर्वांच्या आनंदात सहभागी होऊ शकलो याचे समाधान वाटले ! एकाच क्रमाने अनेकदा काही गोष्टी घडत राहिल्याने नाटकाला थोडा एकसुरीपणा येतो आहे – त्यात वैविध्य आणून कशी सुधारणा करता येईल, हे पाहावे.

या प्रयोगापासून असंख्यांना स्फूर्ती आणि ऊर्जा प्राप्त होईल, हे निश्चित !

२. साखर खाल्लेला माणूस

दिग्दर्शक म्हणून जबाबदारी घेणारा विद्यासागर अध्यापक याला नेतृत्व देऊन आम्ही पुण्यात ‘ अवकाश कलामंच ‘ ही नाट्यसंस्था सुरू केली. आता तो कोल्हापुरात एका रेडियो स्टेशनचा प्रमुख असून उत्तमोत्तम नाटकेही लिहीत आहे. ‘ आधी बसू आणि मग बोलु ‘ या नावाचे त्याचे एक छान नाटक येऊन गेले. त्यात संजय नार्वेकरांची अभिनयातली कमाल बघायला मिळाली होती. आता त्यानेच लिहिलेले ‘ साखर खाल्लेला माणूस ‘ हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आलेले आहे. मुख्य भूमिकेत प्रशांत दामले आहेत ! नाटकाच्या कणाकणात चैतन्य भरायला हा नट ऊर्जा आणतो कुठून, हा प्रश्न पडावा असा सगळा चौफेर टोलेबाजीचा खेळ ! बाकी सगळे सांगत बसत नाही. वेगात संवाद चालु असणे , त्याच वेळी फोन वाजणे, त्याच वेळी दारावरची बेल वाजणे, काही शोधाशोध सुरू असणे – असे आजच्या जगण्यातले बरेच वैतागवाणे तुकडे या नाटकात आहेत ! एका दिलखुलास, हलक्याफुलक्या पद्धतीने एक गंभीर विषय मांडणारे असे हे नाटक आहे. मजा आली !

मानवी जगण्यातल्या -- मानवी संबंधांतल्या -- प्रश्नांत काही एक वैचारिक सत्य वा वैचारिक न्याय असतो, असे समजणार्यांना मी अंधश्रद्ध समजतो !

Dec 25, 2016

कोणत्याही विषयातले – जगण्यातले वा एखाद्या विशिष्ट विषयातले – आपल्याला काही कळत असो की नसो,
विचार चालवता येतातच !
विचार चालवणे म्हणजे भूमिका घेणे !
भूमिका घेण्यात एक गृहीत असते – आपण शहाणे आहोत !
तीच खात्री नसेल तर भूमिका नाही हो घेता येणार !
आणि आपल्यासारखे शहाणे नसलेले ते वेडे, हे काय वेगळे सांगायला हवेय ?

24 DECEMBER 2016

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह – या नावाचे, पुणे महानगर पालिकेचे, एक नाट्यगृह सातारा रोडवर झालेले आहेच.

त्याच नावाचे आणखी एक नाट्यगृह पुण्यातच यरवड्यालाही होत आहे.
म्हणजे आता हे, ‘ सिटी प्राईड ‘, कोथरुड आणि सातारा रोड – असे होणार !
मोठमोठ्या विभूतींची अनेक नावे उपलब्ध असताना
तेच नाव पुन्हा देण्यात कोणता विचार झाला असावा ?

आश्चर्यच आहे
अधाशी मातीतूनही
तरारून उगवून येणे
तडफदार सौंदर्याला
मारखाऊ प्रतिकार

अंगातली गुर्मी
सर्व उत्तेजक
आकारही झुगारत
हजारो नागांचे फणे
होते दिखाऊ
आतून घाबरलेले

ही जणू असते
शौर्याची वेळ
आपादमस्तक
काळवंडलेली
नकळत पडणाऱ्या
ॲसिडच्या थेंबांत
केस जाळणाऱ्या

सौंदर्यही थकते
कंटाळते – वैतागतेही
पदर पडला तरी

उचलतही नाही

नुसताच छळ असतो
घडणार काहीच नसते
--- ००० ---

DECEMBER 22

मतभेद झाला याचा अर्थच
ती चूल आहे की तो पाऊस
आहे हे पूर्ण ठरले नाही --
उद्याचे फुगे रस्त्यावरून घरंगळत
सोडले आणि येणाऱ्या वाहनांचे दिवे फोडले

असाही याचा अर्थ होऊ शकत होता
किंवा कारखान्याला लागलेल्या आगीतून
वाचलेले जीव -- माणसे, कासवे आणि उंदीर
यांना वगळून रस्त्यावरचे विजेचे खांबच फक्त
मोजत बसावे, तसे हे झाले –

शेवटी मूळ प्रेरणांची उष्णता
ही इच्छांवर ठरवायची की
कार्बोरेटरच्या आवाजावर
हेच अधांतरी राहणे झाले हे –

उद्या कुणी म्हणेल की
पाऊस पडला तरीही
चित्रपट खराब निघू शकतो
किंवा वाळवी लागलेले विचारही

हावी होऊ शकतात
एखाद्या स्त्रीच्या जखमी चेहऱ्यावर

मतभेद न होता तरी
कुठे पूर्ण असते
सूर्यास्ताचे निसर्गदृश्य --
त्यावरूनही ओघळत असतातच मानवी मनाच्या चिंध्या
--- ००० ---

कसा एखादा विचित्र प्रश्न येतो समोर !
माझी धाकटी नात सहावीत आहे. तिला असा गृहपाठ देण्यात आला आहे की मराठीतल्या एका लेखकाची माहिती लिहून आणायची. घरी आल्यावर ती मला म्हणाली की ती माझी माहिती लिहून नेणार आहे. यावर माझ्या डोक्यात विचार आला की आपण काही कुणाला फारसे माहीत असण्याची शक्यता नाही. ही समजा आपली माहिती लिहून घेऊन गेली आणि तिला कुणी ' हे कुठले कोण लेखक ' असे काही बोलले तर ती नाराज होऊ शकते. त्यामुळे, मी तिला म्हणालो की जरा प्रसिद्ध, सगळ्यांना माहीत असलेल्या लेखकाची माहिती लिही – मी माहीत नाहीय फारसा कुणाला. तर पठ्ठीने आज तिच्या टीचरना विचारले की माझे आजोबा लेखक आहेत, तर त्यांची माहिती चालेल का ? त्या टीचरांनी तिला आनंदाने परवानगी दिलेली आहे ! आता निर्धोकपणे जाईल माझी माहिती तिच्या वहीतून तिच्या शाळेत !
सुटला एकदाचा हा प्रश्न अशा प्रकारे !

DECEMBER 21

कोल्हापूर

श्रीधर तिळवे कोल्हापूरचे. त्यांची तशी प्रत्यक्ष ओळखपाळख नाही, पण, त्यांच्या कविता मी अत्यंत आवडीने वाचत असतो. आज त्यांची एक कविता मी इथे शेयर केलेली आहे.
योगायोग म्हणजे थोड्याच वेळापूर्वी कोल्हापूरच्याच माझ्या एका मित्राचा काही कारणाने फोन आला. त्याचे नाव प्रसन्न जी. कुलकर्णी. मी ७६ साली बदलीमुळे कोल्हापूरला गेलो तेव्हा आमची ओळख झाली. त्या आधी माझे ' राज्य ' नावाचे एक फालतू नाटक माझा मित्र कै. प्रा. अरुण पाटील याने रंगमंचावर आणले होते. तसे म्हटले तर त्या वेळी एक कवी म्हणून माझी थोडी ओळख होती. माझ्या कविता अनेकांना आणि विशेषतः कोल्हापूरच्या मित्रांनाही आवडत असत. पण, ते मित्र

तसे निर्दय होते. माझ्या त्या फालतू नाटकाची बरीच खिल्ली उडवण्यात आली होती ! या पार्श्वभूमीवर प्रसन्नने एक धाडसच सुरू केले ! राज्य नाट्यस्पर्धेत तो दर वर्षी एक नाटक सादर करत असे. आणि तसे त्याचे चांगले नावही होते. तर त्याने जाहीर करून जिकडेतिकडे सांगायलाच सुरुवात केली की यंदा आम्ही चंप्रंचे नाटक करणार ! माझ्या डोक्यात त्या वेळी नाटकाचे काहीच नव्हते ! तरीही, मीही, मग, त्याला खोटे पडू द्यायचे नाही, असे ठरवले ! थोड्याच दिवसांत नाटकाचे लेखन सुरू झाले ! प्रसन्न,वेळ मिळेल तेव्हा घरी चक्कर टाके, पुढे किती झाले लिहून, असे विचारे, जे लिहून झाले असेल तेवढेच का असे ना, ऐकायचा आग्रह धरे. दोन-चार पाने असली तरी तेवढी ऐकून भरपूर हसून दाद देऊन जाई ! या पद्धतीने लिहून झालेले माझे पहिले ( मला वाटते, त्याप्रमाणे ) चांगले जमलेले नाटक म्हणजे ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘. ते राज्य नाट्यस्पर्धेत सादरही झाले. त्या निमित्ताने आमचा एक मोठा ग्रुप तयार झाला, त्यातून पुढे ‘ प्रत्यय ‘ ची स्थापना झाली. तर स्पर्धेत ते नाटक सादर झाल्यानंतर दोनच नाटकांत खरी स्पर्धा असून त्यातले एक हे आमचे, अशी हवा होती. ते दुसरे नाटक पहिले आले, पण, आम्हाला एखादे साधे प्रशस्तिपत्रही मिळाले नाही. मग, आम्ही आमच्या आवडत्या पद्धतीने ते दुःख साजरे केले !

त्या नाटकाचे पहिले वाचन प्रख्यात चित्रकार रवींद्र मेस्त्री यांच्या स्टूडिओत झाले होते. सर्वांच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या होत्या ! त्याचा संसर्ग होऊन मला वाचणेच अवघड झाले होते ! या नाटकाच्या अशा खूप आहेत आठवणी !

प्रसन्नने कोल्हापुरात सादर केलेले माझे नाट्यलेखन म्हणजे – ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘, ‘ डाव्या डोळ्याखाली काळा तीळ ‘ ( म्हणजे आताचे ‘ धागेदोरे ‘ ), ‘ दिनकर पुरोहितचा खून ', ' इतिहास ‘, आणि ‘ नातं ‘ !

एकूणात, माझ्या मनात, कोल्हापूरबद्दल एक खास जिव्हाळा आहे ! त्याला प्रसन्न आणि ते सगळे अनेक मित्र कारणीभूत आहेत !

या निमित्ताने, त्या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आहे !

shared Shridhar Tilve's post.

ही मराठीतली एक अपवादात्मक ग्रेट कविता आहे ! मन:पूर्वक सलाम ! एका एका प्रश्नाचा वा दु:खाचा विषय हाताळणाऱ्या खूप असतात कविता -- पूर्ण जगण्याचा आवाका घेणारी अशी ही कविता, हे मराठीचे भाग्य आहे !

DECEMBER 20

अंडरवेयर वाळत टाकत
तो म्हणाला, “ बुद्धिप्रामाण्यवादात
नरबळी नाही बसत, पुरुषसत्ताही नाही बसत
कारण, पुरुषसत्ता म्हणजे स्त्रियांचे नरबळी ! “

नंतर टावेल वाळत टाकत
तो म्हणाला, " कोणतीही अस्मिता
वा युद्धही नाही बसत !
विषमता, अत्याचार, अन्याय
या सर्वांविरुद्ध असतो
बुद्धिप्रामाण्यवाद ! "
हे अर्थातच छानच होते !
" बुद्धिप्रामाण्यवाद अंमलातच न येणे
हे खरे तर बुद्धिप्रामाण्यवादाच्या
विरोधात असते ! तो अंमलात येऊ
न देणाऱ्यांशी युद्ध करणे
हे फार महत्त्वाचे असते !
तेवढे एकच युद्ध समर्थनीय असते ! "
तसे तर मग, अस्मिता, पूर्वग्रह, परंपरा
आणि असंख्य सवयी
या सगळ्यांशीच करावे लागेल युद्ध !
आणि बुद्धिप्रामाण्यवादीही
पुरुषप्रधान असला तर ?

यावर, प्युवर म्हणजे शुद्ध वा पूर्ण
बुद्धिप्रामाण्यवादी कोण, याचा शोध
सुरू झाला ! इथे त्याने पँट चढवली --

देवादिकांवर मानवी भावभावना
आरोपित करून त्यांना
माणसांसारखेच पापी का केले असावे
असा प्रश्न आला ! तर देव हे
त्या सगळ्या भावभावनांतून जाऊनही
त्यांच्या परे असतात, असे सांगण्यात आले !

“ मग, पुरुषप्रधान असूनही
बुद्धिप्रामाण्यवादी
असायला काय हरकत आहे ? “
असे त्याने विचारले !

पण, देव भावभावनांच्या परे असतात
हे कुठे बुद्धिप्रामाण्यवादी आहे ?
असे विचारताच तो म्हणाला, “ अर्थात
त्यातूनही बाहेर पडावे लागेलच ! “
म्हणजे भावभावना नष्टच
व्हायला हव्यात की भीती, सुरक्षितता
वर्चस्व तसेच लळा, द्वेष यांसहच
असणार बुद्धिप्रामाण्यवाद ?

“ छे छे – बुद्धिप्रामाण्यवाद
ही एक हळूहळू अंमलात येणारी
आरोग्यदायी प्रक्रिया आहे – तो काही
क्षणात झटका देणारा विजेचा धक्का नव्हे !
सहानुभूती, माफ करणे, चालवून घेणे
संधी देणे – या सर्वांसहच असणार
बुद्धिप्रामाण्यवाद ! “ तो म्हणाला – शर्ट चढवत --

“ बुद्धिप्रामाण्यवाद म्हणजे आंतरविरोधच तर असणार ! “
--- ००० ---

DECEMBER 19

शेजारील देशात आपल्याकडून स्फूर्ती घेऊन ५००० ची नोटाबंदी -- पण, सांगून, सर्वांना विश्वासात घेऊन -- पुढील ३ ते ५ वर्षांत !

असे निवडक वाचायचे म्हटले तरी आयुष्य पुरणार नाही --
सतत नुसत्या करमणुकीत आयुष्य व्यतीत करणे, हीच एक शक्य पळवाट !

अंधारात कडेला एकच
लालभडक दिवा
बाकीचे सर्व शहरी इमारतींचे
रूटीन दिवे

तो काही रक्ताचा वा धोक्याचा
वा ऑपरेशनचा वा एक्सरेचा
नाहीय – पण, काही ना काही मानवी
हेतू असेलच – बहुधा अपवादात्मक

इतर दिव्यांचे रूटीन हेतू कुणाला
डिस्टर्ब करत नाहीत

सर्वच दिवे अस्तित्वात असल्याने
त्यांना स्वतंत्र समजून कवितेत
सामावून घेता येईल, पण
त्यांना जिवंत समजावे लागेल

असा जिवंतपणा मग
त्यांच्यांतली सलगता
घालवून टाकेल

मग, कवितेत, सलग वाक्य
वा सर्व मिळून अर्थ
यांची अपेक्षा करता येणार नाही

एक वा अनेक असंबद्ध तुकडेही मग
कवितेचे भाग असतील – निरर्थक

--- ००० ---

काहीही घडले तरी मराठी माणसाला, ते कुठे घडले, याची फार उत्सुकता असते.

१. त्या त्या ठिकाणी कुणीही निवडून आले असले तरी प्रत्येकजण ‘ त्या ठिकाणी ‘ निवडून आलेला आहे.
२. त्या ठिकाणी कसोटीत भारताच्या ७५० हून जास्त धावा झालेल्या आहेत.
३. त्या ठिकाणी करुण नायरचे त्रिशतक झालेले आहे.

-- त्या त्या ठिकाणी ते ते लोक आणि भारतातले लोकही त्या ठिकाणी आनंदित झालेले आहेत !

DECEMBER 18

सिंहासन नसले म्हणून काय झाले
आईसक्रीम तर आहे मनाला ओढणारे --
अमुक प्रकारची माणसे अशी, तमुक तशी
असे अधांतरी लटकत्या पतंगांना
म्हणता येतेच आणि ते
खरेही असते --
प्रश्न एकच असतो की तुम्ही
कोणती उपाहारगृहे सर्जक ठरवणार ?

विचारांनी आपण काहीही, कसेही असलो
तरी फरक नाही पडत ड्रेनेजच्या पाण्याच्या वासात
उपयुक्तही असतील काही कबुतरे प्रचंड
पण दुःखाने काळवंडलेले कुणाचेही विष हे पूर्ण
मानवजातीला घेरणारच

उपरोधाने कुणी हळव्या लोकांना
वा क्रूर इमारतींना क्षुद्र लेखते वा म्हणते
सपक वा निरर्थक --
सगळे जणू तळपते, लखलखते
असू शकते बुद्धीचे प्रांगण

कोणती वस्तू असू शकते
तिच्या असण्याहून जास्त काही ?
एखादा महान शास्त्रज्ञ एखाद्या
पानटपरीवाल्याहून अधिक उत्तुंग
मनोरा कशामुळे असेल ?

आळीपाळीने सर्वांना क्षुद्र म्हणणे, ही सर्जकता ?

--- ००० ---

DECEMBER 17

स्वत:लाच फालतू वाटणारी पोस्ट रविवारी खपवून टाकावी -- कुणी वाचत नाही !

DECEMBER 16

" पुण्यातल्या मेट्रोचे भूमीपूजन पंतप्रधानांच्या हस्ते होणार ! "
" पुण्यातल्या मेट्रोचे भूमीपूजन शरद पवारांच्या हस्ते होणार ! "
दोन दिवसांनी –
" त्या भूमीपूजनाला शरद पवारांना मानाने निमंत्रित केले गेले पाहिजे ! "

-- हे काय झाले ? करमणुकीच्या भुकेल्या नागरिकांना वाटत होते की आता काही नाट्यमय मजा येईल !
( राहुल गांधी करणार होते त्या ) भूकंपाचाही नाट्यप्रयोग असाच रद्द झालेला दिसतोय !

रांगेत उभे राहून वैतागलेल्या लोकांनी करावे तरी काय ?
प्रश्न सुटलेच पाहिजेत, असा लोकांचा आग्रह नाहीय, पण,
साधी करमणूकही त्यांना मिळू नये ?
तीपासूनही त्यांना निर्दयपणे वंचित ठेवले जावे ?

वारा आपली दिशा नाही बदलु शकत
पण, माणसे बदलु शकतात
त्यामुळेच, डोंगर उर्मट होतात आणि
वाहत्या पाण्याला
दान केलेल्या सहानुभूतीचा वास येतो

दिशा बदलण्यात मूळ शक्ती
हेलपाटल्यामुळे
पंख तुटून मन
तहानेने कासावीस होत राहते

इथे कुणी कुणाला काही सांगत नाही
ऊन फार छान पाडले म्हणून कुणी
सूर्याला गिफ्ट नाही देत
लिम्काचे सुवर्णपदक
ना झाडे उभी राहात रांगेत
त्यांच्या पानांवर सह्या घेण्यासाठी --
त्यांची पाने निश्चिंत असतात

मी इतर दगडांपेक्षा मोठा आणि खूपच
अर्थपूर्ण असल्याने
माझ्या या टप्प्याला माझा गौरव करा
असे नाही म्हणत कोणताही दगड

गौरव करणाऱ्या माणसांनाही स्वतःची
दिशा बदलावी लागते कारण दिशा
बदलुन स्वेच्छेने हवे ते घडवण्यातल्या थ्रिलचे स्वप्न
त्यांनाही पडत असते गळ्याभोवतीच्या स्कार्फप्रमाणे
--- ००० ---

DECEMBER 15

तथाकथित धार्मिक वलय न लाभता वर्षानुवर्षे वाचनीय आणि जगण्याशी प्रस्तुत वाटत राहिलेली मराठीतली कविता कोणती वा कवी कोण ?

DECEMBER 14

झाडाच्या पानांमागे दडलेला
मनाचा एखादा छोटासा भाग
एखाद्या घटनेच्या वाऱ्याने उघडा पडला
तर भटकत्या मोर्च्यांना उकळ्या
का फुटाव्यात ? कुणीही कुणालाही
इतके का जोपासावे
फालतू ठरवण्यासाठी ?

मी कुठे पानांचे महत्त्व
माजवले होते ? की माझ्या
विचारांनी घातले होते खूप
एकावर एक कपडे ?

मी खजिल होण्याने कुणाच्या
आठवणींवरचे संकट

टळणार होते ? कुणाचे चारित्र्य
उजळणार होते ?
अपघाती पाने आणि
अनपेक्षित वारा, हे इतके
मौल्यवान का ठरावेत ?

आणि मुख्य म्हणजे मी तरी
हा उथळ विचार का करत राहावे
माझे भविष्य विसरून ?

माझे मन जर महत्त्वाचे नसेल तर
त्यांचे तरी का असावे ? की कुणाचेही
मन खोटेच असेल ?

--- ००० ---

राहुल म्हणताहेत की मोदींवर व्यक्तिगत आरोप आहेत –
पुराव्यांसह आहेत !
आणि ते असे आहेत की भूकंपच होणार आहे !
( म्हणजे सरकार पडेल की नुसती वादावादी होईल ? )
त्याचबरोबर राहुल म्हणताहेत की मोदी सरकारने
शेतकऱ्यांची कर्जे माफ केली पाहिजेत !
-- भूकंप होणार आहे तर ही मागणी त्यांच्याकडे कशाला ?
याचा मिळून अर्थ लावायचा तर
भूकंपाचा बार फुसका दिसतोय !

नागरीक जणू लॉन टेनिसचा सामना बघताहेत –
एकदा मान इकडे – एकदा तिकडे –
ते दोन्ही प्रतिस्पर्धी एकमेकांबद्दल एकच तक्रार करताहेत --
“ तो मला बोलु देत नाही “ --- “ तो मला बोलु देत नाही “

DECEMBER 13

या खिडकीचा मूड काय आहे
हे बाहेरच्या टॉवर्सच्या
ध्यानीमनी कसे असणार
खाजत्या तळहातांनी घेतलेले औषध
हे फक्त इथल्या अवकाशात
बदल घडवू शकणारेच असणार
त्याच्या भाषिक मर्यादेत

हे काही सत्य नव्हे
तरीही झोप आणू शकणारे
रक्त काढू शकणारे
औदासीन्यमय

याचा इतर कुणाला
त्रास होऊ नये
अशी कोणतीच व्यवस्था
शक्य नाही
खिडकीच्या
भावनिक रचनेत

सर्व असत्यांचे
इतर सर्व तशाच
पर्दानशीन घटनांवर
औषधांसारखेच प्रभाव

काळातून हे सर्व

वगळणे शक्य

आहे का – हाच फक्त प्रश्न

--- ००० ---

योजना यशस्वी व्हायची असेल तर आधी लीक होता कामा नये, कुणाला काही कळता कामा नये, अशा विचाराने जावे तर पळवाटा बुजवायच्या राहिल्यामुळे भ्रष्टाचारी लोक त्याचा फायदा उठवणार आणि तसे होऊ नये म्हणून आधीच पळवाटा बुजवायचा कार्यक्रम हाती घ्यावा तर माहिती आधी कळल्याने, भ्रष्टाचारी लोक त्याचा फायदा घेणार – असे एकूण दिसतेय हे चक्र !

सारांश, भ्रष्टाचाराविरुद्ध असा लढा इथे करत बसाल तर, तो लढा यशस्वी तर होणारच नाही पण, तुमच्या त्या लढ्यामुळे इतरच पडझड खूप होईल आणि पूर्ण देशच त्याचे परिणाम भोगेल – असे आहे हे भ्रष्टाचाऱ्यांचे नंदनवन ! साम-दाम-दंड-भेद यांमुळे आणि स्वार्थ साधण्याच्या इच्छेने इथली जनताही त्यांना सामील होणार ! – हे ओळखून, कोमट राहून, कसेबसे ढकलत राहा – हाच संदेश दिसतोय ! अति-तत्त्वनिष्ठा वगैरे नकोय !

चालु परिस्थितीवर येत असलेल्या भाष्यांमध्ये वरील भाष्याला जागा आहे की नाही ?

DECEMBER 11

आज मी ' नो पोस्ट डे ' साजरा करतोय !

DECEMBER 10

सोसायटीच्या सार्वजनिक जिममधली मशिनरी

सार्वजनिक विचारांसारखीच मोडकळलेली --

जरी आठवले नजिकच्या झाडांना जुन्या काळातले

स्टेशनकडे जाणारे टांगे तरी ते बिचारे

प्रत्येक घरातले वेगवेगळे प्रश्न

वाहायचे तसे वाहू देतात

शंभर फ्लॅटच्या चार इमारतींत चालु असतात

इज्जतीचे, नीती अनीतीचे निळेजांभळे

विषय आयुष्याला मुंग्या लागल्यासारखे
सांडपाण्याच्या पाईपांतून येणारी झुरळे
थेट जातात मुलाबाळांच्याही मेंदूंत

ऑफिसातून येताना गेटाजवळ झालेला
गृहीणीचा अपमान मिसळतो नवऱ्याच्या
प्रेयसीने त्याच्याकडे केलेल्या अनपेक्षित दुर्लक्षात
आणि ते एक कधीच न उलगडणारे मिश्रण
पसरते बाहेरच्या बागबगीचातही
चिकट, घुसमटवणारे आणि घामट

जलतरण तलावातले एकाकी पाणी
हसत खेळत सर्वांना सामावून घे्ण्यास उत्सुक
आणि क्लब हाऊस वाट पाहात राहते
ज्येष्ठ नागरिकांची मनांचे पत्ते पिसणाऱ्या

सरेलच हीही रात्र, या विश्वासाने
माणसे मधुर सुरावटींचे गजर लावतात
पुढचा दिवस सुरू करण्यासाठी खात्रीने --
--- ००० ---

आजच्या काळातल्या विस्कटलेल्या डोक्यांच्या आंतरभागाचा फोटो काढून समोर ठेवणारे नाटक ' अमर फोटो स्टुडिओ ' पाहिले.

नाटकाची रचनाही तुकड्यातुकड्यांची विषयाला साजेशी आहे. खास अशी गोष्टबिष्ट नाही. पण, दोन अंक धरून ठेवते नाटक. चांगला अभिनय, जोरदार संगीत, गाणी आणि नाचही आहेत. मनस्विनी लता रवींद्र हिचे हे नाटक निपुण धर्माधिकारीने नाट्यमाध्यमाच्या खुब्या वापरून चांगले बसवले आहे.

कोणत्याही काळात जाण्यायेण्याची फँटसी लोक सहज स्वीकारतात, हे नाटकाचे यश आहे !

नाटकाचा शेवट बराच लांबल्यासारखा वाटला.

असे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर येणे आणि ते स्वीकारले जाणे हे रंगभूमीच्या प्रगतीचे लक्षण वाटले !

DECEMBER 8

कोणत्याही माणसाचे ब्रेक्स फेल होऊन
ते सगळे तुझ्यावर धडकू शकते
हे असो किंवा अलग अलग मतांनी
माणूस चांगला वा वाईट वागणारच
हेही तुला पटणे असो --
तू राग, द्वेष जोपासू शकतोस
संघर्ष करू शकतोस पण कुणी
तुझ्यावर अन्याय केला
हे म्हणण्यात अर्थ नाही राहात

प्रतिक्रिया म्हणून रस्त्यांची नासधूसही
क्षम्य म्हणता येईल किंबहुना आता तूही
तसेच, न म्हणता येणारे, अन्यायही कुणावर
जमल्यास करू शकतोस

पण एक जखम घेऊन वर्षानुवर्षे तिचे उत्खनन
करत बसण्यात काय अर्थ आहे --
अमुक-तमुक कुणी वाईट होते, असे म्हणणेही
टिकणारे नाहीय

तू जो अन्याय करशील आता तो तू वाईट
असल्यामुळे, असेही वाटू शकेल – आता सर्वांनाच
माहीत असेल की हे कुणाच्याच हातात नाहीय –
असे ना तसे काही ना काही घडेल

म्हणून, द्वेष जोपासण्यापेक्षा तू क्रूर हो

शांतता अशक्य -- बाकीचे सगळे योगायोग समज
याहून जास्त योग्य वा न्यायाचे म्हणजे कसे जगणार
--- ००० ---

इथे बसून दिल्लीचे रेल्वे स्टेशन आठवते
याचा अर्थ झाडाच्या प्रत्येक पानावर
सत्याचा उद्गार कोरलेला आहे, असा नव्हे
स्नान करून पूजेला बसलेले लोक
विचारमुक्त असतात, असे नाही
सर्वांना वाटते मनातून की एकच
तत्त्व यावे अंमलात आणि सगळे
तुंबलेले ट्रक सुरू व्हावेत सहीसलामत
-- अशा तुकड्यांनी घडलेले चरित्र
कितीसे प्रवास करणार

मुळातच झोपी गेलेले सगळे चित्रकार
निसर्गाशी होते का एकनिष्ठ हे न विचारता
नुसत्याच त्यांना पायघड्या घालुन ठेवणे
म्हणजे मृत्यूपूर्वीच इंद्रधुनुष्य मोडण्यासारखे आहे
रंगांचे खेळ तर कल्पनेतही घडू शकतात
याचा अर्थ, काहीच नसण्याची शक्यताच
नसते, असे कसे म्हणता येईल

मनाला सवय असते अंधाराचे सातत्य
चालु ठेवण्याची कोणतेही करार
होत असताना वा पोलिसांच्या शिट्ट्या झुगारून
आईसक्रीम खात असताना
त्याला मागचेपुढचे काही देणेघेणे नसते
त्याच्या लेखी प्रेशर कुकर आणि सोफासेट

हे सारखेच असतात -- हे सर्व पाहता कोण म्हणू शकेल

की जग अपघातांनी चालते

-- मन हीच एक शिस्त नाहीय का अघोरी

--- ००० ---

DECEMBER 7

कुणी एक मित्र आपल्याशी बोलायचे थांबलाय, असे वाटणे -- मग, तसे काहीच नसल्याचे कळणे !

वेदना ही शहाणपणाची जननी --

मला माहीत असते प्रत्यक्ष

खऱ्या नसतात या वस्तू

पण, त्या खऱ्या असल्यासारख्याच

असतात माझ्या विचारात आणि बोलण्यात --

-- खऱ्या, माझा स्पर्श शक्य असलेल्या वस्तूही

खरे तर खऱ्या नसतातच --

मी त्यांना गृहीत धरतो --

त्या तशा का आहेत आणि मुळात

आहेतच का, हे मला माहीत नसते

आकाश एक वस्तू असते

तसाच मीही --

मला दुःख होते तेव्हा

मी असल्याचे मला कळते

-- भावते, जाणवते --

सूर्य ओघळत आकाशात

हळूहळू नष्ट होत अंधारतेय

हे जरी खरे नसले तरी

गळा चिरला जाणे म्हणजे काय, हे
आधी माहीत असायलाच लागते –

मग, माहीत असलेले तेच खरे
असे म्हणत मी माझे
माहीत असणे हीच एक
वस्तू म्हणून पाहू लागतो

ती कशी मला माहीत असणार
तिला मी नुसतीच खरी धरून चालतो –
--- ००० ---

एका मित्राने व्हाटसप वरचे एक वाक्य दाखवले -- जुन्या चालत नाहीत, नव्या मिळत नाहीत -- नोटा आणि मैत्रिणी !

अधीरपणे उमललेली कवटी
आकाशाकडे पाहते
तेव्हा चंद्राचे टोपण उडून
समुद्रात पडते

हलके हलके पुढे सरकणारी
माणसे उत्सुक कणसांसारखी
अवीट पोकळीत गारठत चाललेली
भविष्याची साल सोलत राहतात

एकदा विचारपूर्वक
दिलेली ऑर्डर
शिजवलेल्या घरांची
स्वीकारावीच लागणार
हात नसलेल्या

वेटरकडून

अंधाराचे पापुद्रे
काढून तळ
गाठण्याचे प्रयत्न
नेहमीच फसले आहेत

मनाची पोकळी धारदार
झाली तर ससे मरतात
नाही झाली तर कंटाळा येतो

त्यापेक्षा, पारदर्शी होण्यासाठी
तीव्र ताण निर्माण करावा, हेच बरे
--- ००० ---

DECEMBER 6

" बाबासाहेबांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवरून बौद्ध समाजास दिलेला बुद्ध हा विपश्यना, ध्यान, समाधी करणारा बुद्ध नसून तो समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान सांगणारा बुद्ध आहे. त्यांचा बुद्ध हा गूढवादी नसून तो बुद्धिवादी, प्रज्ञाशील आणि करुणामय समाजनिर्मितीचा भाष्यकार आहे " – बी. व्ही. जोंधळे, पुणे लोकसत्ता दिनांक ०६-१२-१६.
पूर्वी एका जाणकारांच्या भाषणात असेही ऐकले होते की बाबासाहेबांच्या बुद्धात ' निर्वाण ' ही संकल्पना वगळलेली आहे. आजच्या धकाधकीच्या आणि प्रचंड ताणतणावांच्या जगण्यात आणि ध्यानाचे महत्त्व शास्त्रीय दृष्ट्याही मान्य झालेले असण्याच्या काळात, यावर कुणी अधिक प्रकाश टाकला तर बरे होईल.

अनेक कविता आणि काही गंभीर चर्चा हे माझ्या वॉलचे वैशिष्ट्य म्हणता येईल.
पण, त्याचबरोबर, त्यावर उतारा म्हणून, मी काही हलक्याफुलक्या, मजेच्या
वा खास वेगळ्या वाटाव्यात अशा पोष्टीही देत असतो.
त्यामुळे, माझ्या कविता सहन केल्या जायला काही हरकत नसावी.
आणि ज्यांना त्या नको असतील ते त्या टाळू शकतातच की !

आजचे खास बातमी शीर्षक -- पुणे मटा --
'अटक न करण्यासाठी लाच घेताना अटक. '

शब्द जिवंत असल्याचे पाहून
कवी दचकला
आता त्यांचीही मर्जी
संभाळावी लागणार की काय
या विचाराने झाडांचे धाबे दणाणले
झाडांच्या सावल्या
हेच तर लहरते सत्य
होते कवीच्या मेंदूत

शब्दांचे रागलोभ
आणि आवडीनिवडी
यांनी त्यांचा वापर फारच
आकुंचन पावणार होता

त्यांचे अर्थ न दुखवताही
कवी त्यांच्या सावल्या
खूप मोठ्या करू शके

प्रेम या शब्दाची झालर
अंधाराचा मंडप
मांजराचा उजेड
विरहाची तलवार
असे काहीहीअटळ झाल्यास
कवितेचा जन्म
कोंदटून जाणार होता

अनिश्चितता हवीच

कवितेत

--- ००० ---

DECEMBER 5

काहीच माहीत नसणारी रात्र

म्हणजे एक दिवास्वप्न

पायाच्या अंगठ्याच्या

नखाला पडलेले

अर्थ लावणाऱ्यांच्या गल्लीत

होता एक म्हातारा न्हावी

त्याने अशी कित्येक स्वप्ने

शोषून घेतलेली होती

बाहेर टाकण्यासाठी

तोंडातून अर्थांसह अंगारा

आपापली स्वप्ने लोक

पिशवीतून आणत

उपडी करत मग सर्व

मनःस्थिती गुप्त बैठकीत

त्यानंतर सरळ, सत्य

जगण्याच्या जंगलात

सोडून दिले जाई एकेकाच्या स्वप्नाला

मध्यरात्री दहीभातासह

त्यावर कुंकू-बुक्का

टाकून त्याचे भवितव्य
समजून-उमजून आणि जाणून-बुजून

स्वप्न सरपटत निघून जाई झाडाझुडुपात, मग
स्वप्नाचा मालक स्वप्नाचा अर्थ घेऊन घरी जाई

--- ००० ---

बऱ्याच काळापूर्वी, कुणा एकाच्या शर्टावर उगवलेला
सूर्य पाहतोय वादात आसन्नमरण रोजीरोटी

कुणी केले हे असे, विचारतोय एक पाय तुटका सरडा
पाण्याच्या शोधात चुकून दारावर चढलेला लडखडत

युद्धापूर्वी थोडेच माहीत असते गर्दीपुढे
नेमके काय घडेल स्टेडियमवर धोक्याच्या

नेहमी तिथे येणारा एक कावळा म्हणतोय
चूक कुणाची हे नाही सांगता येणार – लाल

आकाशामुळे त्याला दिसेनासे झाल्याने आता
घाबरून तो तारेवरून रेल्वेमार्गाकडे उडालाय

दोन्ही विद्ध बाजूंनी होतोय विचार – तुटके
मोडके हातपाय पुन्हा प्रवाहात आणावेत की

आता धीराने रोग बळावण्याची वाट पाहावी
दमात उखडण्यासाठी घोंघावत्या माशांना

नाल्याकडेला काळ्या फडक्याने हातपायतोंड बांधून

टाकलेले प्रेत कोणती कहाणी सांगेल आता इतक्या उशिरा

पोलिसांना वा कुठेही फोन नाही करायचा, असेच ठरलेय त्या कुणा एकाचे --
कुत्र्यांनी चघळत प्रेताचे अवयव रस्त्यावर आणलेले दिसताहेत, तरीही
--- ००० ---

चित्रपट ' इश्क पर जोर नही ' ( मी पाहिलेला नाही. ) महंमद आणि लता.
गाणे ' ये दिल दिवाना है ' ! वा ! दिल दीवाना असण्याची आवर्तने ऐका ! हे ज्याला सुचले असेल तो जीनियस !
एकाच्याच तोंडूनही ती आवर्तने ऐकताना माणूस गुरफटून जाईल – इथे तर तो आणि ती –
दोघांचीही आवर्तने एकमेकांत मिसळताहेत ! प्रेमभावनेत बुडून बेभान होणे !
-- ये दिल दिवाना है, दिल तो दिवाना है, दीवाना दिल है ये, दिल दीवाना !
त्या वेळी, ऐकताना, या गाण्याला सलाम ठोकायचे राहून जाते – जरा वेळाने सलाम !

माझ्या घशातून जर बाहेर पडल्या चिमण्या
उद्विग्न दिसणाऱ्या तर त्यांना काचा खाऊ घाला
तुमच्या कडक माणुसकीपुढे चालवून नका घेऊ

म्हणा सरळ – हे चोचले चोचींबाहेर आले पुन्हा
तर मुरगाळून टाकू घरादारांचे वासे – प्रदीर्घ
संघर्षातून शिकलोय आम्ही हितसंवर्धनाचे पाठ

कधी कधी त्या त्यांचे पंख फुलपाखरांचे असल्याचे
भासवतील त्यांचे विचारही सुखस्वप्नांकडे नेणारे --
स्वतःचे शर्ट फाडा, केस उपटा पण नष्ट करा ते

आदिमानवापासून ते आज अखेरपर्यंत सर्व
संस्कृतींचे साभ्यास सार आहे तुमच्या नखांत
तुमच्या दातांखाली चिरडा बाकीचे सगळे

तुमचे हेतू शुद्ध आहेत, तुम्ही स्वर्ग हा शब्द
न वापरता आणणार आहात एक छान अविक्षेप
रूटीन – अव्हेरून करत बाकी सर्व महाल फोल

कोणतीही भावनिक समरूपता दगडमातीशी
अभिमान वा लोटांगण वा लुब्ध होणे स्मृतींवर
तुमच्या मार्गातले काटे असल्याचे तुम्ही जाणता

वेळ पडल्यास तुम्ही जगणेही त्यागायला तयार व्हाल
ठार कराल सर्व चिमण्या वा कोकिळा वा मोर
अंध असा की डोळस, न्यायाचे पाईक आहात –
--- ००० ---

DECEMBER 4

यश आणि सत्ता मिळवण्यासाठी
नम्र राहा !

नुसती ओळखही अत्युच्च पिचवर झाली
उघडलेले सर्व डोळे पाहातच राहिले
कधीच न पाहिलेल्या काळविटांचे चौखूर पळणे
रक्तातून अदृश्यपणे मोहाचे कारंजे उडत राहणे

असे घडण्यात पुढे काय काय असते या बाबतीत
मुळीच भानावर नसलेले मन शांतपणे बेफिकीर राहिले
हे क्षण तर निरुपद्रवी मांजरांप्रमाणे दबक्या
हातांनी स्पर्शणार होते हवे ते फक्त मनात

नंतरचे संपर्क वाऱ्यातून ढगात, ढगातून अरण्यात

आणि तिथून अपराधी भावांच्या तिजोरीत जात राहिले
आणि आश्चर्य म्हणजे झाकलेले किरण अचानक
दिसू लागले किलकिल्या खिडकीतून

आधीच अधीर असलेले मन तो प्रकाश पाहून
जलतरंगांचे तुषार झाले आणि विसरले
अभिव्यक्तीतला ओढून ताणून आणलेला संयम
मिळालेल्या जणू काही अलिप्त प्रतिसादात

इतक्या तीव्रतेतून काय होणार ?
उत्फुल्ल कमळांचे ताटवे आणि लौकरच मनातल्या
धगधगत्या सापांचे दंश ज्यांचा त्रास दोघांपैकी
कुणाला अधिक झाला ते कळूच नये, असे

आता हिंसेसह, जखमांसह मान्य झाले होते गोडीने
जगणे – मधून मधून – मनाला मिळू लागले होते
त्याचे नेहमीचे असह्य संघर्षमय असणे –
--- ००० ---

DECEMBER 3

The Trap
Poem by Nicanor Parra - Poem Hunter
poemhunter.com
मागे एकदा मी तुम्हाला फेर्नांडो पेसोआची ‘ द टोबॅको किओस्क ‘ म्हणजे ‘ एक तंबाखू टपरी ‘ ही एक जागतिक महत्वाताची कविता वाचायची शिफारस केली होती. त्याचप्रमाणे आज आणखी एका महान कवितेबद्दल सांगतोय. अशा कविता भरभर वाचून संपवायच्या नसतात, हे एक, आणि या कविता अनेकदा वाचायच्या असतात, हे दुसरे, समजून घ्यायला हवे. अशी एक कविता एकदा वाचणे म्हणजे इतर शंभर कविता शंभरदा वाचणे !
आज सांगतोय ती कविता आहे, निकॅनोर पारा या ग्रेट कवीची ‘ द ट्रॅप ‘ म्हणजे ‘ एक सापळा ‘ ही !

वाचून तर बघा – त्या कवितेची ही लिंक घ्या –

http://www.poemhunter.com/poem/the-trap-2/

मला ग्रेट वाटले म्हणून सांगतोय – हा काही कसला प्रचार वगैरे नाहीय –

( मी फेसबुकवर लोकांना बोअर करणे थांबवावे, असा सल्ला मिळालेला असल्याने हा खुलासा. )

एकाने आत्मसन्मानासाठी
स्वतःचे घर पाडले – दुसऱ्याने
थोडे बिघडलेले पाहून कॅनॉल बंद केला
तिसऱ्याच्या लक्षात आली अनिश्चितता
तो दुकान बंद करून निघूनच गेला

मुळात आहेत किती आपले म्हणावेत असे
तरीही, माझ्या एकट्याच्या आठवणींनी
भरून जाईल कचराकुंडी – भटकी कुत्री
बागडतील खुश होऊन माझे सुटे अवयव
सहज मिळालेले पाहून

खरे तर त्यांच्याप्रमाणेच मी माझ्याही
नाटकांचे सर्व प्रयोग रद्द करून
घरी आलोय आणि नाटक करत बसलोय
मुलाबाळाकुटुंबियांत खेळण्याचे
मनातले गंजलेले पत्रे शाबूत राहण्यासाठी

यातून येणारा मुख्य प्रश्न कोणता
तर घाण पाण्यात एक सडलेले प्रेत होऊन
कंगाल आयुष्य जगण्याचा आणि हे पाहून
इतर अनेक हितशत्रूंनी जातायेता लचके
तोडण्याचा आणि आपल्या सर्व प्रतिमा
विच्छिन्न होऊन रक्तबंबाळ होण्याचा

यावर शक्य उपाय एकच वाटतोय – मन तर
वापरता यावे पण वापरणारा मी नसला पाहिजे
-- असेल का असे काही शक्य ?
--- ००० ---

प्रतिकविता लिहिणारा निकॅनोर पारा त्याचे कवितावाचन झाल्यावर मोठ्याने उद्गारायचा –
ऐका -- इतका वेळ मी जे काय वाचले वा बोललो ते सगळे मी मागे घेत आहे !

पण, हा माझा अंतिम शब्द ऐका :
मी म्हटलेले सगळे मागे घेतोय.
जगातल्या सर्वात महान कटुतेसह
मी म्हटलेले सगळे मागे घेतोय.

But listen to my last word:
I take back everything I've said.
With the greatest bitterness in the world
I take back everything I've said.

DECEMBER 2

वितरणाची उत्तम यंत्रणा असलेल्या कुणाही प्रकाशकांसाठी ---

माझा सुमारे पाच कवितासंग्रहांचा मजकूर तयार आहे. ते सर्व प्रकाशित करण्याची इच्छा आहे.
प्रिय मित्र, प्रख्यात चित्रकार प्रकाश बाळ जोशी Prakash Bal Joshi यांनी निव्वळ प्रेमापोटी काढून दिलेली मुखपृष्ठ चित्रे तयार आहेत. या संग्रहांतल्या तीन संग्रहांचा मजकूर युनिकोड मध्ये टाईप करून तयार आहे आणि दोनांचा आय-लीपमध्ये तयार आहे. प्रकाशनासाठी लागणारी निम्मी गुंतवणूक करायला मी तयार आहे. माझ्या अटी खालीलप्रमाणे असतील –

१. हे सर्व संग्रह मी अंतिम मसुदे तयार करेन त्याप्रमाणेच निघतील. यात कुणाही प्राध्यापकाचा वा समीक्षकाचा सल्ला चालणार नाही.

२. माझे काही मित्र या कवितांवर काही लिहू इच्छितात – त्यांनी स्वतःचे अग्रक्रम संभाळून खरेच तसे काही लिहिले तर त्या लेखांची एक वेगळी पुस्तिका वा पुस्तक नंतर काढण्यात येईल. त्यातही माझी निम्मी गुंतवणूक असेल.

३. हे सर्व संग्रह, माझ्या इतर सर्व लेखनाप्रमाणेच, माझ्या वेबसाईटवर मोफत उपलब्ध ठेवले जातील.

४. वितरणाची पूर्ण जबाबदारी प्रकाशकाची असेल.

५. यासाठीच्या कोणत्याही मार्केटिंगमध्ये माझा सहभाग असणार नाही.

६. माझे मानधन परस्पर समजुतीने ठरवता येईल. ते शून्यही चालेल.

७. ठरल्यापासून तीन महिन्यांत हे काम पूर्ण व्हायला हवे.

वरील सर्व मजकूर मान्य असलेल्या आणि वितरणाची स्वतःची चांगली यंत्रणा असलेल्या कुणाही प्रकाशकाने माझ्याशी ९३७१००५७७३ या मोबाईलवर संपर्क साधावा, ही विनंती.

-- तसेच धर्म, जात, भाषा, विचारसरणी यांचेही किनारे --

घड्याळ खूप उपयोगीच असते
रोज रूटीनवरची धूळ झटकायला
कोणते कपडे किती वर्षांपूर्वीचे आहेत
हे नेमके आठवत नसले तरीही
अन्न जातच असते पोटात, ज्ञानकण डोक्यात
शिळ्या रक्तात अविरत सतत भिनत

कवितेने याचाच एक भाग असण्यात
अर्थच काय असणार ? कितीही फिल्टर झाली
तरी दारू ती दारूच असणार सतत हवीशी

शब्द आणि ओळी यांतून कवितेने
संपताच, बाहेर पडायला हवे
अर्थबंद असण्याची सवय मोडीत काढल्याचे

स्पष्ट दाखवत स्वतःची सर्व वस्त्रे
टाकून निघून जायला हवे

कितीही उंची संगमरवर असला
तरी त्याला चिकटलेल्या स्मृती
दृष्टीत चिकटा आणतातच
आणि विसरतेच बुबुळातले रक्त
पिल्यांच्या जखमा जणू निर्ढावत
काही घडलेच नव्हते अशा

कोणत्याही एकाच कवितेचेही
असायलाच हवे हे असे जगणे –
अर्थबाह्य दिसावा घटना नसलेला
विश्वातला सखोल मूलभूत नकार --
--- ००० ---

DECEMBER 1

टीव्ही वार्तांकनबहाद्दर शक्य तो सगळे कव्हर करणारे !
काल ते कामाठीपुरा इथल्या सेक्स वर्कर्सच्या ( याला मराठीत आलाय का काही वेगळा शब्द ? अन्यथा, जी वेश्यावस्ती म्हटली जाते ) वस्तीत गेले आणि त्यांना त्यांनी विचारले –
“ नोटाबंदीमुळे व्यवसायावर काही परिणाम झालाय का ?
सुटे पैसे नसल्याने काही त्रास होतो का ? “
त्यांतली एक म्हणाली –
“ आयुष्यात चढ-उतार तर असणारच –
संकटे येतात-जातात –
आपण तेवढे सहन करायला हवे ! “
एकूणात तिथे काही कुणाचा रोष वा प्रतिकार नाहीय, हे पाहिल्यावरच
त्या कॅमेरामनसह असणाऱ्या निवेदकाचे समाधान झाले !

भारत-बंद सगळीकडे फेल गेला, हे स्पष्ट झाले !

देशोदेशींचे पर्यटक कधीही
त्याच्या व्हरांड्यात येत-राहात-जात
त्याची करमणूक होई – विशेषतः त्यांतल्या
बऱ्याच स्त्रिया खुल्या, मोकळ्या असत, त्यामुळे --

त्याच्या उंबरठ्यावर अनेकदा
एखादे वर्तमानपत्र पडलेले असे
जे बऱ्याचदा न वाचताच विलीन
होई काळाच्या उदरात पुन्हा कधीतरी
वेगळ्या रूपात वाफ होऊन बरसण्यासाठी

त्याच्या अटी सोप्या असत –
उगीचच इकडच्या-तिकडच्या प्रथा
सांगत बसायचे नाही आणि सारखे
इथले बसरूट विचारत बसायचे नाही --
आपले आपण घ्यायचे समजून गरजेचे
पराकाष्ठेबाबतचे स्तोम न माजवता

त्याने स्वतः ना कोणता देश पाहिला
ना कधी इथला ताजमहाल उष्टावला

तो उदास वा निराश होता, असेही नाही
टापटीप कपडे घालुन तो संध्याकाळी
हळू आवाजात एखादे गाणे गुणगुणे
मग ते गाणे उदासीचे का असे ना

त्याला खिशात जास्त तपशील नको असत

इतकेच

--- ००० ---

मनाचे प्रेशर मोजण्यासाठी
पेट्रोल पंपावर गेलो तर तिथे
ही ऽ ऽ गर्दी उसळलेली --
सगळ्यांच्या अडीअडचणींना
तेच तर होते आशास्थान

एका उंचवट्यावर उभा राहून
मी सर्वांना म्हणालो
तुमची मते तुम्हाला लखलाभ
पण, प्रत्येक वेळी आपण असे
प्यायला पेट्रोल मागू लागलो
तर ते कितीसे पुरे पडेल --
आपल्या मतांना आपल्याला
मुरड घालावीच लागेल

हे काही कुणाला पटले नाही
प्रेशर असणारच एवढेच नव्हे
तर ते लागणारच नुसते उभे
राहायलासुद्धा
असे म्हणत त्यांनी माझ्याशीच
हुज्जत घातली तासंतास

मी थकत होतो आणि वयही वाढत होते
स्मरण सगळे ओसंडून वाहात होते
तरीही ते बधले नाहीत --
मग मात्र माझाही नाइलाज होत चालला

मी घर, दार, माणसे विसरत चाललो --

निसर्गानेच शेवटी हा सुटकेचा मार्ग दिला

--- ००० ---

सहा विद्वान सत्याच्या शोधात

राज्यसभा या चॅनेलवरच्या ‘ सरोकार ‘ या कार्यक्रमात एक चर्चा ऐकली. दहा हजार चर्चा ज्या चर्चेवरून ओवाळून टाकाव्यात अशी चर्चा. या चर्चेच्या क्लिप्स जितके लोक पाहतील तितकी देशातली समज वाढेल. या चर्चेतले विद्वान खरोखरचे विद्वान होते आणि खूपच समजुतदार आणि एकमेकांचे ऐकून घेण्याची कुवत असलेले होते. सूत्रसंचालन करणाऱ्या बाईही विद्वानच होत्या. अशी चर्चा मी टीव्हीवर कधीच ऐकली नव्हती. आपापली मते नुसती गोंजारत बसणाऱ्या सर्वांसाठीच ही एक उद्बोधक चर्चा झाली. याची क्लिप कुठे असते का ते मला माहीत नाही, पण, असल्यास इथे जरूर शेयर करावी. या चर्चेचा विषय होता --

Politics of post-truth म्हणजे उत्तर-सत्याचे राजकारण ! म्हणजे खोटेपणाचे राजकारण, समजा !

वा रे वा ! दिल खुश हुवा ! विद्वानांच्या चर्चेतून ‘ सत्य ‘ म्हणजे काय, हे कळण्याची शक्यता नव्हतीच, पण, तो विषय जो चहू बाजूंनी ढवळला गेला ते मला खूपच आवडले ! ती चर्चा ट्रंप यांचे निवडून येणे, यावर मुख्यतः केंद्रित होती, पण, मधून मधून मोदींचे सरकार निवडून येणे, यावरही बोलले जात होते. ही पूर्ण चर्चा विद्यार्थ्यांच्या एका गटासमोर चालली होती. विद्यार्थीही नम्र, एकाग्रतेने ऐकणारे आणि भारी होते ! त्यांचे प्रश्न उत्तम होते !

जमल्यास मिळवून ऐका ! ये बार बार नही होता !

November 2016

NOVEMBER 30

तुझ्या बोलण्याला मी शुभ्र

तत्त्व समजणार जरी माझा

आख्खा पोल्ट्री फार्म

चिकनगुनियात विराम

पावला असला तरी –

मी मर्यादितच आहे
खोटाच आहे
पण तुझी शुभ्रता
मी हाणून पाडणार

माझे अध्वर्यूही तुझ्यासारखेच
दिखाऊ ब्रँड अँबॅसॅडर आहेत
हे मी जाणतो पण ते खूपच
शक्तिमान आहेत
यू आर नथिंग

तू न बोलणे बरे
नाही तरी तुझ्या बोलण्याने
कोण पुन्हा जिवंत होणार आहे ?
आणि तुला काय पडलेय ?
उचल तुझी पाण्याची बाटली
आणि चालु पड

कुणी ना कुणी दुखावले जातेय
तुझ्यामुळे -- मौन पाळ
जाहिरातीचे पैसे मिळताहेत
म्हणून अंगावरचे कपडे नको विकूस
नष्ट होशील --
--- ००० ---

इथून आता माघार ? शक्य तरी आहे का ?
आता हे तडीला नेणेच शहाणपणाचे आहे !

NOVEMBER 29

माझ्या शाळकरी वयात आम्ही मालाडला आणि माझी मावशी विलेपारल्याला, असे होते. माझा मावसभाऊ हा माझ्या निवडक मित्रांपैकी एक होता. त्यांच्या शेजारीच एका बऱ्यापैकी श्रीमंत कुटुंबाचा बंगला होता. बंगल्याभोवती मोठी मोकळी जागा, जामची झाडे वगैरे असलेला. त्या कुटुंबातल्या मुलांशी माझ्या मावसभावाची मैत्री होती. त्यामुळे, माझेही तिकडे जाणे व्हायचे. त्या कुटुंबातल्या मोठ्या मुलाने, जो आमच्यापेक्षा बराच मोठा होता, ' काला बाजार ' हा सिनेमा यायच्या आधीच त्याच्या गाण्यांच्या तबकड्या आणल्या होत्या ! हे प्रचंड सनसनाटी होते ! त्या ऐकण्याच्या कार्यक्रमाचे आम्ही पहिले लाभधारक होतो ! यामुळे शाळेतल्या मित्रांत काही दिवस मी एक स्पेशल माणूस होतो !

हे आठवायचे कारण, खरेच, आवडतेच मला हिंदी चित्रपटसंगीत ! माझे वडील शास्त्रीय संगीताचे भोक्ते आणि अभ्यासकही होते – ते गातही असत. ते म्हणत की या हिंदी गाण्यांच्या हजारपट समृद्ध आहे शास्त्रीय संगीत ! मलाही ते पटते, मी तेही अनेकदा तन्मय होऊन ऐकतो. तरीही, हिंदी चित्रपट गीतांचे महत्त्व काही कधी कमी वाटले नाही. याचे कारण काय असावे याचा विचार करता मला एक दिसते, ते असे की या गाण्यांमध्ये प्रचंड नाट्य आहे आणि त्याचेच मला खूप आकर्षण असणार. सुमारे ५५ ते ७०-७५ चा काळ हा या गाण्यांचा सुवर्णकाळ होता ! मी अभ्यासही गाणी ऐकत ( होता आमच्याकडे एक सेकंड हँड रेडिओ ! ) करत असे. बिनाका आणि नंतर सिबाका गीतमाला चुकणे म्हणजे प्राणसंकट वाटत असे ! अमीन सयानी हे खास आपले वाटत ! त्या काळात संगीतकारही एकापेक्षा एक भारी होते. शेकडो चाली – प्रचंड वैविध्य आणि तरलता, गोडवा, आक्रमण – सगळे ! शंकर-जयकिशन, एस. डी. बर्मन, सलील चौधरी, मदनमोहन, रवी, रोशन, चित्रगुप्त, गुलाम महंमद, नौशाद आणि ओ. पी. नय्यर ! सगळेच ग्रेट ! अजूनही मी ती गाणी जमेल तेव्हा ऐकतो. त्या वेळी प्रत्येक गाण्याचे सगळे तपशील – कुणी म्हटलेय, चित्रित कुणावर झालेय, वगैरे सगळे पाठ असत ! माझे दोन इंजिनियर आतेभाऊ आहेत – जे आपापल्या क्षेत्रात अद्वितीय ठरले – त्यांना तर ते सगळे अजूनही जसेच्या तसे पाठ आहे ! कोणता चित्रपट कोणत्या साली आला होता – यासह !

आताची गाणी, जगण्याला आलेल्या वेगामुळे सपाट झालेली वाटतात ! बडवत बसणे चाललेय नुसते, असे वाटते. त्यात नाट्यही फारसे दिसत नाही. प्रत्येक मागची पिढी असेच म्हणते, असे नाही म्हणता येणार. आजच्या पिढीचा विषय घेऊन लिहिलेले माझे एक नाटक हिंदीत अनुवाद होऊन मुंबईत झाले तेव्हा पूर्ण प्रेक्षक मुंबईतल्या मिश्र तरुण-तरुणींचा होता आणि त्या सर्वांना ते नाटक त्यांचे वाटले – खूप आवडले ! मी पुढच्या पिढीशीही जोडलेला आहे. असो.

हिंदी चित्रपट संगीत आणि त्यातले नाट्य अमर आहे !

--- ००० ---

सततच कुणाची ना कुणाची हेटाळणी करत राहावेसे वाटणे हे न्यूनगंड, पराभूतता आणि वैफल्य यांचे लक्षण आहे.

वाघ ही काय आपल्या नेहमीच्या
वापरातली बाब थोडीच असते ?
तरीही आपण फिनेलने खोली साफ
केल्याच्या आत्मविश्वासाने
बोलतोच ना स्वतःच्या यशाबद्दल ?

तीच सवलत आपण आपल्या
एकाकीपणाला का नाही देत ?
हवेत भिरकावून थेट हातावर
ओढून घेतलेल्या भोवऱ्याप्रमाणे
आपल्या घराचे सर्व अंतःस्थ हेतू
आपण बंद शेल्फमध्ये न ठेवता
एखाद्या उत्तान पोस्टरवर
टांगून का नाही ठेवत ?

कारण स्पष्ट आहे – आपण घाबरतो
आपण घाबरतो रूटीनलाच
रोज डबा उघडून भाजी कोणती
आहे हे पाहण्याला आणि त्यापेक्षा
सरळ नॉनव्हेजच हवे होते
या विचारालाही – कारण काहीच
आपल्याला आपल्या अंगाला
लावून घ्यायचे नसते

आपण ठरवलेले वेगळे होते
झालेले खूपच वेगळे आहे

पण आपले नाव तर झालेय
वाघामुळे असो की एकाकीपणामुळे

--- ००० ---

NOVEMBER 28

मानवी अनुभव हेच तर कलेचे अंगप्रत्यंग असते.
मग, कलेतली सर्जकता म्हणजे काय ?

रक्तवाहिन्या आक्रसल्याचा
अस्वस्थपणा वाकवतो वय
खिडकीखाली उभ्या उभ्या
पिपाणी वाजवणारा बैल
दैवयोगाने मारतो डोळा
एकट्या कोकिळेला

वाटते की हाच तो सुखाचा क्षण
वाटते की आता मसाला दूध
पितील पाण्यातली बदके
आणि होईल मालामाल
संकटमोचन मंदिर

पण वाळवी लागलेल्या घराशी
धड लळाही न लावणाऱ्या
नियतीने स्टेपलर मारून
आयुष्य जखडून ठेवलेले

काहीही कारण पुरते
मन मुरगळले जायला आणि

डोळ्यांत पाणी यायला

ॲंटि-ॲलर्जिक गोळीमुळेच
होत असणार कुंड्यांतल्या
झाडांना स्किझोफ्रेनिया
एरवी मुकी बिचारी
उभी असतात जातायेता
सिग्नल देत शुभशकुनाचा
--- ००० ---

कलेतली अलिप्तता

The Four Noble Truths is the basis of Buddhism. The First Truth is that all life is suffering, pain, and misery. The Second Truth is that this suffering is caused by selfish craving and personal desire. The Third Truth is that this selfish craving can be overcome. The Fourth Truth is that the way to overcome this misery is through the Eightfold Path.

This is what he discovered: there is an end to suffering; it can happen to anybody, anywhere, here and now; and the key to ending all suffering is to remove all desire, ill will and ignorance.
यालाच बुद्धाने ' निर्वाण ' म्हटलेले आहे.

आता हे जर बुद्धाचे सार असेल तर आपण असे म्हणणार का की बुद्ध बेफिकिरी आणि असंवेदनशीलता शिकवतोय ? तुझा तू हो दुःखमुक्त, मरू देत बाकीचे – हा आहे का याचा अर्थ ?

त्याचप्रमाणे कलेतली अलिप्तता समजून घ्यावी लागेल. कलावंत काही एखादा धर्मसंस्थापक वा संत नसतो. गुन्हेगारांच्या हातूनही उत्तम कलाकृती निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष कलानिर्मितीच्या वेळी तो व्यक्तिगत पूर्वग्रहांतून मोकळा असतो, हा त्याचा अर्थ आहे. त्याचे आत्मकेंद्र कार्यरत नसल्याने त्याचा संवेदनशीलतेचा आवाका अमर्याद असतो. ही क्रूर

बेफिकिरी नसून जिवंत सहानुभूती असते. धंद्यासाठी निर्माण होणारी करमणुकीची कला वा पठडीतला बोध देत राहणारी रटाळ कला यांत ही वैशिष्ट्ये नसतात.

तत्त्वज्ञानाचा वा धर्माचा अभ्यास, विचार करण्याकडे कल नसलेले बरेच असतात. त्यांच्यासाठी मौल्यवान कला ते काम करत असते. व्यक्तिगत वैचारिक साच्यातून जगणे म्हणजे विदीर्ण मनाचे जगणे – ते हिंसक आणि संघर्षमयच असणे भाग असते. तो फक्त स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न असतो. त्यातून होणारी प्रत्येक कृती ही असंवेदनशील आणि बेफिकीर असते. कलानिर्मितीही.

याउलट, सर्जक कलावंताची अलिप्तता ही अमर्याद मानवी मूल्याने ओतप्रोत असते.

( समाजाच्या दृष्टीने व्यक्ती म्हणून तो कलावंत कसाही, काहीही असो. )

कलेत अलिप्तता असणे म्हणजे पूर्वग्रहदूषितता नसणे.

धर्मवादी वा जातीवादी वा विचारसरणीवादी माणूस मौल्यवान कलाकृती निर्माण करू शकत नाही.

एरवी व्यवहारात तो तसा असला तरी मौल्यवान कलानिर्मितीच्या वेळी तो तसा नसतो.

जगण्याला मानवी मूल्यात्मकतेचा स्पर्श देणारे कला हे एक माध्यम आहे.

--- 000 ---

NOVEMBER 27

मी कधी कधी असणारा असतो
तर बरे झाले असते
हे असे सततच पडद्यावर
सिनेमासारखे झेंडे उडवणे
माझ्या नसांवर ताण आणते

किंवा हा डोंगर झाला असता
मधेच गायब किंवा झाला असता
माझ्या बालपणातली हॉकीस्टिक
तरी थोडा संवाद साधू शकलो असतो
मी माझ्या पाळलेल्या कुत्र्याशी आणि

माझ्या अत्यंत आवडत्या
दरबारी कानडाशी

पण मला घ्यावा लागतो सूड
माझ्या सतत असण्याचा
विचारमग्न पाहात
बुद्धाला दिसलेली सर्व आव्हाने

मग मी एसी लावतो, अत्तर लावतो
खूप मऊ गाद्याउशांवर पडतो
किंचित गुंगी यावी म्हणून
आजूबाजूला शांततेत बुडवलेली
पांघरुणे घेतो

आणि हलकेच सुरू करतो प्रयत्न
असण्याचे प्रश्न टाळण्याचा आणि
झोप विसरण्याचा – ती येणार नाही हे ओळखून
--- ००० ---

एका ' आजच्या ' प्रेमकवितेचा शेवट --
I would die for you
but I don't have the time...

NOVEMBER 26

डाव्या विचारसरणीचा म्हणून माहीत असलेला कवीही कसा
वैचारिकतेच्या आणि व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडून
एक व्यापक भानाची कविता लिहितो, हे पाहायचे असेल तर
यंदाच्या ‘ मौज ‘ दिवाळी अंकातली, सतीश काळसेकर यांची

‘ चिवट चिमण्या ‘ ही कविता पाहावी.

कवितेचे प्रयोजन

अनेक कवी त्यांच्या कवितालेखनाचे अनेक वेगवेगळे हेतू सांगतात. आपण इथे त्या सर्वच गोष्टी सामावल्या जाव्यात अशा दृष्टीने पाहू. कवितांचे तीन प्रकार दिसतात – समोर एखादे साध्य असलेल्या कविता, सुखदुःख व्यक्त करणाऱ्या कविता आणि समग्र भान देणाऱ्या कविता. या तिन्ही प्रकरांतल्या चांगल्या कविता विचारात घेऊन खालील वर्णने वाचावीत --

साध्य

काही कविता विशिष्ट साध्यासाठी लिहिल्या जातात. साध्य हे वैचारिक असते. एकरेषीय असणे हे विचाराचे वैशिष्ट्य या कवितांची मर्यादा असते. या कविता माहितीरूप गद्य संपर्काच्या आसपास कार्यरत असतात. देशभक्ती, धार्मिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, जाति-अंत, समता, सामाजिक-राजकीय परिवर्तन – असे काही साध्य या कवितांसमोर असते. या अर्थाने त्या उपयुक्ततावादी असतात.
आदर्श-निष्ठेची भावनिकता असली तरी आशय ठरलेला असल्यामुळे त्या एकसुरी होतात. हा एकसुरीपणा त्यांच्या ध्वनिप्रक्रियेतही असतो. साध्यच महत्त्वाचे वाटत असल्याने त्यांना अशा या रटाळपणाची पर्वा नसते. मानवी जगण्यातल्या सखोल गुंतागुंतीच्या आशयाशी त्यांना काही देणेघेणे नसते. त्यामुळे, आशयघनता खूपच कमी असते. सखोल समावेशकतेच्या अभावामुळे आवाकाच तुटपुंजा असतो.

सुखदुःख

या प्रकारच्या कविता कवींचे व्यक्तिगत सुखदुःख व्यक्त करणाऱ्या असतात. त्यामुळे, भावनिकही असतात. यांत खूप वैविध्य असू शकते. अभिव्यक्तींचे, रचनांचेही अनेक प्रकार असतात. अलंकरणाच्या, चमत्कृतीच्या, प्रतिमा-प्रतीकांच्या शक्यताही खूप असतात. त्यामुळे, सामान्यतः ‘ साध्य ‘ प्रकारातील कवितांपेक्षा या कविता खूपच इंटरेस्टिंग असतात. आशयदृष्ट्याही अधिक समृद्ध असतात. यांचा वाचकवर्ग अधिक व्यापक आणि संमिश्र असू शकतो. या सर्वच माणसांना संबोधित करतात. पुनःप्रत्ययाचा आनंद, भावनांचे विरेचन, अनुभव-समृद्धी या गोष्टी अशा कवितांतून मिळतात. तरीही, व्यक्तिगततेच्या मर्यादेत त्यांची कृती चालत असल्याने, इथेही मानवी जगण्यातल्या सखोल, समावेशक आशयाचा अभावच असतो.

भान

या कविता सखोल, समावेशक भान देणाऱ्या असतात. त्यांना अमुक विचाराची वा अमुक भावनेची मर्यादा नसते. आवाका व्यापक असतो. एकरेषीयता नसते. सूचकतेचे प्रमाण खूप असते. ' सांगून संपणे ' नसल्याने आणि कवीच्या मतरूप आशय-मर्यादा नसल्याने नित्यनूतनता असते. वरील दोन्ही प्रकारांत असणारी प्रतिक्रियारूपता नसल्याने भावनिकता कमी असते. अनुभवात्मक कच्चा माल जरी कवीच्या जगण्यातून येत असला तरी कवीला त्यातल्या गुंतागुंतीचे समग्र भान घेणे महत्त्वाचे वाटत असते. कोणत्याही निष्कर्षाकडे पोचायचे नसते. या कविता क्षणोक्षणी जगण्याचे पूर्ण भान देत असल्याने आशय-समृद्ध असतात. शब्द, भाषा, रचना यांच्यांतल्या अनंत वैविध्याला इथे वाव असतो.

वरील तिन्हींमध्ये, तिसरा प्रकार माणसाला पराकोटीची संवेदनशीलता आणि परिपक्वता बहाल करणारा असतो. या अर्थाने हा प्रकार सर्वोच्च श्रेयस्कर आणि सांस्कृतिक दृष्ट्या मौल्यवान असतो. वरील तिन्ही प्रकारांतल्या सर्वच कविता, या ना त्या प्रकारात घट्ट बसणाऱ्या असतात, असे नाही. प्रकारांची थोडीफार सरमिसळ होऊ शकते. कवीला नकळतही ' वेगळे ' काही घडू शकते.

--- 000 ---

NOVEMBER 25

कवितेला कविनिरपेक्ष अस्तित्व असते.
आधी कवीला समजून घ्या, मग कविता -- याची गरज नसते.

मी हादरलोच जेव्हा तो म्हणाला की राम
हा एक रोबो होता – सगळे आधीच तयार होते
पितृ आज्ञा, वनवास, मारिचाच्या मागे जाणे,
पत्नी वियोग, शोध, युद्ध, जिंकणे, पत्नीबद्दल
संशय व्यक्त होताच अमुक, मग तमुक, वगैरे –
तो एक नियमबद्ध रोबो होता –

स्वतःचे काहीच नव्हते त्याचे – आकाशात उमटेल
तसे बाण चालवणे होते फक्त – तो रोबोच तर होता

त्याचे म्हणणे, माणूस नाही असू शकत असा
नुसतेच मळके कपडे धूत बसणारा – एवढा पराक्रमी
असून दुसरी स्त्री कुणी आवडलीच नाही ? मनाचा
गोंधळ झालाच नाही ? हे असे का, माझ्यावर
का म्हणून अन्याय – असे काही वाटलेच नाही ?

त्याचे म्हणणे, रामाचे उदाहरण माणसाला देऊन
उपयोगच नाही – मनात कणभरही पाप न येता
आकर्षक स्त्रियांकडे पाहू शकतो का माणूस ?
माणूस तर अनिश्चित असतो, इच्छामय, वासनामय
असतो, तो संयम पाळू शकेलच याची
मुळीच गॅरंटी नसते – आपले जे आहे ते आहे का
बरोबर, योग्य, न्याय्य, अहिंसक, दुसऱ्याची स्पेस
मान्य करणारे – हे तो नाही सांगू शकत –

त्याने केलेले माणसाचे वर्णन मला फिट्ट लागू
पडत होते आणि त्यालाही – असेही रोबो
घडू शकत असतीलच ना ? काहीसे अतर्क्य ?
--- ००० ---

NOVEMBER 24

एकाच्या यशासाठी दुसऱ्याच्या अपयशाचा
खूप उपयोग असणे
हा मानवी जगण्यातला एक मोठा बिकट प्रश्न आहे --

shared a memory.

वाघांची जोपासना समजा पर्यावरण रक्षणात येते -- त्याचप्रमाणे भटक्या कुत्र्यांची जोपासना कशात येते ? त्यांच्या २०-२० सभासदांच्या टोळ्या अनेक रस्त्यांवर फिरत असतात. रात्रीच्या वेळी दुचाक्यांचा पाठलाग करून अपघात घडवतात आणि

मुख्य म्हणजे रेबीजसारख्या घातक रोगाला अनेक बळी पाडतात. दयातत्त्व हवेच पण तेच तत्त्व नागरिकांच्या बाबतीतही लागू असायला हवे. हवे तर लोक ' भटकी कुत्री संगोपन कर ' देतील पण हा प्रश्न टोटली निकालात काढला गेला पाहिजे. यात काय असे मोठे प्रॉब्लेम्स आहेत की ज्यांमुळे हा प्रश्न मिटवणे अशक्य बनावे ? लोकांच्या जिवांवर उदार असणारे हे धोरण एकीकडे आणि लोकांची काळजी घेण्यासाठी हेल्मेट-सक्ती एकीकडे -- या सगळ्यातले काय असेल गूढ ?

NOVEMBER 23

कविता चहूबाजूंनी वेढली जात सर्वांगांनी पूर्ण व्यक्त व्हावी.
तसे झाले की ती मनाच्या पकडीतून सुटून बाहेरच पडते.
तिच्याकडे लांबून पाहता येते.
ती खरी सर्जक कविता !
ती ताणतणाव फेकून देणारी असते --
( याचे स्पष्टीकरण वगैरे नाही -- )

आता काही वर्षे मी असेन
या खेड्यात संध्याकाळी
निर्मनुष्य रेल्वे स्टेशनवर

निघून जाणाऱ्या गाडीच्या
मागे उडत जाणारे कागद
पाहात माझे संथवेगी विचार

आज उलट गाडीतली गच्च
भरलेली माणसे असतील विचारात
कशी राहात असतील ही माणसे

अशा घटनाहीन खेड्यात
जे पूर्वी येई माझ्या डोक्यात
आता तर मी पिकातल्या

पानावरची हिरवीगार
अळी चरत राहणारी संथ
चाललेला काळ सुन्न

बाराव्या मजल्यावरचे
माझे घर इथे कुठे पडलेय
येऊन घटनांच्या ओघात

इथला गार वारा पाहतोय
सांगू काही मला मुळीच
ऐकायची इच्छा नसलेले
--- ००० ---

माझा मुलगा एका बँकेत नोटा बदलायला गेला तेव्हा आधीच त्याच्या नावच्या दोन नोंदी दिसल्या होत्या, त्याबद्दल इथे मी एक पोस्ट दिली होती. पुढील हकीगत अशी – दुसऱ्या दिवशी तो बँकेकडे तक्रार पत्र द्यायला गेला. तेव्हा त्यांनी त्याला दाखवून दिले की त्यांच्याकडूनच त्या तांत्रिक चुका झाल्या होत्या. अमुक ओळखपत्र दाखवले की ती नोंद दोनदा येत होती. तरीही, मुलाने, तक्रार घ्या आणि हेच तुमचे उत्तर द्या, असे म्हटले. तिथले शाखाप्रमुख म्हणाले की तक्रारीने उगीचच गुंतागुंत होईल, आमच्या वरच्या ऑफीसबरोबर पत्रव्यवहार वाढेल – त्या चुकून अधिक आलेल्या नोंदी काढल्या आहेत, तर आता पत्र नका देऊ. मुलाने त्यांना माझ्याशी बोलायला सांगितले. मी म्हटले, ठीक आहे, तक्रार नाही देत, पण, आमच्या सेफ्टीसाठी तुम्हीच एक पत्र द्या आणि त्यात, एकदाच नोटाबदल केला आहे हे स्पष्ट करा.
आज त्या बँकेने तसे पत्र दिले आहे, त्यामुळे, तो प्रश्न मिटला आहे.
त्या चुका फक्त त्यांच्या बँकेच्या नोंदींतच घडल्या होत्या. भारतभर अशा नोंदी करणारी ती यंत्रणा असेल, असे वाटले होते. तसे काही नाहीय. असो. तो प्रश्न मिटला आहे.

NOVEMBER 22

कधी वाऱ्याने
पाने मंजुळ हलतील
कधी पडतील, उडतील
खोटे नाहीच काही
मनाची मनालाच
तीव्र सुखकेंद्री
वासनामय आसक्ती

ज्ञात चढउतार
इंद्रियगम्य तसेच
नात्यातलेही
मुलायम स्पर्श
मधुर श्वास
तरीही, अचानक
अपघात घडताच
मानापमानांचे तुंबळ
विध्वंस परस्परांना
मान्य असलेले

आधी ठरलेले
काहीच नाही सगळेच
नवीन सदोदित
सर्वव्यापी साधे
मग्न विसरून
सर्व जखमा

पदरावर फुले
न कोमेजणारी
--- ००० ---

‘ आँखों पे भरोसा मत कर ’ हे ‘ डिटेक्टिव्ह ’ मधले गाणे मी बारा वर्षांचा असताना अनेकदा ऐकले होते.

त्या काळात मी सारखा आजारी असायचो.

त्यामुळे, त्या गाण्याबरोबर माझ्या तेव्हाच्या आजारपणाचा मूडही चिकटलेला आहे.

आता मला ते गाणे त्या आजारपणाच्या मूडशिवाय ऐकायचे आहे, तर जमतच नाहीय !

कशासाठी ऐकायचेय आता ते तो मूड वगळून ?

तर माझी स्मृती माझे ऐकणारी का नसावी – हे पाहण्यासाठी, समजा !

आणि आवडतेय, तर शुद्ध ते गाणे ऐकावे, असेही वाटतेच !

कळतेय – स्वतःच्या स्मृतीवरही कवडीचा ताबा नसलेले तुरुंगी जगणे ! –

-- कुणी म्हणेल, कशाला एका किरकोळ गाण्यासाठी एवढा विचार ?

किरकोळ आणि फार महत्वास्चे, असा फरक तरी कितपत असतो जगण्यात

-- हाही प्रश्न आहेच !

मंगळ आणि पारंबी
यांचे नाते असू शकते, तर
कासव आणि विमा पॉलिसी
यांचे का नसावे ?
त्यामुळेच मला
तुझे ओठ आवडतात
आभासी

माझ्या संगणक टेबलाशी
बसून करतो मी हजार विचार
हे सगळेच का नसावे
संबंधित – तुझ्यासह सर्व मिळून ?
मी फ्लुने त्रस्त आहे
म्हणून हे सगळे अराजक
का ठरावे ?

मी आक्रमक होणे

हे असेलही विश्वबाह्य

पण विश्वातच तर

फुटतेय ते

ज्वालामुखी बनून

न झेपलेले सगळे असंख्य

टाळण्यासाठी आपण जणू

स्वबाह्य समजतोय

शिकारीची सर्व सावजे --

फाटक्या आकाशाला आपण

विचारांची ठिगळे लावतोय

--- ००० ---

NOVEMBER 21

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मी ' मनोहर ' मासिकाच्या टीममध्ये होतो. त्या वेळी मी ' सहशिक्षण ' या विषयावर अनेक विद्वानांच्या मुलाखती घेऊन एक मोठा लेख तयार केला होता. त्या लेखाबरोबर चित्रकार प्रभाकर काटे यांची अनेक अन्वर्थक चित्रे होती. त्या वेळी एक विद्वान असे म्हणाले होते की वयाच्या पंचविशीपर्यंत मुलामुलींनी एकमेकांकडे पाहताही कामा नये. मी त्यांना, अमुक मानसशास्त्रज्ञ असे म्हणतो, असा काही प्रश्न विचारताच ते माझ्यावर खवळले होते. सांगायचा हेतू हा की माणसाचे मन हा प्रकार मुळीच समजून न घेता सामाजिक, नैतिक, कलेच्या आणि संस्कृतीच्या क्षेत्रात बेधडक मतप्रदर्शन करणारे लोक समाजात नेहमीच राहात आलेले आहेत. मराठी व्यावसायिक नाटक कित्येक वर्षे समाजमान्य नैतिकतेचे धडे प्रेक्षकांना गिरवून देत होते. खानोलकरांच्या कादंबरीला कृती ऐवजी विकृतिप्रधान आणि ' न-नैतिक ' कादंबरी म्हणणारे आपले विचारवंत आणि पुढे ज्ञानपीठ विजेते झालेले नेमाडे त्याच पठडीतले म्हणायला हवेत. याचे मूळ आश्रमधर्माच्या कल्पनेत तर नसेल, अशी मला शंका येते. ब्रम्हचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि सन्यास या आश्रमधर्माप्रमाणे असू-वागू शकते का माणसाचे मन ? तसे नाही असू शकत, हे सत्य आहे. नेमाड्यांना कृती आणि विकृती यांतला फरक सांगता येईल, ही मुळीच शक्यता नाही. तरीही सगळे रेटून बोलत असतात. अजूनही, माणसाचे मन वाढत्या वयाबरोबर अमुक प्रकारे सामान्यतः आणि नॉर्मलीच अधिकाधिक नैतिक होत जाते, अशा बावळट कल्पना जोपासणारे बरेच लोक दिसतात. एखाद्याने नव्वदाव्या वर्षी प्रेमकविता लिहिली किंवा लैंगिक काही लिहिले तर म्हातारा बहकलाय, चळलाय किंवा निर्लज्ज झालाय, असे वाटणारे बरेच लोक दिसतात. माणसाच्या लैंगिक प्रेरणा तो मरेपर्यंत नष्ट होत नाहीत, हे शास्त्रीय सत्य

आहे. आणि लैंगिक प्रेरणा म्हणजे केवळ मुले जन्माला घालण्याची क्षमता नव्हे. हे काहीही न समजणारे लोक अभिव्यक्तिस्वातंत्र्य प्रचंड धोक्यात आणत असतात. पण, हा भाग बराचसा प्रतिकारहीन, दुर्लक्षितच राहतो. नॉर्मल म्हणजे अविकृत मन आणि विकृत मन यांतला फरक सांगता येईल ? अविकृत मन हे खरे तर वदतो व्याघाताचे ( contradiction in terms ) उदाहरण आहे. मनाच्या विकृती या व्यक्त होत असतात वा दडपल्या जात असतात.

कोणत्याही स्वतंत्र कलावंताला समाजातल्या असल्या हेकट कल्पना फेकून देणे भाग असते.
तसल्या अपेक्षांना बळी पडला तर तो खोटारडा, खुजा कलावंत होतो.
कोण काय म्हणेल, या विचाराने ज्याचा थरकाप होतो, अशाने कलाक्षेत्रात येणे निरर्थक आहे.

फट म्हणा की दरी की घळ
की अरुंद अवकाश की पोकळी
की भेग
तुमच्या सुप्त मनातून
पाझरेल सतत तेवत्या
दिव्याचा प्रकाश
जो बसेल तुमच्या खुर्चीवर
परवानगीशिवाय

तो म्हणेल की नुसते
कॉलम्स तर उभे करतोय
इमारत तुम्हीच घडवायचीय

तुम्हाला असते संगीताची
आवड जीवनरक्षक
खडूसारखी

तुम्ही दगडाची त्वचा
कशी बदलणार

काही गोष्टी नसतात शक्य

कबूल करते तुमचे मन

ऑरेंज पिता पिता

तुम्ही कपडे उतरवून मारा उडी

बेधडक मागे न पाहता

विचार निरुपयोगी आहे हे ओळखून

--- ००० ---

NOVEMBER 20

कुठल्या विषयावरच्या चर्चेत काय अनपेक्षित सापडेल, हे सांगता येत नाही. काल नोटाबंदीवरच्या चर्चेत एका चर्चिकाने असे सांगितले की आता एका महत्त्वाच्या विषयावर शास्त्रीय संशोधन चालु आहे. तो विषय म्हणजे – माणसाचा मेंदू, बेकायदेशीर वागून आपल्याकडे पैशाचा संचय करावा असा निर्णय घेतोच कशामुळे – काय घडते मेंदूत ?

-- यावरचा एक काल्पनिक संवाद --

उजवा – कळला ना संशोधनाचा विषय ?

डावा – होय, पण, मी बहुतेक विरोध करेन याला –

उजवा – का ?

डावा – अन्यायाची, विषमतेची कारणे अशी शारीरिक लेव्हलवर ( स्तरावर ) शोधून एकूण पुरोगामी विचारांचा पायाच उखडण्याचा डाव दिसतोय मला यात – हे तुम्हा उजव्यांचे कारस्थान आहे –

उजवा – अरे, पण, भौतिकच आहे ना सगळे ? मग, भौतिक संशोधन करण्यात काय चूक आहे ?

डावा – तसे नाही – माणसाचे विचारस्वातंत्र्य मान्य करून कुणाला तरी दोषी ठरवता आले पाहिजे –

उजवा – पण, विचारस्वातंत्र्य असूनही मेंदू असा का वागतो मग ?

डावा – हा खूप गुंतागुंतीचा विषय आहे – मला यावर खूप अभ्यास करावा लागेल –

उजवा – मग तोवर चालु राहू दे ना संशोधन ?

डावा – एक वर्षभराने बोलु यावर – नीट अभ्यास करूनच बोलायला हवे –

उजवा – ठीक, चल, आपल्या दोघांच्याही मेंदूंना तरतरी आणणारा चहा पिऊ मस्त --

डावा – हं --

--- 000 ---

आत्मप्रौढीने जगणे म्हणजे
अनेक गोष्टींबाबतच्या कडवटपणाचे विष मनात जोपासत
हळूहळू आत्महत्या करणे.

NOVEMBER 19

Mumbai ePaper| Mid-day e-Paper
epaper2.mid-day.com
आजच्या Sunday Mid Day मध्ये मी लिहिलेल्या
' ढोलताशे ' या नाटकावर वर आलेल्या
सुमेधा रायकर-म्हात्रे लिखित लेखाची लिंक --

https://www.google.co.in/amp/m.mid-day.com/amp/articles/sumedha-raikar-mhatre-hushed-prayers/17770178?client=ms-android-ckt&espv=1

भक्तांची विद्वत्ता असो की द्वेष्ट्यांची
दोन्ही सारखीच सदोष आणि चुकीची असणे भाग असते !
भक्ती आणि द्वेष हे दोन्ही आकलनातले अडथळे असतात !
तिसरी शक्यता अस्तित्वातच न ठेवणे
हे या दोघांचेही प्रयत्न असतात !
त्यामुळे,
बिनविद्वान, सामान्य जनतेला
यांतलीच कोणती तरी एक बाजू पकडून
एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न करत राहणे भाग असते !
यातूनही विकास होत राहतो !
जनता चांगल्या जगण्याची स्वप्ने पाहू शकते !

त्यातही, विशेष म्हणजे, सर्वांनाच ही खात्री असते की आपण
निःपक्षपाती, विचारी आणि मानवी हिताचे उपासक आहोत !

कुदळी, फावडी, कोयते, खुरपी
हे होतेच सगळे शिवाय अधिक प्रागतिकही
बरेच होते मंडन करणारे स्वमतांचे
जग चांगले चालण्यासाठीच्या
पद्धतींबाबतच्या

कुणी सिगरेटी ओढणारे होते
कुणी सतत तोबरा भरलेले
सर्वांची मते अर्धवटच असली तरी
त्यातले उच्च नशेचे कोणते
हे ठरवायचे होते

शांतता शक्यच नव्हती
कारण अभ्यासू, हुशार आणि
दूरदृष्टीच्या लोकांची
वक्तृत्वकला धारदार होती

पाठीराखे बरेचसे नासमझ
असल्याने ते बसून असत
मस्त मंडपात दुपारी
झोपही काढत

इकडे कितीही आरडाओरडा
चालु देत राहात सगळे धूर्तमानव
कारण त्यांच्या निर्णायक हिकमती

वेगळ्याच असत

लोकही कुणाचे बरोबर याची फार काळजी करत नसत

--- ००० ---

सतत कुजके वा उपरोधिक बोलणे, आपल्याशी सहमत न होणाऱ्यांना क्षुद्र लेखणे, सारखे कुत्सित, छद्मी हसणे
-- हे प्रकार कुणाला जास्त वापरावे लागतात ?
मतांच्या मांडणीत पुरेसे तथ्य असलेल्याला की पुरेसे तथ्य नसलेल्याला ?

मुळात किती मृत्यू, अशी संख्यात्मक तुलना करणेच चुकीचे आहे.
कारणे अतिभिन्न असताना तर आणखीनच चुकीचे आहे.
आणि अतिरेक्यांमुळे प्राणास मुकलेले आत्तापर्यंतचे
एकूण भारतीय का नाही बघत ? एकाच ठिकाणचे का ?

अतिरेक्यांच्या कारवायांना आळा बसणार आहे, हे पटतेय की नाही,
हा प्रश्नही महत्त्वाचा आहेच.

NOVEMBER 18

स्टिफन हॉकिंग्ज म्हणताहेत की पृथ्वीचे आयुष्य आता फक्त एक हजार वर्षेच शिल्लक आहे.
माणसाने आता दुसरा एखादा वस्तीयोग्य ग्रह शोधून तिकडे स्थलांतर करायला हवे.
तसे समजा ट्रंप यांनी सर्वात आधी जमवले एखाद्या ग्रहावर
तर त्या ग्रहावर त्यांच्यानंतर येणाऱ्यांना ते स्थलांतरित म्हणणार !
म्हणजे --
कुठेही जायचे असेल तर ट्रंपांच्या आधी जायला हवे, हाच याचा सारांश !

shared Sumedha Raikar's video.
उद्याचा ' मिड डे ' बघा --

मातीयुक्त प्रचंड सोसाट्याचा वारा
घरांवरचे पत्रे आकाशात
खूप धडपड
जुना क्षण वा पुढचा क्षण
आत्ता जगण्यात आणण्याची
त्या वाऱ्याहून बिघडवणारी
रक्तप्रवाह आणि ठोके हृद्याचे

विजांच्या गदरोळात
कळतेय भीतीची तीव्रता
वाढत चाललेली

टेबलावरचे पेन हलतेय
कागद् अनिश्चित फडफडताहेत
जवळची सर्व माणसे
स्मृतीरूप थडग्यांतून
येताहेत बाहेर एकटेपणाला
आधार म्हणून पण उलट
रस्ते होताहेत ओलेचिंब
रक्ताने

याविरुद्धचे मानसिक वादळ
हाताबाहेर चाललेले
काहीही घडेल
काहीही घडेल

असे म्हणत डोळे

विस्फारलेले

--- ००० ---

एका रात्री रस्त्यावरच्या एका दिव्याखाली निरुद्देश
उभा होतो रहदारी बघत तर एक झुळुक वाटली
सुखद – पण, निघून गेली – तिला नाही आवडले
मी तिच्या सुखाने आसक्त होणे

नंतर मात्र मी माझी सर्व हत्यारे म्यान करून
वाट पाहात राहिलो – आणि आश्चर्य ! – पुन्हा
आली संधी खूप काळाने – आता मात्र मी सावध
संयमी, समंजस, हळुवार, इतरच आजूबाजूचे
बोलणारा झालो – हे कदाचित समजूनही
ती वाहात राहिली – तिला क्रम नव्हता मोडायचा
मी मोडलो असतो तरी चालले असते – हे स्पष्टच होते

झुळुक स्वतंत्र थोडीच असते ? ती असते माझ्या
विचाराचा एक आयाम – आता मात्र हे माझेच
विचार – तिच्या नियमांत बसल्याने ज्यांत
तीही हळूहळू, नकळत आणि कळून सवरून सामील

मी म्हणजे तिचाही एक आयामच तिच्या विचाराचा
आता न खटकणारा –

वेडीच म्हणावी लागेल ती कारण नियम पाळता पाळता
पुढे ते मोडलेही गेले तरीही ती सामीलच राहिली –

आता तिची वस्त्रे झाली नियमबाह्य – तिची दृष्टी नितळ
प्रेमभऱ्या अंगाने तिने माझ्या आकाशाला कवटाळले

नव्हे, तिने सरळच, विचाराचा एक आयाम म्हणून
सुखमय प्रेमच मान्य केले –

--- ००० ---

NOVEMBER 17

नोटाबंदीचा निर्णय बरोबर की चूक, यातून अपेक्षित परिणाम कितपत साध्य होणार आहेत, या निर्णयाची माहिती बाहेर न फुटता, याच्या अंमलबजावणीची अधिक चांगली व्यवस्था करता आली असती का – हे प्रश्न असणारच एवढ्या मोठ्या देशात हिंमतीने एवढे मोठे काही करताना. लोकांना त्रास सहन करावा लागतो आहे, अनेक अडचणी येत आहेत, बरेच व्यवहार थांबलेले आहेत, हेही खरेच आहे. तरीही, एकूण जनता या निर्णयाच्या पाठीशी उभी आहे – यातून दिसणाऱ्या चांगल्या शक्यता जनतेला महत्त्वाच्या वाटत आहेत, हे स्पष्टच दिसते आहे. खूप रोष, भडका, उद्रेक असे कुठे काही फारसे दिसत नाही. याचाच अर्थ, खूप मोठ्या प्रमाणात सरकारने जनतेला स्वतःबरोबर सामील करून घेतलेले आहे. अशा परिस्थितीत विरोधकांनी काय करावे ? सरकारला निर्विवाद यश मिळू द्यावे ? आणखी एक मोदी लाट येऊ द्यावी ? असा आत्मघातकीपणा टाळायचा प्रयत्न त्यांना करावाच लागणार ! सगळ्यांनी जिवंत राहून , ‘ टिकून ‘ देशाचे भलेबुरे काय व्हायचे ते होवो, असेच होणार -- आणि ते साहजिकच आहे. भडकून बोलणे, कुचेष्टा करणे असे सगळे विरोधकांना करणे भागच आहे ! एवढ्या मोठ्या कार्यक्रमात कुठेतरी मोठा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणारच – तसे झाल्यास, ती संधी हातून जाऊ नये, या इच्छेत त्यांना राहावेच लागणार !

माणसाचे मन जसे नेहमीच द्विधा असते तसेच देशाचेही मन द्विधा असणारच !

खूप आहे गोंधळ वापरलेल्या
कंडोम्सने भरत चाललेल्या
बागांचा, सभागृहांचा, बाजारांचा

आता आठवणी नाही तारणार
स्वप्नांच्या रोगराईपासून
आता विचारांचे ताफे झालेत

म्यूझियम्समधले उभे

सशस्त्र सैनिक ज्यांना
भूकच नाही लागत

अद्वातद्वा ओसंडलेले
ढगांचे स्वयंसेवक नग्न
भराभर उत्तरे देणारे

आता अकस्मात काहीच नाही
घडणार मारामारी वा खूनही
ते सर्व आहेच आता

असण्याच्या पोतडीत
गोधडीप्रमाणे शिवलेल्या
सतत कार्याच्या पवित्र्यात

काही घडण्यातला सनसनाटीपणाच
संपल्याने आता उरलाय फक्त
जमेल तेवढा तर्क

--- ००० ---

NOVEMBER 16

हे नुसते वाचून सोडून दिले तरी चालेल -- खरेखोटे ज्याचे त्याने पाहावे --

"I must add... my gratitude to you for the attention with which you have listened to me, for, from my numerous observations, our Liberals are never capable of letting anyone else have a conviction of his own without at once meeting their opponent with abuse or even something worse."
― Fyodor Dostoyevsky, The Idiot

साध्या मराठीत --

" आणखी एक मला सांगायलाच हवे – तुम्ही ज्या लक्षपूर्वकतेने माझे ऐकलेत त्याबद्दल मी कृतज्ञ आहे – कारण, मला असंख्य वेळा असे दिसून आलेले आहे की आपले जे उदारमतवादी असतात ना त्यांची हे समजून घ्यायची कुवतच नसते की दुसऱ्या एखाद्याला त्याची स्वतःची एक वेगळी निष्ठा असू शकते – खात्री असू शकते – त्यामुळे, कधीही ते ताबडतोब त्यांच्या विरोधकाला अपशब्द वापरायला सुरुवात करतात किंवा त्याहून वाईट काही करू पाहतात. "
-- फ्योदोर दोस्तोवस्की, ' द इडियट '.

' मी ' -- ' मी ' म्हणतोय ना -- ते फालतू, निरर्थक, फसवणारे, ढोंगीपणाचे, आपमतलबी, निर्बुद्ध आणि अहंकाराचे आहे, म्हणून ! ते तसेच आहे, मग ! वाद शक्यच नाहीय ! खलास !

भाषेत खेळणाऱ्या माझ्यासारख्याला निवृत्तीची गरज नाही. ' बरा वेळ जातो तुमचा, छान लावून घेतलाय तुम्ही छंद ! ' -- हे ऐकून घेणे, हा लेखकासाठी सर्वात मोठा अपमान असतो, तेवढा मात्र सहन करावा लागतो. मुद्दाम कुणी असे करत नाही, त्यांना चांगलेच बोलायचे असते !

सारखेच कशाच्या ना कशाच्या विरोधात असणारा माणूस स्वतःला सारखेच दुःखात असण्याची सवय लावून घेतो.
बुद्धाने सांगितलेला दुःखमुक्तीचा विषयही त्याला पटत नाही वा टिंगलीचा वाटतो.
फार तर लाजेकाजेस्तव तो कधी कधी गप्प बसू शकतो, इतकेच !

तुझा आवाज
तापलेल्या इमारतीतून
खडबडीत डोंगरावरून घरंगळत
पोचतो माझ्यापर्यंत
तेव्हा काय करायचे
हे मी ठरवलेले आहे

मी नुसता ध्वनी ऐकतो
आणि त्यातले आक्रमण

देतो फेकून दिशाहीन

उपग्रहाप्रमाणे

पण तुला वाटते की मी

खूप दुखावला गेलो असेन

एकटा पडून

तू एक बालिश धूर आहेस

तुझी सवय कळल्यावर

इतरांच्या दृष्टीने तू

मृत्यूच पावतोस

तुला नकळत

तुझा रोजचा तोच तोच

उत्साह पाहून कंटाळतात

तुझे विरोधक

पण सहजीवनाचा विचार

करत पोहायला जातात

वर्षानुवर्षे तू डुंबत राहतोस तुझ्या अविश्रांत हुशारीत रानोमाळ

--- ००० ---

NOVEMBER 15

shared Girish Patke's photo.

माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक --

या टीमने माझे हे नाटक सखोल उंचीवर नेऊन अमर केले ! ज्यांनी पाहिले ते अजूनही दिलखुलास बोलतात या नाटकाबद्दल !

प्रत्येक अणूत

असते त्याचे जगणे

त्याचे सहचर

त्याच्या घडू

शकणाऱ्या सर्व

घटना पुनरावृत्त

होऊ शकणाऱ्या

एका सफेद वस्त्रात

लपेटलेले शव

अज्ञात असले तरीही

त्याची सर्व वटवाघुळे

लोंबत असतात

त्याचे हर्ष-खेद

बनून नवे जुने

म्हणूनच कविता

कुठूनही होऊ शकते

सुरू आणि जाऊ शकते

कवीच्या अज्ञातात

जरी अणू ज्ञात

असला तरी

कवीच्या स्पर्शाने

शब्दार्थ नम्र होतात

ताबा सोडत अणूवरचा

तेव्हा कविता लिहून झालेली असते

--- ००० ---

माझ्या मुलाचा आत्ताच फोन आला होता – तो एका बँकेत नोटा बदलायला गेला होता – तर तिथे त्याच्या ड्रायव्हिंग लायसन्सवर आणि पॅन कार्डावर आधीच नोटाबदल झाला असल्याचे आढळले ! त्याला आधार कार्डावर नोटा बदलुन मिळाल्या !

-- याचा अर्थ आपण पूर्वीच कुठे ना कुठे दिलेल्या झेरॉक्सचे गैरवापर होत आहेत ! यावर आपण सावधगिरी तरी काय बाळगणार ?

NOVEMBER 14

कोणतीही लाजिरवाणी फुले बहरू शकतात मनात
हे माहीत असूनही मन करते करारी दगडफेक
हवालदिल, भयग्रस्त आणि दिङमूढ

जे जे नको म्हटले ते ते सगळे
हवेतल्या गारठ्याप्रमाणे मातच करत जाते –
वाटते, अंगावर खूप पाली चिकटलेल्या असून
त्यांसहच जगणे भाग आहे

मन कुणाला सांगत वा दाखवत नाही
स्वतःला स्वतःमुळेच रोज होणाऱ्या जखमा --
कागदावर भिंगाने केंद्रित सूर्याप्रमाणे
रोज भोके पडत राहतात

हळूहळू याचीही सवय होते
तरीही प्रत्येक वेळी नवे दाह घेऊन
आकाश करपत राहते

कोमेजणे सतत लपवलेले

नासवते सगळे संबंध
कुणालाही नकळत
रूटीन हिंसा सवयीची करत
जणू सगळे अकस्मात आणि ताबाहीन

तापाने फणफणलेल्या
मनाला कळते
आपण नसलेला एखादा क्षण तरी
अवतरायला हवा

--- ००० ---

तिच्या मोठ्या टिकलीतून बाहेर पडत
अव्याहत गरजणारे संतापी किडे --
ती नेहमीच घट्ट बांधलेली असे एका
सायकल दुकानाशी तिच्या
स्वेच्छेच्या ओढणीने

लोकांना वाटे ही एक नादिष्ट
स्त्री आहे नुसतेच ढगांपल्याड
तिच्या नजरेचे किरण फेकणारी
कारण तिच्या विचारविश्वातून
कधीच येत नसत पाण्याचे झरे

तिची तळमळ उमटे लोकांच्या
हातरुमालांवर साध्या सरळ
तरीही रंगीबेरंगी पोषाखांना
कंटाळा येई रोजच्या रोज होणाऱ्या
तिच्या सेक्सी आक्रमणांचा हिंसक

लोकांना भीतीही वाटे की न जाणो
तिचे साथीदार खरोखरच आपल्याला
उदंड धन देणार असले तर
आपले इतरत्र व्यग्र राहणे --
आपल्या पाळीव प्राण्यांचीच काळजी
घेत राहणे --
यांमुळे आपले भविष्य अंधारणार तर नाही

मग लोक तिच्या रागाऐवजी तिच्या
सौंदर्याकडे बघायचे ठरवत निरलसपणे

--- ००० ---

रोजच्या रोज, कोणत्या ना कोणत्या विषयावरून आरडाओरडा करत लोकांचे मेंदू भंजाळून टाकणे आणि वैचारिक भडिमार करून लोकांना मानसिक रक्तबंबाळ करत राहणे – हा लोकांच्या जिवांशी खेळ नाही होत ? की लोकांनाच नीट जगता येण्यासाठी ही एक अत्यावश्यक हिंसा मानावी ?
-- की या टीव्ही चॅनेल्सपेक्षा छापील माध्यमेच बरी म्हणावे ?

नोटाबंदीचा मूळ निर्णयच चुकीचा आहे, त्याची उद्दिष्टे खोटी आहेत किंवा त्यातून सत्ताधाऱ्यांना वेगळाच काही स्वार्थ साधायचा आहे – असे तर फारसे कुणी बोलत नाहीय. असे निर्णय आपल्याकडे यापूर्वीही घेतले गेले होते आणि परदेशांतही घेतले गेले होते. मग प्रश्न काय येतोय ? अंमलबजावणीतल्या अडचणी आणि त्यामुळे जनतेला होणारा त्रास, हाच. हे काम जर देशहिताचे आहे असे पटत असेल तर विरोधकांनी अडचणींचे भांडवल करण्यापेक्षा त्यांवर मात करायला सरकारला मदत का करू नये ? लोकांना संयम राखायला सांगणे, रांगेतल्या लोकांसाठी चहा, पाणी, अन्न यांची व्यवस्था करणे, अशी कामे विरोधकांना करता येतील. की मूळ निर्णयच देशाची वाट लावण्याच्या हेतूनेच घेतला आहे, असे विरोधकांना वाटतेय ? जर हा प्रयत्न सर्वांनाच देशहिताचा वाटत असेल तर त्याच्या कामात अडथळे आणण्यापेक्षा, सर्वांनी एक होऊन काम करायला काय हरकत आहे ?

NOVEMBER 13

मी लिहिलेल्या ' नाणेफेक ' या नाटकावर

डॉ. वि. भा. देशपांडे यांचा लेख

पुणे लोकमत दि. ०६-११-१६ ( पूर्वार्ध )

पुणे लोकमत दि. १३-११-१६ ( उत्तरार्ध )

-- दोन्ही रविवार --

शक्य त्यांनी वाचावा.

इथे देण्यासाठी लिंक सापडल्या नाहीत.

भारताच्या राजकीय क्षेत्रातला, इथल्या जनतेने, वेळात वेळ काढून का असे ना,

प्रचंड उत्सुकता बाळगावी असा सध्याचा विषय म्हणजे –

शरद पवार आणि राहुल गांधी यांच्यांत, मोदी या अति-महत्त्वाच्या विषयावरच

जर इतके मूलभूत स्वरूपाचे मतभेद असतील

तर ते एकत्र राहणार कसे ?

जाणता राजाही स्तुती करतोय म्हटल्यावर

बाकीच्या नगण्य लोकांनी कुठल्या तरी कोपऱ्यात बसून

काही ना काही पॉईंट काढत किरकिर करणे आणि

बोटे मोडत बसणे आता नुसते निरर्थकच नव्हे तर

केविलवाणेही होऊन बसलेले आहे !

कालच गुगलने सांगितले होते की गेल्या काही दशकांत दिसला नाही एवढा मोठा चंद्र काल-आज दिसतो आहे !

काल माझ्याकडून तो पाहायचा राहिला होता – आज पाहिला ! सुंदर !

नोटाबदल, जातपात, विचारसरण्या आणि एकमेकांचे द्वेष क्षणभर बाजूला ठेवून पाहावा असा नजारा आहे !

त्याच्या आकारातला फरक मला विशेष जाणवला नाही, पण,

या निमित्ताने लक्ष गेले, हीच किती महान गोष्ट आहे !

पूर्ण विश्व एकत्रितपणे परस्पर चालु आहे, याची आपल्याला जाणीव राहो, हीच सदिच्छा !

NOVEMBER 12

' प्रत्येक मत हे पूर्वग्रह दूषितच असते ' यावर विचार व्हावा -- कोणत्याही मतधारकाने हेकट होणे, हे लोकशाहीला घातक आहे !

प्रसंगी आपली मते बाजूला ठेवता येण्याची क्षमता हीच लोकशाहीची परिपक्वता !

गाढ्या विद्वानांचेही एकमत होत नाही, हे समजून घ्यायला हवे !

एका मुख्य प्रश्नावर फारसे कुणी बोलत नाहीय –

दोन-अडीच लाखांच्या वरची रोख रक्कम कुठून आली याची चौकशी होणार आहे, हे ठीक.

पण, तेवढ्या रकमेच्या वर असणाऱ्या जमिनी, इमारती, फ्लॅटस, शेयर्स, सोने, हिरे, उद्योगधंदे, वगैरे – हे सगळे कुठून आले, हेही विचारणार का ?

असे केले तर सरकार कितपत तगू शकेल ?

नोटांसाठी रंगांदाज निरूपण --

तांबडा – अगदीच साम्यवादी नको दिसायला.

नारिंगी – हिंदुत्वाचा अर्थ तर येणार नाही ?

पिवळा – नोटेसाठी आवडण्याची शक्यता कमी.

हिरवा – फिकट वापरलाय

निळा – गडद निळा शाईसारखा दिसेल.

पांढरा – नोटेचा रंग ? छे छे –

जांभळा – २००० नोटेसाठी घेतला.

काळा – नापसंत.

-- जांभळ्या ऐवजी पिवळा ठीक होता काय ?

किंवा कोणत्या नोटांना कोणते रंग बेष्ट झाले असते ?

( अजून एक नोट यायची आहे, हेही लक्षात घ्या -- )

नोटारद्द विषय --

हा निर्णय चांगला आहे / वाईट आहे

हा निर्णय यशस्वी होईल / अयशस्वी होईल

या निर्णयाने देशाचा / सामान्य माणसाचा फायदा होईल / नुकसान होईल

-- अशा दोन्ही बाजूंनी बोलणारे वेगवेगळे तज्ञ, विद्वान व जाणकार आहेत.

काल मोदींच्या बाजूने बोलणारा पोपट आज वेगळे बोलतो किंवा
काल मोदींच्या विरोधात असलेला पोपट आज या निर्णयाची भलावण करतो
असे होताना दिसत नाही !
सामान्य माणसाने स्वतःच्या शहाणपणावर विश्वासून राहावे, हेच बरे !

NOVEMBER 11

हलक्याफुलक्या रंगीबेरंगी फुग्यांसारखे
तुझे अवतरणे करते माझ्या नाकपुड्या तेज
झणझणीत आसक्तीने भरते माझे हृदय
तू म्हणतेस, ही तू नाहीसच
तुझ्या सावलीचा आभास नुसता
यावर मी म्हणतो, मी जाणतो
सगळाच खोटेपणा, मला फरकच नाही दिसत
खऱ्याखोट्यातला मानीव

मला खरेच काही कळते की तू
हवी असणे, हेच असते माझ्या ज्ञानाचे मूळ
याबाबत आभासी मी साशंक

तुलाही ते आवडते, नुसतेच रूटीन
गुंतण्यापेक्षा तुझ्या स्तनांना फुटतो अप्रूप
उत्तेजकतेचा पान्हा या अगम्य गुंतागुंतीमुळे

माझ्या जाण्यायेण्याच्या रस्त्यावर
नेहमीचीच वर्दळ असूनही मला मात्र
दिसतात तू उडवलेले ऍसिडचे फवारे
सर्व आसमंत विकृत करणारे
कुरूप आणि सुंदर यांतला

फरकच नष्ट करणारे

तुझ्या असण्यावर माझा विश्वास आहे
माझ्या शरीरातून उगवणारे सर्व साप
खरे आहेत -- त्यांतल्या एकाच्याही दंशाचे विष
मृत्यू घडवून तुझा देईल तुला माझ्यातला अग्नी
--- ००० ---

५०० आणि १००० च्या नोटा रद्द झाल्यामुळे लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून त्या नोटा रेल्वेत अमुक तारखेपर्यंत चालतील, असे सरकारने जाहीर केले होते. त्यात चान्स आहे हे हेरून काही जीनियस भारतीयांनी आपल्याकडच्या तशा जास्तीच्या नोटा खपवण्यासाठी एक आयडिया सुरू केली. फर्स्ट क्लास एसी ची लांब पल्ल्याची तिकिटे बुक करायची आणि नंतर ती रद्द करून त्यांचा रिफंड घ्यायचा ! हे लक्षात आल्यावर सरकारने त्यावर काही उपाययोजना केली. त्या संदर्भात बोलताना --

एक रेल्वे अधिकारी -- हम पूरा इंतजाम कर रहे हैं कि जेन्युईन पॅसेंजर सफर ना करे ।
( या वाक्यातला सफर हिंदी नसून इंग्रजी – suffer – हा आहे ! )

यावरून, ‘ चोरीचा मामला ‘ या उत्तम मराठी चित्रपटातले एक दृश्य आठवले. एक गुरखा आणि एक हातगाडीवाला असलेले निळू फुले या दोघांनी मिळून, एका तळघरात लपवलेल्या धनावर डल्ला मारलेला असतो. आता जवळ मुबलक धन असूनही त्यांना एक वेगळाच प्रश्न सतावत असतो. मोठ्या रकमेची नोट घेऊन काही खरेदी करायला जावे तर लोक संशयाने पाहतात – याच्याकडे कशी काय ही नोट, असे चकित होतात. एकदा रस्त्यात ते दोघे भेटतात. निळू फुले विचारतात, काय रे, कुठे गेला होतास ? तो गुरखा म्हणतो, स्टेशनवर तिकीट काढायला. निळू फुले विचारतात, काय कुठे गावाला चाललास काय ? यावर तो गुरखा म्हणतो, नाही नाही, तिकीट काढायचे आणि पैसे सुटे करून घ्यायचे, असे करतो हल्ली !
-- याला म्हणतात, कलावंताचा द्रष्टेपणा !

५०० आणि १००० च्या सध्याच्या नोटा बंद करण्यावर फारसा विरोध नाहीय.
शेवटी, मतभेदाचा भाग हा दिसतोय –
१ असा अचानक निर्णय नको होता.
२ एक १५ दिवस आधी सर्वांना विश्वासात घेऊन हा निर्णय अंमलात आणायला हवा होता.

३ १०० वा ५० च्या पुरेशा नोटा जवळ ठेवा, आम्ही असा असा निर्णय घेणार आहे, हे जनतेला आधी सांगायला हवे होते.

४ किंबहुना आधीच जनतेला नोटा बदलुन घ्यायला सांगून मग हा निर्णय घ्यायला हवा होता.

५ किंवा या गोंधळाच्या काळात सर्व अत्यावश्यक सेवा फुकट ठेवायला हव्या होत्या.

-- काय झाले असते असे केले असते तर ?

नेहमीचाच पण तरीही ताजा प्रश्न --

' नौटंकी ' आणि ' कळवळा ' यांतला फरक स्पष्ट करा --

( कशाला काय म्हणायचे हे सगळ्यांचे आधीच ठरलेले असते ! )

NOVEMBER 10

ट्रंपसाहेब निवडून आल्यावर हिलरीवाले खवळलेत – ‘ हे आमचे अध्यक्ष नाहीत ‘ असे बोंबलत ते फिरत आहेत ! हिलरी निवडून आल्या असत्या तर ट्रंपवाले हेच करणार होते, हे त्यांनी आधीच सांगितले होते ! म्हणजे, लोकशाही व्यवस्थेबद्दल कुणालाच नाहीय सहिष्णुता ! सारांश, लोकशाही म्हणजे ‘ आपण स्वतः सोडून इतरांनी सहिष्णू असण्याची गरज असणारी व्यवस्था !!! ‘ की याहून अचूक म्हणजे, ' सर्वांनाच असहिष्णुतेची पूर्ण मुभा देणारी व्यवस्था ' ?

आपल्या सहवासात निदान रक्तप्रवाह सगळे
मोकळे तरी होत – बाकीचे काय आहे उरलेले ?
तेच तेच सगळे रोजच्या रोज लेट होणारी बुलेट ट्रेन
चेचवडपणे खाद्यपदार्थ विक्रीसाठीच असल्याप्रमाणे

आता मतभेदांमुळे तेही अवघडच होत चाललेय
सौम्य ऊन नेसून येणारी संध्याकाळ
उग्र होत चाललीय
रुक्ष होत विरत चाललीय
एखाद्या आठवण म्हणून बाळगलेल्या
जुन्या वस्त्राप्रमाणे

हरवलेय सगळे
नवे काही शोधायचा उत्साह नाहीय
त्राणही नाहीय

असे जगायचे ? --
तुझ्यामुळे उद्देशमृत झालेले ?
--- ००० ---

सौंदर्यसंभार संभाळणे,
सौम्य बोलणे-वागणे,
किंचित स्मित करणे,
गोडवा टिकवणे,
सहानुभूतीने तरलणे
-- या सगळ्यापेक्षा
कुणी, क्रूर सौंदर्यवती
म्हटले तरी चालेल --
असे वैतागलेला काळ –
--- ००० ---

NOVEMBER 9

अलीकडे इथे मी माझ्या काही कविता ' सांगून निरर्थक ' म्हणून देत असतो.
त्याबाबत आलेली एक मैत्रीपूर्ण प्रतिक्रिया --
" तुमच्या निरर्थक कविता फारच दुर्बोध असतात हो ! "

सामान्य माणूस म्हणून एक शंका आहे. तिचे निरसन कुठे आलेले दिसले नाही.
ज्याच्याकडे हजारो कोटींत काळा पैसा आहे तो माणूस समजा अनेक खटपटी-लटपटी-हिकमती करून त्यातला बराचसा पैसा पांढरा करण्यात यशस्वी होईल. तरीही, काही हजार कोटी मातीत जाणारच ! अशा परिस्थितीत, एकूण विचार करता, त्यातला जो चाळीस टक्के पैसा समजा कर रूपाने सामान्य माणसाच्या म्हणजे देशाच्या कामी आला असता तो आता येऊच

शकणार नाही. आता ते शक्यच होणार नाही. याचा अर्थ, त्या काळ्या पैसेवाल्याबरोबरच देशाचेही नुकसान होणारच !
देशाचा लुटला गेलेला पैसा वापस मिळणार नाहीच !
म्हणजे, एक प्रकारे, हे, ( स्वतःचेच ) ' नाक कापून अवलक्षण ' या सदरात येईल का ?

हा निर्णय बसतोय ना परिवर्तनवादात ?
मग, म्हणा ' चांगला निर्णय ' बिनधास्त !
नाही तर, खरे तर, तुम्हाला काहीच कळत नाही
आणि तुम्ही तुमचा मेंदू विरोधकाच्या भूमिकेत
फिट करून मारून टाकला आहे, असे होईल !

उधारउसनवार वस्तू हाच जंगलचा कायदा
असल्यामुळे स्वच्छ दगडांतून झुळझुळ वाहणारे
पाणी वाघांनाही पोसते आणि उंदरांनाही --
घिरट्या घालणारी पाकोळी असो की झुरळाचा
मृत देह ओढणाऱ्या मुंग्या
स्वतःच उधार आल्याप्रमाणे
भरकटते जे ते ज्याच्यात्याच्या मेंदूत

माझा विचारच जर दहा हजार वर्षांपूर्वी
झालेल्या एका हत्येचा परिणाम असेल तर
आज हा नितळ संगमरवर सडल्याशिवाय
कसा राहील -- कसा राहील शाबूत आणि सुगंधी

मला पडणारा प्रश्न कुणालाही
पडू शकतो आभाळातून पडणारी
पक्ष्याची विष्ठाच जशी

जगात समता न्याय बंधुत्व हे सगळे
मानसिक स्वैराचाराचे लक्षण या रूपातच

वावरते सडक्या आशावादासह

उगीचच कुणी कुणाच्या फंदात
पडत नाही अनावश्यक संघर्षाच्या भीतीने
हे खरे असले तरीही मृत्युरूपात स्थिर
असलेले काहीही जमेला धरताच नाही येत
छोटी पिल्ले वाढवताना तरी

कारण माझा सूर्यच उगवतो उधारीवर

--- ००० ---

नोटा रद्द प्रकरणावर जे दिलखुलास आनंद व्यक्त करतील त्यांनी अजून फारसे काही कमवलेले नाहीय, असे समजावे !
विरोध फारसा कुणीच करणार नाही !
गप्पच बसतील ते धोक्यात आलेत, असे समजावे !

NOVEMBER 8

गगन देव रिआर आणि महेश केसकर यांचे दिग्दर्शन
आणि
गगन देव रिआर आणि सारिका सिंग यांचा उत्तम अभिनय
यांनी युक्त असा, माझ्या ' प्रेमच म्हणू याला हवं तर ... ' या नाटकाचा हिंदी अनुवाद
' रिनोव्हेशन ' या नावाने मुंबईत पृथ्वी थिएटरमध्ये, फ्रिंज नाट्य महोत्सवात काल सादर झाला !
प्रकाश, नेपथ्य आणि संगीतही पूरक, छान होते !
प्रयोग उत्तम झाला ! माझ्याच संवादांवर मी पुन्हा एकदा खुश झालो !
प्रेक्षक तर खूपच खुश झाले !
मुंबईतल्या तरुणाईसमोर हिंदीतून माझे नाटक प्रथमच सादर झाले !
" हम पुराने जमानेके जेलर हैं " हे वाक्य मला कधीच म्हणावे लागणार नाही, याची खात्री पटली !
माझ्या नाटकांबद्दल उत्सुकता निर्माण झाली – हे एक छान घडले !
या नाटकाचे हिंदी आणि मराठीतून प्रयोग होत राहणार आहेत.

हे नाटक यापूर्वी आपले मित्र रवींद्र लाखे यांनी बसवले होते –

तो एक वेगळाच उत्तमपणा होता ! एकच नाटक किती वेगवेगळ्या प्रकारांनी मजा आणते

हे पाहून मस्त वाटले !

नाटक संपल्यावर प्रत्यक्ष भेटून अनेकांनी भरभरून प्रतिसाद दिला !

एकाच महिन्यात माझे ‘ ढोलताशे ‘ कानडीत आणि इकडे हे हिंदीत झाल्याने

आणि दोन्ही ठिकाणी ती नाटके उत्तम स्वीकारली गेल्याने,

आपली नाटके अन्य भाषिक प्रेक्षकांनाही चांगली पोचू शकतात याचे समाधान वाटले !

मूळ पृथ्वी थिएटरच्या समोरच आणखी एक मिनी थिएटर ( पृथ्वीचेच ) तयार झाल्याचे मी पहिल्यांदाच पाहिले.

८०-९० ची क्षमता असलेले हे एक छान आटोपशीर थिएटर आहे !

‘ रिनोव्हेशन ‘ तिथे झाले – थिएटर फुल होते !

शिवाय गिरीश पतके आणि विवेक जाधव या जिगरी मित्रांबरोबर गप्पा झाल्या !

आणि मुख्य म्हणजे आमच्यांत काही नवे प्लॅन्स शिजले !

एकूणात कालचा मुंबई दौरा छानच झाला !

--- ००० ---

NOVEMBER 7

आज मुंबईत -- फ्रिंज नाट्योत्सवात

पृथ्वी थीयेटरला संध्याकाळी ०५-०० वाजता

मी लिहिलेल्या ' प्रेमच म्हणू याला हवं तर '

या नाटकाचा हिंदी अनुवाद

" रिनोव्हेशन ' या नावाने सदर होतो आहे.

शक्य असेल त्यांनी जरूर पहा --

माणसाच्या मनाच्या मार्गाने सापडणारा अर्थाचा प्रदेश माणसाने कितीही वाढवला तरी निरर्थकतेच्या अमर्याद अस्तित्वापुढे तो नुसता लहानच नव्हे तर नगण्य आणि क्षुद्र असतो. कवितेने निरर्थकतेकडेही मनःपूर्वक लक्ष द्यायला हवे.
( मी माझ्या कवितांतून ते काम करत आहे. )

काहीही कळण्यापूर्वी शेवट यावा
तसे रोजच चिकाटीने रडणे
लुळ्यापांगळ्यांचा अध्वर्यू होऊन
वर्षानुवर्षे बिळात राहणे

विळखा घालणारे झाड
अर्थ देऊ पाहते मरणाला
तर भिऊन मागे सरणारे सरडे
विकलांगपणे किंचाळणारे

होईल ते होईल असे म्हणून
अदृश्य प्रेयसीच्या आठवणीत
अंतिम संभोग करणारे मन
अचानक नाकारते सगळे अवयव

विहंगम दृश्य म्हणून समोर येते
एक तुटपुंजे तळे बगळ्यांचे
ज्यांना नसतात चोची-डोळे
अधाशी मासे रांगेत पळताना

कुणीच कुणाला दुखवू नये
असे म्हणत सगळे हमाल
चुंबळी देतात फेकून चांदण्यांवर
घरवाल्या उरल्यासुरल्या झोपताना

आता शक्यच नसते पुन्हा सुरुवात

सोडूनच देणे भाग पडते

सगळे हातातले डाव विमनस्कपणे

निर्जीवपणे

--- ००० ---

NOVEMBER 6

१

दोन दिवसंपूर्वीचा प्रसंग. संध्याकाळी एकत्र फिरून येणारा असा आमचा एक ग्रुप आहे. आम्ही फिरून येण्याच्या रस्त्यावर मनपा ने दिलेल्या एका बाकावर काहीजण बसलेले असतात. त्यात आमचे एक मित्र असतात. चावट बोलणे आणि चावट ज्योक्स सांगणे यांत ते माहीर आहेत. काही वेळा आम्ही थोडा वेळ त्यांच्याशी बोलतो आणि अनेकदा त्यांना नुसता हात दाखवून, हसून पुढे जातो. तसा परवा त्यांना मी हात दाखवला, त्यांनीही तिकडून हात दाखवला. पण, झाले असे की मध्येच एकजण उभे होते, त्यांना वाटले की मी त्यांनाच हात केला, म्हणून प्रतिसादात्मक असा त्यांनीही मला हात केला. ते पाहून मीही त्यांना हात केला. पण, त्यांच्या लक्षात आले की मी त्यांना हात नव्हता केला. ते म्हणाले, " सॉरी हं, मला जरा कमी दिसते --- मला वाटले, तुम्ही मलाच हात केला – " यावर मी म्हणालो, " त्यात काय बिघडले ? तुम्हाला कमी दिसते, हे वाईट आहे, पण, त्यामुळे आपली ओळख झाली हें किती छान आणि बेष्ट झाले ! " मग, हसून आम्ही आपापल्या मार्गांनी गेलो.

२

आता, आज घडलेला प्रसंग. सकाळी मी रस्त्याने चाललो होतो. तेवढ्यात एक रिकामी रिक्षा मागून पुढे येऊन माझ्यापुढे थांबली. तीतला रिक्षावाला खूपच उग्र चेहऱ्याचा होता. डोळे मोठे होते. मी म्हटले, " मी हात नव्हता केला – " यावर तो खवळलाच माझ्यावर – " तुम्ही हात नव्हता केला हो – आमच्या ओळखीचा एक माणूस तुमच्यासारखाच दिसतो, म्हणून थांबलो – " असे गुरकावून त्याने वेगपट्टी वाढवली ! आता, त्याच्या ओळखीचा तो माणूस मी नाहीय, याला मी काय करू शकणार होतो ? माझी यात चूक काय झाली, ते मला अजून कळलेले नाहीय ! काही अपमान फुकटचे, विनामूल्य मिळतात, ते असे !

कालच इथे मी काही ' सांगून निरर्थक ' कविता दिल्या आहेत. तशी काही आठवलेली परंपराही सांगितली आहे. अशा निरर्थक कविता मराठीत, कोणत्याही काळात, आणखी कुणी कुणी लिहिल्या आहेत ? आठवल्यास -- ओळींसह सांगता आले तर फारच उत्तम ! असा हा एक छोटासा संग्रह मजेदार आणि ' अर्थपूर्ण ' होईल !

सांगून निरर्थक कविता

१

तुझ्या बाबतीत मला सल्फरचा अनुभव नव्हता
इकडे खड्डा खणल्यावर आकाशाला खळी पडते
एवढेच रुजलेले होते काचेच्या रंगीबेरंगी बाऊलमध्ये

तुला हसू यायचे कारणच नव्हते तुझा ब्लाऊज
भिजल्यामुळे उडालेल्या ठिणग्या पाहून
तूच तर माजवले होतेस समयसारणीचे महत्त्व

--- ००० ---

२

विद्वानांचे महत्त्व जाणारच होते आज ना उद्या
कारण दगडांचे कावळे उद्विग्न झाले तरी
पाणी पीत नाहीत वा गातही नाहीत

लैंगिक तीव्रतेने पडणारा पाऊस खजिल न होता
घालवू शकतो झाडांच्या पानांचे नैराश्य
त्याचे कामच असते खून होताना प्रत्यक्षदर्शी होण्याचे

--- ००० ---

३

हिरव्या रंगाचे कान असलेली प्रत्येक व्यक्ती
प्रलयातूनही बचावते हे माहीत असल्याने
सगळे कारखाने बंद करण्यात आले त्यांची
निराश मशिनरी पाहून

सुटकेचा एकच मार्ग होता जाणारा

निरर्थकतेकडून निरर्थकतेकडे

अर्थात अर्थहीन

--- ००० ---

shared Gagan Dev Riar's post.

' प्रेमच म्हणू याला हवं तर ... ' या मी लिहिलेल्या नाटकाचा

हिंदी अनुवाद -- येत्या ०८ ला, पृथ्वीला, संध्याकाळी ०५ वाजता --

NOVEMBER 5

‘ हम बडे तुम बडे एक दूजे के लिये ‘

-- याचबरोबर अनेकदा –

‘ और हम खडे खडे बहार देखते रहे ‘

-- हे जोडून घ्यायची वेळ येते !

अपरिभाषित

एका नव्या लेखक-दिग्दर्शकाचे हे नाटक पाहून आजचा रंगभूमीदिन साजरा केला. त्याचे नाव सौरभ दिघे. आस्तिक-नास्तिक, श्रद्धा-अंधश्रद्धा या विषयावर संवाद देणारे – भेदक व सखोल चर्चाही करणारे नाटक लिहिणे आणि ते सादर करणे, हे धाडसाचे काम आहे. सुदर्शन फुल भरलेले होते. आणि इतक्या प्रेक्षकांना नाटकाने छान बांधून ठेवलेले होते. एवढ्यावरूनच प्रयोगाची कमाल मान्य व्हावी. अलिकडे वेगवेगळी आव्हाने घेणारे काही चांगले लेखक या क्षेत्रात येत आहेत. अजित देशमुख, युगंधर देशपांडे, दत्ता पाटील, प्रणव सखदेव आणि आता हा सौरभ दिघे. अंगद, अनंत आणि अमृत यांची अभिनय-साथ आणि सर्व तांत्रिक अंगे उत्तम पूरक, यांमुळे प्रयोग चांगला झाला. काही वेळी काही प्रयोगांना भिडस्तपणे जाणे होते आणि मग वेळ वाया गेल्याची खंत वाटते. तसे इथे झाले नाही. वेळ खरोखरच सार्थकी लागला ! आजच्या रंगभूनीदिनी सौरभ दिघे या नव्या लेखक-दिग्दर्शकाचे स्वागत !

‘ प्रयोग ‘ संस्थेचे अभिनंदन !

--- ००० ---

सीताराम कुंभार उर्फ सीताराम मामा ह्या रंगकर्म्याशिवाय मराठी रंगभूमी दिन साजरा होऊच शकत नाही...

सलाम 👆

Picture © : @[525119127:2048:Sanjay Pethe]'

□ ५ नोव्हेंबर

मराठी रंगभूमी दिनाच्या आपणास हार्दिक शुभेच्छा □

NOVEMBER 4

लगाम हातातून हिसकावून घेऊन
कालचा दिवस त्याला हवा तसा गेला
डुलकीची अत्यंत गरज असताना
एकामागोमाग एक गर्दीच्या
जाहिरातींनी कामालाच लावले
तेवढ्यात कर्तव्यांचे विषयही
उसळी मारून मनापुढे गेले
मागून सक्तीने जाताना
शक्यतो प्रश्न नकोत
हे पालुपद निनादत राहिले
फक्त मनातल्या मनात मला
ढकलत जणू शेवटाकडे

आता स्वातंत्र्य गेले गटारात
लोकशाही न्याय समता बंधुता
यांचे वारे गेले उडत सर्वांसमक्ष

हीच वेळ समजा विद्रोहाची
पेटून उठण्याची – या वेळी
शेपूट घालणे म्हणजे एकूणच
मानवजातीवरच अन्याय करणे

मला करू द्या विचार माझा
जगणे त्यातल्या त्यात कसे
शाबूत राहील याचा --
सर्वांचे आणि सर्व पिढ्यांचे
भले करायला मी जन्म घेतला आहे
असा भ्रम मला होऊच नाही शकत

तुम्ही तरी शौर्य कुणापुढे दाखवता
जे तुमची गांड फाडून हातपाय तोडून
तुम्हाला एक किडा करत नाहीत
त्यांच्यापुढे

आणि आता तर परंपरागत
अन्याय करण्याची मुभा असलेलेही
फाटत चाललेत

तरीही आपण सगळे एकत्र
येणे शक्य नाही
जाहिरात करून जित्या माणसात
समजुतीचे रसायन
नाही होत तयार

उपाय एकच
एकमेकांना दोष देत
आपापल्या आदर्शांचे झेंडे फडकावत
गुटखा चघळत
आशावादी राहणे

आम्ही तळपती तलवार

उद्याचा सूर्य मानवतेचा

उद्याची प्रत्येक गांड न फाटणारी

असे घडू शकेल ?

खरेच आम्हाला काहीच नको आहे ?

आमच्या दुःखांच्या आठवणी नष्ट झाल्या आहेत ?

--- ००० ---

NOVEMBER 3

बाथरूममध्ये पाय घसरून पडलो पण बचावलो --

इतका सेफ बचावलो की जणू पडलोच नाही --

अनिश्चिततेची प्रखर जाणीव झाली !

फार्मा में बिकवालीसे बाजार की सेहत खराब !

गैरसमज दे फेकून

डोंगरापलिकडे

कारण माहीत

आहे आपल्याला

त्यांचे शून्य मूल्य

आपण हवेच

असल्याने एकमेकांना

बाकीचे खेळ

मनांचे निरर्थक

निरर्थक मनांनी

होवो आपला सहवास

निःशब्द तीव्र सतत

--- ००० ---

NOVEMBER 2

दिल्लीच्या एम्स इस्पितळात CYBER DE-ADDICTION CELL

म्हणजे मोबाईल, गेम्स, फेसबुक, व्हाटस अप, संगणक, टीव्ही

यांच्या व्यसनातून सोडवण्यासाठी उपचार करणारा विभाग

सुरू झाल्याचे ऐकले !

याही व्यसनात आयुष्ये वाया जाण्याचे धोके समोर येताहेत !

आजच्या पुणे ' सकाळ ' च्या पृष्ठ ९ वरची बातमी –

आता ' कॉम्रेड ' ही धार्मिक कार्यक्रमांत --

जनाधार वाढवण्यासाठी ' माकप ' चा निर्णय

वा रे वा ! जय पश्चिम बंगाल !

आता जागतिक शांततेसाठी साम्यवाद्यांनी

महायज्ञाचे आयोजन केले तरी धक्का बसू नये !

त्या वातावरणात राहून राहून बिचारे

हिंदुत्ववादी साम्यवादी होऊन बसू नयेत, म्हणजे झाले !

shared Mohit Takalkar's post.

कानडीत अनुवादित ' ढोलताशे ' वर बंगळुरू मधले प्रेक्षक बेहद्द खुश !

कालचा हाउसफुल प्रयोग उत्तम झाला !

NOVEMBER 1

माणसाच्या मनाची एक विचित्र गोष्ट आलीय का तुमच्या लक्षात ? त्याच्या मते ‘ वाईट ‘ हे ठरलेल्या गोष्टीलाही ते कधी कधी मानसिक पाठिंबा देते ! उदाहरणार्थ, “ ट्रंपच येऊ दे, तिच्या मारी ! वाट लागू दे एकदा ! “ -- असे वैतागून नव्हे, खरेच वाटते त्याला कधी कधी ! ही काय भानगड असावी ?

कवीचा व्यक्तिगत अनुभव ही चांगल्या कवितेची मर्यादा नसते -- प्रत्यक्षातले जसे च्या तसे काहीच कलेत येत नाही -- कलेचे विश्व आणि तिची शिस्त वेगळी असते -- कवीचा व्यक्तिगत अनुभव महत्त्वाचा असतोच पण तो कलेत येताना ' अलग ' राहत नाही -- खूप गोष्टींसह ' सलग ' होऊन येतो -- कलेतल्या एका अत्युच्च स्तरावर अनुभव महत्त्वाचा न राहता कलेतून व्यक्त झालेले मानवी जगण्याचे समग्र भानच महत्त्वाचे ठरते. ' समग्र भान ' म्हणजे निष्कर्षहीन पाहणे -- ' मत ' म्हणजे तुकडाभान --

shared WinPoint Learning Center's photo.
मुलगी-जावई यांनी केलेले काम --

OCTOBER 31

आज संध्याकाळी ०७-३० वाजता
कर्नाटकातील बंगळुरू इथे
एका मराठी लेखकाचा ( म्हणजे माझाच )
प्रगट दिन ! --

कानडीत ' ढोलताशे ' !

रंगशंकरा सारखी प्रख्यात संस्था आहे
मोहित टाकळकर सारखा निष्णात दिग्दर्शक आहे !
चिंताच नाही !

Beediyolagondu Maneya Madi
Comedy Drama Satire Kannada 1 hr 30 mins

१९७९-८० साली मी आमच्या बँकेच्या राहुरी फॅक्टरी शाखेत होतो. त्यातले सुमारे दीडदोन महिने तिथून आमच्या संगमनेर शाखेत डेप्युटेशनवर होतो. सुरुवातीला काही दिवस रोज जा-ये करत असे. नंतर संगमनेरला एक खोली भाड्याने घेऊन तिथेच राहिलो होतो. तरीही सुट्ट्या आणि शनिवार-रविवार राहुरी फॅक्टरीला घरी येत असे. तिथून विशेषतः सकाळी संगमनेरला जाणे खूप अवघड असे. अहमदनगरहून सगळ्या एसटी भरून येत – राहुरी फॅक्टरीला थांबतच नसत. अशा वेळी, संगमनेरकडे जाणारा एखादा ट्रकही पकडावा लागे. कधी ड्रायव्हरच्या केबिनमध्ये बसायला जागा मिळे, पण, कधी ट्रकमध्ये मागे चढून उभे राहून वा आत खाली बसूनही प्रवास करावा लागे. त्या वेळचे ते तसे प्रवास करणे, आता ३६ वर्षांनंतर माझ्या कवितेत अवतरले आहे ! यासाठी कालच मी इथे दिलेली काविता बघा. सारांश म्हणजे, आपल्या जगण्यातला कण न कण कधीही आपल्या कवितेत एक प्रतिमा बनून वा काही एका अर्थाचा वाहक म्हणून येऊ शकतो ! आपण मन मोकळे सोडायला मात्र हवे !

wrote on Prafulla Taywade's Timeline.
तुमच्या चित्रांनी खूप आनंद मिळतो ! तुमची कला बहरत राहो !
खूप शुभेच्छा !

October 2016
OCTOBER 31

माझ्यासाठी पूर्ण मोकळे असलेले तुझे आकाश
मी कधीही करू शकतो काबीज माझ्या तीव्र वासनेने
सहज एसटी पकडावी तशी माझी कविता आठवते
माझे तुझ्यासाठी ट्रकमध्ये उभे राहून प्रवास करणे
तुझ्या मांड्यांचे गच्च टायर्स मनात वेगाने फिरवत
प्रेमच असे की विमानात इडली खाताना जगातले सगळे वेग
असलेली तू नुसती अर्पण होत राहतेस चोवीस तास

प्रेम आहेच आणि असणारच आणि संपणारच नाही
प्रत्येक क्षणी नष्ट होणे आवडण्याचे व्यसन लावलेस तू मला
म्हटले तर पंखांसारखे नाजुक तुझे हात

ओठांवर बोट ठेवलेला तुझा खट्याळ खुनी चेहरा
माहीत असते तुला आता आपोआप काय होत राहणार आहे ते
तू क्रूर, तू दयाळू, तू मार्दवी, तू उत्तेजक, तू स्तनविश्व
पहाटे उतू जाणारे दूध तुझ्या जमिनीतल्या चांदण्यांना
तृप्त करण्यासाठी पत्करते धोके सत्यात उघडे पडण्याचे
तुला जणू फिकीरच नसते

खिडकीतून दिसणारी रहदारी असते तुझ्या वस्त्रांचे लहरणे
तुझी एखादी बट सुरुंग लावून पाडून टाकते पुस्तकांचे ढीग
मला तू हवी असणे नव्हे तुझे पूर्ण नष्ट होणे हवे असते
निव्वळ माझ्या असण्यात

खेड्यातून शहरात शहरातून तुझ्या डोळ्यांच्या खंदकांत
असा प्रवास करत मी तुला विश्वमय करत पूर्ण विश्व
घेतो करून माझे कारण आता मला हवा असतो तुझा
आध्यात्मिक संभोग कारण मला आता फरकच नकोय
राहायला अवयवांच्या असण्यादिसण्यानसण्यात
असे करायचेय मला तुला आत्मसात
अशी व्हायला हवीयस तू माझ्या मनाहून तरल
माझ्या इच्छेहून तीव्र माझ्या आसक्तीहून सत्य
तुझे काय व्हावे काय करावे हे प्रवासातच ठरेल बहुतेक
आपसूक तू स्वतःच असशील ती प्रक्रिया

कुठे आहेत तुझी वस्त्रे ? या क्षणी माझा मीच होतोय
तुझ्या उष्ण आकाशात जळून नष्ट होणारा पक्षी

असा तुझा नाश करत माझे जगणे साजरे करायचेय मला

मला फक्त एक सांग हा भूतकाळ आहे की भविष्यकाळ ?

आनंदात आहेस ना तू ?

--- ००० ---

जे पाहिले त्याची कविता हातात हात घालुन
इथून लिहितोय जिथे फक्त भौतिक पत्थर
मिरवतात जगण्याचा सारांश – त्यामुळे
आपोआपच खोटी आहे ही कविता
झोपलेल्या झाडांप्रमाणे

या पत्थरांबरोबर वावरणाऱ्या इथल्या
अभेद्य प्रतिमा तिथे अस्तित्वातच नव्हत्या
इथला भूतकाळ तिथे नष्ट होता
काहीच स्थिर नव्हते घट्ट वा मजबूत
पाया असणारे
त्यामुळे घटनाच नव्हत्या
कुणी अमर वा वलयांकित नव्हते
पुढे जाऊन मात करणे ढग होऊन
निरर्थक तरंगत विरत होते

ना मूडस, ना हिंसा, ना व्यक्तिगत भावना
ना तुझे खिसे, ना माझे पैसे
ना आत्महत्येचे विषय

घटनाच नसल्याने वर्चस्व नव्हते
सूड नव्हते
सुखासाठी ओरबाडणे नव्हते
समता या शब्दाचीही गरज नव्हती

इथला माझ्यातला नीच माणूस म्हणतोय

" मजाच काय मग ? " -- हे विचारणारा

तोही नव्हता

--- ००० ---

OCTOBER 30

पारंपरिक कल्पनांची, मनाच्या सवयींचा घिसापिटा आशय देणारी कविता, कितीही वाकबगार हातांतून आली तरी ती यथातथाच -- बरी वा ठीक असते.

shared Mohit Takalkar's post.
'Rangashankara Repertory Actors hauling up the sets of 'Beediyolagondu Maneya Maadi' for the Dress Rehearsal. One more day to go.
We play on 1st November, 7:30 pm at Rangshankara on Rajyotsava Holiday.
Playwright:
Translation: Shripati, Surendranath
Direction: Mohit Takalkar

Book your tickets on
https://in.bookmyshow.com/bengaluru/plays/beediyolagondu-maneya-madi/ET00047749'
Rangashankara Repertory Actors hauling up the sets of 'Beediyolagondu Maneya Maadi' for the Dress Rehearsal. One more day to go.
We play on 1st November, 7:30 pm at Rangshankara on Rajyotsava Holiday.
Playwright:
Translation: Shripati, Surendranath
Direction: Mohit Takalkar

Book your tickets on

https://in.bookmyshow.com/bengaluru/plays/beediyolagondu-maneya-madi/ET00047749

OCTOBER 29

Why do I want to know who my great-great-grandfather was ? Who cares ? What matters is what I am now. Who cares whether somebody is a prince or a queen ? All that is so childish. The vast majority want that so that they can dominate the world.

--- J. Krishnamurti.

मराठीत –

माझे खापरपणजोबा कोण होते हे कशाला माहीत असायला हवेय मला ? काय फरक पडतो ? मी आत्ता काय आहे, हे महत्त्वाचे आहे. एखादी व्यक्ती राजपुत्र आहे की राणी आहे, याचे कुणाला काय पडलेय ? निव्वळ पोरकटपणा आहे तो. बहुसंख्य लोकांना ते हवे असते कारण त्यांना जगावर वर्चस्व गाजवायचे असते।

--- जे. कृष्णमूर्ती.

shared Mohit Takalkar's post.

'Last Diwali I opened 'Mein Huun Yusuf Aur Ye Hai Mera Bhai' at Rangashankara. This Diwali I open 'Beediyolagondu Maneya Maadi' on 1st November, 7:30pm at Rangashankara for their Repertory Company. It is the Kannada adaptation of @[100000669434144:2048: ]'s Marathi play, Dhol Tashe. 15 years after it was written, it still feels even more relevant and hard hitting and I don't know if this is a good thing, considering the content of the play. Have we as a society not grown at all?

I also think fondly of the original cast of Dhol Tashe. @[100003261687462:2048:Ajit Bhure], @[1566402739:2048:Aditi Mulgund Deshpande], Bappa, Rekha Baḍe, Vijay Kenkare and of course Kakde Kaka, Prematai and Hemu Kaka.

With @[637265657:2048:Ujwala Rao], @[642212353:2048:Shrunga B Vasudevamurthy], @[792116476:2048:Sushma Rao], @[100000597822913:2048:Venkatesh Prasad], @[1513960629:2048:Surendranath] & others at RSC.'

Last Diwali I opened 'Mein Huun Yusuf Aur Ye Hai Mera Bhai' at Rangashankara. This Diwali I open 'Beediyolagondu Maneya Maadi' on 1st November, 7:30pm at Rangashankara for their Repertory Company. It is the Kannada adaptation of  's Marathi play, Dhol Tashe. 15 years after it was written, it still feels even more relevant and hard hitting and I don't know if this is a good thing, considering the content of the play. Have we as a society not grown at all?

I also think fondly of the original cast of Dhol Tashe. Ajit Bhure, Aditi Mulgund Deshpande, Bappa, Rekha Baḍe, Vijay Kenkare and of course Kakde Kaka, Prematai and Hemu Kaka.

With Ujwala Rao, Shrunga B Vasudevamurthy, Sushma Rao, Venkatesh Prasad, Surendranath & others at RSC.

OCTOBER 28

विचारांचे शीघ्रपतन कधी होते
तर प्रत्येकाला सत्य स्थिर वाटते
तेव्हा
आपले वाद हे नुसते वांझ नसतात
तर त्यांत अपयशांचा संतापही असतो
एकदा कळले म्हणजे झाले कपडे
आपल्या मापाचे आणि दुसऱ्याला
आव्हानात्मक
असे नसते

तरीही आपण लावून धरतो
वजनाने हेलपाटून बसलेल्या
बैलाला फटकारत राहतो

खाजगी आयुष्यात तुम्ही
भावनांना अत्तर चोपडता की
मिशा पूर्ण साफच करता
यांवर काहीच अवलंबून नसते
एखाद्या व्यक्तीला तुम्ही क्रूर
वाटू शकताच

म्हणून मग आपण प्रतिमा
घडवण्याच्या कामाला लागतो
लोकप्रिय रंग आणि आकार
यांचे अंदाज घेतो पण आपल्याला
हवी ती व्यक्ती खास असते
या विचाराने प्लॅन बदलुन
आपण आधी
तिचा अभ्यास करायचे ठरवतो
आपल्याला तिचे कशामुळे आकर्षण
वाटणे तिला आवडू शकेल
याचे विचार करत आपण तहान, भूक, खिसे
हे सगळेच नगण्य समजू लागतो

यामुळे ती स्वतःला फारच महत्त्वाची
उच्च समजू लागली तर आपण तिला
तिच्यासाठी योग्य वाटणार नाही
या विचाराने आपला उद्योगधंदाच
हवालदिल होतो

सारांश म्हणजे सत्य काय हा प्रश्न
टाळता येतच नाही

हे मान्य करून आपण वादांचे मार्ग

टाळू लागतो

खुले ऊन म्हणजे यशाच

असे नसल्याचे आपल्याला कळते

ती हसली वा तिने स्वेच्छेने स्पर्श केला

तरीही आता माझी नेमकी कोणती कृती

तिला अपेक्षित असेल

या विचाराचा अंधार येताच कामा नये

डोळ्यांसमोर

त्यामुळेच आता धर्म पाचशे पानांचा

नाही चालणार ताणमुक्ती देणारा

एका वाक्यात लागेल सर्वसमावेशक --

शारीरिक -- हे आपल्याला समजते --

--- ००० ---

नाही पुण्याची मोजणी

नाही पापाची टोचणी

जिणे गंगौघाचे पाणी

-- बा. भ. बोरकर.

गात होते कै. जितेंद्र अभिषेकी. ‘ दूरदर्शनच्या सङ्ग्रहातून ‘ या कार्यक्रमात.

सुंदर !

रागावणार नसाल आणि भावना दुखावणार नसतील तर मला काय वाटले, ते सांगतो.

पहिल्या दोन ओळी मला प्रचंड आवडल्या ! असे हवे जगणे !

पण, तिसऱ्या ओळीत गंगौघ कशाला ? कशाला ते पारंपरिक पावित्र्य ?

तिसरी ओळ पहिल्या दोन ओळींना खाली ओढते, असे मला वाटले !

OCTOBER 27

आपल्या पोस्ट चा मूळ स्वर वा सूर ( spirit ) ओळखला न जाणे, चर्चेला भलतेच फाटे फुटणे, चर्चा भरकटणे आणि आपण कल्पनाही न केलेल्या अंगाने बराच वेळ बोलले जात राहणे -- ही या फेसबुकची समृद्धी समजायला हवी ! हे जर पचनी पडत नसेल तर इथून गाशा गुंडाळणे बरे ! मला नाही तो प्रॉब्लेम ! यातून एक महत्त्वाचे तत्त्वही व्यक्त होते -- जगात प्रस्तुत वा अप्रस्तुत असे काही नसते !

‘ काहे दिया – ‘ हे नाव हिंदी असले तरी मालिका मराठी आहे, त्यामुळे, मोहन जोशींची परिस्थिती फारच वाईट झालीय. चारपाच छडमाड पोरांसह आलेल्या एका टकलु मराठी गुंडाने त्यांना दम दिला की पाच दिवसांनी घर खाली करून किल्ली माझ्या माणसांकडे द्यावी लागेल ! फार वाईट वाटले ! अशक्य वाईट ! मोहन जोशींच्या मनातला डायलॉग माझ्या मनात आला – “ पाच दिवसांनी हिंदीत ये साल्या, मग, देतो तुला – किल्ली ! “ मराठीत मोहनराव बिचारे फारच गरीब वाटतात --

OCTOBER 26

" कुठून तुमच्यासारखी चांगली माणसे आमच्या वाट्याला आली, सांगता येत नाही -- " सहज ' खुलता कळी -- ' मधले पाहिले गेलेले वाक्य !
मराठीबाबतचा जो काही थोडा आत्मविश्वास होता तोही माझा जात चाललाय --
' कुठून ' पासून सुरू होणारे वरील वाक्य ' चांगल्या ' माणसांना चालेल का ?
की सामन्यात: ते वाईट माणसे वा वाईट गोष्टींबाबतच ठीक असते ?

लिहायला सुरुवात करण्यापूर्वीच
कागदावर भीती उमटलेली दिसली
तसे तर झाडाच्या एखाद्या पानावरची रेघही
चकित व्हायला लावतेच – मग त्याचाही कंटाळा येतो

तिथून होते सुरुवात जे जे आहे त्याचा कण न कण
खरा धरून लक्षात ठेवण्याची – फुलांच्या पाकळ्यांत
रक्त नसते याचेही आश्चर्य वाटेनासे होते मग

चंद्राला बल्ब समजून फुटलेल्या काचा
स्वप्नात विखुरणे वेगळे – ते तर नसलेल्या
आकाशाला काळिमा फासणे

मरगळ आणि उत्तेजकता जणू एकाच नदीतल्या
दोन मगरी – दोन्ही क्रूरच -- खादाडच

सगळे वेगवेगळे नसून एकत्रच आहे
हे म्हणणार कोण आणि कसे आणि कुठून
अंगावरच्या कपड्यांनिशी सत्य शोधायला
बाहेर कुठे उभे राहणार

यावर कागदावरची भीती पसरतच राहिली
प्रत्येक इमारतीचा रंग आक्रमक होऊ लागला
सगळे संबंध एकाच वेळी हवेसे आणि नकोसे
वाटू लागले

व्यसनाच्या अंमलाबाहेरची आपली ही अवस्था
रममाण होणारे यातून मुक्त असतील
--- ००० ---

OCTOBER 25

एखाद्या प्रणयचतुर स्त्रीने प्रियकराच्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर न देणेच ' दर्जेदार ' असते आणि तसे ते न देऊनही ती ते देऊन टाकत असते. हिंदी चित्रपटांच्या गाण्यांत अशा मस्त गंमती खूप असतात. आत्ताच ' ऐलान ' या चित्रपटातले, शंकर-जयकिशन यांची चाल असलेले एक मजेदार गाणे ऐकले –

रफी – आपकी राय मेरे बारे में क्या है क्या है कहिये

शारदा – सोचके बतायेंगे हम मिलते मिलते रहिये

-- दिलेय का उत्तर ? नाही ? याच्या इतके परिपूर्ण आणि दिल कब्जात घेणारे कोणते असू शकेल उत्तर ?

(अधिक उकल वा फोड करून हवी असेल तर – ‘ मिलते रहिये ‘ – यातच दिले गेलेय ना ते उत्तर !
हे एवढे तरी समजणारा असायला हवा प्रियकर, नाही तर, काय बोलावे -- )

उगीचच दगडावर फळी आपटत बसलो असताना
विचार आला, जे जे आवडत नाही ते ते मनातून
टाकून देता यायला हवे, मग काहीही होवो –
फक्त आवडेल तेच ठेवायचे –
माझे शेजारी म्हणाले, जुनी आहे ही आयडिया --
मन आपले असले तरी ते आपले नसते

अजूनही उकडीचे मोदक खास कौशल्यपूर्ण
करणाऱ्या एक वृद्ध बाई भेटल्या, त्या म्हणाल्या,
तारुण्य असल्याशिवाय खवैय्यांचा आनंद
मिळू नाही शकत, माझा तिखट झटकाही
तितकाच लोळवू शकतो माजलेल्या बैलांना

मी काढता पाय घेतला, असे नाही म्हणता येणार –
विचार भरकटवतात म्हणून फक्त मी एका छान
फुलांच्या दुकानात गेलो – अविस्मरणीय !
--- ००० ---

खंदे प्रवक्ते लौकरच दुसरी बाजू मांडतीलच --
पण सध्या तरी असेच दिसतेय --
लोकशाहीच्या इज्जतीचा पंचनामा करण्यात
गांधीभक्त आणि शिवभक्तही सामील !

OCTOBER 24

" आमच्या लोकांनी केलेल्या असहिष्णुतेचे वा हिंसेचेही आम्ही कदापि समर्थन करत नाही ! " -- हे सूत्र भारतातल्या सर्व स्वयंघोषित सहिष्णूंना पटणारे आहे ! हे सर्वांनीच ग्राह्य समजावे -- म्हणजे, हा पूर्ण देश सहिष्णूंचाच आहे, हे पटवून घेणे आपल्याला सोपे जाईल !

अवघड झालेय !
सहिष्णुता शिकावी तरी कुणाकडून ?

सर्वसामान्य नागरीक किती गोष्टींचा अभ्यास करणार हो ?
लांबून पाहून असेच दिसते की हे सगळे
आदर्शवादी, विवेकी, समाजवादी आहेत !
मग, हे भांडत का असावेत ?
समाजवादाची भरभराट, जनतेचे हित
हे ' माझ्याच ' हस्ते व्हायला हवे, असे त्यांना वाटत असावे !
पण, समाजवादाच्या भरभराटीचे ' श्रेय ' तर
यांच्याच घराण्यात येणार आहे ना !
ते ' श्रेय ' वाटून खायची व्यवस्था केली तर काय प्रॉब्लेम आहे ?

किंवा मग --
लोकांचे भले होण्याशी मतलब
मग ते कुणाच्याही हातून का होई ना –
-- असा असू शकतो का एखादा आदर्शवाद ?

OCTOBER 23

मी फोनवर सांगितलेले दोन तपशील त्या व्यक्तीने
बिनचूक भरले असतील ना माझ्या फॉर्ममध्ये
अन्यथा माझे बरेच नुकसान होऊ शकते – या विचाराने
तयार झालेल्या मनःस्थितीत आता तीव्र सर्दी आणि
प्रतिजैविके यांच्या योगाने झालेला आणखी परिणाम

-- शिवाय इतरही आणखी थोडे थोडे मनात साठलेले

अशीच -- अशी ना तशी घडत राहणारी मनःस्थिती

-- यातून झालेले ज्ञान –

सत्य मनःस्थिती -- असे काही असू शकत नाही

--- ००० ---

मला एक खरोखरच कळत नाही किंवा निरर्थकच वाटते असे म्हटले तरी चालेल –

सारखे इतिहास संशोधन चालु ठेवून जाती, विभूती यांच्यावर

नव्या पुराव्यांसह नवा प्रकाश टाकत राहायची काय गरज आहे ?

बहुमताने मान्य असलेला इतिहासच ग्राह्य धरून त्यातल्या कटुता आणि कटकटी मिटवून टाकल्या समजा,

तर काय बिघडेल ?

OCTOBER 22

कै. बाळ मोघे

बाळ आज गेल्याचे कळले. आम्हा अनेकांचा जुना दोस्त !

बाळची पहिली ओळख म्हणजे उत्तम, बुद्धिमान प्रकाशयोजनाकार ! तो अमोल पालेकरांचा एक उत्तम सहकारी होता. बाळची अशी जगभर दोस्ती होती. माझ्या दोन-तीन नाटकांना त्याने प्रकाशयोजना केली होती. कै. प्रा. अरुण पाटील या मित्रामुळे माझी त्याच्याशी ओळख झाली होती. अरुणने नाटक दिग्दर्शित केले की बाळ तिथे असणारच, हे ठरलेले होते. माझी दोन नाटके अरुणने बसवली होती. त्यांतले जयसिंगपुरातून त्याने बसवलेले माझे नाटक ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ हे अनागरी राज्य नाट्यस्पर्धेत पहिले आले होते. त्यातही बाळचा सहभाग होताच. बाळचे एक विशेष मान्यताप्राप्त काम म्हणजे ‘ घाशीराम कोतवाल ‘ या नाटकाच्या पुनरुज्जीवन निर्मितीत असलेला त्याचा सहभाग. त्याचे दोस्तीवाले अनेक ग्रुप्स होते – त्यांतल्या एकात, अरुण, मी, नाटककार प्रा. विजय कारेकर, नाटककार दिलीप जगताप आणि कोल्हापूरचे काहीजण असे होतो. त्याच्यासह आमच्या साग्रसंगीत गप्पाटप्पा अनेकदा होत असत.

इथे फेसबुकवर असलेला आपला मित्र गिरीश रांगणेकर त्याच्या दोनतीन मित्रांच्या सहकार्याने ‘ व्यक्त-अव्यक्त ‘ हे मासिक काढत असे. ते माझा सल्ला मानत. प्रकाशयोजनेवर मराठीत फारसे लेखन नाहीय, तर आपण बाळकडून एक लेखमालिका लिहून घेऊ असे मी त्यांना सुचवले होते. त्याची लगेचच कार्यवाही झाली. बाळला त्यासाठी घोड्यावर बसवावे लागले

प्रेमळ सक्तीने. एक लेख त्याने दिलाही लिहून आणि तो त्या मासिकात आलाही. उत्तम होता लेख. गुरुवर्य समर नखाते यांनीही तो लेख वाखाणला होता ! झाले ! पुढचा लेख काही बाळ लिही ना ! त्याच्या घरी एक सदारू बैठक करून त्याची मी खूप मनधरणी केली. त्याचे म्हणणे होते की हा फार गहन विषय आहे आणि मलाच आधी खूप अभ्यास केला पाहिजे, मग मी लिहीन ! अभ्यासासाठी त्याच्याकडे असलेले त्या विषयावरचे ग्रंथही त्याने मला दाखवले. पुढे त्याने काही लिहिले नाही. लिहिले असते तर नक्कीच मराठीत प्रकाशयोजनेवरचे ते एक उत्तम पुस्तक ठरले असते ! आता त्याचा तो अनुभव आणि ज्ञान त्याच्याबरोबर गेले !

आमचा एक उत्तम, दिलदार, दिलखुलास मित्र गेला !

त्याच्या स्मृतीस मैत्रीपूर्ण अभिवादन !

OCTOBER 21

एकूण कलेबद्दल बोलण्या ऐवजी उदाहरणादाखल कवितेबद्दल बोलु.

अनेकदा कवी ( यात कवयित्रीही आल्या ) असे म्हणत असतात की हे पाहून ते अस्वस्थ होतात, ते पाहून तर ते अधिकच अस्वस्थ होतात आणि अशी अस्वस्थता साठत जाऊन ती अभिव्यक्त होण्यासाठी टाहो फोडू लागते, आणि त्यामुळे कविता जन्माला येते, म्हणजे लिहिली जाते.

आता एक प्रामाणिक वाचक घेऊ उदाहरणादाखल.

तो स्वतःच आधी त्याच्या त्याच्या अस्वस्थतांनी खूप अस्वस्थ असतो. त्यात परत कवी कवींत भेदभाव न करता तो असंख्य कवींनी व्यक्त केलेली पाचेकशे प्रकारची तीव्र अस्वस्थता स्वीकारत जातो !

काय होत असेल याचा परिणाम त्या वाचकाच्या आरोग्यावर ? एकूण दीर्घकालीन सामाजिक आरोग्यावर ?

अस्वस्थता हा कलेचा महत्त्वाचा निकष झाल्यामुळे हृदयरोगाचे प्रमाण वाढू शकते का ?

बरीच माणसे वेडेपणाच्या कगारवर जाऊ शकतात का ?

की यातून व्यक्तिगत आणि सामाजिक आरोग्य सुधारते ? कशा प्रकारे ?

कै. शांताबाई शेळके

‘ सह्याद्रीच्या पाऊलखुणा ‘ या कार्यक्रमात आत्ताच शांताबाईंची मुलाखत पाहिली.

मराठी भाषेवर आणि शब्दांवर प्रेम करण्यासाठीच फक्त जन्माला आल्याप्रमाणे जगणे ! मी अगदीच नवखा होतो. पण, त्यांच्या आणि आरती प्रभूंच्या गप्पा काही वेळ ऐकण्याची एकदा संधी मिळाली होती. विषय होता मराठी गीते. दोघेही त्यातले मास्टर कलाकार ! त्या वेळी मुख्यतः चकित व्हायला झाले ते शांताबाईंचे पाठांतर पाहून ! महाग्रेट, बिनचूक

पाठांतर ! शेकडो कविता आणि गाणी ! आणि चाललेल्या विषयाला धरून योग्य ते आठवणे ! माझ्या आठवणीप्रमाणे ग. दि. माडगूळकर हे दोघांचेही आवडते गीतकार. त्यांच्या काही गीतांवर दोघेही खुश होते.

या मुलाखतीत त्या म्हणाल्या की अनेक पारंपरिक गीते, परभाषेतली गीते असे ऐकून खूप गाणी सुचतात. अशी त्यांनी काही उदाहरणेही दिली. दुसरे एक त्या म्हणाल्या की आपली ‘ स्वतःची कविता ‘ कित्येकदा महिनो न महिने सुचत नाही, त्याला इलाज नसतो. दिवाळी अंक मागताहेत म्हणून मी माझ्या कविता कधी लिहिल्या नाहीत. पण, गाण्यांचे तसे नसते. स्टुडिओ, कलाकार बुक झालेले असतात आणि वेळ अशी येते की एका दिवसात गाणे लिहून हवेच असते. तसे त्यांनी अनेकदा केलेले आहे !

अशा अनेक भाषाप्रेमींनी घडवलीय, समृद्ध केलीय मराठी भाषा !
शांताबाईंच्या स्मृतीला मनःपूर्वक सादर प्रणाम !

OCTOBER 20

ज्याला दिसतेय तो इतरांना पाहायला लावू शकत नाही
आणि
त्या इतरांना पाहायचेच नाहीय, त्यांना फक्त करमणूक हवीय, त्यांना वेळच नाहीय
-- हीच माणसाची शोकात्मिका आहे.
-- जे. कृष्णमूर्ती.

OCTOBER 19

अटळपणे जातिनिहाय जगणारे बांधव
ऑरेंज गोळ्यांसाठी रांगेत उभे होते

ती गोळी चघळतच मुंबई परिषदेत
प्रवेश मिळणार होता देशहितार्थ

समर्थ जातीचा माणूस आधीच

त्या परिषदेच्या निष्कर्षांचे कागद

फडकावत होता निलाजऱ्या, बुजऱ्या
कमकुवत, मळक्या, दरिद्री शर्टांपुढे

तेहतीस टक्के हक्क म्हणून आलेल्या स्त्रिया
आपापले आराखडे एकमेकींना दाखवून

पुन्हा जागच्या जागी ठेवत होत्या
त्यांच्या अनेक कप्प्यांच्या सुंदर पर्सेसमध्ये

समर्थ जातीचे कार्यकर्ते सर्वांची सोय
पाहात, नम्रपणे सर्वांशी समतेने स्मित

देवघेव करत होते, अगदीच कमकुवत जातीच्या
लोकांवरून त्यांची नजर पुढे निघून जात होती

जात-समानतेसाठी खास लंडनहून कोहिनूर हिरा
मागवला होता या परिषदेपुरता दर्शनासाठी

आपापली कुवत, ताकद ओळखून सगळे खुशीत गोळ्या चघळत
समान न्याय, समान संधी यांची पोस्टर्स पाहात रांगेत उभे होते
--- ००० ---

OCTOBER 18

हजारोंनी येतात पिल्ले
जरी गोजिरवाणी असली तरी
त्यांचा लळा थोडाच लावून

घेते कुणी ? खाऊन-पिऊन झाली
साडेतेराशे ग्रॅम की येतात गाड्या
त्यांच्या पुढील प्रवासाच्या

प्रत्येक दिवशी घडते वाढत्या
काही ना काही पिल्लांचे पण
त्या कुणी घटना नाही समजत --
त्यांचे जाणेही नसते घटनामय

घटनांमुळेच मात्र जर्जर होतो मालक
त्याचे आयुष्य घटत जाते खाजगी
त्याच्या घोंघावत्या अनावरपणे

ऐश करत हॉटेलात खात पार्टीत
बसल्या बसल्या चिकन
मालक एक टक एका
विचारात घटनेच्या विश्वासातल्या
पोखरणाऱ्या अपमानाच्या

मनालाच वाटते खूप
आहे सगळे घडलेले --
ते आठवते, साठवते, मोजते
आजचे, कालचे, आधीचे

मंद प्रकाशात … मलुल हसत …
--- ००० ---

मतभेदांनी मेंदू पिंजून झाल्यावर
आधी दारू मग चिकन झाले

मग सगळे समुद्रकिनारी गेले
रात्रीच्या वाळूत पाय खुपसून
सर्वांनी गाणी म्हटली

एकमेकांवर विश्वास नसूनही
त्यांनी एकाग्रतेने
लाल आणि काळ्या डुकरांचे
स्मरण केले गार वाऱ्यात
चंद्राकडे पाहात

पहाटे वाळूतून खेकडे बाहेर आले
मग कासवे आली आणि अचानक
उगवत्या सूर्याने डाव साधला

त्या जादूने चंद्र फिका पडला
नखे टाकून खेकडे पळाले
कासवांनी दात टाकून धूम ठोकली

व्हायचे तेच झाले
नखे आणि दात
गोळा करण्यसाठी झुंबड उडाली
मतभेदांऐवजी मारामाऱ्याच
सुरू झाल्या – रक्त
रक्त रक्त रक्त झाले

माणसे पुन्हा माणसांत आली
--- ००० ---

विचारस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांचा इतका प्रचंड वापर आणि भडिमार चालु आहे की
इतकी टोकाची सहिष्णुता आणि इतकी खुली लोकशाही जगात कुठे नसेल,
अशा अभिमानाने ऊर भरून यावा !
( किंवा कंटाळून, मालिका बघून, मग, जेवून झोपी जाणे व्हावे -- )

इंदिरा गांधी यांनी जे. कृष्णमूर्तींशी सल्लामसलत करून आणीबाणी रद्द केली आणि निवडणुका जाहीर केल्या – अशी माहिती पुपुल जयकर यांनी लिहिलेल्या इंदिराजींच्या चरित्रात आहे. पूर्ण भारतावर परिणाम करणारी ही घटना होती.

पण, जेकेंकडे कधीही कोणतीही सत्ता नव्हती. धर्मसत्ता हा प्रकार तर ते मोडीतच काढत !

OCTOBER 17

पाय तुटलेल्या माणसाला
चाकांच्या पाटावर बसवून ओढावे
तसे माझे आयुष्य – मी काय
लिहिणार स्वतःवर कविता –
तरीही मित्रांचा आग्रह म्हणून बळी
पडायचे ठरवले –

लगेचच सांगतो – माझे नसलेले
असे काही माझ्याजवळ आहे
ज्यामुळे मी नसलेले
असल्याचे दाखवू शकतो
माझ्या बारीकशा समजुतीचा स्पर्श
कोणत्याही अवाढव्य भूलभुलैयाला
करू शकतो नामोहरम
नामवंत पैलवानांनाही –
कुणी भाळते, कुणी भजनी लागते, कुणी
म्हणते याच्याइतका हलकट माणूस

जगात दुसरा नसेल

आहेच मी अद्वितीय – पण
मला माझे अप्रूप नाही – कारण
मला माहीत असते माझी
तुटपुंजी ऐपत
जी अनेकांना पेलत नाही
कारण त्यांचे नसलेले
असे काही नसतेच त्यांच्याजवळ

-- उरते फक्त माझा नाद सोडून देणे –

--- ००० ---

हृदयाचा नाश नको असेल तर
चित्तवृत्ती प्रसन्न ठेवा काहीही करून
पहारे बसवा आधी मतभेदांवर
अत्याधुनिक मोबाईल जय्यत
दाखवून संवादांतून मिळवा
स्त्रीगंध

कवाडे लावून घ्या ब्लू फिल्म्सची
निरपेक्षपणे राबत राहा आणि
पुढचे जन्म नाकारा
हुशारीने

आनंदी होण्याचे पवित्र खडे
बाळगा खिशात बाहेर पडताना
सुरक्षित वास्तूतून रस्त्यावर
विश्वासाने

कुणी कुणाचे नसते – हा मंत्र
स्वतः जपा, दुसऱ्यांनाही द्या
टक्कल पडलेल्या
डोक्यात खिळा ठोकल्याप्रमाणे
अप्रतिहत

पीळदार होण्यासाठी विचार
व्यायाम करा हास्याचा रोज
आहारात असू द्या एक पाल
खास तुमच्या वेगळेपणाची
द्योतक
--- ००० ---

OCTOBER 16

एक खोटी भीती लागेलच
स्वतःचा विश्वास बसेल अशी
खंदकावर पिरॅमिडचे आभास
उभे करावे एक स्वप्न
कुपोषितांना लग्नाच्या पंगतीत
मेंदूगच्च जेवण्याचे

माध्यमांतून पाठवावेत
हजारो दूत शहराचा
पाणीपुरवठा दूषित करणारे

सगळीकडे दिसत राहावेत
तंदुरुस्त उंदरांचे सेल्फीज

वाटेकडे डोळे लावून बसलेल्या

प्रेयसी कापून विकाव्यात

--- ००० ---

काँग्रेसी समीक्षा वा बीजेपी समीक्षा, असे कलेत काही नसते, त्यामुळे, मला ते आवडतात – मी आलटून-पालटून त्यांना मते देऊ शकतो – पण, समाजवादी वा साम्यवादी यांना कदापि नाही -- कारण, ते मानवी जगण्याचा पायाच उध्वस्त करतात – मुळातली, सखोल समतेचे आकलन होण्याची शक्यताच ते सतत नष्ट करत राहतात – ( धर्मद्वेषाधारित हिंदुत्ववाद इथे कुणी आणू शकेल, असे मला मुळीच वाटत नाही. )

ट्रंप साहेबांचे ऐकल्यावर, आपल्याकडची नेते मंडळी ही खूपच सभ्य आणि सुसंस्कृत म्हणावी लागतील !

तारिक फतेह म्हणतात की भारतातल्या डाव्या विचारसरणीच्या लोकांची अशी इच्छा आहे की इथल्या मुसलमान समाजात सुधारणा होऊ नयेत -- त्याच त्या जुनाट, कालबाह्य विचारांत तो खितपत पडावा !

OCTOBER 15

डॉ. अशोक रा. इंगळे – जी. के. ऐनापुरे – आजचा पुणे लोकसत्ता.
यातले खसच विशेष –

" ऐनापुरे प्रस्तुत ग्रंथातील सहाव्या भागात ग्रेस यांच्या कवितेतील असेंद्रिय ( inorganic ) आणि सेंद्रिय ( organic ) घटकांचा शोध घेतात. मात्र त्यांना ग्रेस यांच्या कवितेत ही असेंद्रियता नाममात्रच जाणवते. वस्तुतः असेंद्रिय घटक निसर्गातूनच येत असतात. म्हणजेच ते समाजातून येतात. हे असेंद्रिय घटकच स्वतः कवी नाहीसे करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळेच ग्रेस यांच्या कवितेतील सेंद्रियता संशयास्पद बनते. थोडक्यात, ग्रेस यांच्या कवितेत असेंद्रिय घटक काल्पनिकतेवर आधारित असल्यामुळे निर्माण होणारी सेंद्रियताही त्याच पद्धतीने अस्तित्वात येते. ग्रेस हा निव्वळ काल्पनिकतेवर चाललेला खेळ प्रतिमा आणि प्रतीकांच्या साहाय्याने खेळतात. म्हणून लेखनप्रक्रियेचा तो खेळ फसल्याची जाणीव त्यांची कविता वाचताना होत राहते. इथेच ' ग्रेसच्या कवितेतील भाषिक मर्यादा आपल्या ध्यानात येतात. भाषेच्या नाहीत. ' – असे जी. के. ऐनापुरे दाखले देत स्पष्ट करतात. "

-- या वाक्याच्या अनुषंगाने पाचसहा अभ्यासकांनी सविस्तर लिहिले तर पुढील पिढ्यांची काव्यजाणीव समृद्ध करणारा एक महत्त्वाचा ग्रंथ आकाराला येऊ शकेल.

डॉ. अशोक रा. इंगळे – जी. के. ऐनापुरे – आजचा पुणे लोकसत्ता.

या लेखातले दोन खास ( पण त्या लेखाच्या निरपेक्ष ) शब्दसमूह –

१.' आरंभबिंदूजवळच घुटमळणारी कविता '

( म्हणजे उदाहरणार्थ – माझे तुझ्यावरचे प्रेम ढगासारखे तलम, वाघासारखे डरकाळणारे, खारीसारखे चपळ – अशा पन्नास गोष्टींची यादी ओळींत ओवणारी कविता – जी पूर्ण वाचली नाही तरी चालते. )

२. ' दुःखाची नक्षी देणारी – दुःख वगळणारी कविता '

( म्हणजे ' वाह वा ' म्हणता यावी अशी दुःखाची करमणूक देणारी, पण, दुःखाचे भान देऊ न शकणारी कविता. )

कोणतीही गोष्ट अचूकपणे शब्दांत मांडता येण्यासाठी समीक्षक खास मर्मदृष्टीचा असावा लागतो.

ग्रेस हे काही माझे आवडते कवी नाहीत. काही वर्षांपूर्वी त्यांच्या कविता वाचल्या होत्या.

आता पुन्हा तिकडे वळण्याची शक्यता नाही.

आजच्या पुणे लोकसत्तेत डॉ. अशोक रा. इंगळे यांनी, ' ग्रेसची कविता – अर्थबोधाचे तपशील ' या जी. के. ऐनापुरे लिखित पुस्तकाचे परीक्षण ' ग्रेस यांच्या कवितेची उभी-आडवी छाननी ' या शीर्षकाने लिहिलेले आले आहे. हे परीक्षण तर उत्तम आहेच, पण ऐनापुऱ्यांचे पुस्तकही अपवादात्मक महत्त्वाचे असणार, असेच वाटते आहे. माहिती आणि परिचयवजा लिहिणारे समीक्षकच जास्त दिसतात. त्या गर्दीत, आशयाला भिडून, त्याची स्थिती जोखणारी समीक्षा हा ऐनापुऱ्यांचा विशेष दिसतो आहे.

यातली दोन वाक्ये मला अशी जाणवली आहेत की त्यांच्या स्वतंत्र पोस्ट द्याव्यात. त्या इथे देईनच.

ऐनापुरे आणि इंगळे यांचे मनःपूर्वक अभिनन्दन !

जन्मापासून बिंबवल्याप्रमाणे
पाय जमिनीवर राहिले
मग्रुरी नाही आली

मनमिळाऊपणाबरोबरच

भयग्रस्तता आली

कनेक्षन तुटण्याची

अंधाराच्या भीतीने

जमीन झाली

एक चाकोरीबद्ध मन

--- ००० ---

OCTOBER 14

घडलेल्या घटनांचे अर्थ

काय घडावे, काय घडू नये

यांचे अवाढव्य, अमर्याद जंजाळ

नऊ अब्ज डोक्यांचे

सतत सज्ज असणाऱ्या

विमानवेधी तोफांप्रमाणे

हे वगळले गेले तर

खळाळत मोकळे होतील

सगळे प्रवाह

मान्यवर प्लंबर आणावा लागतो

सॅनफ्रॅन्सिस्कोहून अत्यादरपूर्वक

असेल ती फी मान्य करून, तरीही,

निदान तोच करणार, उपाय तोच करणार

-- तुम्ही कशासाठी त्याला

मुकुट घातलात ते नगण्य असणार --

तुम्हाला लाख हवे असतील

विमानवेगी मोकळे प्रवाह, पण
इतर कुणालाच ते नको आहेत

तुम्हाला परवडेल तेच जगा --
तक्रारी करण्यात आयुष्य
वाया घालवू नका

पुढच्या पिढ्या हा तुमचा
भ्रम असू शकतो
--- ००० ---

OCTOBER 13

' सर्वांत हुशार, अभ्यासू आणि न्यायी ' लोकांनी बुद्धिप्रामाण्याच्या आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या मदतीने भूमिका घेताना त्यातला आपला व्यावहारिक फायदा बघणे हे विवेकात बसते का ? की बुद्धिप्रामाण्यावाद आणि विवेक यांच्यांतही एक दरार असते ?
( संदर्भ – त्रिवार तलाक वरची चर्चा ).

त्रिवार तलाक
समान नागरी कायदा या विभागात ‘ त्रिवार तलाक ‘ यावरची चर्चा ऐकली.
हा मुस्लिन स्त्रियांवर होणारा अन्याय असल्याने, समान मानवाधिकारांच्या न्यायाने, त्यात सुधारणा आवश्यक आहे, अशी एक बाजू आहे.
एकूण बलाबलावर आधारित काय ते ठरेल, पण, मला एक वेगळाच लोच्या दिसतोय
आणि त्याबद्दल खूपच उत्सुकता निर्माण झालीय.
उदारमनस्क ( म्हणजेच पुरोगामी असावेत ) असण्याची दोन लक्षणे आहेत –
मुस्लिमांना न दुखवणे आणि त्यांना पाठिंबा देणे
तसेच
सामाजिक सुधारणांना उत्तेजन, पाठिंबा देणे.
या प्रश्नाच्या निमित्ताने या दोन्ही वैशिष्ट्यांत दरार पडते आहे –

मुस्लिम मंडळी या सुधारणेच्या विरोधात असल्याचे दिसते

म्हणजे

मुस्लिमांना पाठिंबा द्यावा तर सामाजिक सुधारणेला विरोध करावा लागणार

आणि

सामाजिक सुधारणेची बाजू घ्यायची असेल तर मुस्लिमांचा रोष होणार !

बापरे ! अवघड दिसतोय प्रश्न !

स्वतःला फाडून ' भूमिका ' घ्यावी लागणार की काय ?

shared RANGASHANKARA's photo.

' ढोलताशे ' येतेय कानडीत --

अमुक रंग ना, माझ्या अत्यंत आवडीचा आहे

तमुक भाजी ना, मला अज्जिब्बात आवडत नाही

-- अशी सारखी स्वतःची वैशिष्ट्ये ठामपणे सांगत राहणे

हे अत्यंत भयग्रस्त जगण्याचे लक्षण आहे !

अशा लोकांनी एक करावे –

भयग्रस्त जगण्याची ना, मला मुळ्ळीच भीती वाटत नाही

-- असे मनातल्या मनात घोकत राहावे --

OCTOBER 12

डॉ. प्रज्ञा पवार यांचे पाटण विभागीय संमेलनातले भाषण वाचून त्यावर तिथेच माझी प्रतिक्रिया देत होतो -- पण, unable to post comment -- असे सारखे येत होते. त्यामुळे तो मजकूर इथे माझी पोस्ट म्हणून देत आहे --

पाटण विभागीय साहित्य संमेलनाच्या वेळी घडलेला प्रकार क्लेशकारकच आहे. डॉ. रावसाहेब कसबे आणि डॉ. प्रज्ञा पवार यांना त्या चालु असलेल्या संमेलनातून नेमके कुणी घालवून दिले, त्याची कारणे काय होती, हे अजून स्पष्ट झालेले नाही. तरीही, आपापले विचार मांडणाऱ्या या व्यक्तींबद्दल इतका संताप येणे हे सांस्कृतिक हिंसकपणाचेच वाटते. या संमेलनात डॉ. प्रज्ञा पवार यांनी केलेले भाषण वाचले. त्यातले मुद्दे वा तशा घटनांचे उल्लेख करून सास्कृतिक दहशतवादाबद्दल बोलले जाणे

हे यापूर्वीही घडलेले आहे. त्या भाषणात तरी कुणाला अचानक नवेच आक्रमण वाटावे, असे काही जाणवले नाही. मुख्य राग कदाचित डॉ. कसब्यांवर तर नसेल, अशी शंका आली. या एकूण प्रकाराबाबत मला दिसणारे मुद्दे इथे मांडतो –

१. बलात्कारित स्त्रीची जात बघून मग त्याबाबत निषेध, आंदोलन करावे का, असा विषय हल्ली चर्चेत असतो. दिल्लीत, भर रस्त्यात चाकूचे बत्तीस वार करून एका तरुणीचा खून झाला होता – ती क्लिप आणि बातमी टीव्हीवर पाहून मी इथे एक पोस्ट दिली होती. त्या स्त्रीबाबत नंतर कुठेच कुणीच काहीही दखल घेतल्याचे दिसले नाही. ना निषेध, ना चर्चा, ना आंदोलन, ना मोर्चा. तो प्रकार तसाच विरून गेला. तसेच, आणखीही अनेक बाबतीत दुःख वाटूनही आपण काही करू शकत नाही, असे घडते. उदाहरणार्थ तस्लिमा नासरीनच्या बाबतीत जे घडले तेही अनेकांना संतापजनक वाटलेले असू शकते. मुस्लिम समाज एका ठिकाणी सहानुभूतीला योग्य असतो तर एका ठिकाणी तो मूलतत्त्ववादी असतो. काश्मिरी पंडितांना पलायन करावे लागणे, हा विषय काहींच्या बोलण्यात सारखा येतो तर काहींच्या बोलण्यात येतच नाही. अशा विषयांवरच्या टीव्हीवरच्या चर्चा पाहिल्या तर, एकमेकांच्या विरुद्ध बोलणारे लोक त्यांच्या त्यांच्या समर्थनार्थ चार चार घटना घेऊन आलेले असतात आणि त्या एकमेकांवर भिरकावत असतात. खरे तर त्या एकूण आठही घटना वाईटच असतात ! यावरून असे दिसते की आपापले समूह आणि आपापले हितसंबंध यांवरच सर्वांच्याच स्वातंत्र्याच्या तत्त्वप्रेरणा चालत असतात !

२. दुसरा एक, वर उल्लेखल्यासारखाच, आणखी एक प्रकार म्हणजे, एकजण एकीकडे अन्यायग्रस्त असणे आणि दुसरीकडे क्रूर, हिंसक असणे. ' उध्वस्त धर्मशाळा ' मधला नायक आपल्याला दयनीय, अन्यायग्रस्त वाटतो, पण, त्याच्या विचारसरणीची सत्ता जिथे असते तिथे काय घडते ? सताधाऱ्यांविरुद्ध बोलणे वा त्यांच्याविरुद्ध चळवळ उभी करायचा प्रयत्न करणे यांबद्दल तिथे असते का सहिष्णुता ? डॉ. आंबेडकरांना साम्यवादाचा मार्ग का स्वीकारावासा वाटला नाही, हे माहीत असूनही, त्या नाटकाच्या नायकात आपण फुगवून हवा भरायचे काम केलेच !

३. डॉ. पवारांच्या या भाषणात, मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासून हे अशा दहशतवादाचे प्रकार चालुच आहेत, असे म्हटलेले असून जगभरातली अनेक उदाहरणेही दिलेली आहेत. म्हणजे, ही एक मानवी प्रवृत्तीच आहे, असे म्हणावे लागते. धार्मिक मूलतत्त्ववाद असो की वैचारिक बांधिलकी असो – वर्चस्व, सत्ता, अन्याय आणि दहशतवाद यांचा हा खेळ अव्याहत चालुच असतो आणि चालुच राहणार, असे दिसते. सर्व मानवजातीचा एकच समूह होणे आणि सर्वांचे हित एकच आहे, असे समजणे, कुठेही दृष्टिपथात नाही.

४. निषेध, धिक्कार, चळवळी, लढे हे सगळे आहेच चालु सगळीकडे. इथे प्रश्न असा येतो समोर की ' आदर्श ' व्यवस्था आलीय का अस्तित्वात कुठे ? तसे असते तर तिचा या भाषणात उल्लेख आला असता. म्हणजेच दडपणारा आणि दडपला जाणारा हे दोन वर्ग जगभर अमर दिसतात !

५. एकूणात माणसे जात, भाषा, धर्म, प्रांत, विचारसरणी वा कुणी थोर व्यक्ती -- विभूती, यांपैकी कुठे ना कुठे समरूप ( identify ) झालेली असतात. त्यात त्यांना सुरक्षितता वाटते. शिवाजीमहाराजांच्या अनुयायांनी जी त्यांची प्रतिमा मनात स्वीकारलेली असते तिला धक्का लागला की ते चवताळून उठतात. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या स्वीकृत मानसिक

प्रतिमेला धक्का लागला तर त्यांचे अनुयायीही खवळतात. भावना दुखावतात कारण आपल्या समरूपता विषयाला धोका म्हणजे आपलाच मृत्यू, असे होऊन बसलेले असते. समाजाच्या कमीजास्त प्रगत वा समंजस असण्यावर फार तर याचे प्रमाण बदलत असेल. अशा बाबतीत वाद, ऐतिहासिक सत्यांचे उत्खनन वगैरे सगळे बालिश, निरर्थक आणि हानिकारक ठरते. दोन समूहांना एकाच बाबतीतली दोन वेगवेगळी ऐतिहासिक सत्ये महत्त्वाची वाटू लागली तर कमकुवत घटकाने गप्प बसणे, हाच मार्ग उरतो.

६. हिंदुत्वाचा खूप दबाव वाढला असून इथले मुसलमान लोक फार दडपणाखाली, भीतीग्रस्त जगताहेत असे दिसत नाही. इथल्या मुसलमानांची संख्या आणि त्यांची प्रतिकारक्षमता पाहता कुणी फारसे असे काही करूही शकणार नाही, असे वाटते. सध्या तरी सर्वांचे दैनंदिन व्यवहार नीट सुरू असून त्यांतले काहीजण मुक्तपणे अभिव्यक्तिस्वातंत्र्यही वापरत आहेत. टीव्हीवर तर अनेकदा अत्यंत कर्मठ लोकांनाही बोलु दिले जात आहे.

७. " स्पष्टपणे विरोध पत्करत, प्रसंगी पूर्णतः एकाकी पडत परखडपणे अभिव्यक्त होणे म्हणजे भूमिका घेणे. सर्वांना रिझवत, ज्याला जे ऐकायला आवडते ते ऐकवत फिरण्याला भूमिका घेणे म्हणत नाहीत " -- असे एक वाक्य या भाषणात आलेले आहे. मला असे दिसते की माणूस एकाकी असतोच. त्याची वाढ, त्याच्यावरचे प्रभाव, त्याचे अनुभव, सुखदुःखे, त्याचे नातेसंबंध, या सगळ्यांतून घडलेला त्याचा स्वभाव – यांमुळे तो इतरांपासून अलग आणि एकाकी पडलेला असतोच. त्या एकाकीपणातूनच तो सुरक्षिततेच्या आशेने कुठेतरी समरूप झालेला असतो. असा माणूस परखड होणे म्हणजे काय ? त्याची अलगता अधिक धारदार करत पण त्याच समरूपतेला बांधील राहून लिहिणे ! हे पाहता, भूमिकेचे कौतुक फारसे टिकणार नाही, असेच दिसते.

८. सारांश म्हणजे -- प्रत्येक दडपशाहीबद्दल रागही येऊ शकतो आणि त्याचबरोबरच मानवी जगण्याची ही रचनाही दिसू शकते.

या पद्धतीने हे सगळे बिनतोड आणि विनानिराकरण वाटते !
यातून असू शकतो का काही मार्ग – हाच प्रश्न मग शेवटी सर्वात महत्त्वाचा वाटू लागतो !

-- मूळ भाषणापेक्षा प्रतिक्रिया लहान राहावी याची काळजी घेतलेली आहे, तरीही, जरा जास्तच झाला की काय मजकूर, कोण जाणे ! यातले कुणाला काही अयोग्य वाटले तर त्याबद्दल आधीच दिलगिरी व्यक्त करून ठेवतो ! जे वाटले ते प्रामाणिकपणे लिहिलेले आहे. धन्यवाद !

OCTOBER 10

निसर्ग कविता

सौंदर्यलक्ष्यी कविता

प्रेमकविता

विरहकविता

भक्तिकविता

निराशेच्या, दुःखाच्या, औदासीन्याच्या कविता

-- हे सगळे माणसाला संवेदनशील, तरल करणारे असते. माणसाच्या मनाचा क्रूरपणा कमी करणारे असते. न्यायाच्या, समतेच्या शक्यता वाढवणारे असते.

नष्ट तर व्हायला नकोय ना हे ? मग, याला ‘ सुखवस्तू लोकांची चैन ‘ म्हणून हेटाळणे बंद व्हावे.

सर्वजण सुस्थितीत येईपर्यंत सर्व सांस्कृतिक प्रवाह बंद ठेवावेत, हे मुळीच हिताचे नाही.

आणि मुख्य म्हणजे, सुस्थितीतल्या लोकांना दुःखे नसतात, ही एक भ्रामक कल्पना आहे.

खूप श्रीमंत लोकांनी आत्महत्या केल्याच्या अनेक गोष्टी नेटवर पाहता येतात.

पंचतारांकित हॉटेले कुणी बंद पाडू शकते का ?

मग, कलेतल्या या अनाक्रमक गोष्टींचा राग का धरावा ?

छोड दो बाकी सब

पक्ष्यांची लगबग , उन्हात दिसणाऱ्या झाडांच्या असंख्य हिरव्या छटा,

खूप दिवसांनी मोकळे झालेले निवांत आकाश

-- इकडे जरा लक्ष देऊ --

-- जमल्यास --

ओल्या पण सावरलेल्या मूर्ती ऐकतात

प्रामाणिकपणे पण त्या खूप जुन्या असल्याने

त्यांच्या विचारांना फाटे खूप फुटतात

आतून सतत फुटत असल्यासारखे जगणे

खरे तर नको जीव करणारे – बाजूच्या

डोंगरावरच्या कावळ्याला कालव्ययाला

बोलावणारे त्याच्या आवाजासह का असे ना

संवाद साधायचे प्रयत्न करतातच खूप

पर्यटक नंतर वावड्याही उठवतात

त्या मूर्तींनी मने खुली केल्याच्या

दगडांचे गुण स्वीकारलेली मने
वर्षानुवर्षे गातात प्रेमाची गाणी
नजाकत हरवलेली वृद्ध फुलपाखरे
क्वचित ये-जा करतात
एखाद्या स्त्री मूर्तीच्या स्तनावर
काही क्षण थबकूनही जातात

चेहरा समोर पण मन सतत
मागे वळून पाहणारे लहानपण
आठवणारे किती कष्टाने टक्केटोणपे
खात वाढलो आपण
याचे समाधान वाटणारे तेही दगडी

आयुष्य खूप आहे पण आता
उरलेय काय अशी अवस्था
पायऱ्यांवरून घरंगळत जाणारे
दगड आणि कावळे मोजणारी
--- ००० ---

OCTOBER 9

१. नोबेलसह सर्व पारितोषिके दिली जाण्यात राजकारण असते म्हणजेच सर्वमान्य गुणवत्तेचा वगैरे त्यात संबंध असत नाही.

२. अमुक कला मौल्यवान असे सर्वमान्य काही असू शकत नाही. त्याबाबत अनेक आवडी आणि मते असतात.

३. माणसाचे हित कशात आहे याबाबत जागतिक मान्यताप्राप्त विचारसरणी असू शकत नाही.

-- समजा ही अशी यादी आणखीही वाढवता येईल. म्हणजेच, सारांश असा की अमुक चूक, तमूक बरोबर किंवा हे न्यायाचे, ते अन्यायाचे किंवा हे नीतीचे, ते अनीतीचे – असे काही नसते. एकूण गोंधळ मान्य करूनच जगायचे असते. मग राहते काय – सत्ता कमावणे, अधिकाधिक लोकांना अंकित करता येणे.

-- हेच सत्य समजायचे का ? की अधिक बरे काही शक्य आहे ?
( सर्व मानवजातीला मान्य आहेच असे यावरून गृहीत धरता येईल असे काय आहे तर -- रक्तपात, अत्याचार, विषमता, हुकुमशाही आणि सततचा गोंधळ आणि अराजक ! )

OCTOBER 8

कुणाकुणाच्या काय काय मागण्या आहेत याबाबतच्या बातम्या आणि लेख मी शीर्ष-ओळी वाचून बऱ्याचदा सोडून देतो कारण, इतके सगळे समजून घेत बसणे शक्य नसते --

कोणत्याही चांगल्या कलेचे काम काय --
बाजू घेऊन न्यायदान करणे की
मानवी जगण्याचे करुणायुक्त भान घेणे ?
असे भान व्यक्त होण्यात सगळेच
त्या वास्तव-कोंडीच्या बाहेरचे समजून घेण्याची शक्यता असते.

सामाजिक, आर्थिक, नैतिक, जातीय, भाषिक, वर्गीय, धार्मिक -- अशा निरनिराळ्या पायांवर दुसर्या एखाद्या समूहाचा वा व्यक्तींचा द्वेष वा हेटाळणी करणे हे जर या पुरोगामी महाराष्ट्रात प्रतिगामी असेल तर इथले पुरोगामी कोण ? की यांतले काही द्वेष पुरोगामीपणात बसू शकतात ?

बुद्धिप्रामाण्यवाद्याकडे विवेक असू शकत नाही.
स्वत:च्या एकरेषीय विचारात तो इतका वाहोटीला लागतो
की त्याला इतर काही आजूबाजूचेही दिसू वा समजू शकत नाही.
एकरेषीय विचार हा विवेकाचा शत्रू असतो.
विवेक हा फक्त समावेशक परिपक्वतेतच शक्य असतो.
( हे न समजल्याने, बुद्धिप्रामाण्यवादी लोक सांस्कृतिक क्षेत्रात
विवेकमूल्याचा विध्वंस करत राहतात. )

OCTOBER 7

जणू काही आम्ही वाढलो
दगडांचे रस आणि पक्ष्यांचे डोळे यांवर
रसांचे आणि डोळ्यांचे रंग फक्त वेगवेगळे –
कॉमन एकच घडले, आमच्या मनःस्थिती
मतभेदांच्या घडल्या किराणा दुकानातून
साबण पावडर आणि रक्त आणल्याप्रमाणे

आम्ही बोललो नाही तरी कळते
कुणाचेही मन दातओठ खात आपल्याकडे पाहात
आपोआप कुरूप होत चाललेले
हसत हसत खोटारड्या चेहऱ्याने
खिशात विंचू बाळगणाऱ्या

नको वाटते असे जगणे उंटावरून
मैला वाहून नेल्यासारखे
सतत संघर्षमय, निरर्थक वाटत राहते
वांझ प्रगत होत जाणे

नाहीच आवडत सतत इतरांना
ढकलुन द्यावेसे वाटणे आणि नाहीच आवडत
त्यांची रूपेच बदलावीशी वाटणे
त्यांचे चेहरे फाडून

कधी वाटते स्वतःच नष्ट होणे गरजेचे आहे
रोज घेत आलो त्या आहाराने आपण
आळशी झालोय

हे तरी किती वर्षे म्हणायचे – ठप्प चिखलसारखे

--- ००० ---

या महान विद्वानांची भांडणे ऐकून जनता आपली मते बनवत असेल का,

हे खूपच संशयास्पद आहे -- इतर अनेक प्रभावी कारणे असणार.

तरीही, काय ईमानदारीत, जीव खाऊन, ओरडत, बोंबलत भांडत असतात !

लोकशाही म्हणजे विचार नव्हे -- विचारांचे आवाज !

( ज्यांना मते घडवण्यात नगण्य स्थान असणार ! )

आता मी माणसांना म्हणेन वटवाघुळे

आणि जिराफांना म्हणेन प्रोफेसर्स

विचार करण्याला म्हणेन गटाराचे

पाणी वाहणे प्रेमाचे बहाणे पाहून म्हणेन

भ्रष्टाचाराला पंख फुटणे

असे करता येणे किती महत्त्वाचे आहे

ते प्रयत्न कराल तेव्हाच कळेल

कारण, मुळीच नाही तयार होत मेंदू

सवयी सोडायला

काय उपयोग आहे अशा निरर्थकतेचा

असे वाहील गटाराचे पाणी

पण, निरर्थकतेसारखी संजीवनी नाही

अर्थांच्या जगाला वाचवायला

सुरुवातीला प्रचंड घाबराल

या निरर्थकतेत पाऊल टाकायला

मान्यवर प्रोफेसरांची होतील वटवाघुळे

आणि रोजच्या सवयीच्या जगण्याचे

छाटले जातील पंख

अर्थांच्या जगातले जाच
ताणतणाव, संघर्ष
एकमेकांना फसवणे
कुणी कसे वागले पाहिजे ते सांगणे
आणि आपल्याला खूप कळते असे वाटणे
नष्ट होईल – मस्त मोकळे वाटेल – अमर्याद –
--- ००० ---

OCTOBER 6

मुंबईचे खड्डे आणि नाशिकचे खड्डे
कोण जबाबदार
अधिकारी, कंत्राटदार
असा जोरदार वाद चालला होता
सात्त्विक संतापयुक्त !
वादक होते दोन्हीकडचे लोकप्रतिनिधी !
भयानक संतप्त !
पाहून जनता तृप्त झाली !

एवढे महागडे फर्निचर घेतल्यावर
त्याच्या उपभोगासाठी मेंदूत खंजीर असायला हवेत
तुमचे सगेसोयरे सेक्सी असले तरीही तुमच्या
चेहऱ्यावर मऊ, मवाळ भाव असायला हवेत
गल्लीबोळातला ऊरबडवेपणा
विसरून अधिक मूलभूत नाशाची किमया
आत्मसात व्हायला हवी
तुम्ही म्हणजे हजारो मधमाशा

तुम्ही म्हणजे भटक्या कुत्र्यांचे रक्षणकर्ते
तुम्ही म्हणजे दुर्लक्षित वाघांना न्याय देणारे
असे होऊन वर इतिहास, विचार आणि करुणा
यांचे अप्रतिहत प्रवाह असायला हवेत
तुमच्या जगण्यात अनेक खूनही पचवून
कुणी व्हिलन समजले तरी अनेकांना तुम्ही त्यांचे
सेनापती वा राजे वाटायला हवेत वेळ पडल्यास
आहात तुम्ही चूक-बरोबर न पाहता पाठीशी, असे

वाचा, अभ्यासही करा पण माणसे हाताळा
दुसऱ्यांना धोकेबाज आणि स्वतःही धोके पत्करणारे
असे जाँबाज व्हा टिपटॉप पोषाखात
ज्यांचे नुकसान केलेत त्यांच्यापुढेही नम्र व्हा
करुणामय व्हा – शत्रू आणि शत्रुत्व हे कमीच ठेवा
ठेवा शक्यतो चेक प्रत्येक संभाव्य प्रतिस्पर्ध्यावर
देव, पितर आणि वृद्ध यांचे आशीर्वाद घेत राहा

खूप उलाढाली, मानापमान, डावपेच आणि तुम्हाला
नामोहरम करण्याचे प्रयत्न चालुच राहणार
तरीही, दारू वा गोळी घेऊन का असे ना – शांत झोपा
--- ००० ---

काल टीव्हीवर न्यायमूर्ती पी. बी. सावंत यांची मुलाखत पाहिली. तिच्यातले मुद्दे –

१. आरक्षण हे जातवार नसते -- अनुसूचित जाती व जमाती तसेच इतर मागासवर्गीय -- अशा विभागांना ते असते -- त्या त्या विभागात योग्य त्या जाती समाविष्ट असतात. म्हणजे, आता मराठा या जातीला आरक्षण द्यायचे ठरले तर ती जात यांतल्या एखाद्या विभागात म्हणजे इतर मागासवर्गीय, यात समाविष्ट होईल.

२. त्यांच्या मते आरक्षण हे अपवादात्मक संख्येला असायला हवे – म्हणजे असे की अनुसूचित जाती/जमाती आणि इमाव यांच्यसाठी ८५ टक्के जागा ठरत असतील तर तसे न करता उरलेल्या १५ ट्क्क्यांना आरक्षित करावे आणि बाकी सर्व जागा त्या ८५ टक्यांतल्यांच्या स्पर्धेने भराव्यात.

३. आर्थिक निकषावर आरक्षण हे तत्त्व योग्य होणार नाही कारण त्याचा लाभ बराचसा प्रगत जातींतले लोकच घेत राहू शकतील.

OCTOBER 5

प्रेमकविता

१.

खरे तर सततच असते
आपल्या प्रेमाची वेळ
यशस्वी न होणारी असंख्य
सामाजिक, राजकीय प्रश्नांमुळे
जे उद्भवतात समोरच्या
डोंगरावरच्या आलिशान
बंगल्यात राहणाऱ्या
एका वाळवंटी
खजूरवाल्यामुळे

तो क्वचितच बाहेर येतो
कारण त्याच्या सर्व कारवाया
होत राहतात परस्पर
एका शेयर दलालामार्फत

म्हणून तुझ्या नावावर शेयर घेतले
जरी तू लकी नाहीस, असे तुझे म्हणणे होते
तुझा ड्रेस तू ज्या दुकानातून पसंत केलास
ते त्याच दलालाचे तर होते

तरीही प्रेमासाठी भेटायचे ठरवलेच आपण
सांजवेळी जेव्हा एक तर तो दलाल पीत असतो
किंवा गोकुळीचे गुणगान करण्यात मग्न असतो
आपण धर्माच्या विरोधात थोडेच आहोत

--- ००० ---

२.

दोघांचाही मूड होता
वेळही ठरली होती
तेवढ्यात पाऊस आला
रोमँटिक जरी तो नैसर्गिक असला
तरी तितकीच नैसर्गिक
आपली तीव्रता रस्ते बंद झाल्याने
मारली गेली

शुभस्य शीघ्रम म्हणून
आपण पाऊस बघत
मोबाईल सेक्सचा
लाभ घेतला
शहरात भेदभाव
राहिलायच कुठे
नैसर्गिक आणि अनैसर्गिक
असा

माझ्या आणखी दोन मैत्रिणी
तुला माहीत असल्याने
जग खूप मोठे आहे
हे तू मान्य केलेस
तसेच मीही

माझ्या माहितीला तुझी माहिती
पूरक ठरली – कित्ती तोडीस तोड
यावर भेटशील तेव्हा एक किस घेईन

--- ००० ---

३.

बघता बघता आणि हां हां म्हणत्ता
झाले एकदाचे सगळे पूर्ण माझ्या
मोर्च्यात सामील व्हायच्या
वेळेआधी

हे सगळे आमच्या मागण्यांप्रमाणे
झाले तर आपण पुढल्या वर्षी
सजवू शकतो आपली कार
धूमधडाक्यात

म्हणजे इतर कुणाला कबूल
केले नसलेस तर माझा शब्द मी
सर्वांत आधी तुलाच देतोय
निर्णय घे पीसीवर आलीस की

या जगात आपणच आहोत
एकमेकांचे असे प्रेम करू
एका छोट्याशा छान फ्लॅटमध्ये
गुलाबाचे चित्र लावू

तू फार कमी बोलतेयस
की गोंधळलीयस ?

शांतता आणि क्लॅरिटी

यांच्या मदतीने ठरव फायनल

--- ००० ---

OCTOBER 4

डावी विचारसरणी आणि कला या गोष्टी एकत्रच पाहायला हव्यात !

देशभक्ती आणि कला या गोष्टी वेगवेगळ्या पाहायला हव्यात !

-- हे कळायला अवघड वाटते !

एका कट्टर विचारसरणीच्या अनुयायांबद्दल आपण असे म्हणू शकतो की त्यांनी अथक परिश्रम आणि प्रचंड अभ्यास करून गधडेपणा कमावलेला असतो. ते बोलतील ते सर्वांनी प्रमाण मानले पाहिजे, अशा आक्रमक भ्रमात ते जगत असतात. तरीही, स्वतःच्या कपाळावर ते ‘ सहिष्णू ‘ असा शब्द मिरवत असतात ! शिवाय, इतर सर्वांनी सतत सहिष्णू असले पाहिजे, असे ते दरडावून सांगत असतात ! अशा लोकांना, थोडक्यात, अति-बुद्धिमान वेडे, असे म्हणता येते !

मन सतत पूर्वग्रहदूषित ठेवायचे असेल तर

एकूणातच खुजेपणा स्वीकारावा लागतो.

OCTOBER 3

आनंदाचे विश्लेषण वा विच्छेदन करून त्याचा दर्जा आणि त्याची प्रत आणि त्यातली सुधारणा आणि त्याची सत्यता पारखत बसण्यापेक्षा

तो नुसता असू दिलेला बरा !

नेट बंद होते -- दुसरे काही काम नव्हते, मग वाटले, कविता लिहू --

तर या तीन कविता --

नेट बंद असल्याप्रमाणे

अँटिबायोटिक्सच्या गोळ्या

कोंबल्या मेंदूच्या पिशवीत
आणि घसा बिघडल्याप्रमाणे
शेळीच्या लेंड्यांचे भस्म
धारण केले कपाळावर

परतावा मिळतो
ही खात्री असणे
महत्त्वाचे होते
उगीचच कुणी कशाला
शिकत बसेल
निरनिराळ्या केशरचना

फावला वेळच नसण्याच्या
या काळात – सेक्ससाठीसुद्धा
एकत्र येता येत नाहीय
वाट बघत
बसावे लागतेय फास्ट ट्रेनची

गोळ्या, उदबत्त्या, पिना
आणि जगाचे नकाशे
विकणाऱ्यांकडून
कोणत्या अपेक्षा करणार

अतिरेक्यांचा बंदोबस्त करणे
हे आयुर्वेदाचे काम आहे
किंवा संमोहनविद्येचे
--- ००० ---

तुमच्या मनात हेतूंच्या सावल्या
नसल्या तरीही दुसऱ्यांच्या मनांत
त्या कशा पडाव्यात यावर
तुमचा ना ताबा ना क्रोध

माहीतच नसते तुम्हाला
कुठे कसे चाललेत
आरोह, अवरोह
बटण दाबल्याप्रमाणे
चालु, बंद होणारे वाटते
तुम्हाला जग

तुमच्या शब्दकोशांतून पडा
बाहेर आणि बघा अनावृत भासांचे
अमर्याद जग

अमुक झाले की तमुक होईल
हा विश्वास आहे तुमच्याकडे
म्हणून तुम्ही चाललाहात
पुढे पुढे स्वतःला न विसरता

आजारी पडलात तर आहे
अणुभट्टी हा विश्वास तुम्हाला
तरून नेतो सर्व जंतूंच्या
हिंसक स्पर्शांतून

तुम्हाला तरी कुठे आहे
शांत व्हायला वेळ
--- ००० ---

मतभेदांमुळे मला माझे अस्तित्व
दगडी, कणखर आणि निर्विवाद
वाटते – किक बसल्याप्रमाणे

माझी कपॅसिटी ओळखून आहेत
माझे मित्र आणि ढग
मी दगा नाही देत
रात्री-अपरात्रीही
माझ्या अंगात स्वप्ने असोत की
नरकाचे डेव्हलपमेंट प्लॅन्स

स्त्रियांना आवडण्याचा दोष तर
सोडाच, मी एखादे वेळापत्रकही
कधी नीट पाळत नाही
जरी मला
त्याच्या शिक्षाही भोगाव्या
लागतात आणि उचक्याही
जगणेच धोक्यात आणणाऱ्या

मी स्वीकारून चालतो निसर्ग
आणि ऑफीस आणि नाती आणि
माझ्या प्रगतीचे परदेशप्रवास

दुर्घटना वा अपघात मी
ना नाकारतो ना भयप्रद मानतो
माझे एक खुबीदार धोरण असते
निवडक व्यक्ती आणि वस्तूंना
मोठेपणा देणे
--- ००० ---

OCTOBER 2

भारताचे संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांनी पुण्यातल्या हडपसरच्या कचरा डेपोची पाहणी केली आणि लौकरच तिथल्या दुर्गंधीवर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

( आजचा पुणे सकाळ )

-- या कामासाठी एवढ्या मोठ्या देशाचे संरक्षण मंत्री ?

OCTOBER 1

साधन शुचिता ही त्या वापरल्या जाणाऱ्या साधनात असावी लागते

की ते साधन वापरणाऱ्याच्या मनात असावी लागते ?

हिंसेमुळे जीवसृष्टी व वस्तुमात्र यांचा नाश होतो – तसे होणे योग्य नाही – या विचाराने गांधी अहिंसा सांगत होते की कुणाचेही हिंसायुक्त जगणे हे त्या व्यक्तीचेच, स्वत:चेच जगणे विकृत करणारे असते, म्हणून ?

भारतात दोन व्यक्ती महत्त्वाच्या --

१ -- अहिंसा सांगणारे गांधीजी आणि

२-- तू हिंसा करतोयस, असे कर्तृत्व स्वत:कडे घेऊच नकोस, असे सांगणारा श्रीकृष्ण.

-- या दोन्हींचा समन्वय असा काही असू शकतो का ?

“ आपण बरीच वर्षे एकमेकांना ओळखतो – “

“ बरे, मग ? “

“ आपण एक वेगळाच खेळ खेळू –

तू माझ्या ढोंगीपणाचे, वावदूकपणाचे वा खोटेपणाचे दहा प्रकार सांगायचे –

मी तुझे सांगणार – ते झाले की पुन्हा पाच –“

“ तरीही, आपण बिगरढोंगी थोडेच होणार आहे ? “

“ मला वाटले, आपल्याला माहीत नसलेले कळल्याने आपण सुधारू –

जागरूक होऊ – “

“ सगळे लोक आयुष्यभर हाच तर खेळ खेळत असतात – “

" तू सुधारणार नाहीस – "

दुकान चालवणे, कारखाना चालवणे, अभ्यास करणे, संशोधन करणे,
कला, तत्त्वज्ञान, अध्यात्म, वाद, चर्चा, फेसबुक, खेळ, नोकरी, वगैरे सर्व
समजा भरल्या पोटी करायच्या गोष्टी आहेत.
या गोष्टीही काहीजण तहानभूक विसरून करतात, ते सध्या सोडून देऊ.
पण, उपाशी पोटी करायच्या गोष्टी कोणत्या ?
आणि भरल्या पोटी करायच्या गोष्टी क्षुद्र का समजाव्यात ?

SEPTEMBER 30

नवाब मलिक टीव्हीवरून थेट सल्लूविरुद्ध खरे बोलले आहेत.
( संदर्भ -- काल टीव्हीवर पाहिलेली ' पाकिस्तानी कलाकार ' यावरची एक चर्चा. )
-- यात कलाबिला काही नसते – असे कलाकार इथेही खूप उपलब्ध आहेत –
हे सगळे का चालते ? – तर ओव्हरसीज बाजारात
आंतरराष्ट्रीय कलाकारांनी युक्त असलेल्या चित्रपटांना मोठे मार्केट आहे !
ही सगळी ' कमाई ' ची गणिते लक्षात घेऊन हे चालते !
-- वा, मलिकभाई !
चित्रपट हा फक्त चांगला किंवा वाईट असतो –
( धंद्याच्या चित्रपटात कराव्या लागणाऱ्या तडजोडींमुळे
काही बिघडत नाही ) -- असे म्हणणाऱ्यांनाही
चांगला झटका दिलात !
-- हे सर्व पाहता –
हे कलाकार आहेत, यांचा अपवाद करा
-- या म्हणण्याला फारसा अर्थ राहात नाही !
त्यामुळे, सल्लूचा सांस्कृतिक पुळका रद्द !

नुसता हूमदांडगेपणा फारसा उपयोगाचा नसतो.
बरळताहेत तर बरळू द्या.

कुरव्यात आतंकवादी जेव्हा देशाचे प्रवक्ते असल्याप्रमाणे

प्रतिक्रिया देत राहतात आणि त्या देशाचे नियुक्त नेते

त्यांना चाप लावत नाहीत, असे दिसत राहते

( चाप लावायचा नुसता थोडा प्रयत्न जरी केला तरी

ते भडवे देशातच हैदोस घालतील -- ही जाणीव असल्याने ) तेव्हा तो देशच आतंकवादी आहे,

हे वेगळे म्हणायची गरजच राहात नाही !

आंतरराष्ट्रीय राजकारणात थोडे डोकेही लागते,

हे माहीत असले तरीही,

आपणच पोसलेल्या राक्षसामुळे

पूर्ण जगासमोर नंगे व्हायची वेळ कशी येते,

त्याचे हे उत्तम उदाहरण !

घडवलेल्या एका योग्य कृतीमुळे उपद्रवी बाजू कशी आपोआप

उघडी पडत जाते, ते आता दिसत राहील --

समजून घेणे म्हणजे प्रतिक्रिया देणे नव्हे --

September 2016

SEPTEMBER 29

तिथे अतिरेक्यांचे तळ होते आणि त्यांत अमुक इतके अतिरेकी होते -- हे माहीतच नव्हते, असे दाखवणे त्यांना भागच आहे

-- त्या कारवाया त्यांच्या नसतातच, हे ढोंग चालु ठेवण्यासाठी तसे करावेच लागणार !

त्यामुळे, असे काही घडलेलेच नाही, असे म्हणत राहणे त्यांना भाग आहे !

मनात दुखत असले तरी बोलता येणार नाही !

मध्येच जरा वेळ होता आणि एक पुस्तक प्रदर्शन चालु असल्याचे दिसले म्हणून ते पाहिले. हिंदी पुस्तकांचे होते. ९० टक्के पुस्तके धार्मिक वा तत्सम प्रकारची होती ! सगळ्यात कहर म्हणजे वेदमूर्ती श्रीराम शर्मा नामक एक लेखक आहेत – त्यांची विद्वत्ता आणि ग्रंथसंपदा पाहून अवाढव्य थक्क झालो ! सगळ्या वेदांच्या हिंदी अनुवादांच्या खंडांपासून असंख्य विषयांवर भरपूर पुस्तके ! ती न वाचताही मनातून त्यांना नमन केले ! एवढी पाने नुसते ‘ जय मराठी ’ असे लिहायचे म्हटले तरी अशा

दोन-पाच पुस्तकांत अवसानघात होऊन जाईल कुणाचाही ! दुनिया खूप मोठी आहे आणि तिच्यात असे खूप काही प्रचंड अचरजवाले आहे, हेच खरे !

अत्यंत सुमार, कंटाळवाणा, अनावश्यक ' प्रायोगिक ' असा एक मराठी चित्रपट पाहिला – मिस्टर अँड मिसेस अनवाँटेड ! द्विपात्री चित्रपट ! असे धाडस यापूर्वी मराठीत झालेले नाही ! या चित्रपटामुळे माझ्याही डोक्यात आलाय विचार -- आपणच का लिहू नये एखादा चित्रपट ? मला हव्या त्या वेळेला हाच उपलब्ध होता म्हणून पाहिला ! बाल्कनीमध्ये आम्ही फक्त पाच प्रेक्षक होतो – मध्येच दोन निघून गेले ! रस्यातून गल्लोगल्ली भटका हवे तर तासदीड तास पण या सिनेमाच्या वाटेला नका जाऊ –

SEPTEMBER 28

स्वतःला न पटणाऱ्या लोकांचे उल्लेख -- शहाणे, दीड शहाणे, सज्जन, विद्वान, अक्कलवान, पुरोगामी – असे हेटाळत न करणारे मन असू शकते ? प्रत्येक माणूस कशाशी ना कशाशी समरूप ( identify ) झालेला असतोच – मग ते धर्म, देश, जात, भाषा, एखादी विचारसरणी, पक्ष, कुणी पुढारी, गुरू -- असे काहीही असेल. त्यातूनच हे हेटाळणीचे आणि स्वतःला फार कळत असल्याचे भ्रामक सूर सारखे बोलण्यात येतात. मूल्यात्मक जगणे म्हणजे काय, हे प्रत्येकजण आपापल्या, ' निर्विवाद ' वाटणाऱ्या, अशा समरूपतेतून गृहीत धरत असतो. त्यामुळे, निरर्थक संघर्ष, रटाळपणा आणि जगणे वाया घालवत राहणे – हे एकूणच मानवजातीचे अटळ भवितव्य ठरते !

आम्ही शांत आहोत
आम्हीही शांत आहोत
आम्ही कुणाच्या विरोधात नाही
आम्हीही फक्त आमच्या मागण्या मांडत आहोत
आमची मते वेगळी आहेत
आम्ही यापुढे अन्याय सहन करणार नाही
अमुक केले नाही तर परिणाम वाईट होतील
तमुक व्हायलाच हवे
हा लाखोंचा आक्रोश आहे
ही लाखोंची वेदना आहे

अहो, पण सगळे सगळ्यांच्या
मनांसारखे कसे होणार
मागण्या सेम नसताना
मागण्या विरोधी असताना

सरकारने योग्य ती कृती करावी
सरकारने सत्वर न्याय द्यावा
आमच्या शांततेची परीक्षा घेऊ नये
या शांततेचा उद्रेकही होऊ शकतो
आमचे आमच्यापुरते नाही
आमच्याही बरोबर हे, ते आहेत
हे उपाशी लोकांचे प्रश्न आहेत
आम्हाला सुरक्षितता हवी आहे
हा लाखोंचा प्रश्न आहे
हाही लाखोंचा प्रश्न आहे
शांततेत तोडगा निघावा
हो, शांततेने
--- ००० ---

SEPTEMBER 27

शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत एक उपाय सुचतो -- तो असा --
दिवसाची कॉलेजेस ही १०० टक्के आरक्शितांसाठी असावीत
आणि रात्रीची कॉलेजेस ही फक्त अनारक्षित विद्यार्थ्यांसाठी असावीत.
-- हा पर्याय अधिक न्यायाचा ठरू शकेल, असे वाटते.
की यात काही अशा अडचणी येतील की ज्या सोडवताच येणार नाहीत ?

' भटक्या कुत्र्याला कोण कुत्रे विचारतेय ! ' असे तुम्ही म्हणाल, पण,
भटक्या कुत्र्याच्या प्रश्नावरून झी २४ तास वर घमासान चर्चा झाली !

मागण्या तर सगळ्या कायद्याच्या क्षेत्रातल्या दिसतात --
मुख्यमंत्र्यांनी तातडीची कृती म्हणजे काय करणे अपेक्षित आहे ?

SEPTEMBER 26

मागे राहिलेल्या अमुक समूहांचा विकास झालाच पाहिजे -- हे १०० टक्के मान्य आणि योग्य ! पण, पुढे गेलेल्या अमुक समूहांचा विकास होताच कामा नये वा थांबला पाहिजे, हे तत्त्व जर व्यवहारात येऊ लागले तर ते मात्र लोकशाहीविरोधी ठरेल !

स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतरही भारतात वाढत असलेला
आरक्षणासाठीचा आक्रोश पाहता, आरक्षण या तत्त्वाची
अटळ गरज अधोरेखित होते. ते असायलाच हवे आणि
वाढायलाही हवे, हे समजूनच या प्रश्नाकडे पाहू.
नोकर्यांमधले आरक्षण हा जरा कमी गंभीर प्रश्न समजू.
मुख्य प्रश्न शिक्षण क्षेत्रातले आरक्षण हाच दिसतो.
माझा नीट अभ्यास नाही, पण वगळले कोण कोण जातील,
याचा विचार करता -- ब्राम्हण, वाणी, जैन, पारशी, मुसलमान,
असे दिसते. याबाबतच्या विचारासाठी खालील पर्याय दिसताहेत --
१. या वगळलेल्या समुदायांच्या लोकांना कोणत्याही शिक्षणक्रमासाठी
बाहेरून प्रवेश देणे. म्हणजे ते कॉलेजात येणार नाहीत, पण,
खाजगी क्लासेसमधून वगैरे शिक्षण घेऊन कोणतीही परीक्षा देऊ शकतील.
२. या समाजांचा अपवाद करून त्यांना या वगळलेल्या समाजांच्या मुलांसाठीच
असणाऱ्या अशा शिक्षण-संस्था काढू देणे.
की त्या वगळल्या जाणार्या समुदायांचा विचारच करायची गरज नाही ?

संधी नाकारल्या गेलेल्या, दडपल्या गेलेल्या जातींना आरक्षण
या तत्त्वात परिवर्तन आणि प्रगती होत होत आता आरक्षण

जर ५०-६०-७० टक्क्यांपर्यंत वाढत जाणार असेल तर
काही ठराविक समाजांना एकाकी पाडण्याकडे तर हे जाणार नाही ना ?
की आदर्श लोकशाहीत हे अटळच समजावे ?
पापी पूर्वजांचे वारस असलेल्या आणि संख्याबळ कमी असलेल्या
अशा समाजांचे भवितव्य काय असेल ?

SEPTEMBER 25

भारतातले जे लोक आरक्षणाचे लाभार्थी होऊ शकणार नाहीत
त्यांची, शिक्षण व नोकरी यांसाठी, कोणत्या छोट्यामोठ्या परदेशांत
कशी सोय होऊ शकेल, याची सरकारने चाचपणी-पाहणी
सु्रू करावी. म्हणजे देशातल्या सर्वच नागरिकांची काळजी घेता येईल.
शिवाय मानवाधिकारांचे १०० टक्के जतन होईल ! घटनेचेही पालन होईल !

१. राज्यात आरक्षण विभागात एकूण जागा उपलब्ध किती आहेत ?
२. कर्मचारी कपातीचे एकूण सरकारी धोरण पाहता, आरक्षण विभागात दर वर्षी अंदाजे किती भरती होईल ?
-- याबाबत माहिती आलीय का कुठे ?
( शिक्षण क्षेत्रातही विभागावर उपलब्ध आरक्षण जागांची आलीय का कुठे माहिती ? )

SEPTEMBER 24

अमेरिका, रशिया, चीन हे मोठे आहेत की नाही ? का आहेत ?
ताकद आहे, अनेक बाबतीत वर्चस्व आहे, इतर देश त्यांना भितात !
आपल्यालाही वाटतेच ना आपणही तसेच व्हावे – महासत्ता व्हावे !
ते देशहिताच्या आणि देशातल्या माणसांच्या फायद्याचे असते !
देश म्हणजे काय दगड-माती-डोंगर-झाडे असे थोडेच असते ?
इट इज ह्यूमन माईंड – ते माणसाचे मन असते !
आपण काय बुद्ध वा तुकाराम थोडेच आहोत ?
आपण हिंसेची तयारीच ठेवली नाही तर कोण कुत्रे तरी विचारेल का ?

पण, मग सगळे शांततेचे का बोलतात ?

हिंसेच्या ताणाचा त्रास होतो, खुद्द हिंसेचा तर खूपच त्रास होतो –

त्यामुळे शांततेचेही बोललेच पाहिजे ! दोन्ही हवे ! भीतीही हवीच ना !

गळेकापू स्पर्धा हवी, देश, जात, धर्म यांच्या टोळ्या हव्यात --

सूड घेणारी, एकमेकांना देशोधडीला लावणारी माणसेही हवीतच !

हजार प्रकारची विषमताही हवी ! ती घालवायचे प्रयत्नही हवेतच !

हिंसा, खून, डावपेच, धूर्तपणा, शौर्य, गुर्मी, रुबाब, दडपशाही

हे सगळे हवेच हो ! अळणी होईल लाईफ म्हणजे आयुष्य, नाही तर !

जगणे इंटरेस्टिंग असायलाच हवे ! आपण काय बुद्ध वा तुकाराम

थोडेच आहोत ? साधे सामान्य आहोत आपण !

मग, त्या बुद्ध-तुकारामांचे तरी कशाला एवढे माजवायचे ?

ते करायचेच ! ते ग्रेट होते ! महान होते ! शेवटी आपल्यासमोर तेच हवेत !

वाईट घालवायचे आणि चांगल्याची जोपासना करायची – हे करायचेच !

ग्लोबलायझेशन म्हणजे जागतिकिकरणामुळे सगळे प्रश्न

गंभीर होताहेत म्हणे ! शिवाय हल्ली ते दहशतवादाचे एक फोफावत चाललेय !

तेही असावेच पण ! अशी निरनिराळी दडपणे असल्यावर तेही असणारच ना !

पण, मजा येते, सावधगिरी बाळगणे, वेळीच त्यांचा खात्मा करणे !

आता प्रेमविवाची एक मजा असते की नाही ? तसेच ते मोडण्यातही एक सेन्सेशन वा थ्रिल वा सनसनाटीपणा असतो !

आता बघा – प्रेमविवाह झाला आणि प्रॉब्लेम काय आला, तर नेल पॉलिश लावणे हे धर्मविरोधी आहे ! झाली ना बॉंब ?

पण, हे हवेच सगळे !

नाही तर लाईफ म्हणजे आयुष्य अळणी होईल ! आणि आपण काही

बुद्ध-तुकाराम नाही ! आहोत का ? सांगा ! सांगा ना ! अहो, प्रेमविवाह, ठरवून विवाह, पत्रिका पाहून, मेडिकल तपासण्या करून, लिव्ह इन राहणे -- असे सगळे

आहे ना ? तरीही एक प्रश्न फोफावतच चाललाय – मला कमिटेड पार्टनर म्हणजे बांधील साथीदार मिळेल का ? ती खात्री खलासच होतेय ! मग आता ?

ओपन म्हणजे खुला विवाह !

विवाह करायचा पण कधीही कुणाहीबरोबर झोपले तरी चालेल ! फक्त एकमेकांचे

मित्रमैत्रिणी वा नातेवाईक टाळायचे, एवढीच अट असते म्हणे ! तीही वेळप्रसंगी शिथिल होत असेल म्हणा ! देशांची भीती आणि माणसांची भीती ! यातून मस्तपैकी

धूर्तपणाने, शहाणपणाने, माणसे जोडत, तोडत चालत राहायचे ! हवेच ना हे

सगळे !

लाईफ म्हणजे आयुष्य अळणी होईल नाही तर ! आणि आपण काही तुकाराम, बुद्ध

थोडेच आहोत ? बाकीचे संघर्ष सोडा, नेहमीचे आवडते संघर्ष घ्या -- कोणते –

स्त्री-पुरुषांमधले हो ! त्यातली हिंसा वा अत्याचार घ्या ! सामान्यतः हे सगळे पुरुषच करतात, हे समजून चालु ! तर का

बाबा पुरुष असे करतात ? त्यांच्या जनुकांची, मेंदूतल्या रसायनांची काय कारणे असतील ती असतील, पण

बाकी काय ?

संशोधनातून सापडलेली मुख्य चार कारणे – सुखासाठी, वर्चस्वासाठी, क्रोधासाठी

आणि परलिंगी व्यक्तीला क्लेष देण्याच्या आनंदसाठी म्हणजे सॅडिझम हो ! त्यासाठी !

हे मन घडते तरी कसे म्हणावे साले ? तर सरळ आहे – समाजामुळेच !

समाजच घडवतो आपले मन – त्याच्या वागण्याच्या पद्धती – त्या पद्धतीविरोधात

जाण्यासाठी आपण कितीही लाथा झाडल्या, मादक द्रव्ये घेऊन पडून राहिलो

तरी मन ही समाजाचीच देन असते ! सामाजिक बांधिलकी आपल्या रोमारोमात,

जगण्यातच असते ! त्यामुळे नैतिकता आणि जबाबदारी येतेच !

हिंसक राहा आणि शांततावादी राहा ! पुढारी खाऊ देत तिकडे ओरबाडून, पण,

इकडे, ‘ नो मीन्स नो ‘ म्हणजे ‘ नाही म्हणजे नाही ‘ -- हा नाराही हवाच !

हे बोलले जायलाच हवे होते, हळूहळू का असे ना, बदल होतीलच !

कुणी म्हणाले ५०-१०० वर्षेही लागू शकतील ! विद्रोह, विषमताविरोध,

बंधुता संमेलन, जातीअंत आंदोलन, उद्रेक, मोर्चे, निषेध, परिवर्तन लढे

हे सगळे हवेच हो ! नेहमीच ! कायमच ! आपण काही ---

आणि नाही तर लाईफ म्हणजे आयुष्य ---

--- ००० ---

SEPTEMBER 22

“ आम्हाला आवडते – आम्ही दागिने घालुन सगळीकडे फिरणार –

दागिन्यांचे असे प्रदर्शन टाळा, हे आम्हाला सांगण्यापेक्षा चोरांना सांगा ना, चोऱ्या करू नका म्हणून – “

गूढ

दोनतीन दिवसांपूर्वी चारपाच वाहिन्यांवर, सीसी टीव्हीच्या क्लिपसह, एक भयानक बातमी दाखवली गेली होती. पाहणाऱ्याने हादरून जावे असा तो प्रकार होता. दिल्लीच्या एका भर रस्त्यात, सकाळी साडेनऊच्या सुमारास, एका तरुणाने एका तरुणीवर हल्ला केला आणि तिच्यावर चाकूने ३२ वार करून तिला ठार केले, अशी ती बातमी होती. ( केलेल्या वारांची संख्या कुणी ३० वा २२ सांगत होते. ) मध्ये पडायला गेलेले एकदोन लोक घाबरून मागे फिरल्याचे दिसत होते. या घटनेची थोडी पार्श्वभूमीही सांगितली जात होती. पोलिसांनी त्या तरुणाला अटक केल्याचेही सांगितले जात होते.
दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत ही बातमीच नव्हती. हा विषयच सगळीकडे बंद झालेला दिसतोय.
हा काय प्रकार असेल ? लोकांत घबराट पसरू नये म्हणून ही बातमी बंद झाली असेल ? तसे म्हणावे तर अशा भयानक बातम्यांचा लोकांवर भडिमारच तर चालु दिसतो – त्यामुळे, ती शक्यता वाटत नाही. की असे काही घडलेच नसेल ? मुद्दाम कुणीतरी खोटी क्लिप तयार करून पसरवली असेल का ही बातमी ? पण, तसे करण्यात ते करणाऱ्याचा काय हेतू असू शकतो ?
एक सामान्य भारतीय नागरीक म्हणून हे एक गूढ वाटतेय --

SEPTEMBER 21

झाडावर लागलेले फळ हे सामान्यतः अमुक इतक्या काळात पक्व होणार हे ठरलेले असते.
बालपणीची अज्ञानावस्था गेली की माणूस सज्ञान झाला, असे म्हटले जाते.
पण, माणूस असा नुसता पक्व होऊन भागत नाही तर तो ‘ परिपक्व ‘ व्हावा लागतो.
काहीजण मरेपर्यंत परिपक्व होत नाहीत.
खूप अकादेमिक शिक्षण वा पदव्या असल्या म्हणजे माणूस परिपक्व असतो, असे नाही.
एखादा अशिक्षित, अडाणी म्हटला जाणारा माणूसही परिपक्व असू शकतो.
बौद्धिक, वैचारिक क्षमता म्हणजे परिपक्वता, असे नाही, हेच यावरून दिसते.
मग, काय, ‘ परिपक्वता ‘ म्हणजे ?

SEPTEMBER 20

कोणतीही मौल्यवान कलाकृती माणसाला शहाणपण देणारी असते. शहाणपण म्हणजे मत वा वैचारिक भूमिका नसून मानवी जगण्याचे साकल्यात्मक भान असते. माणसाची बुद्धी ही एकरेषीय, विश्लेषणात्मक, माहितीपर, मतमतांतराच्या

स्तरावर ‘ ठरवून ’ काम करणारी असते. बुद्धीला साकल्यात्मक भान समजू शकत नाही. त्यामुळे, बुद्धी हीच मानवी जगण्यातली अत्युच्च शक्यता, असे स्वीकारून चालणाऱ्याला ते शहाणपण ‘ समजू ’ शकत नाही. याचाच अर्थ, बुद्धिप्रामाण्यवादी हे मौल्यवान कलाकृतींच्या आशयापासून वंचित राहतात. याचाच दुसरा अर्थ म्हणजे बुद्धिप्रामाण्यवादी हे समाजाच्या सांस्कृतिक नुकसानीला कारणीभूत होतात. ते जगण्यातल्या मूल्यात्मकतेच्या विरोधात असतात आणि तिला अटकाव करत राहतात. मूल्यात्मकता म्हणजे साकल्यात्मक भान म्हणजेच शहाणपण. कोणतीही कलाकृती ही किचकट वैचारिक चौकटीत फिट करणे म्हणजे शहाणपण नव्हे. अमुक एक मत वा अमुक एक भूमिका ही शहाणपणाच्या आशयाची असू शकत नाही.

पसारा आवरता येतो.
अस्वच्छता घालवावी लागते.

अत्यंत उत्तेजक सुखाची असो की कडवट अपमानाची
एखादी एखादी घटना व्यापूनच बसते मनाचा एखादा कप्पा
मग, आठवते मधून मधून -- तेव्हा तीच घटना नाही घडत
पुन्हा – आता घडते ती त्या घटनेची आठवण – पण,
या आठवणीची घटना पुन्हा नाही आठवत – वारंवार
आठवते ती मूळ घटनाच – म्हणजे तिचीच आठवण

मला घटना, माणसे, इमारती, वेळा हे सगळे आठवते
आयुष्यातले चढ-उतार, यशापयश, असे खूप आठवते, पण
या सगळ्यात सतत मी असूनही मी कधीच नाही आठवत,
खरे तर माझ्यामुळेच हे सगळे असूनही – मीही नाहीय
का क्षणोक्षणी घडत जाणारी एक अव्याहत घटना ?
की तुकडे झाल्याशिवाय घटना नाही घटना ठरत ?

माझ्या मृत्यूच्या क्षणी मी एक घटनारूप तुकडा होईन
पण
माझ्या घडून जाण्याची ही पूर्ण घटना

कुणाची आठवण होईल ? अनेकांच्या मनांत मी
असेन तो असेन त्यांच्या त्यांच्या घटनांमधला एक भाग --
पूर्ण मीच घटना ठरेन असे आहेच कुठे कोण ?

मी असेन तोवरच माझ्या घटना – नंतर तर
त्याही नसतील आणि मीही नसेन -- म्हणजे तर
काहीच नसेल – मग, तेच काहीच नसणे
या क्षणीही असेल – असेलच बहुतेक –

ते काहीच नसणे हे फक्त मीच नसण्यासारखे असेल, की
काहीच नसण्यासारखे ?

--- ००० ---

SEPTEMBER 19

सतत अविरत मन
हजार हातांचे क्षण

--- ००० ---

पत्र्याऐवजी प्लास्टिक वापरायचे होते
आणि कमी जाडीचे –
पण, उन्हाळ्याचा विचार केला –
पण, कुठाय इथे एवढे टेंपरेचर –
पण, सांगता येत नाही ना –
हेच सगळे झाडाच्या सावलीत घ्यायचे –
पण, हे झाड पडायला आलेय म्हणून
पाडायचेच ठरलेय ना –
ठीक आहे, पण, तुमचे काम
मनासारखे नाही होणार मग –

अहो, घरमालक जागा सोडाच
म्हणतोय – मग जाऊ द्या --
होईल ते होईल आणि जमेल ते जमेल –
पण, जगताना तरी काळजी घ्या –
एक नक्की ठरवा, काय कसे हवेय ते –
नाही तर, जाऊ द्या, उद्या होईल मनासारखे –
माझी सदिच्छा आहे --
पण, एवढी साधी, नैसर्गिक, मूळप्रेरणा
म्हणावी अशी तुमची इच्छा
वाया जाऊ नये, असे वाटतेच हो --
आपल्या मनाप्रमाणे फारसे काही
घडलेच नाही तर
मरताना त्रास होत असेल का हो ?
-- तेही त्या मनासारखे न घडलेल्यात
घेऊन टाकायचे, झाले !
--- ००० ---

SEPTEMBER 17

‘ मुंबई विद्यापीठात आजपसून सात दिवसांचा आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सव ‘ सुरू होतो आहे.
( पुणे लोकसत्ता, रविवार वृत्तांत, पृष्ठ ४. )

तिथे होणाऱ्या चर्चासत्रांचे विषय –
१ रंगकर्मींचे सामाजिक उत्तरदायित्व -- लेखकाची भूमिका.
२ --- “ --- -- दिग्दर्शकाची भूमिका.
३ --- “ ----- -- कलाकारांची भूमिका.

सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तन एवढ्याच क्षेत्रात कलेने काम केले पाहिजे, हे मान्य नसणारेही काही असणारच.

आणि अशा एखाद्या हेतूत न गुंतणारी खूप कला ही अत्यंत संवेदनशील, मानवी मूल्यांचाच उद्घोष करणारी असू शकते, हे समजणारेही.

‘ इतर -- म्हणजे भूमिकाहीन ‘ कलेला न ओळखणे, हे एक मोठे सांस्कृतिक नुकसान ठरेल, हे समजणारेही काही असणारच ! असंख्य मार्गांनी कलाभिव्यक्ती होत राहणे हेच कधीही ‘ चांगले ‘ असणार !

आपापल्या आकलनाप्रमाणे सर्व कलावंतांना काम करता येवो, हीच सदिच्छा !

एवढा निसर्ग, पृथ्वी, आकाश, ग्रह-तारे,
एवढी जीवसृष्टी, त्यांचे व्यवहार -- हे सगळे
एवढे कशाला तयार केले माझ्यासाठी,
मला सुखी-दुःखी करण्यासाठी –
अशा आश्चर्यात असतानाच
मीही एक यातलाच,
या सगळ्याबरोबरच तर नसेन,
असा विचार आल्याने कुतूहल आणि
आश्चर्यही संपले, कारण, हे पाहून
बाहेरून बोलणारे कुणी राहिलेच नाही –

आहे तर खरे सगळे, पण, काहीही
नसल्यासारखेच झाले –

क्षणभर विसावा वाटला, पण,
भीतीही वाढली –

आपण आहोत की नाही
या गोंधळात मी जगावे – अशी --
कसली ही गधडी कल्पना –
--- ००० ---

अपेक्षित उद्याच्या

पूर्णत्वासाठी कविता

वाट नाही पाहणार –

ती आजच पूर्ण असेल

निरुपयोगी --

कवीच्या जगण्यातल्या

अपूर्णत्वासह --

--- ००० ---

देवा,

भक्तमंडळी थकून-भागून-दमून झोपली आहेत –

त्यांनी किती जोशात, ताकद लावून भक्ती केली, ते पाहिलेस ना !

त्यांना हळुवार वारा घाल ! शांत झोपू देत त्यांना !

म्हणजे, लौकरच, नवरात्रासाठी पुन्हा

नव्याने धूम-धमाल, धुवांधार भक्ती करायला

ते ताजेतवाने होतील !

SEPTEMBER 15

पेसोआची ' Tobacco Shop ' किंवा ' Tobacco Kiosk ' म्हणजे तंबाखूची टपरी वा दुकान ही कविता वाचा. जरा वेळ लागेल, शांतपणाही लागेल. नंतर आपोआपच ती आणखी दहा वेळा वाचावीशी वाटेल. जगातल्या एका अतिमहान कवीची आहे ती कविता.

मित्र-मित्र, मित्र-मैत्रीण, मैत्रीण-मैत्रीण, प्रियकर-प्रेयसी वा पती-पत्नी

-- यांतले कोणतेही असो नाते --

तिसर्या एखाद्या व्यक्तीबद्दल वाईट बोलण्यात

एकमेकांना साथ दिल्याशिवाय

ते पूर्ण आणि खरे वाटूच नये --

याला विकृती म्हणावे की

नॉर्मल मानसिक गरज ?

खरे तर बस वा ट्रक वा कोणतेही वाहन
दिसायला हवे त्याच्या चालकाच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे
गुंड वा नम्र वा नियम पाळणारे वा नवखे -- तसे न होता
प्रत्येक वाहनाला असते स्वतःचे व्यक्तिमत्व
त्यामुळे जिवंत माणसांचे गैरसमज होतात
-- चालकाचे दिसणे वाहनावर बिंबित होईल
असे तंत्रज्ञान अत्यावश्यक आहे – दगड, रस्ता, झाडे
यांनाही असतात आपापली व्यक्तिमत्वे, पण ती फसवत नाहीत
वा दुसरेच कोणते अंदाज नाही करावे लागत त्यांच्याबद्दल

इतकी वाहने वा वस्तू सजीव करणे शक्य नाही, त्या ऐवजी
माणसेच निर्जीव होऊन आपापली कामे करत राहावीत
म्हणजे वाहन आणि चालक यांतले द्वंद्व मिटेल

त्यांना सुखदुःखेही भोगायला आवडत असल्याने फार तर
त्या त्या वेळी त्यांना त्यांची त्यांची व्यक्तिमत्वे देता यावीत
-- पण मग त्या त्या वेळी त्यांनी वाहने चालवू नयेत –

हे तरी कशाला ? व्यक्तिमत्वेही स्थिर आणि निर्जीवच तर
असतात ना ? ! सुखदुःखांची आवड असली तरी ? !
फक्त कोणत्याही एका निर्जीव गोष्टीने दुसरी कोणतीही निर्जीव गोष्ट
चालवू नये, असे म्हणू, म्हणजे झाले !

अणुबाँब कसा कोणत्या देशाच्या ताब्यात आहे त्यावरून
त्याचे व्यक्तिमत्व कळते, तो दिसत नसला तरी
--देशाचे कळते देशप्रमुखावरून –

जाऊ दे – व्यक्तिमत्व पद्धतीमुळे फारच गोंधळ होत राहतात –
--- ००० ---

Does my verse make sense if the universe doesn't make sense?
In geometry does a part exceed the whole?
In biology does the function of the organs
Have more life than the body?
-- Fernando Pessoa.

SEPTEMBER 14

भास होणाऱ्या माणसाला ते सगळे सत्यच वाटत असते -- हे पाहिले की क्षणभर, आपले सत्यही भासच तर नसेल -- असे क्षणभर सगळेच धूसर होऊन जाते !

Once they called me a materialist poet
And I admired myself because I never thought
That I might be called by any name at all.
I am not even a poet: I see.
If what I write has any value, it is not I who am
valuable.
The value is there, in my verses.
All this has nothing whatever to do with any will
of mine.
-- FERNANDO PESSOA.
फेर्नान्डो पेसोआ ( हाच उच्चार बरोबर आहे. )

हा जागतिक कवितेतला अलीकडच्या काळातला एक अमर्याद महान कवी
होऊन गेला !
माझ्या दृष्टीने ज्ञानेश्वर, तुकाराम आणि पेसोआ !
मी या तिघांचे वाचू शकलो हे माझ्या जगण्यातले अत्युच्च महत्त्वाचे !

आहे मला माहीत
काही अगदीच असणार आहे अतार्किक
मांजर म्हणजे माणूस वा पडदा म्हणजे उंट
तरीही मी दुरुस्त नाही करणार काहीच
( सध्या तरी ) आतले-बाहेरचे मिळून
आपोआप घडतेय काही
प्रकाशमान किंवा निरर्थक
मला घडू द्यायचीय कविता सोडून
माझा ताबा – एक कणही असला तसा
तरीही त्याचा अर्थ पूर्णच –
--- ००० ---

SEPTEMBER 13

ढीगभर वर्तमानपत्रे आणि रोजी
दोनपाच हजार पुस्तके वाचणारे
निवडक लाल कावळे पत्र्यांवरून
पळत राहातात पावसासारखे
आवाज करत उन्हात तडतड

कोरड्या डबीतून नखाने
खरवडावा चुना तसे थरारते जगणे

राजकारणात रंगीबेरंगी ओकणारेच
खूप झालेत हे खरेच आहे मला काही
मोहल्लाकिंग होण्यात रस नाहीय

अन्नावरच्या घोंघावत्या माशाच

झाल्यायत आता अन्न

मी फ्रेश उपाशी राहणार आहे

--- ००० ---

हिचकॉकच्या प्रत्येक सिनेमात जसा तो एकदा तरी दर्शन देऊन जातो
तसाच प्रत्येक कवितेत द्यायला हवा निरर्थकतेला वाव थोडा तरी
भाषेच्या प्रभुत्वामुळे ती बिचारी मूक राहते वाळल्या गवतासारखी
शब्दच तिच्या स्वाधीन करून समतोल साधायला हवा अनभिषिक्त !

--- ००० ---

सगळी मार्गदर्शक तत्त्वे वगैरे गेली ------ --- त !
रस्ते डांबरी असोत की सिमेंटचे, त्यांवर हवे तसे खड्डे पाडून
गणपती-उत्सवाचे मंडप उभे आहेत !
( वाहतुकीची वाट लागणे, हे तर सोडूनच द्या -- )
नंतर हे खड्डे संबंधित गणेशमंडळांनी बुजवायचे,
असेही एक मार्गदर्शक तत्त्व आहे ! तसेही होत नाही !
ते खड्डे बुजवण्याचा खर्च मनपालाच करावा लागतो --
प्रति खड्डा दोन हजार रुपये !
सव्वादोन लाख खड्डे आहेत, अशी बातमी आहे !
नंतर हीच सगळी निर्लज्ज जनता घराघरांतून,
रस्त्यांवरून, कार्यालये, हॉटेले यांत बसून म्हणणार,
" कुणाचा कुणाला धाकच राहिला नाहीय !
कसे होणार या देशाचे, कोण जाणे -- "

SEPTEMBER 12

पुण्यात एका गणेश मंडळाने असा देखावा सादर केला आहे की
परशाऐवजी खुद्द गणपतीच उंचावरून विहिरीत उडी मारतोय

आणि विहिरीतल्या एका पायरीवर आर्ची बघत उभी आहे !
-- याचा एक अर्थ असा लागतो की परशातही गणपती आहेच !
( गणपती आणि परशा यांच्यात खुन्नस निर्माण होईल, असा अर्थ कृपया नको. )
आणखी कोणकोणते लागू शकतील या देखाव्याचे अर्थ ?

माझ्या माहितीत एक मोठी सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. तिथल्या एका सभासदाने एक दांडगा पैलवान कोंबडा पाळलेला आहे. तो पहाटे पाचपासून जीव खाऊन ओरडायला सुरुवात करतो. लोकांना विनाकारण जाग येते. काही सभासदांनी तक्रार केली तर हे कोंबडामालक म्हणाले की कुत्रा पाळता येतो तर कोंबडा का नाही ? यावर त्या संस्थेला अजून काही निराकरण सापडलेले नाही. आता शेजारच्या बंगल्यांतले लोकही तक्रार करू लागलेत. आम्हाला कामांमुळे रात्री झोपायला उशीर होतो, त्यामुळे आम्हाला एवढ्या पहाटे उठणे शक्य नसते, असे ते म्हणताहेत. बिनतोड होऊन बसलाय हा प्रश्न ! आता अखिल महाराष्ट्रातला एकच शेवटचा मार्ग राहिलाय – शरद पवारांना मध्यस्थीला बोलावणे !

सध्या बऱ्याच प्रमाणात विकला जात असलेला रसायनिक गुलाल हा माणसाच्या आरोग्याला घातक आहे – डोळे, श्वसन, त्वचा यांना इजा करणारा आहे, अशी बातमी आहे.
-- हे मुळापासून त्वरित उखडून काढण्याची ताकद शासन-यंत्रणेत नसते ?
-- हा एक भोळा प्रश्न येतोच मनात !

माझ्या परमप्रिय फ्रेंडांनो, आज मी इथे ‘ कडक उन्हात ’ ही माझी एक अत्यंत महत्त्वाची ( मराठीत विशेष भर असलेली -- असे मला वाटणारी ) अशी कविता दिलेली आहे. ही कविता लिहिल्यावर मला समाधानाचा झटका येऊन गेला ! हा ताजा प्रकार तुमच्यापुढे सादर केलाय ! जमल्यास, बघा --

कडक उन्हात सॉमिलसमोर उडालेला भुस्सा
तुझ्यामाझ्यात घडवतो एक चकाकता पोलादी पडदा
-- अशा अवस्थेत तुला हवाय माझ्याकडून तुझा फोटो
म्हणजे तर उंच लांब तारेवर बसलेले पक्षी ओळीने
मारून पाडावे लागतील खाली जे माझ्या अंतर्मनाच्या
अस्त्रांना शक्य नाहीय – खरे तर तुझे तुलाही सगळे
कळतात तुझे मांसल विचार माझ्याइतक्याच तीव्रतेने

खरे तर हे आपल्या खऱ्या वा काल्पनिक आठवणींचे
आहे मीलन खोटे आणि तर्कहीन आणि स्क्रीनवर न दिसणारे
आपण आहोत पार्श्वभागी दोन मृत प्रेमिकांच्या जिवंत सावल्या
धडाडत्या रेल्वेत आपत्कालातही साखळी न ओढणाऱ्या
समाधान मानण्यावर असते की असण्यावर हा प्रश्नच आपण
या नात्यातल्या मूलभूत दगडी अशक्यतेवर सोडलाय
या जिवंत बाळाची मोठी व्यक्ती होणारच नाही हे समजून

आपल्या डोळ्यांत संकटांची भीती नसते, प्रलयाचा विचार नसतो
आपले अमूल्य डोळे हिरे असतात आपल्याच सावल्यांवर जडवलेले
मृत्यूनंतरच्या या जगण्यात हेही चालणार असते आपल्याला
कारण आठवणीचे यंत्र वापरत आपण हे सर्व जिवंत
उपभोगात रूपांतरित करतो पोलादाइतके खरे आणि जाणवणारे
तुझ्या आवाहक सावलीच्या उत्तेजक आकारांच्या कल्पनांचे मला आहे
जिवंत रसरशीत आकर्षण जे आपल्याला ठेवतेय बांधून मिठीत
--- ००० ---

"If you understand your painting before making it, there is no reason to make it."
-- DALI.

SEPTEMBER 11

झाडे वेली फुले पक्षी डोंगर नद्या नाले विहिरी
यांसह तो एका खेड्यात जन्माला आला
तसे होणे त्याला खूपच उपयोगी पडले कारण पुढे तो
निसर्गकवी होणार होता – मी झालो बिननिसर्ग !
हे पाहता अर्थाअर्थी कोणताच कवी नैसर्गिक नसतो !
निसर्गकवीही नैसर्गिक नसतो ! निर्णय त्याचा असतो !

माझा यातला कार्यानुभव सांगतो – माझ्या आकाशाचे कापड
मी चहूबाजूंनी खाली ओढले – त्याला ताण देऊन पीळ
दिला आणि खालच्या भागात एक छोटा पीळफुगा बनवला !
आता त्या छोट्या पीळफुग्यातून मी उरलेल्या आकाशावर
तसेच जगावरही नियंत्रण ठेवू लागलो – याच पद्धतीने
मी माझ्या निर्णयाने बिननिसर्गकवी झालो –

एखाद्या झाडावर नवसफेडीच्या चिंध्या असतात ना रंगीबेरंगी
त्याचप्रमाणे अब्जावधी पीळफुगे आहेत जगात अदृश्य
सेनाधिकारी राष्ट्रप्रमुख वा पानटपरीवाले झालेले
सर्वांचेच सर्वांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न --

यांना नैसर्गिक राष्ट्रप्रमुख सेनाधिकारी पानटपरीवाले
का नाही म्हणता येत ते कळतेय ना ? ऐकलेय कधी
नैसर्गिक सेनाधिकारी -- असे ?
ही सगळी त्या पीळफुग्यांची कमाल असते !
कर्तृत्वाचा आनंद देणारी
विजयी वा पराभूत करणारी
आणि हो – अतीच झाले तर बहुतेक
आत्महत्येला प्रवृत्त करणारी --
--- ००० ---

सण लावतात जगाची सवय
वाटते, उंदरांच्या राज्यात
तुरे सलामत ! ठराविक वेळी
सुटणारच ती गाडी
तेच सगळे फर्निचर घेऊन
उंदरांसह जाणारच बरोब्बर
वेळेवर प्रस्फुटत्या हास्याच्या

स्टेशनवर

मृत्यू स्थगितच झाल्याप्रमाणे

--- ००० ---

भोवळलेल्या मनांनाही आणेल भोवळ
इतका कुठाय अजून गाण्यांचा स्पीड ?
त्यांच्या रंगांत अंधार असला म्हणजे
पुरतेय – फिटतेय अनेक जन्मांचे ऋण !
उघड्या लाटा पाहून सूर्य विसरतोय
त्याची जेवणाची वेळ –

भिन्न भिन्नपणे सगळी डोकी भिन्न !
-- स्पष्ट, कळणारे, हातात येणारे
खात्रीचे मार्ग –
भक्तीही उपभोगण्याचे --

शक्तीला बांध नको म्हणून
सूर्यालाही एक चमचा
च्यवनप्राश –

होऊ दे जागरण –

--- ००० ---

SEPTEMBER 10

भलतेच उकिडवे मांजर
पूर्वेकडून पश्चिमेकडे गेले
तरीही त्याचा फ्यूज

शाबूत राहिला –

नंतर आम्हाला नका

बोल लावू

असे म्हणणारे अनुभवी

सम्राटही चूप बसले !

स्त्रिया तारुण्यात

जास्त उत्सुक असतात की

मेनोपॉजनंतर

यावर सर्व प्राण्यांत वाद झाला !

न्यायाधीश नसल्याने झालेले अराजक

पुरुषांनी निस्तरून घेतले !

नारळ फोडणे

ही काही सेक्सी नाही घटना --

तरीही एका दृष्टिकोणाप्रमाणे

ती उत्तेजक ठरलीच !

मूळ चूक मांजराची की

नैसर्गिक असणाऱ्या

लैंगिक भावनेची

यावर सूर्याने निर्णय दिला --

अस्ताला जाऊन !

--- ००० ---

भाषा शोधतोय

अपघातासारखी

जिच्यात शब्द आणि वस्तू

असतील पोकळ

माणसांच्या कृती आणि

निसर्गाच्या वा हवेच्या

सरमिसळत राहतील
सहजपणे

एकाच वेळी असेल सगळे
गुण्यागोविंदाने आणि
हिंसक संघर्षात
साळसूदपणे

पडत्या इमारतींना
पूर घेतील सामावून
काहीच न घडल्यासारखे
निरर्थपणे

शब्द असून
पान कोरे दिसेल
माणसे असून नष्ट
होतील मुळात

शब्द, व्याकरण, वाक्ये
द्यायचीयत फेकून कवितेत
परस्त्रीशी दुरावा
दाखवल्याप्रमाणे

जगणे जसे आहे
तसेच भाषेत
यावेसे वाटते
म्हणून

--- ००० ---

दोन न--कविता

विशिष्ट वयापेक्षा उताणे माकड
अधिक जिद्दी असेल या विचाराने
फुलांचे पराग शिंपडले
माणुसकीच्या उतारावर तरी
कधीही कळणारच नव्हती व्याप्ती
शालेय अभ्यासक्रमातल्या
वस्तूंच्या गोंधळाची
मग कशाला उगीचच
आपल्या खिशाला खार

माकडे शहाणीच असतात
यावरच आखायचे सगळे
शहर विकासाचे आडाखे

की झाले

--- ००० ---

वेटरने आणलेल्या
पाण्याच्या ग्लासात
असावी आपल्याच कारची किल्ली
तसा असतो
कवितेचा अर्थ
अजोड असून कॉमन --
गालिच्यावर उभे राहून आपल्या
आवडत्या सिनेमाची आठवण
काढणे म्हणजे नसते

एखाद्या ओळीचे पारदर्शक वस्त्र

विसरावे लागते

--- ००० ---

काळ ही एक
सहज वितळणारी गोष्ट आहे
हे मला स्वच्छ दिसते

एखाद्या विचाराच्या
दगडाला नमून
जिवंत वारा कसा असणार

भाषेमुळे वाटते
जगण्याला अर्थ आहे
रिकामा नसलेला

भावनांची गाणी
एक खोटे सातत्य देतात
एकाकी कोंडणारे

अनुभवात बांधून
संपन्न करणारा
राजवाडा नाहीय इथे

दगडांनी भरलेले
रक्तबंबाळ राज्य
वितळतेच

मी धागे विलग करून

आतले साधे सोपे

शून्य स्पर्शतो

--- ००० ---

SEPTEMBER 9

कुछ तो कंटाळा करो --

जेलमध्येच असे किती दिवस तुडवत राहणार

निरर्थक दगडांचे फुटीर संघ --

कित्येक वर्षांपूर्वीचे तेच खरे धरून चालताना

तुम्हाला धाप नाही लागत ?

वयामुळे तुमच्या गोट्या पांगळ्या झाल्यात

दूरस्थ कल्पनांसारख्या

तरीही तुम्हाला भास होताहेत

तुमच्या तारुण्यात क्रांती झाल्याचे --

स्त्रियांचे अवयव इकडेतिकडे विखुरलेले

सूर्याचे तुकडे -- असे काहीच नकोय ?

रहस्य असे कधी वाटलेच नाही तुम्हाला कसले --

जीर्ण खिशांत वाढलेल्या दरिद्री दाढीची

स्वप्ने काळजीपूर्वक संभाळताना

तुमच्या विचारांची बोटे झडली तरीही तुम्ही

उलटी काळजे नॉर्मल समजत

मानवी हिताच्या तलवारी परजत राहिलात

तुमचे उद्दाम केस अडवेतिडवे विस्कटलेले

आकाशाला जखमी करत राहिले --

वैचारिक अस्तित्वातच तुमचे अवघे जगणे
संपत आले

तुम्हाला वाटते मागे काय घडले त्याला धरूनच
पुढे काही घडेल तुमच्या तुटपुंज्या बेअक्कल
कवट्यांतून निखालस कारंज्यांप्रमाणे उसळेल --
यालाच तुम्ही अमर अर्थ समजत मश्गूल राहिलात
--- ००० ---

दिवस होता की रात्र आठवत नाही
स्वीकारलाच नव्हता माझा राजीनामा
उशीर झाल्याने रेल्वे रूळ ओलांडून घाईत
गाडी पकडायला गेलो तर मागे फुगे
लावलेली गाडी जाताना दिसली – आता
वाहन पाहावे म्हणून बाहेर येताना लघवीची तीव्र
इच्छा झाल्याने मुतारी वा आडबाजू शोधू लागलो
इथे नाही, इथे नाही, इथे नाही, असेच ऐकू येत होते

खूप घाईत मी आजारीही होतो आणि वेळेत पोचलो
नसतो तर कधीच सुटका नसती झाली -- माझ्या
नाकातून रक्त येतेय की काय असे वाटताच
दवाखाना दिसला, पण आणखी उशीर होईल
नकोच सध्या, अशा विचाराने रिक्षा शोधू लागलो
तर माझी दुचाकीच दिसली पण ती दुरुस्त
व्हायला वेळ लागणार होता

सरबत झाले, मग चहा झाला, अरे बाप रे,
अजून मी इथेच आहे ! पोचणार कधी ?
आत्ताच एक तास उशीर झालाय –

माझी प्रतिमा मलिन होणे आता टळणार नव्हते
इतकी वर्षे एवढा हुशार, कार्यक्षम असून

पोचलो तेव्हा कुणी काही बोलले नाही, सरळ
काम सुरू केले, खूपच अवघड होते संपवणे
त्या सर्वांचा काही प्रश्न नव्हता – माझाच राजीनामा
मंजूर झालेला नव्हता – त्यांच्यांत हास्यविनोद चालु होते –
--- ००० ---

SEPTEMBER 8

जलनाश झाल्याने झोपेत
घशाला कोरड पडून पडलेली
भयानक स्वप्ने वाचवतात
फाशीच्या शिक्षेपासून
आपण आरोपी असून वर
गुन्हा सिद्ध झाल्यावरही
कुणीच नसलेल्या जगात
मी एकटा काय करतोय
अंधारात सुसाट्याच्या
कोसळत्या उंचावरून

कोणतेही वस्तुमात्र
चालतेय मला
असण्यासाठी

मनाला पडू दे कोरड
वा चालु राहू दे माझे
गर्वहरण सदा जिवंत

वा

आजूबाजूला असू देत

जिवंत वा वठलेली

निर्मनुष्य घरे

पाणी प्याल्यावर मला

बरे वाटू दे – गाढ --

--- ००० ---

खरे तर उद्विग्न व्हायची गरजच नव्हती

शय्यासोबतीला वनराई असताना, वर

आकाशात चंद्र पंख्यासारखा फिरत असताना

सगळे माझ्यासाठीच होते, तर सत्य फक्त

माझ्याच मनात असणार हळूहळू कोमेजत्या

आकाशातून अचानक खूप पक्षी मरून

खाली पडावेत तसे – आश्चर्य-संशयग्रस्त

या आकाशाची तुलना दुसऱ्या वेश्यागृहाशी

कशी करणार ? रोगट रस्त्यांवरचे शिळे अन्न

वाढणारे सगळे धाबे मेकप करून सज्ज

असले तरी ?

वनराईला नाही सांगत मी माझ्या उद्विग्नतेची

हजार कारणे, मला सजावट आवडत नसल्याने

तरीही व्हायचे ते होतेच – तिची पाने

तीव्रतेने लालस होऊ लागतात

माझ्या उद्विग्नतेने खिन्न झालेली वनराई
सरकते शहराकडे अधिक उष्णतेने मला
खेचण्यासाठी तेव्हा देतो सोडून मी
उद्विग्नता तात्पुरती आणि तुडवत सुटतो
अनावरपणे वनराईचे अवयव आकाश होऊन

तीही बेभान आणि बेशुद्ध झाल्याच्या
समाधानात मी वाजवतो बासरीवर आकाश
घुमवणारे माझ्या अस्तित्वाचे कंगोरे
--- ००० ---

एकाच दिवशी जास्त नको -- एक कविता तयार आहे -- एक तर फ्रेंडस वाचणार नाहीत किंवा म्हणतील -- याला नाही उद्योग, जाने दो ! -- तर उद्या !

SEPTEMBER 7

कवी जे जे वाचतो, पाहतो त्या सर्वच गोष्टींचे त्याच्या अभिव्यक्तीवर प्रभाव असतात. या अर्थाने प्रत्येक कविता ही अनेक कवी मिळून लिहीत असतात. कोणतीही कविता ही अनेक ज्ञात-अज्ञात कवींची एकत्रित निर्मिती असते.

जागृत मन आणि सुप्त मन यांना एकत्रितपणे मोकळे सोडून
ज्या कविता लिहिल्या जातात त्या फक्त जागृत मनाने समजू शकत नाहीत.
तिथे लेखनप्रक्रियेवरचा जागृत मनाचा ताबा सोडलेला असतो.

जुन्या पापांचे परिमार्जन म्हणून
मनांत काटेरी झुडुपे लावली
त्यांच्या जोपासनेला माळी ठेवले
त्यांचे काम एकच – उकरत
राहायचे माती आणि टाकत राहायचे
पूर्वेला – ढीग उंच करत सूर्याचे

उदय दिसूच नयेत -- पश्चिमेचे
फक्त अस्त दिसावेत यासाठी

पापी म्हणूनच जगण्याची ही शिक्षा
परिमार्जन आणि दुतर्फी समाधान
पसरवत राहिली तरीही आता
काट्यांबरोबरच सूडभावनाही
उगवणार की काय
असे झाल्याने
हिंसेचे भय पसरले

आता होणारी हिंसा पाप असेल की नसेल
ते कळेनासे झाले
दोन्ही बाजूंनी अंदाज घेणे
चालु असल्याचे जाणवत राहिले

कोणत्याही रूपातली कुवतच शेवटी
महत्वात्ची ठरणार हे ओळखून
काट्यांनी जखमी होत राहिलेली मने
क्रोध गिळून भयभीत होत राहिली
सांस्कृतिक संपन्नता म्हणून --
--- ००० ---

विस्मरण नसते एखादे कर्मकांड
जे कुठेही टाकावे वाळत
प्रेताच्या टाळूसारखे –
विचार जेव्हा चढतो
कष्टाने ठरलेले सर्व
इमले तेव्हाच नदीकाठच्या

वाळूत उमटतात असंख्य

शून्ये हळद-कुंकू बनून –

-- ००० --

द्याचे विष आजच

साजरे करण्यावर

माझा विश्वास नाही कारण सडलेले

माझे कान समुद्री वाऱ्याने

उष्टावले आहेत –

माझे लैंगिक स्वप्न

तोडगा नाही होऊ शकत

आधीच मयत झालेल्या

प्रश्नावर –

-- ००० --

SEPTEMBER 5

लोकांना बुद्ध अजून कळलाच नाही.

लोकांना गांधी अजून कळलेच नाहीत.

लोकांना आंबेडकर अजून कळलेच नाहीत.

( आता तर, ' लोकांना आचार्य अत्रे अजून कळलेच नाहीत ' ! )

-- हे आपण नेहमीच ऐकत असतो.

असे म्हणणाऱ्याला तरी ते ते कळलेले असते, हेच त्यात एक समाधानाचे असते !

( पण, लोकांना मार्क्स अजून कळलेलाच नाही -- असे कधी कानावर येत नाही.

कारण, सगळे मार्क्सवादी अमर्याद हुशार असतात ! त्यांना कळले नाही,

असे होऊच शकत नाही ! )

तर मग आता करावे काय ?

त्या त्या विभूती कुणाला समजल्या आहेत, ते आधी ( एकमताने ! ) ठरवून,

ते सगळे आधी त्या त्या समझदाराकडून सर्वांनी समजून घेत बसावे ?

ते मुळात पूर्ण होणारे काम नाही -- आणि तेवढ्यात --
लोकांना शरद पवार अजून समजलेच नाहीत,
लोकांना मायावती अजून समजल्याच नाहीत
-- हे सुरू होणार !
तर मग करावे काय ?

SEPTEMBER 4

एकटेपणाचा अणू फुटण्यातून सांस्कृतिक प्रक्रिया निर्माण होते --
झुंडीच्या कृतीतून नाही.

SEPTEMBER 3

काल एबीपी माझा वर माझा कट्टा या कार्यक्रमात नसिरुद्दिन शहा होते.

१. ते २५-३० वर्षे ‘ वेटिंग फॉर गोदो ‘ करताहेत ते का, असा प्रश्न विचारला जायला हवा होता.

२. ‘ लमाण ‘ ही डॉ. लागूंची नटाबाबतची कल्पना – म्हणजे, नट हा लेखकाच्या आशयाचा फक्त भारवाही असणे – ही १०० टक्के बरोबर आहे, असे ते म्हणाले, याचे मला आश्चर्य वाटले.

३. मुलाखत पाहण्या/ऐकण्यासारखी आहे -- पुन:प्रक्षेपण असेल तर जरूर जमवा.

ते गाणे, त्याचे सौष्ठव, त्याची चाल आणि त्याची भुरळ
हे सर्व आवडले तेव्हा त्याच्याशी माझ्या तारा जुळताहेत
असे थोडेच खास भान होते ? त्यातले प्रत्येक वाद्य आग्रही
होत चालल्याचे लक्षात येणे, आता का घडले असावे ? तो सर्व
वाद्यमेळ आता चालुन येणारा वाटतो तेव्हा वायुमंडल

अस्वस्थते -- ते गाणे नकोसे नसते झालेले, फक्त जरा वेळ
शांतता हवी असते – शांततेत आपण नष्ट तर नाही होणार
ही त्या गाण्याला भीती असल्याचे दिसते – त्या गोड गाण्याला
प्रेमाने समजावूनही कळत नाही – माझ्यामुळे त्याचा खूपच

गोंधळ उडालेला असतो – दुतर्फी बंध अबाधित असून –

--- ००० ---

SEPTEMBER 2

या घ्या आस्तिकांच्या पूजेला नास्तिकांच्या उदबत्त्या !

वाहिली जाणारी फुले विकणारे आस्तिक आहेत की नास्तिक

हे कुठे कोण विचारते ?

उदबत्त्या, मखर, रोषणाईच्या माळा, आकाशकंदील !

वा !

पण, साम्यवाद्यांनी हा धंदा करणे म्हणजे

धर्म या अफूच्या गोळीला प्रोत्साहन देणे नाही होत ?

August 2016

AUGUST 30

हाय कोर्टाच्या आदेशावरून गेल्या वर्षी पुणे महानगरपालिकेने ‘ उत्सवांतले मंडप ‘ या बाबतीतले धोरण तयार केलेले होते. त्या धोरणाबाबतच्या शंकांचे निरसन करण्यातच नगरसेवकांनी बराच काळ घेतला. त्यामुळे गेल्या वर्षी त्या धोरणाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. गेल्या वर्षी उत्सव झाल्यानंतर मुख्य सभेने त्या धोरणाला मान्यता दिलेली आहे. मात्र, ते सर्व धोरण यंदाही पुस्तकातच राहिल्याचे चित्र आहे.

-- म्हणजेच, अर्थातच, रस्त्यात खड्डे पाडणे, रहदारीला अडथळा करणे, ट्रॅफिकची वाट लावणे – ही आपली उच्च सांस्कृतिक परंपरा या वर्षीही भक्तिभावाने आणि उत्साहाने राबवली जाताना दिसेल !

( आजच्या पुणे लोकसत्ताच्या पृष्ठ १ वरील बातमीच्या आधारे. )

AUGUST 29

संस्कृती म्हणजे जगणे समजत राहण्याची प्रक्रिया. कलाकृतींच्या संपर्कातून समजा ही प्रक्रिया चालु राहते. तरीही, एखाद्या क्षणी, अशा बाह्य गोष्टीवर अवलंबून राहायची आता गरज नाही, अशी पूर्ण समज कधी येऊ शकते की नाही ? अशी ‘ शेवटची ‘ कलाकृती असू शकते की नाही ? अगणित कलाकृतींतून कणाकणाने असे शहाणपण जमा होत जाते का ? म्हणजे

वैविध्यातून ? तसे असेल तर आजवर निर्माण झालेल्या आणि यापुढे निर्माण होत राहणाऱ्या अमर्याद संख्येच्या कलाकृतींचा विचार करता, आपण पूर्ण आयुष्यातही ज्या काही कलाकृतींच्या संपर्कात येऊ त्या अगदीच नगण्य असणार ! आणि जगण्याचे ज्ञान हे असे वैविध्यावर अवलंबून असते असे म्हणणे याचा अर्थ ते ज्ञान पूर्ण कधी होऊच शकत नाही, हे मान्य करणेच नाही का ? मग, हवाय कशाला एवढा तरी कलासंपर्क ? की सगळीच नुसती करमणूक ? आणि करमणूक म्हणजेच संस्कृती ?

AUGUST 28

सिंधूची मॅच चालु असताना एक समालोचक म्हणाली,
“ आता फक्त अकरा पॉइंट घेतले की हा गेम सिंधू जिंकेल ! “
मला हसू आले – अकरा पॉइंट घेणे म्हणजे काय खाऊ आहे का,
असे माझ्या धाकट्या नातीकडे पाहून मी म्हणालो – तीही हसली.
त्यानंतर दोन दिवसांनी मी माझ्या त्या नातीला व्हॅन गॉ चे एक चित्र
बघून काढायला सांगत होतो. ती म्हणाली, खूप अवघड आहे !
मी म्हणालो, अगं, समुद्राच्या लाटा तर काढायच्यात नुसत्या !
तर तिने काय म्हणावे ? – नुसते अकरा पॉइंट घेतले की झाले,
असे बोलताय तुम्ही !

माझ्या धाकट्या नातीला चित्रकलेची आवड आहे.
तिला इथली, नेटवरची काही चित्रे दाखवली.
ती म्हणाली, " आता एखादे चित्र काढताना
पॅलेट म्हणून मी एक कॅन्व्हासच वापरते --
म्हणजे एका वेळी माझी दोन चित्रे तयार होतील !
एक मी काढलेले आणि एक त्या पॅलेट कॅन्हासवरचे ! “
( palette वरचे ते modern चित्र -- या अर्थी ! )

AUGUST 27

आजच्या मटामध्ये शशिकांत सावंत यांचा चित्रकार श्रेष्ठा यांच्यावर ‘ प्रयोगशील कलावंताचा शोध ‘ हा लेख पुरवणी पृष्ठ ८ वर आलेला आहे. त्यातले एक वाक्य --

“ रोजचे जीवन शब्दांनी, अर्थांनी भरलेले असते. या अर्थ आणि शब्दांच्या पलिकडे कसे जाता येईल, हा ध्यास नेहमीच अमूर्त चित्रकारांना जाणवतो. “

-- कुणालाही एक प्रश्न पडू शकतो की त्या शब्दांच्या आणि अर्थांच्या पलिकडे कशाला जायला हवेय ? काय गरज आहे ? यावर फ्रेंडसचे काय विचार ?

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तीवर थोडा शाडूचा थर देऊन ती मातीची म्हणून विकायची, असे काम मोठ्या प्रमाणावर चालु असल्याचे समजते.

दुसरी बातमी आहे ती ५४ लाख रुपयांच्या सोन्याच्या गणेश मूर्तीची !

प्लास्टर ऑफ पॅरिस असो की शाडू असो की सोने,

सगळेच मृत्तिकेसमान असते !

ही सर्व भक्तमंडळीच आहेत – देव सर्वांचे भले करेल !

द्वैतभाव गेला की झाले !

नाही का ?

AUGUST 26

कायद्याची अंमलबजावणी हा एक वेगळाच प्रांत असतो.

ध्वनिप्रदूषणाचे जमले कारण ते मोजता आले.

हंडीची उंची कशी मोजणार ?

झाडावर चढून की दुसऱ्याच्या घराच्या टेरेसमधून ?

मोठाच प्रॉब्लेम आला !

उंचीबाबत काहीच करता आले नाही !

काम करायचा प्रयत्न करतो त्यालाच प्रश्न येतात –

उगीचच पुण्याला लोक नावे ठेवतात !

AUGUST 25

स्वच्छ भारत ' मिषन '

न म्हणता ' मिशन ' म्हणायला हवे.

तरच त्याला यश मिळेल.

अन्यथा,

नुसतेच ' यष ' मिळत राहील !

एक वैधानिक इशारा म्हणून, तशा असणाऱ्या पोस्टखाली

सरळ लिहूनच टाकावे --

" सदर पोस्ट उपरोधिक आहे.

तिचा कृपया साधा शाब्दिक अर्थ घेऊ नये. "

कायद्याचा वा आदेशाचा भंग करणाऱ्यांवर

गुन्हे दाखल करणे हे जसे सरकारचे कर्तव्य आहे,

त्याचप्रमाणे,

त्याला दमनाचे रूप येऊ नये, या लोकहिताच्या विचाराने,

ते गुन्हे पुढल्या वर्षी काढून रद्द करण्याचे अधिकारही

सरकारकडे अबाधित राहायला हवेत !

जनता निर्भयपणे जगू शकली पाहिजे !

अवमान होऊ नये आणि मान राखला जावा

या दृष्टीने

सार्वजनिक बाबी आणि विषय, हे

न्यायालयाच्या कार्यकक्षेबाहेरच ठेवावेत का ?

shared a memory.

जगणे म्हणजे मानसिक गोंधळात असणे --

गोंधळ नसण्याची भीती म्हणजे जगणे --

मला पडलेल्या स्वप्नातली एक काल्पनिक बातमी--

' सगळे डीजे हॅक झाल्याने ऐन सणांत सुनसान शांतता !
गुन्हा नोंदवून घेण्यास पोलिसांचा नकार ! '

AUGUST 24

माझ्या एका मित्राकडून कळल्यामुळे --

Please see message below: facebook accounts are being CLONED.
Please advise your family and friends.
Please ask your media friends to give publicity to this. Facebook should act and plug the loophole.

Just giving everyone fair warning . . . this has happened to many people this week, they are even coming via Messenger. Almost all the accounts are being cloned. Your profile picture and your name are used to create a new facebook account. And then they want your friends to add them, your friends think it's you and accept. From this moment, they can write what they want under your name!! ..... I want you to know I have NO plans to open a new account, so please do not agree to a 2nd invitation from me!!
Copy this message on your wall so that all your friends will be warned!

आधी दहाव्या थरावरची कायद्याची हंडी
आणि मग
नऊव्या थरावरची दहीहंडी !

प्रेम, मीलन अशा विषयांवर कविता लिहायचे मनात असूनही,
कोण काय म्हणेल, या विचाराने जे लिहू धजले नाहीत,
त्यांनी आज ती भावनिक हंडी फोडून घ्यावी --
लोकांना वाटेल, राधाकृष्णाचे चाललेय --

हंडीची उंची फक्त २० फूट ठेवूनही चुरस कशी वाढवता येईल
याबाबत टीव्ही ९ मराठीने सुचवलेले अजब उपाय –

१ गोविंदांच्या कमीत कमी संख्येच्या वापराने हंडी फोडणाऱ्या संघाला बक्षीस.
२ कमीत कमी वेळात हंडी फोडणाऱ्या संघाला बक्षीस.

-- म्हणजे जितके संघ येतील तितक्या वेळा हंड्या बांधत राहायचे का ?

एका प्राध्यापकाने सांगितलेली सत्यकथा --

दोन प्राध्यापक गप्पा मारत पेपर्स तपासत बसले होते. त्यांतला मराठीचे पेपर्स तपासणारा जरा वेळाने म्हणाला, “ आयला हे, ‘ है है ‘ काय येतेय सारखे ? ! “ जरा बारकाईने पाहता तो हिंदीच्या पेपरांचा गठ्ठा असल्याचे लक्षात आले ! दुसरा म्हणाला, “ अरे, एखादे वाक्य तरी बघायचेस ना – किती झालेत तपासून ? “ त्याचे पंधरा पेपर तपासून झालेले होते ! आता गठ्ठे बदलुन घेणे आले ! त्याचा मराठीचा गठ्ठा हिंदीवाल्याकडे गेला होता ! गठ्ठे बदलण्यासाठी हा त्याच्या घरी गेला. दोघांनाही प्रॉब्लेम लक्षात आलेला होता. आपसात बदलुन घेऊ आणि मग पाहू, असे ठरले. मराठीवाला म्हणाला, “ यांतले पंधरा झालेत तपासून – फक्त माझ्या सह्या खोडून तुमच्या टाका, की झाले ! “ हिंदीवाला म्हणाला, “ ते करूच, पण, सॉरी – “ “ का हो ? “मराठीवाल्याने विचारले. “ माझ्याकडून तुमचे फक्त पाचच झालेत तपासून – “ हिंदीवाला म्हणाला !

AUGUST 23

काही कार्य गरज नसताना
चालु राहिल्याने मोबाईल
जसा डिस्चार्ज होत राहतो
तसेच

स्वभाव आणि इतर कार्ये

चालु राहिल्याने

आपली शक्ती उगीचच खर्च होत राहते --

रुपये३५००=००

४५ दिवसांचा औषधाचा कोर्स

घेऊन पाहा

लाभ न झाल्यास

औषध परत करा -

AUGUST 22

" हे राजकीय षडयंत्र किंवा सूडबुद्धी आहे

-- असे प्रत्येक ठिकाणी टाच आल्यावर,

सारखे किती वेळा म्हणणार ?

सुरुवातीला एकदा म्हटले,

ते बास ना – "

" आमचा अलगतावाद ठीक आहे – तो घातक नाहीय –

पण, तुम्ही अलगतावादी झालात तर देशाचे तुकडे पडतील – "

" आम्ही सांगतोय एवढी ऐच्छिक वर्गणी दे भोसडीच्या, सक्ती नाहीय – देवाचे काम आहे, एकोप्याने व्हायला हवे ! -- समजतेय ना ? "

AUGUST 20

चाललेल्या चर्चेत नवेनवे मुद्दे येत असतात, मूळ पोस्टकर्ताही मध्येच काही बोलत असतो – या सर्व गोष्टींकडे सर्व सहभागी फ्रेंडसचे नंतर लक्ष जात नसावे, असे वाटते. त्यापेक्षा, एखादी पूरक पोस्ट द्यावी, हेच बरे !

बजुतेक, माझ्या आधीच्या पोस्ट मध्ये एक मुद्दा नीट स्पष्ट झाला नसावा, म्हणून तेवढा एकच मुद्दा पुन्हा मांडतोय. लोकांना सनसनाटीपणा, करमणूक यांसाठी झुंजी पाहायला आवडते – त्यासाठी स्वतःला तयार करणे आणि पूर्ण आयुष्य त्या कारणासाठी खर्च करणे -- असेच होत नाहीय का खेळाचे स्वरूप ? मरणाची झुंज, जीव धोक्यात घालणे, अशा गोष्टींना ‘ शौर्याचे खेळ ‘ असे संबोधून त्यांचे आपण खोटे उदात्तीकरण तर करत नाही ? प्रत्यक्षात स्वतःला लढतीची जनावरे वा पशुपक्षी बनवणे, याहून जास्त काय घडत असते खेळात ? संघभावना निर्माण होण्यासाठी अशा अघोरी प्रकारांची असते गरज ?

एखाद्या शास्त्राच्या क्षेत्रात काम करणारा माणूस समजा रोज १६-१८ तास काम करतो.
नंतर त्याचे संशोधन नावाजले जाते वा त्याला मोठे सन्मानाचे पारितोषकही मिळते.
पण, यात ग्लॅमर नसते, करमणूक नसते, यावर सट्टा खेळता येत नाही.
माणसाला सनसनाटीपणा हवा आहे. झुंजी हव्या आहेत.
तर सध्या तशा असलेल्यांपैकी, खेळ या क्षेत्राचा विचार करू.
जागतिक विक्रम होण्यासाठी आणि देशाचे नाव रोशन होण्यासाठी
वयाच्या ३-४ व्या वर्षापासून मुले तयार करावी लागतात !
त्या मुलांना न विचारता -- त्यांना अक्कल यायच्या आधीपासून !
हे समर्थनीय वाटते ?
आपल्या देशाच्या व्यक्तीने जागतिक पराक्रम केला की देशातले
इतर लोक सर्वच क्षेत्रात जिद्दी होतात – देशाची प्रगती करतात –
हे खरे आहे का ? कुणालातरी सुवर्णपदक मिळाल्याचे पाहून शास्त्रज्ञ ?
सनसनाटीपणा आणि करमणूक यांसाठी माणसांचे रोबोटीकरण करून
त्यांना ठार करणे, त्यांना माणूस म्हणून संपवणे चाललेय,
असे नाही वाटत ?
यावर माझे अमुकच असे मत नाहीय
म्हणूनच इथे चर्चेला देतोय हा विषय --

आमच्या कमी दर्जाच्या दारूच्याच दरात कुणी जर अधिक चांगल्या दर्जाची दारू विकणार असेल तर ते आम्ही होऊ देणार नाही -- आमच्या परमप्रिय बांधवांचा धंदा आम्ही बसू देणार नाही ! त्याचे रक्षण करू !
धोनीवरचा चित्रपट मराठीत डब करून आल्यास मराठी चित्रपट मार खातील !

-- अरे, पण, जे मराठी प्रेक्षक आहेत ते नाहीयत का तुमचे बांधव ?
मिळू द्या ना त्यांना अधिक चांगली दारू !
धंद्याला निघायचे आणि रडीचा डाव खेळायचा, ही सवय घालवा ना बांधवांची --

AUGUST 19

कट्टर धर्मवादी आणि कट्टर साम्यवादी हे दोन्ही माझ्या दृष्टीने मानवी समूहातले अत्यंत फालतू, हिंसक आणि घातक लोक आहेत. त्यांना त्यांची जी काय तुणतुणी वाजवायची ती त्यांनी स्वतःच्या वॉलवर, स्वतःच्या पोस्टमधून वाजवावीत. माझ्या पोस्टवर, चाललेला विषय सोडून, आपले विषारी डोके व्यक्त करणे चालणार नाही. अशा लोकांना नाइलाजाने ब्लॉक करायची माझी पद्धत आहे. आजवर मी फक्त अशाच दोनचार लोकांना ब्लॉक केलेले आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सिंधूचा डाव्या हाताचा नेटजवळचा एरिया कमकुवत होता आणि ते मारीनने बरोब्बर हेरलेले होते -- तिने बरेच पॉइंट तिथेच घेतले ! अगदी ठरवून ! हरकत नाही –
पहिला गेम जो सिंधूने घेतला तो म्हणजे तिचा ग्रेट खेळ होता !
या खेळात भारताला सिल्व्हर प्रथमच मिळतेय -- मोठे यश !
आपल्या प्रिय सिंधूचे प्रचंड अभिनंदन !

AUGUST 18

उत्कलनबिंदू येऊन
टाळ्या पडेपर्यंत
मी थांबत नाही
माझी पुढची कविता
तयार असते

मी लिहितो फ्रेंडससाठी
जे असतील दहा वा दहा कोटी
आज ना उद्या -- जरी
असते तशी कविता

एकाच व्यक्तीसाठी

जी वाचते ती

समजून आवडून

न समजता आवडून वा

न आवडताही

माझ्या कवितांचा पुढचा प्रवास

असल्यास

मला माहीत नसतो

मी अडवतही नाही

शब्दांना माहीत असते

त्यांच्यांत साठलेले जुने अर्थ

सांगण्यासाठी ते इथे नसून

काही सुचवण्यासाठी आहेत

त्यांच्यांत साठूच न शकणारे

अधांतरी राहणाऱ्या

या अनभिषिक्त कविता

शब्दांतून आणतात

अविरत वाहणारे

अर्थझरे – निरर्थझरे

मी खूप खुजा आहे

त्यांच्यापुढे ...

--- ००० ---

( जरा वरातीमागून का असे ना -- )

‘ कहीं पे निगाहें कहीं पे निशाना ‘ हे बरे नाही का ?

दूरदृष्टीने पूर्वीच सांगून ठेवलाय उपाय !

वाऱ्याच्या हेलकावत्या

घूं घूं आवाजात

आसक्तीची सावली कमीजास्त

करावी लागते जसे

मदिरेचे प्रमाण

नियती म्हणजे असते

लाखो मैलांवरून आलेल्या

वाऱ्याचे देहावसान

एखाद्या गहन नात्याच्या

सावलीत डळमळत्या

चढलेला प्राणवायू

हातोहात फसवतो

वाऱ्याबाहेर काढतो

अनिश्चित मासा

एकाकी

--- ००० ---

shared Rumi's photo.

'Run from what's comfortable. Forget safety. Live where you fear to live. Destroy your reputation. Be notorious.

~ Rumi'

AUGUST 17

गेल्या वर्षीही होते का हो असे आदेश ?

त्यांचे काय झाले ?

की या वर्षी नवीन आलेत हे आदेश ?

AUGUST 16

ना कोणती तक्रार, ना दुःख, पण, अनावश्यक प्रश्न टाळण्यासाठी आपल्या जगण्यात थोडीफार सुसूत्रता आणायचे प्रयत्न करत राहावेच लागते. ते प्रयत्न फ्रेंडसशी शेयर करण्यासाठी ही पोस्ट. शेयर करणे आणि काहींना माहितीही देणे. एक छोटेसे विश्लेषण मांडतो --

सेलेब्रिटी नाटककार कोण

( ही पोस्ट फक्त माझ्याशी संबंधित असल्याने आणि मी थोडाफार स्वतःला, नाटककार नाही तरी नाट्यलेखक समजत असल्याने, हा शोध – )

१ ज्यांच्या नाटकांचे शेकडो, हजारो प्रयोग होतात.

२ ज्यांची नाटके खूप बक्षिसे मिळवतात.

३ ज्यांच्या नाटकांचे प्रयोग नेहमीच भारतातल्या महत्त्वाच्या नाट्यमहोत्सवांमध्ये होतात.

४ ज्यांच्या नाटकांचे महोत्सव होतात.

५ ज्यांना नाट्यलेखनासाठी भारतातले अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

६ ज्यांच्या नाटकांचे अनेक भारतीय भाषांत तसेच इंग्रजीत अनुवाद झालेले आहेत.

७ जे नाटककार असून शिवाय नाट्यप्रशिक्षणाच्या अकादेमिक कार्यातही ज्यांचा सहभाग आहे.

८ मराठीतल्या आणि भारतातल्या नाट्य अभ्यासकांनी ज्यांची खास दखल घेतलेली आहे.

९ परदेशांतही ज्यांची नाटके झालेली आहेत.

१० ज्यांच्या हस्ते अनेक बक्षीससमारंभ होतात.

११ ज्यांच्या खूप मुलाखती घेतल्या जातात.

-- आणखीही काही असतील वैशिष्ट्ये, तर वरील प्रकारच्या नाटककारांना सेलेब्रिटी म्हणतात. त्यांतले एकही वैशिष्ट्य माझ्याकडे नसूनही चुकून काहीजण मला तसे समजतात. ( किंवा, अर्थातच, मैत्रीमुळे आपुलकी वाटणारेही काही असतील. ) प्रेमाने आणि आदरपूर्वक मला त्यांच्या नाट्यप्रयोगांना वा इतर कार्यक्रमांना बोलावतात. परंतु, एकूणातच मी सेलेब्रिटी नसल्यामुळे, काहीजण नंतर ते विसरून जातात. खरे तर, मी कुणी बोलावण्याची अपेक्षा ठेवतच नाही, मला जे

नाटक पाहायचे असते ते जाऊन, तिकीट काढून पाहतो. ( माझी नाटके प्रायोगिक स्वरूपाची असल्याने, अनेकदा, मी माझ्या घरच्या माणसांचीही, माझेच नाटक पाहण्यासाठीही, तिकिटे काढतो. व्यावसायिक स्वरूपात आलेल्या माझ्या नाटकांबाबत मी असे करत नाही. ) असो. यापुढे माझ्यापुरती मी काही सुसूत्रता आणतोय, ती अशी --

१ अमुक नाट्यप्रयोग, अमुक दिवशी आहे, वगैरे माहिती मला कुणीही द्यायला हरकत नाही.
२ कुणीही, कृपया, प्रेमादरपूर्वक मला निमंत्रण देऊ नये. त्या बाबतीत माझा प्रतिसाद मिळणार नाही.
३ मला जे नाटक पाहायचे असेल ते मी पाहात आलेलो आहे, यापुढेही पाहीनच.
४ माझी किरकोळ औकात समजूनच मी या क्षेत्रात वावरत असतो, हे ध्यानात घ्यावे.

यापुढे माझा हा असा सुटसुटीतपणा असेल. उगीचच फालतू प्रश्न नकोत.

सत्याला मरण नसते, हे एक
आणि
ते बोलत राहणे चांगले असते, हे दुसरे !

मला वाटतेय खूप काही राहिलेय
करायचे – मी नुसताच
बसून आहे बंद कपाटाकडे पाहात

म्हणजे कपाटाकडेच असे नाही
जणू काही कपाटाकडे

मला वाटतेय खूप शक्यता आहेत
जगण्याच्या – मी नुसताच
वेळ वाया घालवतोय

कपाटातल्या वस्तू नाहीयत आठवत मला
माझ्या मनातले सगळेच
जणू स्तब्ध

काही न होण्याचे दुःख असे नाहीय
हातून – मग ही अपूर्णता कसली
हे कळत नाहीय

मी नुसताच
असल्याचे जाणवत राहतेय
अपूर्ण –
--- ००० ---

AUGUST 14

Posts about absurd poems on Beyond Language
beyondlanguagepoetry.com
Pablo Saborio
https://beyondlanguagepoetry.com/tag/absurd-poems/

हा एक महाग्रेट कवी वाचनात आला आहे.
इच्छुकांनी जरूर पाहावी अशी साईट वर दिली आहे.

AUGUST 12

बुद्धिवादाचा आगापिछा

बुद्धिवाद, बुद्धिप्रमाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोण, इहवाद यांचे अस्मितायुक्त भक्त बरेच दिसतात. ते स्वतःला बुद्धिवादी म्हणत असूनही नेहमीच उपरोध आणि टवाळी यांचा अंगीकार करताना दिसतात. कुणी जराही विरोधी बोललेले त्यांना सहन होत नाही. समोरची व्यक्ती सलग, गंभीरपणे काही बोलत असली तरी तसे बोलण्याचा धीर त्यांच्यांत दिसून येत नाही. जणू काही त्यांचा दृष्टिकोण हा आकाशातून पडलेला असून अनाव्हान्य ( आव्हान देता येणार नाही असा ) आहे, असे ते स्वतः तर गृहीत धरतातच, पण इतरांनाही तशी सक्ती करू पाहतात. या सर्वांचे मूळ गृहीत काय तर हे विश्व भौतिक असून त्यात इतर

काही देवबीव नाहीय. या विचाराप्रमाणे, मग, हे निर्माण कसे झाले, याचा आकार किती आहे, हे प्रश्न समोर आले. काहीच नसण्यातून काही निर्माण होऊ शकत नाही आणि याची सुरुवात सांगणे शक्य नाही, हे पाहून आता शास्त्रज्ञही असे म्हणताहेत की या विश्वाला आदि-अंत काही नाही, हे अमर्याद आहे, हे आहे इथूनच सुरुवात करावी लागते आणि हे का, कशासाठी निर्माण झाले यावर काही बोलता येत नाही, असे वाचनात आले. म्हणजेच –

कोण्या कारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।

-- अशी तुकारामबुवांनी सांगितलेली अवस्था. ( त्यातला ' देव ' हा शब्द वगळून, अर्थात ! )

हे विश्व इतके भौतिक आहे की इथे मनबीनही काही नाहीय -- आहेत त्या मेंदूतल्या पेशींच्या आणि रसायनांच्या हालचाली – असे यांचे म्हणणे असते.

(१) तसे जर असेल तर विवेक आणि नैतिकता हे मुद्दे निकाली निघतात. कृतिस्वातंत्र्य वा निर्णयस्वातंत्र्य हे ढगात गेल्याने त्या विषयांवर बोलणे बंद करावे लागते.

(२) तरीही एका उथळ स्तरावर ते मनाचे अस्तित्व मानतात. पण, मनाचा वापर हा वर्चस्वभावना, महत्त्वाकांक्षा, सुखशोध, आणि इतर सर्व गुणावगुणांनी युक्त असणार हे मान्य करतात. त्यामुळे, सर्व आत्मकेंद्रित जगणे मान्य करावे लागते आणि त्यातून येणारे अराजक, अन्याय, विषमता आणि हिंसा हे सर्वच मान्य करावे लागते. याचाच अर्थ ' काही चांगले ' घडण्याची शक्यताच सोडून द्यावी लागते. म्हणजेच हा निराशावाद ठरतो ! आणि हे तर स्वतःला आशावादी म्हणून सतत गौरवत असतात !

(३) कोणत्याही क्षेत्रात काही घडणे हे कार्यकारणाच्या साखळीतले असते, हे त्यांना मान्य करावे लागते. पण, ती कारणे लाखो-कोट्यवधी असू शकतात, ती कधीच आपल्या बुद्धीच्या आवाक्यात येणे शक्य नाही, याकडे ते दुर्लक्ष करतात. आपल्याला सोयिस्कर तेवढ्याच वस्तुस्थिती घेऊन ते ' खात्रीशीर ' विचार मांडत राहतात आणि अपयशी होत राहतात.

(४ ) वस्तुजगतातला बुद्धीचा उपयोगी वापर मान्य केला तरी मानवी संबंधांच्या प्रश्नांच्या बाबतीत बुद्धी कामी येत नाही. संघर्ष, युद्धे, हिंसा यांवर बौद्धिक कृती निरुपयोगी ठरते.

(५) सगळेच जर अनाकलनीय कार्यकारणाने युक्त असेल तर हा एक नियतिवाद ठरतो ! आणि त्याला तर त्यांचा विरोध असल्याचे ते सांगत असतात.

सारांश, बुद्धिवादी लोक हे गोंधळलेले, अविवेकी, आक्रमक, भूमिकाच नसलेले आणि अराजकतावादी असतात. शिवाय, निराशावादी आणि नियतिवादी असतात.

( मग, धर्म-देववाले, अध्यात्मवालेही तसेच नसतात का, हेही बोलता येईलच. पण, सध्या, न संतापता, विचाराच्या मार्गाने यावर चर्चा व्हावी. उपरोध, टवाळ्या वा अपशब्द यांमुळे विचार मार खातात, एवढेच. )

AUGUST 11

बुद्धिवादी / वैज्ञानिक दृष्टीकोण असलेला / विवेकी माणूस आणि सर्जक कला यांचा संबंध / संपर्क / त्यांच्यातली समजउमज प्रक्रिया -- हे सगळे कसे असते याबद्दल कुतूहल वाटणे योग्यच आहे. उपरोध आणि टवाळीचा सूर टाळून यावर बोलले गेले तर अनेक गोष्टींचे भान वाढेल, असे वाटते.

खालील दोन प्रश्न टाळू नयेत, असे मला वाटते --
१ अध्यात्म म्हणजे काय ?
२ अध्यात्माला मानवी जगण्यात महत्त्व आहे का ? असल्यास कोणते ?

AUGUST 9

पुण्यातले वाडिया कॉलेज. निरनिराळ्या भाषांतले लेखक, कवी बोलावलेले होते. त्यांनी क्रियेटिव्हिटी म्हणजे सर्जकता या विषयावर स्वतःच्या लेखनाच्या संदर्भासह बोलायचे होते. दुपारी विद्यार्थ्यांचे ग्रुप करून एकेका ग्रुपबरोबर त्या त्या लेखनप्रकाराबद्दल, त्याची वैशिष्ट्ये वगैरे चर्चा करायची होती. मराठीतून ‘ नाटक ‘ या विषयावर बोलायला मी होतो. इंग्रजीतून बोलायचा सराव नसल्याने मी भाषण लिहूनच नेले होते, ते वाचले. तर, त्या सकाळच्या सत्राला शोभा डे या प्रमुख पाहुण्या होत्या. ते सत्र संपल्यावर त्यांनी आवर्जून मला भेटून, माझे भाषण चांगले झाल्याचे सांगितले. माझी नाटके पाहायची इच्छाही त्यांनी व्यक्त केली. मला अर्थातच छान वाटले. बाई समजुतदार आहेत, कशाला त्यांच्यावर असे हल्ले, असे मला वाटते. मलाही त्यांचे हे खेळाडूंबद्दलचे बोलणे पटले आहे, असे नाहीच. ‘ हमको तो सफर प्यारा, मंजिलका खुदा हाफिज ‘ हीच जगण्याची पद्धत हवी, असेच मला वाटते. त्यांनी माझे नाटक पाहिले/वाचले असण्याची शक्यता नाही आणि मीही त्यांचे काही वाचलेले नाही. भारताला पदके मिळावी, ही इच्छा फेल जात असण्यातून येणाऱ्या वैफल्यामुळेच त्या असे बोलल्या असाव्यात, असे मला वाटते.

‘ हमको तो सफर प्यारा
मंजिल का खुदा हाफिज ‘

-- ‘ ये रास्ते हैं प्यार के ‘ – ‘ तुम जिस पे नजर डालो ‘
महंमद रफी, संगीत -- रवी.

पाऊस पडून गेला आहे.

सकाळ. शांतता. वाराही नाहीय.

एक अस्वस्थता भरून.

ही एंजॉय करावी की

तिचे कारण शोधावे की

ती टाकूनच द्यावी ?

मीच तर आहे ती !

जेव्हा जेव्हा भेटते

तेव्हा तेव्हा तिला

एकात्मताच हवी असते !

--- ००० ---

AUGUST 8

Sunil Tambe -- यांच्या पोस्टवर एक चांगली चर्चा चालु आहे -- तीवर दिलेली माझी कॉमेंट --

ही एक महत्त्वाची चर्चा आहे.

या विषयाबाबत सुचणारे मुद्दे वा प्रश्न –

१ लेखकाच्या आकलनसाठी बाह्य परिस्थितीच्या बदलांचा वेग मर्यादित असावा लागतो का ?

२ लेखकाला बाह्य परिस्थितीचे एक स्थिर असे बौद्धिक आकलन असावे लागते का ?

३ काळानुरूप बदलणारी परिस्थिती आणि बदलणारे आकलन यांवरच साहित्यनिर्मिती चालते का ?

४ तसे असेल तर शेक्सपियर, पिरांदेलो, आयनेस्को, बेकेट, कामू, काफ्का, तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या विरोधात विद्रोह म्हणजे काय ?

५ चांगल्या साहित्यकृतीचा विद्रोह हा फक्त मागच्या पिढीच्या कालबद्ध आकलनाबद्दल असतो की एकूणच माणसाच्या भ्रमिष्टपणाच्या विरोधात असतो ?

६ कोलटकर, नेमाडे, ढसाळ यांचा विद्रोह हा कालसापेक्ष होता की अधिक मूलभूत होता ?

AUGUST 7

स्वत:च्या मतांवर ठाम असलेले लोक

दुसऱ्यांचे मूल्यमापन करण्यात

स्वत:चे आयुष्य खर्ची घालतात !

त्यामुळे, प्रत्येक व्यक्तीची शेकडो मूल्यमापने होतात !

चांगले कोण, वाईट कोण याचा गोंधळ उडत राहतो !

प्रत्येकाचे मन चालु राहण्यासाठी हे अत्यावश्यक असते !

आपण जे नाही आहोत

त्याच्याशी त्या नाहीपणानेच झगडणे

अधिकच ढोंग आणि त्रास वाढवणारे --

त्यापेक्षा आपण मुळात जे आहोत ते फक्त असावे …

--- ००० ---

AUGUST 6

वाचनाचा मृत्यू

सुखदु:ख, फसवणूक, प्रतारणा, आशा-निराशा, उद्वेग, एकाकीपणा, भीती, सूडभावना, आसक्ती, वासना, वगैरे सर्वच आता पुरेसे सर्वांच्याच अनुभवात आहे.

अपघात, खून, उत्सव वगैरे घटनांच्या तपशीलवार वर्णनातही विशेष काही वाटेनासे झाले आहे, कारण माध्यमांतून यांचा सतत ओघ आणि मारा चालुच असतो.

विद्रोह म्हटला तरी कशाबद्दल काय असणार, ते माहीत असते.

भूमिका म्हणजे मनाचे पवित्रे – तेही माहीत असतात.

थोडक्यात म्हणजे, मन कसे चालते आणि घटनांचे परिणाम कसे होतात, या बाबतींत आता सगळेच पुरेसे माहीतगार झालेले आहेत.

नुसते घाटाचे ( फॉर्मचे ) नावीन्य म्हणून ललित साहित्य वाचावे, एवढी काही गरज वाटायची गरज राहिलेली नाही.

ज्यांबाबत माहिती असायला हवी, ज्ञान असायला हवे अशा गोष्टींची संख्या प्रचंड वाढलेली आहे.

या सर्व गोष्टींमुळे वाचनाचा मृत्यू होतो आहे.

-- हे नसेल पटत तर अशी कोणती सांस्कृतिक कारणे आहेत की ज्यांसाठी ललित साहित्याचे वाचन चालु राहावे ?

AUGUST 5

" नेते मंडळींनी पैसे जरा कमी खाल्ले तर जमेल का – कामे जरा पक्की आणि टिकाऊ होतील का ? "

" तोच तर नारा आहे आपला भाऊ – ' भ्रष्टाचारमुक्त भारत ! ' – पण, ते करण्यासाठी सत्तेत यावे लागते, त्यासाठी निवडणूक जिंकावी लागते, त्यासाठी पैसा लागतो -- "

" पटले ! अशा महत्त्वाच्या कामासाठी कितीही किंमत मोजावी लागू दे – मागे नका हटू – "

" तुम्ही absurdity चे एवढे का माजवता ? "
असे मला विचारणाऱ्यांना मी विचारतो --
लोकशाही म्हणजे लोकांसाठी की लोकविरोधी ?

खूप ठिकाणी रस्ते, इमारती, पूल, धरणे यांची बोंब आहे.
अनेक ठिकाणी आधीचे, नंतरचे घोटाळे असण्याची शक्यता आहे.
अहवाल सादर करण्यासाठी ठिकठिकाणी जाणे-येणे धोक्याचे झालेय.
सरळ, पावसाळा संपेपर्यंत भारत बंदच ठेवावा.
( आवश्यक इतका स्टाफही नाहीय उपलब्ध -- )
सरकारी आदेशाने ' भारत बंद ' !
( निरनिराळे पूल वाहतुकीसाठी बंद व्हायला सुरुवात झालीच आहे ! )

AUGUST 4

सामान्यतः व्यावसायिक कला, साहित्य, नाटके, चित्रपट हे
समाजमान्य नीतीचौकट गिरवत आणि पढवत राहण्याचे काम
करत असतात.
त्याचा समाजावर बराच प्रभाव असतो -- वास्तव वेगळे असले तरीही.
अमिताभने कायदा हातात घेतला पण न्यायासाठी इलाजच नव्हता ना दुसरा --

असे त्या चौकटीत बसवूनही घेतले जाते.
ही चौकट सत्य मानण्यातले खाचखळगे आणि धोके समजणारे लोकही,
' नको कटकट ' म्हणून ' हो, हो ' करत राहतात.
त्यामुळे, ती चौकट, प्रत्येक व्यक्तीच्या मूल्यमापनाचे एक साधनच बनते !
एखादी व्यक्ती वा कलावंत या चौकटीच्या बाहेरच्या कृती करत असल्याचे
कळले वा दिसले तर समाजमनातून त्या व्यक्तीचा दर्जा घसरतो.
ती व्यक्ती जर कलावंत असेल तर त्या व्यक्तीचे कलाक्षेत्रातले कामही
ढोंगयुक्त आणि खोटे ठरावे, असे अनेकांना वाटते.
काही ' गुन्हेगार ' वा ' अनैतिक ' व्यक्तीही ग्रेट कलावंत म्हणून
जगन्मान्य झाल्या तर अशी समाज-मनवाली माणसे बुचकळ्यात पडतात !
जग अनैतिक होत चालले आहे म्हणून खंतावतात !
समाजमान्य चारित्र्य असलेल्यांनीच कला, साहित्य, विज्ञान, तत्त्वज्ञान
अशा क्षेत्रांत सर्जक वा अद्वितीय कामे करावीत –
बाकीच्यांनी ' अद्वितीय ' काही करूच नये, अशी यात अपेक्षा असते !

वास्तव आणि मान्यता यांतले पूल
बऱ्याचदा असे मोडकळीला आलेलेच का असतात ?

सर्वांचेच पाय मातीचे --
याला दिलासा म्हणावे की निराशा ?
दुसऱ्यांनी कसे असायला हवे,
हा विषय मन का चघळत राहते ?

पेसोआच्या एका कवितेचा सढळ अनुवाद --

कुणीच नाही करत माझ्यावर प्रेम --
थांबा, आहे आहे --
पण फारच कठीण आहे खात्री वाटणे
तुमची श्रद्धा नसलेल्या गोष्टीबद्दल.

मी अश्रद्ध असल्यामुळे माझी श्रद्धा नाहीय
असे नाही, कारण मी जाणतो,
आहेच मी आवडणारा. तो माझा स्वभाव आहे.
सश्रद्ध नसणे आणि न बदलणे.

कुणीच नाहीय माझ्यावर प्रेम करणारे --
या कवितेच्या असण्यासाठी तसे गरजेचे आहे
-- हे दुःख सहन करण्याशिवाय
मला काही इलाजच नाहीय.

किती दुःखद आहे – प्रेमच न मिळणे !
माझे दीन बिचारे बहिष्कृत हृदय !
असो, आणि हाच आहे शेवट
मी विचारपूर्वक घडवलेल्या या कवितेचा.

मला काय वाटते, तो भाग वेगळा …

--- ००० ---

AUGUST 3

एक अनुभवी भारतीय म्हणून मनात येते ते बोलल्याशिवाय राहवत नाही --
नुसती जुन्या ३६ पुलांची रचनातपासणी करायची, असे नका करू --
आपण बांधलेल्या नव्या पुलांचीही करा तशीच तपासणी --
आपल्या भेसळ-सम्राटांनी कशी केली असतील कामे, सांगू नाही शकत !
आणि दोन्ही बाजूंच्या पुढार्यांचे परंपरागत हुकमी कलाकौशल्यही त्यात उपयोगात आले असणारच !
( पण, त्या सर्वांना आपणा सर्वांची खूप काळजी आहे, हे मात्र स्पष्ट दिसते ! आपल्यासाठी किती घसे खरडून ओरडत असतात, ते दिसते ना ! )
ब्रिटीशांच्या कामावर पूर्ण विश्वास असल्यानेच हलगर्जीपणा झाला असावा --

तसा हलगर्जीपणा आपण केलेल्या कामांबद्दल होऊ नये --
आपण केलेल्या कामांवर तसा विश्वास ठेवणे धोक्याचे होईल --

AUGUST 1

समुद्रकिनाऱ्याचा कट्टा तोच होता
जिथे आम्ही अनेकदा भेटायचो
त्या दिवशी मात्र लाटांचे आवाज
जणू धडका देत होते
दोघांनाही जाणवत होते -- नको ते
बोलावेच लागणार --
मला हवे ते तिच्याकडून घडू शकत नव्हते
तरीही तिला लाटा ओलांडून सारखे
माझ्यापर्यंत पोचायचे होते

शेवटी, मीच समजून घेत असल्याचे सांगितले
सूर्यस्ताइतकेच आपले नाते सुंदर राहील
असे सांगितले – तिला ते पटले – किती मी
मोठ्या, समजुतदार मनाचा आहे
याचे तिला खूपच समाधान झाले
प्रेमही अधिकच दृढ झाले
नंतर ती खूप काही प्रेमाने
निरागसपणे बोलत राहिली

मी तरी मनातून चकित झालो होतो
त्याच किनाऱ्यावर त्याच जागी
आता काही वेगळे घडले होते
समजुतदारपणाच्या मुखवट्याखालुन
हे फक्त मलाच समजत असेल का

ती खरेच हे सगळे खरे समजत असेल का
-- तिचा छान सुंदर चेहरा जणू
हा प्रश्न, जगण्यात आलाच नव्हता असा
नॉर्मल होता प्रेमभरा

सूर्य अस्ताला जाताना आम्ही उठलो
मला अंधार जाणवत होता आणि ती
म्हणत होती – कित्ती हे आवाज
रहदारीचे, माणसांचे –

तीच माझी समजूत मी जर खरोखर
आत्मसात करू शकलो असतो
तर सगळे नीटच तर होते …
--- 000 ---

July 2016
JULY 31

गप्पा मारायला कमीजास्त वयांच्या व्यक्ती नाही चालत ?
पुढे काय प्रगती होईल ती पुढची पुढे !

माझ्या समजुतीच्या तर्काप्रमाणे बोलतोय –
विश्वाची उत्पत्ती कशी झाली, हा प्रश्न घेऊ.
विश्वाची सुरुवात कल्पायची असेल तर त्याआधी काहीच नसायला हवे.
काहीच नसण्यातून ' काही ' निर्माण होणे, हे तर्कात बसणार नाही.
तरीही, वैज्ञानिक विश्वाच्या उत्पत्तीबाबत कसला शोध घेत असतात ?

What is love with most of us? When we say we love somebody, what do we mean? We mean we possess that person. From that possession arises jealousy, because if I lose him or her what happens? I feel empty, lost; therefore I legalize possession; I hold him or her. From holding, possessing that person, there is jealousy, there is fear and all the innumerable conflicts that arise from possession. Surely such possession is not love, is it?

Obviously love is not sentiment. To be sentimental, to be emotional, is not love, because sentimentality and emotion are mere sensations. A religious person who weeps about Jesus or Krishna, about his guru or somebody else, is merely sentimental, emotional. He is indulging in sensation, which is a process of thought, and thought is not love. Thought is the result of sensation, so the person who is sentimental, who is emotional, cannot possibly know love.

Again, aren't we emotional and sentimental? Sentimentality, emotionalism, is merely a form of self-expansion. To be full of emotion is obviously not love, because a sentimental person can be cruel when his sentiments are not responded to, when his feelings have no outlet. An emotional person can be stirred to hatred, to war, to butchery. A man who is sentimental, full of tears for his religion, surely has no love.

-- J. Krishnamurti.

JULY 30

सुक्याबरोबर ओले जळणे -- हेच बरोबर वाटते.
ओल्याबरोबर सुके जळणे -- असेही दिसते अनेकदा.
ही काय भानगड आहे ? ' खरे बरोबर ' काय ?

JULY 29

विचार आणि भावनाही वस्तूच असतात आणि प्रतिमारूप असू शकतात, हे मान्य करून, सध्या, बोलण्याच्या सोयीसाठी त्यांना वेगळे समजून बोलतोय.

वस्तूंनी आणि प्रतिमांनी अधिकाधिक भरली जाणारी कविता अगम्य होत जाते.
विचार आणि भावना यांच्याच भाषेत जास्त बोलणारी कविता अतिव्याप्त होत जाते.
या दोन्हींचा समन्वय साधणारी कविताच अधिक समृद्धीने पोचते.

( खरे तर हे काही माझे पक्के निष्कर्ष नाहीत.
म्हणून तर हे चर्चेसाठी पोस्ट केलेय. )

म्हशीची शिंगे म्हशीला जड नसतात -- तसाच स्वत:चा स्वभाव स्वत:ला !
त्याचा कंटाळा करण्यापेक्षा त्याची महती गात राहावे, हेच बरे !
ती महती गाण्याचा दुसऱ्याला येई ना का कंटाळा !

JULY 28

फक्त सहा हाडांचे कारखाने ?

मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या दुर्गंधीयुक्त सहा हाडांच्या कारखान्यांवर बुधवारी जिल्हा प्रशासनाने कारवाई केली.
( आजचा पुणे लोकसत्ता पृष्ठ ९ ).

लेखकीय मनोऱ्यातून बाहेर पडलेले आदिवासी ?

लेखकीय मनोऱ्यातून बाहेर पडत चारी बाजूंनी लुटल्या गेलेल्या आदिवासी , भटक्या विमुक्तांच्या पाड्यापालांवर ही प्रतिभावंत लेखिका त्यांच्यांतली एक बनून वणवणत होती.
( आजचा पुणे मटा अग्रलेख ).

मानवी थोरांच्या नावे दारू, बिडी काढायला कायद्याने बंदी आहे -- देव काही इतके थोर नसतात !

JULY 27

दोन प्रौढ, सुशिक्षित, आधुनिक स्त्रिया एकमेकींशी तिसऱ्याच एका, तिथे नसलेल्या तरुण स्त्रीबद्दल बोलत होत्या. त्या संभाषणातले एक वाक्य --

" अगं, तिला माहीतच होतं की त्याचा असल्या गोष्टींवर विश्वास नाहीय ! "

ही गोष्ट, बोलणारीच्या लेखी फक्त एक स्वभाव-वैशिष्ट्य होती – ' काय फरक पडतो ' – या प्रकारची !

असे व्यवहारज्ञान मला तरी आदरणीय वाटते !

मी कविता कशी लिहितो ?

मनात काही चालु असते --

त्याच वेळी दुसरे काही समोर येते --

व्यक्ती, अनुभव वा आपलीच एखादी भावना --

ते सर्व एकत्र होऊन कविता लिहिली जाते --

कारण --

सर्व जगणे एकत्रच तर असते !

या अर्थाने, माझी प्रत्येक कविता हा एक अपघात असतो --

चांगला की वाईट हे वाचक ठरवतात --

आपल्या हयातीत हे जग आपल्या आदर्शाप्रमाणे होईल,

असे कुणालाच वाटत नाही.

तरीही, सर्वांची ओढ-ताण चालुच असते.

-- या कॉमन प्रश्नावर तरी

सगळे एकत्र का येत नाहीत ?

JULY 26

स्मृती हाच पाया

एकनिष्ठा मस्ट

प्रतारणाकष्ट

प्राणभेदी

एकनिष्ठेमाजी
अटळ कंटाळा
विरोधाला आळा
घालवे ना

दोन जगे माझी
एकात मी मस्ट
एकात मी नष्ट
होत असे

नष्टत्वाचा पाया
असे माझ्या मस्टी
होत नाही कष्टी
कदापीही

इथे येण्यासाठी
तुझी खेच भारी
अनिर्बंध उरी
तूच तीव्र

इथे येता मन
हक्काने भरते
सुख ते चाखते
ब्रेकयुक्त

माझे मन उष्ण
तुझा प्रतिसाद

तोही निर्विवाद
समतीव्र

इथून मी जातो
दुसऱ्या जगात
जिथे होई मात
हक्कावरी

प्रेमासाठी इथे
खंडित मी होई
प्रेमामुळे जाई
नष्ट होण्या

येरझार चाले
अगणित वेळा
अनंत जिव्हाळा
दोन्हीकडे
--- ००० --

आम्हाला राहू द्या ना तुमच्याबरोबर -- कोंडी नका ना करू आमची -- सडवू नका ना आम्हाला -- स्वाभिमानाने राहू द्या ना आम्हाला -- प्लीज -- आमच्या भाषेत बोलायला नका ना लावू आम्हाला -- असे काय करता -- मोडायचाय का संसार -- असे नका ना करू -- प्लीज --

JULY 25

ती म्हणजे विश्वच
कशी आली अस्तित्वात
त्याचा शोधच घेऊ नये अशी
काहीच नसण्यातून काहीतरी

## कसे येईल

ती आहे
इथूनच करावी लागते सुरुवात
होतोही आम्ही कुठे ना कुठे
मी एखाद्या केबिनमध्ये
ती एखाद्या वाचनालयात
अनभिज्ञ की कधी इतके घट्ट
होणार आहोत अभेद्य

झलक की झुळुक की एखादी ओळ
आली अशी की जणू हक्काचीच वाटावी
तरीही अस्पर्शित

तीव्र आकर्षणात लपेटून घेणारी
ज्वालाच जणू धजूच नये कुणीही
अशी सचेतन ती

जन्मापूर्वीच मान्य होते की काय
इतक्या जीवसृष्टीचे अस्तित्वात येणे
विरोधाचा कणही नाही आला
जे जसे आहे तसे विनाअट
भरभरून मान्यच होत गेले

स्वप्नवत कधीतरी दिसली होती ती
परकेपणाच्या अवगुंठनात
तरीही मी हेरले होते तिचे आकार
आत्मसात होईल ही आपल्या मनात
कधी काळी या कल्पनेशिवाय

आता ती सर्वस्व देऊ करतेय
कधीही इच्छा होताच
कल्पनेतही नसलेल्या अर्थांसह

हळूहळू मला
तिची आभूषणे दिसेनाशी होताहेत
तशीच तिची वस्त्रेही
हे तिला समजत असल्याचे
दाखवते ती मला
जणू अनवधानाने
तिची आता हरकतच नसते

स्वतःचाच तिरस्कार करणारा, आत्ममग्न, विकृत
होतो मी – हे माहीत होण्याची तिला गरज नसते
शुद्ध वर्तमानात ती स्वीकारते मला सन्मानाने
पूर्ण

कवितेला बंधने घालणारा मी कोण
मी येऊ देतो तिला कधीही
तिच्या-माझ्या एकात्म मर्जीने
ती माझी असूनही
हक्क न गाजवता

आताही होणाऱ्या भेटी
स्वप्नवतच असतात
तरीही ते असते ' माझे ' स्वप्न
तसेच ' तिचे ' ही
आम्ही पूर्ण सामील असतो

एकमेकांना

कारण, अर्थातच, कधीचेच
आम्ही प्रेमात आहोत !
--- ००० ---

जात, धर्म, भाषा, लिंग, राष्ट्र अशा अनेक भेदांसहच मन असते !
-- हे भेद काढून टाकले तर मनच राहणार नाही !
अलगता आणि फुटीरता ही मनाची अविभाज्य लक्षणे आहेत !
तुकारामबुवा म्हणून गेलेत --
' अहंकार तो नासा भेद ' !

JULY 24

( कोणत्याही कवितेला कवीच्या चरित्राशी जखडू नये, हे सांगून -- )

तू म्हणतेस, आपल्या त्या भेटीला सत्याचे सातत्य होते
म्हणजे आपल्या स्मृतिरूप मनांनी प्रत्येक क्षण
स्मृतीत जमा करत जाणे – हेच ना ?
अदृश्य धारेहून सूक्ष्म असणारा कोणताही क्षण
खरेच जगलो का आपण ? ते तर फक्त स्मृतीशिवायच
घडू शकले असते ! म्हणून म्हणतोय
त्या सत्यालाही आभास म्हणून स्वीकार
म्हणजे मग आताच्या या आभासाला
आभास म्हणावे लागणार नाही

मी तरी सोडूनच दिलाय
आभास आणि सत्य यांतला
मुळातच नसलेला फरक

या आभासाचेही स्मृतीत रूपांतर होत राहीलच
म्हणून म्हणतोय
सत्याचा आभास सोडून आभासातच ये
इथे होणारे मीलनही
सत्यच असेल

अडवू नकोस मनाचे खुलणे
होऊ दे
आभासाबाबतचे तुझे सत्य
आभासी माझ्यात नष्ट
ये माझ्याबरोबर
या सत्यात सत्य

हे आभासी स्वातंत्र्यच
अमर्याद सत्य --
--- ००० ---

' अक्षर वाङ्मय ' -- जानेवारी ते सप्टेंबर २०१६.
प्रा. सतीश बहादूर विशेषांक ( चित्रपटभाषा अंक ).

चित्रपट या माध्यमाच्या बाबतीत मराठीत तरी असे महत्त्वाकांक्षी काम एखाद्या नियतकालिकाने केल्याचे पाहण्यात / ऐकण्यात नाही. डॉ. नानसाहेब सूर्यवंशी, डॉ. अरुण प्रभुणे आणि डॉ. श्यामला वनारसे यांच्या प्रदीर्घ प्रयत्नांनी हा अंक सिद्ध झालेला आहे. त्यासाठी आधी त्यांचे अभिनंदन आणि वाचकांतर्फे त्यांचे आभार ! सिनेमा या माध्यमाबाबतची सजगता वाढवणारा असा हा अंक झालेला आहे. इथे या अंकाचा थोडक्यात परिचय करून देणार आहे.

या अंकाच्या एका भागात समर नखाते, गणेश विसपुते, अभिजित देशपांडे, अरुण खोपकर, गिरीश कसारवल्ली, अनिल झणकर, अशोक राणे, सुषमा दातार, श्यामला वनारसे आणि सतीश जकातदार यांचे लेख असून दुसरा भाग पूर्णपणे सतीश बहादूर यांचे व्यक्तिमत्व, कार्य आणि त्यांचे लेख यांना बहाल केलेला आहे. बहादूरांवरचा भाग फारच कष्टपूर्वक उभा केलेला आहे. त्यांच्याबाबतचे लेख आणि त्यांचे लेख हे असे एकत्रितपणे बहुधा प्रथमच येत आहेत. या क्षेत्रातला त्यांचा अधिकार

हा सखोल अभ्यास आणि अथक शिक्षण-कार्य यांतून तयार झालेला आहे. या माध्यमाच्या खोल पाण्यात उतरायची ज्याची इच्छा असेल त्याने या भागाचे परिशीलन करणे खूप लाभदायी ठरू शकेल.

अन्य लेखकांच्या विभागात गिरीश कासारवल्ली या कर्नाटकतल्या सर्जक दिग्दर्शकाने उपस्थित केलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. नुसती वेगवान कथा सांगण्यातून सर्जकतेला आवश्यक असणारी सूक्ष्मता आणि सखोलता मारली नाही का जाणार, असा तो प्रश्न आहे. या माध्यमाच्या काल-संकल्पनेवर विचारात पाडणारा हा लेख आहे.

इतर सर्व लेखकांचे लेखन हे प्रामुख्याने चित्रपट माध्यमाच्या भाषेची वैशिष्ट्ये व अंगे यांवरच्या सविस्तर चर्चेचे आहे. हे सर्वच लेखक या माध्यमाचा अनेक वर्षे अभ्यास करणारे आहेत. मूकपटापासून बोलपटापर्यंत बदलत गेलेली या माध्यमाची भाषा, लय, गती, प्रकाशयोजना, स्क्रीन टाईम म्हणजे काय, कला-विज्ञान-तंत्रज्ञान यांचे एकत्रित काम चालणे, दिग्दर्शकामुळे सिनेमाला येणारी समृद्धी, दृश्य आणि ध्वनी यांचे सायुज्य, चित्रपटाचा रचयिता हा दिग्दर्शकच कसा असतो, ध्वनीचा या माध्यमातला विशेष प्रभाव, सिनेमाची आस्वाद-प्रक्रिया, सिनेमातली स्त्री-प्रतिमा आणि सिनेमाविषयक झालेल्या लेखनाचा आढावा -- असा भरगच्च मजकूर आहे. पृष्ठ ८२ वर क्रमांक २ या मुद्यात बहादूरांनी या भाषेची सांगितलेली सर्व वैशिष्ट्ये इथे चर्चिली गेलेली आहेत. यातली त्रुटी काहीशी जाणवते ती अशी की प्रत्येक लेखकाने त्याच्या विषयाच्या संदर्भात एखाद्या सर्जक सिनेमावर निदान एक-दोन परिच्छेद लिहायला हवे होते, असे वाटते. याचबरोबर असेही वाटते की अशा एक-दोन सर्जक चित्रपटांची पूर्ण आस्वादप्रक्रिया असलेले एकदोन लेख असते तर फार बरे झाले असते. इथे बहादूरांचे हे वाक्य पाहावे – " My teaching inputs supplemented the technical learning with awareness of the best of international and Indian cinema. " अशा प्रकारचे समाधान इथे बहादूर यांच्या लेखांतून मिळते. शिवाय, सिनेमा हा सिनेमा असतो -- असे मोघम बोलणाऱ्यांनी, बहादूरांनी केलेला, व्यावसायिक हिट चित्रपट आणि सर्जक चित्रपट यांतला फरकही जरूर वाचावा.

असा हा मौलिक अंक प्रसिद्ध केल्याबद्दल सर्व संबंधितांचे पुन्हा एकदा अभिनंदन !

JULY 23

माझा दिग्दर्शक मित्र गिरीश पतके याने, दत्ता पाटील लिखित ' हंडाभर चांदण्या ' या दीर्घांकाची खूप स्तुती केलेली माझ्या लक्षात होती. काल या लेखकाच्या दोन दीर्घांकांचा पुण्यात प्रयोग होता आणि त्याने प्रेमाने बोलावले होते, त्यामुळे, ती संधी साधली. प्रयोगाचे उत्पन्न दुष्काळग्रस्तांना जाणार होते, त्यामुळे, तिकीट काढून प्रयोग पाहिला. प्रयोग पाहून धन्य वाटले ! माझे लक्ष, अर्थातच, आधी लेखनाकडेच जाणार. दत्ता पाटील हा मराठीला लाभलेला एक अत्युत्तम नाटककार आहे. माझा

मित्र अभिजित झुंजारराव याने दिग्दर्शित केलेले या नाटककाराचे व्यावसायिक रंगभूमीवरचे ' स्ट्रोबेरी ' हे नाटकही पाहायचेच, असे मी आता ठरवलेले आहे. हे दोन्ही दीर्घांक सचिन शिंदे याने दिग्दर्शित केलेले आहेत. समजून आणि उत्तम !

' हंडाभर चांदण्या '

पाणी नसलेल्या एका फक्त ३०० लोकवस्ती असलेल्या दुष्काळी गावात पाण्याच्या टँकरची वाट पाहिली जाणे, हा या दीर्घांकाचा विषय आहे. सूर्य पूर्वेकडून उगवतो तसा हा टँकरही पूर्वेकडूनच येणार आहे. कितीही अर्ज-विनंत्या करूनही कुणी लक्ष देत नसल्याने गावातला एक कार्यकर्ता संबंधित स्त्री-तहसिलदार व्यक्तीलाच पळवून आणतो आणि दबावाने टँकर मिळवायचा प्रयत्न करतो. पुढे सुमारे ७० मिनिटे नुसते वाट पाहणे दाखवले जातेय ! पाहणाऱ्याच्या घशाला कोरड पडावी असे जबरदस्त नाटक ! एक मिनिटही ढील न देणारे. सर्व टीमची उत्तम साथ लाभलेले. सुरुवात जरा पडेल झाली. मास्तर या पात्राचे संवाद नीट कळत नव्हते. काहीजण वाक्याचा शेवटचा भाग पाडत होते. या प्रयोगाला कुठेही ताकद कमी पडून चालणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. तांत्रिक अंगे उत्तम संभाळली गेली. पाणी खूप लांबून आणावे लागणे, त्याची खूपच कमतरता असणे म्हणजे काय याचा हा एक धगधगीत अनुभव होता. प्रत्येक क्षण जीवन-मरणाचा वाटावा, असा !

' गढीवरच्या पोरी '

हा दीर्घांक तर सर्वगुणसंपन्नच झाला ! यातल्या चारही मुलींनी तो अफलातून सादर केला. आशयाची समज आणि काळाचे अचूक भान असलेल्या या अभिनेत्री यांना सापडल्या कुठे, असा प्रश्न पडावा इतकी समरसून त्यांनी अभिव्यक्ती दिली ! या चार वेगवेगळ्या मुली फोनवर आलटून पालटून बोलतात, अशी ही रचना आहे. एक प्रकारे ती त्यांची स्वगतेच आहेत. अप्रतिम ! आपापल्या आयुष्यावर स्वार झालेल्या या स्त्रिया आहेत. त्यांच्या आयुष्यांतले अनेक प्रश्न हाताळण्याची त्यांची सहजता पाहता स्त्रियांचेे राज्य सुरूच झाले की काय, असे वाटावे ! लोभस आणि भेदक ! यातल्या आशयाचे तपशील नाही सांगत. संधी मिळाल्यास अवश्य बघा, एवढेच सांगतो.

दत्ता पाटील या लेखकाचे नाट्यरचना आणि संवाद यांतले कौशल्य वादातीत आहे.
बऱ्याच दिवसांनी काही रसरशीत आणि अर्थपूर्ण पाहिले !

निर्माते प्रमोद गायकवाड यांचे अभिनंदन !

JULY 22

रोजगार कमी होतील म्हणून यांत्रिकीकरणाला विरोध झाला.
त्याच कारणाने संगणकीकरणालाही विरोध झाला.
आता त्यापुढची पायरी -- माणसांऐवजी यंत्रमानव !
३० ते ७० टक्क्यांपर्यंत पर्यंत रोजगार कमी होतील, म्हणतात !
श्रम स्वस्त मिळत असल्याने इथे आलेले परदेशी कारखानेही
परत जाण्याचा धोका !
काय करतील या सगळ्यामुळे ' मोकळी ' झालेली माणसे ? ( तसे होईल तेव्हा पाहू -- सध्या, गाईचे कातडे
आणि पुतळ्यांची विटंबना -- यांत रंगून राहू ! आणि हो --
आरक्षण ! )

" खरूजवर शेवटचा इलाज ! "
खरुजेवर म्हटले पाहिजे की खरजेवर ?

JULY 21

कवी वसंत आबाजी डहाके म्हणतात की त्यांच्या कवितेवर अस्तित्ववाद आणि मार्क्सवाद यांचा प्रभाव आहे. हे दोन्ही एकत्र कसे असते, ते मला नीट समजत नाहीय. यावर कुणी प्रकाश टाकू शकेल का ?

तू नको सांगूस मनातले काही
मीही ओळखण्याचा प्रयत्न करणार नाही

जगात खूप हिंसाचार आहे
निरपराध बळी जाताहेत
याने विद्ध व्हावे तर
साधे, ताजे, छान सारे
संपूनच जाईल

आपल्यातच ते जगणार आहे
एकमेकांची मने जणू
अज्ञात असल्याप्रमाणे
एका नाजूक धारेवर
चालत राहू मनांत फुलत

आपण एकमेकांचे आहोत
हे न सांगता, न ओळखता
नुसते समजून …
--- ००० ---

JULY 20

फुले-शाहू-आंबेडकर आणि रानडे-कर्वे-आगरकर यांचा महाराष्ट्र, असे एकाने लिहिलेले वाचले ! याला पुरोगामी म्हणावे की प्रतिगामी ?

JULY 19

व्यवस्था व्यवस्था म्हणजे तरी काय ? आपल्या सर्वांच्या मनांची मिळून होणारी अभिव्यक्तीच ना ? मग, व्यवस्था बदलणे म्हणजे काय बदलणे ?

काहीजणांच्या हे लक्षात आलेही असेल – गेल्या काही काळात, विशेषतः स्त्रियांच्या बोलण्यात, एक लकब वापरात येते आहे – ती अशी की, ऐकणारा पुरुष असो की स्त्री, सारखे " ऐक ना – " असे म्हणायचे ! समोरची व्यक्ती नीट ऐकत असली तरीही म्हणायचे ! हे जवळीक, सलगी यांचे लक्षण म्हणावे की सामान्यतः आपले काहीही ऐकण्यात कुणाला काही इंटरेस्टच नाही, अशी भावना वाढीस लागल्याचे लक्षण म्हणावे ? टीव्ही मालिकांतल्या स्त्री-पात्रांच्या संवादांतही याचे प्रतिबिंब दिसू लागले आहे. ही लकब इतकी प्रचारात येण्याची कोणती असतील कारणे ?

JULY 18

साहित्याचा कच्चा माल होणारे वास्तव हे भेदाचे – विषमतेचेच असते. निर्मिती प्रक्रियेत असे काय घडते की ज्यामुळे अभेदाची – समतेची समज यावी ?

JULY 17

सामाजिक, राजकीय, आर्थिक अशी कोणतीही सुधारणा काही नवा गोंधळ तयार करते, नवे प्रश्न समोर आणते आणि पुढील आणखी सुधारणेची गरज तयार करते. एक तर हे कधी संपत नाही आणि यातून वेगवेगळ्या सत्तींचा जन्म होत राहतो – असे जे. कृष्णमूर्ती म्हणतात. ते खरेच दिसते.
तरीही, अन्याय सहन करणारे आणि अन्याय करणारे हे बदलत तरी राहावे लागेलच ना ! माणूस याहून जास्त काही करू शकत नाही, हे समजले तरी !

मुरुगन या लेखकाच्या कादंबरीवरच्या प्रतिक्रिया उग्र आलेल्या असल्या तरी त्याला लिहिण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे, असा निकाल मद्रास हाय कोर्टाने दिला आहे. त्याबाबतच्या, कालच्या मटातल्या लेखात, जयंत पवार म्हणतात की ते लिहू शकतील पण व्यवस्था बदलु शकणार नाहीत.
-- हेच जर सत्य असेल तर बांधिलकीच्या साहित्याचा हेतू काय असतो ?
JULY 16

अमुक शाम्पू वापरा
याने केस होतील
गुंताफ्री !

‘ उपोद्धात ‘ आणि ‘ उपसंहार ‘ हे दोन शब्द बघा.
यांचे अर्थ अनुक्रमे प्रस्तावना आणि समारोप, असे आहेत.
तरीही एकाच्या शेवटी घात आणि एकाच्या शेवटी संहार येत असल्याने
त्यांच्या अर्थांबाबत माणसे गोंधळात पडतात !
‘ प्रस्तावना ‘ आणि ‘ समारोप ‘ हेच शब्द वापरात ठेवणे
हा यावरचा तोडगा ठीक होईल का ?

प्रेम महत्त्वाचे

गैरसमजांना थारा नाही

असे ठरले तेव्हा

विचार, बौद्धिक-भावनिक आडाखे

रद्द झाले – आश्चर्य म्हणजे

प्रेमही उरले नाही !

--- ००० ---

JULY 15

मराठीतल्या ‘ माझे पती – ’ या हरदिन मालिकेतले प्रमुख पात्र, शोभायात्रेत उभे राहण्याच्या अभिनयापेक्षा मालिकेत काम करणे ग्रेट मानते ! त्याबद्दल ते जीव तोडून बोलते ! त्यात तथ्यही आहे ! जरी मालिका या प्रकाराला क्वचितच कुणी ग्रेट मानत असले तरी ! असे किती टप्पे असतील श्रेष्ठतेचे अभिनय-कलेत वा कुठल्याही कलेत ? हे टप्पे कोणकोणत्या कारणांनी ठरत असतील ? यात सर्वोच्च श्रेष्ठ असे काही असेल का ? त्याचे निकष कोणते असतील ?

JULY 13

ती होती

एक सेवाभावी रोबो

रूटीनपासून सर्व

सुखदुःखांत सदोदित

पाठीराखी आणि आधारभूत

प्रसंग संपताच स्वतःला पुसून टाकणारी –

आता बरी आहे आपली परिस्थिती --

हे सांगितले तरीही

पैसे न पुरण्याची मानसिक सवय असलेली –

अहंकार एकच -- आपल्या हातून

काही देत राहावे आणि वरिष्ठतेचा

मान घ्यावा !

सर्व नातेवाईक, शेजारी, मित्र, ओळखीचे

सर्वांच्या प्रेमाची –

आयुष्यात कधी स्वतःहून कुणाला

दुखवले नाही, अशी

निव्वळ सहनशील --

फक्त चौथी शिकलेली --

प्रत्येकापुढे स्वतःला कमी समजणारी --

आपला कुणाला त्रास होऊ नये, या गरीब इच्छेखातर

अनेकांची बोलणी खाणारी --

मी तिच्यावर प्रचंड उपकार केले --

तिला पुत्रशोक होऊ दिला नाही !

( हे माझे कर्तृत्व थोडेच म्हणता येईल ? )

तिचा तो महत्त्वाचा गुण

मीही आत्मसात केलेला आहे –

तिच्या नसण्याचे दुःख आले रे आले मनात

की स्वतःला पुसून टाकेन –

तिचाच तर मुलगा आहे मी –

कशाला हवेय

माझ्या तरी दुःखाचे महत्त्व ?

--- ००० ---

नातेवाईक, आप्तस्वकीय, मित्र यांना दिलेली माहिती इथल्याही फ्रेंडससाठी --

मे महिन्यात आई आठ दिवस इस्पितळात होती. त्या वेळचे प्रश्न सुटल्यावर तिला घरी आणले. ती तोंडाने काही खात-पीत नव्हती. नाकातून घातलेल्या नळीने सर्व द्रवाहार, पाणी, चहा, औषधे हे चालु होते. या प्रकारे चाळीस दिवस चालु होते.

तिच्या सेवेसाठी एक दिवसा व एक रात्री अशा दोन मावशी होत्या. घरी असल्याने, नातवंडे, पतवंडे, नातेवाईक, कुटुंबमित्र वगैरे भेटत होते. ती कधी ओळखे, कधी ओळखत नसे. या काळात काही प्रश्न आले तर डॉक्टर घरी येत. ती जाण्याच्या दोनच दिवस आधी हवागादी ( air-bed ) आणली होती. पण --

गेल्या शनिवारी दिनांक ०९-०७-१६ ला सकाळी ती वारली. वय ९२ होते.
दुपारी तिला अग्नीच्या स्वाधीन केले.
कोणताही विधी केला नाही. जमलेल्या सर्वांनी नंतर दोन मिनिटे शांतता पाळली.
पुढेही कोणताही विधी करणार नाही.
दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी आळंदीला तिच्या अस्थी नदीत विसर्जित केल्या.

आई असणे आणि ती नसणे यांतला फरक जाणवण्याचा क्षण खूपच जड गेला !
आता प्रश्न नाही -- वस्तुस्थिती अर्थातच स्वीकारलेली आहे.

JULY 12

संगणक बिघडला आहे -- ही तात्पुरती सोय करून मिळालीय --

JULY 9

काल Lakhe Damodar Ravidra यांनी पोस्ट दिल्याप्रमाणे
काल सकाळी माझी आई वारली.
आम्ही सगळे ठीक आहोत.
आपणा सर्वांच्या, आईप्रती व्यक्त झालेल्या
आदर-भावनांबद्दल आभारी आहे !

JULY 8

सर्व कवींसाठी मुक्त व्यासपीठ --
विसरा त्या चेष्टा आणि टवाळ्या --

या इथे बिनधास्त --

सहा शब्दी कवितांचा पाऊस पाडू या --

पहिली कविता मी देतोय --

आभासी सत्याने

सत्यातल्या रात्रीत

सत्य स्वप्न --

चला, संकोचू नका -- जे जसे जमेल ते तसे येऊ द्या --

( कविता फक्त सहा शब्दीच असायला हवी, हे बंधन मात्र पाळा. )

JULY 7

आभासी सत्याने

सत्यातल्या रात्री

सत्य स्वप्न --

हे खड्डे सध्या असेच असू द्यावेत --

ते बुजवण्याचा खर्च नकोच --

यांतलेच काही पुढे

मंडप उभारण्यासाठी उपयोगी पडतील --

‘ परिवर्तनाचा वाटसरू ‘ ( १६ ते ३० जून’ १६ ) या अंकात दीपक बोरगावे यांची एक कविता आलेली आहे – ‘ कविश्रेष्ठ ग्रेस यांची क्षमा मागत … ‘ -- तिच्यातला भाग --

ऐक …

संध्येच्या प्रहरापाशी

चांदणे तुझे सुनसान

शोकातून फुलते दुःख
दिःकाल मिठीतील पान

हे रक्त असे झिरपे गं
रिझवाया भगव्या रानी
तू नकोस सांगू मजला
भिजवाया हिरवी गाणी
म्हणजे …
ही कविताय !
ठीकाय …

-- जमेल त्यांनी पूर्ण वाचा ( अंदाज आला असेलच ! )

JULY 5

गणेश दिघे या मित्राचे ' मेघदूत '
( कालिदासाच्या मूळ संस्कृत काव्याचे मराठीत दर्शन )

गणेश दिघे हा आपला मित्र म्हणजे एक वेगळेच रसायन आहे, हे त्याच्या इथल्या पोस्ट वाचून आपल्याला माहीतच असते. शेती, भटकंतीपासून ते वाईन बनवण्यापर्यंत सगळेच याला आवडते. झाडे, पाने, फळे आणि निसर्गातल्या असंख्य प्रक्रिया यांचे तर त्याला एक जिवंत भानच आहे. याच त्याच्या गुणामुळे तो कालिदसाच्या ' मेघदूत ' या महान काव्याच्या प्रेमात पडला असणार. ते त्याचे आयुष्यभरचे प्रेम आहे, हे त्याच्या ' मेघदूत ' वर त्याने मराठीत केलेल्या कामावरून दिसूनच येते. त्याचा पहिला श्राव्य प्रयोग त्याने बालगंधर्वला सादर केला त्याला आता काही वर्षे झाली. त्या प्रयोगाला त्याने अंध विद्यार्थ्यांयना खास निमंत्रित म्हणून बोलावले होते. त्यानंतर त्याने मराठीतला एक बॅले म्हणून ' मेघदूत ' चा एक साग्रसंगीत, भव्य प्रयोगही सादर केला होता. त्याचे अनेक ठिकाणी प्रयोग झाले होते. काल त्याने पुन्हा एकदा, आषाढाच्या प्रथम दिवसाचे औचित्य साधून, ' मेघदूत ' चा श्राव्य प्रयोग बालगंधर्वला सादर केला. हा जाहीर प्रयोग नव्हता. त्याने फक्त पाच जणांना निमंत्रित केले होते. त्यांतला एक असण्याचा बहुमान मला मिळालेला होता. तासाभराच्या अशा फक्त श्राव्य प्रयोगासाठी, तेही फक्त पाच श्रोत्यांसाठी, बालगंधर्व घेणे, हे मला वाटते, नुसते अपवादात्मकच नव्हे तर एकमेव घडले असणार !

राहुल घोरपडे यांचे संगीत, शौनक अभिषेकी, रवींद्र साठे आणि धनश्री गणात्रा यांचे ' बोलके ' आवाज आणि रवींद्र खरे यांचे निवेदन -- असे सगळे रिच होते ! मुख्य म्हणजे गणेशने केलेले त्याच्या प्राणप्रिय कलाकृतीचे मराठीतले लेखन ! पूर्ण रिकाम्या नाट्यगृहात आम्ही पाचजण एक तास डोळे मिटून ऐकत होतो. रंगमंचावर फक्त एक लामणदिवा होता. आपल्या प्रेयसीला निरोप देण्यासाठी यक्षाने निवडलेल्या त्या मेघरूप दूताचा पूर्ण प्रवास आम्ही अनुभवला ! हंस, इतर पशुपक्षी, नद्या, वीज, वारे यांचे आवाज -- असे सगळे भरगच्च होते. या महान काव्यात कालिदास, त्याची मुख्य पात्रे आणि पूर्ण विश्व यांची एकरूपता पाहतो आणि ते पाहणे विलक्षण आहे ! काल ऐकताना आणि इथल्या गणेशच्या पोस्ट वाचूनही, एक मोठे तत्त्वज्ञानत्मक सत्य जाणवले. कुबेराच्या मुंगुसाचे महादेवाच्या नागाकडे लक्ष गेल्याने क्रुद्ध होऊन त्याने कुबेराला शाप द्यावा, त्यातून पुढे कुबेराने त्या यक्षाला शाप देण्याची वेळ यावी आणि त्यातून पुढे या मेघाकडे दूताची भूमिका यावी – हे सगळे पाहता घटनांची साखळी कशी ' सगळे मिळून ' आणि ' असंख्ययुक्त ' असते, हे लक्षात येते. नुसते एकाच एखाद्या कर्माचे फळ म्हणून काही घडत नसते !

या महान कलाकृतीचा समृद्ध प्रत्यय दिल्याबद्दल गणेशचे मनःपूर्वक आभार ! गणेश स्वतः एक उत्तम कवी असल्यामुळे त्याच्या अभ्यासाला आणि या एकूणच कामाला एक खास जिवंतपणा आलेला आहे !

--- ००० ---

अमुक एका कवीच्या कविता समजून घ्यायच्या असतील तर तुम्हाला खालील सर्व माहीत असायला हवे –
मानववंशशास्त्र, सर्वच अद्ययावत शास्त्रे, इतिहास, निरनिराळे धर्म, धर्मयुद्धे, उत्क्रांती, भाषा कशी तयार झाली, व्याकरण आणि शब्दार्थ, आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारण, वगैरे.
समजा या कशातच मला इंटरेस्ट वा गतीही नाही -- तर काय ?
मी फक्त ती कविता समजून घ्यायला नालायक की जगायलाही ?
मी इमानेइतबारे नोकरी करतो, कुटुंब संभाळतो – शब्दकोश वापरत नाही, व्याख्याने, प्रवचने ऐकत नाही, एवढेच काय, दर्जेदार म्हटल्या जाणाऱ्या कोणत्याही कलेकडेही मी फिरकतही नाही.
तर, वरील सर्व करणारे माझ्याहून मौल्यवान ठरणार का ?
तेही माझ्यासारखेच सुखदुःखी होताना, वेडे होतानाही तर दिसतात !
ही काय भानगड आहे ?

JULY 4

एकच पुरेशी असताना असंख्य

प्रतिमांनी घेरलेस – दृष्टिभ्रमात

धुंद झालो -- आता तूच

सत्य !

--- ००० --

माझे ' ढोलताशे ' हे नाटक मुंबई विद्यापीठात एमएला अभ्यासाला होते.

आता ते जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एमएला आहे.

इतर नाटकांची पुस्तके नसल्याने विद्यार्थ्यांना त्यांचा त्रास नाही !

( या पोस्टच्या निमित्ताने कळले की ते एसएनडीटी लाही अभ्यासाला आहे. )

एखादा चित्रकार कधी त्याच्या चित्रात कुठेतरी एक वेगळ्याच रंगाचा ठिपका वा स्पर्श करून ठेवतो आणि तेवढ्याने ते चित्र संपन्न होऊन जाते. तसेच एका गाण्यात घडलेले आहे.

‘ तुमसा नही देखा ’ या सिनेमाचे शीर्षकगीत ऐका ! गायक -- महंमद रफी, संगीत – ओ पी नय्यर.

या गाण्यातल्या प्रत्येक कडव्याची शेवटची ओळ झाल्यानंतर येणारा जलतरंगाचा एक थेंब ऐका !

हा थेंब म्हणजे एक अवीट गोडीचा क्षण आहे ! कितीदाही ऐका !

उदाहरणार्थ –

‘ मानके तो देखो कभी किसी का कहा ’

या ओळीनंतर अचूक क्षणावर पडणारा तो थेंब !

तेवढ्यासाठी ते गाणे मी अनेकदा ऐकतो !

JULY 2

अन्न, वस्त्र, हवा, पाणी, निवारा

हे जसे जीवनावश्यक

तशीच करमणूक !

वेडे होऊन मरू नये, यासाठी !

अक्षयकुमारने एका नव्या सिनेमासाठी

पन्नास कोटी मागितल्याची बातमी आहे ! ( टीव्ही. )

पुणे खुश !!!!!

काल रात्रभर आणि आत्ताही

जोरदार पाऊस !!!!!

जल्लोषी आवाजात एक स्त्री म्हणते, " आता फक्त नाईनटीन रुपीजमध्ये ! "
त्यांना बाजार काबीज करून माल खपवायचाय -- एकोणीस म्हणजे किती, हे विचारणारे ग्राहक खूप आहेत -- ते सांगण्यात कशाला वेळ घालवायचा ! ?

JUNE 30

आणि पुण्य म्हणजे काय याचे शाब्दिक उत्तर चालत असेल तर -- बुद्धाने सांगितलेले निर्वाण, जेकेंनी सांगितलेले ध्यान, अस्तित्ववादात सांगितलेले अस्तित्व आणि तुकारामाने सांगितलेले एकविध मन म्हणजे पुण्य. ते कुठे असते ? आपल्या जगण्यात असू शकते, असे ते म्हणतात. पाप-पुण्याचा बाजार मांडणारे ब्राम्हण आणि त्याची खिल्ली उडवत बसण्यात धन्यता मानणारे इतर -- या मर्यादेत पुण्याचा संबंध येत नसावा !

पुण्य ही गोष्ट अस्तित्वात नाही -- मानवी मनातून फक्त पापच उदभवू शकते -- मग, ते मन कोणत्याही जातीचे असो !
ज्ञानेश्वरांनी पुण्यात्मक पाप आणि पापात्मक पाप, हे दोन प्रकार दाखवलेले आहेत !

वारकरी म्हणजे तुमच्या-आमच्यासारखीच

सगुण-दुर्गुणयुक्त माणसे असतात.

त्यांच्याशी प्रेमाने चांगले वागणे

आणि इतर कुणाशीही तसेच वागणे

यांत काहीच फरक मानू नये.

' पुण्य ' मिळत राहील --

JUNE 29

मौल्यवान कलाकृती म्हणजे अमर्याद आवाक्याची कलाकृती. ती पूर्ण जगण्याचे भान देते कारण ती तिच्या निर्मात्याची मते, धारणा, संस्कारबद्धता यांच्या पकडीतून सुटलेली असते. वेड्या, गुन्हेगार कलावंताकडूनही अशा कलाकृती निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. अशी कलाकृती समजून घेताना वाचकांनी तिच्या निर्मात्याची संस्कारबद्धता आधी समजून घेतली पाहिजे आणि त्या मर्यादेतच तिचा अर्थही समजून घेतला पाहिजे, असे म्हणणे, हे त्या कलाकृतीवर अन्याय करणारे असते.

JUNE 28

" आपला माणूस जातीयवाद्यांच्या व्यासपीठावर जाऊन बसण्याने नक्कीच व्यथित व्हायला झाले आहे ! या पूर्ण भारतात फक्त आपली एकच जात अशी आहे की जी मुळीच जातीयवादी नाही ! "

माणसाचे प्रत्येक नाते एक भूतकाळ घडवत जाते आणि त्या भूतकाळावर आधारितच रूप घेत जाते.
त्यात स्वार्थ, सुखशोध, प्रेम, द्वेष, सूडभावना, अंतःकरणात झालेली एखादी जखम आयुष्यभर वा पिढ्यान पिढ्या वागवत राहणे,
हे सगळे येते.
याच प्रक्रियेत जगणाऱ्या कोणत्याही माणसाने इतर माणसांना
“ माणसा माणसा माणूस हो ! “ असे सांगणे,
हे बावळटपणाचे नाही वाटत ?

JUNE 27

जातीवाद्यांनी धर्मवाद्यांना प्रतिगामी म्हणावे
धर्मवाद्यांनी भाषावाद्यांना संकुचित म्हणावे
भाषावाद्यांनी त्या दोघांनाही ढोंगी म्हणावे
पण, प्रख्यात आणि सर्वमान्य त्रिमूर्तींची नावे
सर्वांनी सतत घोकत राहावे
असा भंगार होत चाललेला हा देश

त्याच्या आंतरिक शक्तीवर चालत राहील
अशी सर्व देशवासीयांची श्रद्धा आहे !

ही एक नवीनच समस्या म्हणायची ! एका व्यक्तीच्या चौकशीसाठी एक समिती नेमली तर त्या समितीतल्या एका व्यक्तीची भ्रष्टाचराबाबत आणि एका व्यक्तीची विनयभंगाबाबत, अशा केसेस चालु आहेत ! आणायची कुठून हो माणसे ! ?
-- आजचा पुणे मटा पृ १३ वरील बातमी.

बालपणी आजारपणात
पडून असताना मी
मैं रंगीला प्यार का राही
माँग के साथ तुम्हारा
चली चली रे पत्तंग मेरी चली रे
( गजाचा मांजा फेमस होता
तो काचेची पूड लावून बनवायचा )
ऐ मेरी टोपी पलट के आ
ऐकत असे सतत धार्मिक कर्ण्यांवर.
कसे काय हे लोक
गाणी म्हणतात, असे वाटे.
इतर सगळी माणसे आणि गाणी
मला चिडवण्यासाठीच होती !
दुसऱ्या कोणत्या तरी जगात
केलेल्या पापामुळे मला
या जगाच्या नरकात टाकले आहे
असे वाटे.

आधीच्या त्या जगातच मी
चांगले वागायला हवे होते
म्हणजे मीही
गाणी म्हणणारा झालो असतो

असे वाटे.

हे असले विचार नंतर
कमी कमी होत गेल्यानेच
तसा तसा मी बरा होत गेलो
असे आता वाटते.
--- ००० ---

JUNE 26

माझ्या क्रोधासह
करून घेतलेस मला
तू तुझ्यात गडप
याला
तू माझे कृष्णविवर असणे
म्हणावे की
माझे असणे मला दिसणे
की आपले
एकत्र असणे ?
--- ००० ---

JUNE 25

धन्य

धन्य १ -- कालच्या लोकसत्तेत आलेल्या, हिलरी क्लिंटन यांच्यावरच्या एका लेखात असे एक वाक्य आहे की अमेरिकेत स्त्री-पुरुष समानता यायला अजून शंभर वर्षे लागतील ! ( बाकीचे देश अधिकच धन्य ! )

धन्य २ – आजच एका सोनोग्राफीवरच्या लेखात असे वाचले की गर्भलिंगनिदानासाठी यापुढे सोनोग्राफीची गरज लागणार नाही – ते काम नुसत्या रक्त तपासणीनेही होऊ शकेल !

जरा थोडा पाऊस आला की ' ढाम ' कन आवाज येऊन परावर्तक ( Transformer ) उडणे आणि वीज जाणे -- हे बंद होण्यासाठी तरी पुण्याचे हुशार शहर ( smart city ) होणे आवश्यक वाटते !

JUNE 23

ब्रेक्झिट मुळे अतिरेकी कारवाया सध्या थोड्या थंडावतील. त्यामुळे मादक द्रव्यांच्या व्यापारावर वाईट परिणाम होऊन त्याचा फटका करमणूक उद्योगाला बसेल. इतर मादक द्रव्ये बाजारात कमी आल्याने दारूचा धंदा तेजीत येईल. निरोध आणि गर्भरोधक गोळ्यांना मागणी वाढेल. सीरिया आणि अफगाणिस्तान इथे याचे विपरीत परिणाम होऊन तिथे काही काळ शांतता नांदेल. सगळेच युरोपीय देश अमेरिकेकडून मदतीची अपेक्षा करू लागल्यावर अमेरिकेची कमकुवत उघडी पडेल. याचा फायदा घेऊन भारत शेजारी देशांना नमवून त्यांच्याशी स्वतःला अनुकूल करार करून घेईल. ब्रिटनमधले भारतीय अणुशास्त्रज्ञ भारतात परततील. पुढे, सख्याचे तत्त्वज्ञान राबवत भारत एक महासत्ता बनेल ! हे सगळे अचंबित होऊन पाहात राहणे, एवढेच ब्रिटनच्या हातात राहील !
या एकूण प्रकारात शेअर बाजारातले जुगारी गब्बर होतील !
( हे अर्थातच एका जागतिक तज्ज्ञ विश्लेषकाचे मत असून नाव उघड न करण्याच्या अटीवर आम्ही ते मिळवलेले आहे. )

JUNE 22

शहरांतून तरी प्रसाधन दालनांची ( beauty parlours ) संख्या खूप वाढलेली दिसतेय. दर शंभर फुटांवर एक वा कधी एकाला एक लागूनही ती दिसतात !
दुसरीकडे सतत मानसिक विदीर्णतेची चर्चा चालु असलेली दिसते !
मनांची वाट लागत राहणे आणि सौंदर्यासक्ती वाढत जाणे यांचा काही संबंध असेल का ? की ही खातीच वेगवेगळी आहेत ?

' मी किती मोठा ' या धाटाचे बोलणे --
यात धाटाचे म्हणजे रीतीचे अशा अर्थी ओघात लिहिले गेले.
पण, नंतर शंका आली म्हणून पहिले तर ' धाटणीचे ' असे बरोबर आहे.
शब्दकोशाप्रमाणे असे असले तरी ' धाटाचे ' हा शब्द ' रीतीचे ' या अर्थी वापरला जातो ना ?

JUNE 21

आत्मचरित्र

कोणतीही व्यक्ती संपूर्ण सद्गुणी असू शकत नाही. सामाजिक अपेक्षांच्या चौकटीत पूर्ण बसणारे असे आयुष्य असूच शकत नाही. मनातले तसेच बोलण्या-वागण्यातले आंतरविरोध असतातच. ते सगळे दबवून नुसती रामरक्षा वा व्यंकटेश स्तोत्र म्हणत आयुष्य संपवणाऱ्यांचे जगणे रटाळ आणि सपक असते. पूर्ण भीतीग्रस्त आणि कधीच कोणतीच आव्हाने न घेणारे असते. तशा माणसांचे आत्मचरित्र किमान वाचनीय असण्याची शक्यताही खूप कमी असते. राहतो विषय आव्हाने घेणाऱ्यांचा. त्यांतलेच काही यशस्वी वा अति-यशस्वी होत असतात. अशी माणसे, कधी स्वतःचे महत्त्व अधिकच वाढवण्यासाठी ( खरे तर आपल्याबाबतच्या मोठेपणाच्या लोकांच्या भावनेचे शोषण करण्यासाठी ) वा कुणाच्या तरी आग्रहाला बळी पडून आत्मचरित्र लिहू शकतात. ' आता मी कृतकृत्य आहे, समाधानी आहे, या आयुष्याने मला खूप दिले, मी तृप्त आहे ' अशा धाटणीचे शेवट असलेली आत्मचरित्रे, वाचली नाहीत तरी चालेल, अशी असतात. ती फक्त स्वतःच्या यशाची द्वाही फिरवणारी असतात. दुसऱ्या कुणाच्याही जगण्यात तसल्या आत्मचरित्रांना कोणतेच मूल्यात्मक स्थान असू शकत नाही. मूल्यात्मक म्हणजे कुणालाही त्याचे स्वतःचे आयुष्य समजून घ्यायला उद्युक्त करेल, अशी जगण्याची प्रक्रिया देणारे. यासाठी –

१. भल्याबुऱ्याचा विचार न करता आपल्या सर्व गुणावगुणांसह, विकृतींसह स्वतःला उघडे करण्याची हिंमत लागेल.

२.मुख्यतः आयुष्यातले आव्हानात्मक प्रसंग वा घटना कोणत्या, कशा होत्या आणि ती आव्हाने घेण्याची पूर्ण प्रक्रिया कशी घडली ते सांगता आले पाहिजे.

३. या सर्व जगण्यात आपले काय, कसे चिंतन होत गेले, ते सांगायला हवे.

४. यश मिळणे ही पूर्तता वाटली का, अपूर्तता जाणवली असेल तर ती कोणती, हेही सांगायला हवे.

-- नुसतेच घटनांचे ' यशस्वी ' शेवट सांगून दिपवून टाकायचा प्रयत्न करणारी आत्मचरित्रे काही कामाची नाहीत. घटनांच्या वा आव्हानांच्या रचना आणि प्रक्रिया न देणाऱ्या आत्मचरित्रांना वाचकांच्या जगण्यात काही स्थान असू शकत नाही.

( नुसतेच ग्लॅमरवेडे मूर्ख वाचक इथे जमेला धरलेले नाहीत. )

-- या विषयावर आणखी काही मुद्दे सुचत असतील तर ते फ्रेंड्सनी जरूर मांडावेत

काही वर्षांपूर्वी भाजप आणि संघ यांना एक किळसवाणा रोग होता – तो म्हणजे, सारखेच, सत्ताधाऱ्यांच्या सगळ्याच गोष्टींवर, अत्यंत उत्साहाने, कुत्सित, उपरोधिक, द्वेषयुक्त आणि टवाळी करत बोलणे ! त्यांचे छद्मी हसणे तर डोक्यात तिडीक आणणारे असे. आता सत्तेत आल्यापासून ते त्या रोगातून बरेचसे बाहेर पडलेले दिसताहेत. पण, तशीच पराभूत मनोवृत्ती आता इतर काहीजण आत्मसात करताना दिसताहेत. काँग्रेसचे कदाचित हे अलिकडे घडत असेल, पण, बिचाऱ्या समाजवाद्यांना मात्र हा रोग सततच, कायमच जोपासावा लागतो – सत्तेत काँग्रेस असो की भाजप ! याला नाइलाजाने नियती म्हणावे काय ?

ताणताणाव आणि हृदयविकार आटोक्यात ठेवण्यासाठी योग आणि ध्यान यांचे महत्त्व जगन्मान्य आहे. बायपासची वेळ आली तर पाचसात लाखांचा बांबू बसतो ! हे सामान्यांना परवडणारे नाही.
सगळ्याच गोष्टींच्या टिंगल-टवाळ्या करण्यात अर्थ नाही.

JUNE 20

' योग ' म्हणा की ' योगा ' म्हणा,
सर्वांचे आरोग्य-वर्धन-रक्षण होवो, हीच सदिच्छा !

थियेटर लौकर ताब्यात मिळाल्यावर नाटकवाले नेपथ्य मांडून बसलेले असतात -- तशी अवस्था होती !
पण, झाले एकदाचे नाटक सुरू !
( मुक्काम -- पुणे -- विषय -- पाऊस. ).

JUNE 18

तुझ्या कर्णफुलांमागचा तुझा हात
प्रक्षेपितो लहरी उत्तेजनेच्या
ज्यांच्यामुळे ओसंडतात ओळी
कवितेच्या
अर्थसंपृक्त शब्दांच्या
जे टाकतात तुला पिऊन
संपूर्णच –

हे कवितेचे असणे

अजरामर असते –

--- ००० ---

आता कदापि त्याची

नेमेची येतो म्हणून

बोळवण होणार नाही --

JUNE 17

पंतप्रधानाचे काम कितीही कष्टाचे, कौशल्याचे, मुत्सद्दीपणाचे आणि हजार व्यवधाने संभाळण्याचे असू दे, तो कोट्यधीश वा अब्जाधीश झालेला जनतेला चालणार नाही. पण, एखादा सिनेनट अब्जाधीश झाला तर जनता नुसती खुशच होईल असे नव्हे तर वर त्याला स्टारपद देईल, त्याच्या पाया पडेल, त्याच्या सह्या घेऊन त्या एक अमूल्य ठेवा म्हणून जपेल ! यात काहीही चूक नसते. जगण्याच्या प्रश्नांपासून दूर पळायला मदत करणारे, करमणुकीच्या वा प्रत्यक्ष नशेचे पुरवठादार असे श्रीमंत होणारच, हे जनतेला समजते. कारण नशा ही गोष्ट इथल्याच नव्हे तर एकूणच जगातल्या माणसांच्या अग्रक्रमात नंबर एकवर असते. त्यामुळे, सिनेमा, क्रिकेट, फुटबॉल – अशा क्षेत्रांत यशस्वी होणाऱ्यांना अमर्याद पैसे मिळणारच. कारण तिथे नशेचा ‘ खरा ‘ व्यवहार असतो ! हिंदी सिनेमातल्या नायकाला एका सिनेमाचे मानधन ३० ते ४० कोटी मिळते, म्हणे – पण, नायिकेला मात्र, नायिकाप्रधान सिनेमा असला तरीही, सुमारे १० कोटींपर्यंतच मानधन मिळते. ही विषमता घालवली पाहिजे, असे आता नायिका म्हणताहेत. सर्व जनताही इथे ‘ पुरोगामी भूमिका ‘ घेऊन समतेच्या बाजूने उभी राहू शकते ! जनता न्यायी असते !

I can't change the fact that my paintings won't sell.

But the time will come when people will recognize

that they are worth more than the value of the paints

used in the picture.

Vincent van Gogh ~

JUNE 16

आमच्या इथल्या एका रस्त्यावर वाहतूक-व्यावसायिकांच्या बसेस पार्क केलेल्या असतात. सकाळी थोड्या थोड्या वेळाने त्या एकेक करून मार्गस्थ होतात. सकाळी मी त्या रस्त्याने चाललो होतो. एका चालकाने त्याच्या बसला नुसती किल्ली लावली मात्र, त्या बसखालुन तीन कुत्री बाहेर आली. रात्रभर ती तिथे निवांत झोपली होती, हे स्पष्ट होते. बाहेर येऊन त्यांनी आळोखेपिळोखे देणे, शरीर ताणणे, वगैरे केले. बस सुरू होऊन निघून गेली. मला सहज प्रश्न पडला की बस सुरू होणार असून आता यापुढे तिथे पडून राहिल्यास वाट लागेल, हे त्यांना समजत कसे असेल ? ' बसखाली झोपताना घ्यायची काळजी ' असे लेख तर ते वाचत नसणार. बरे, आधीच्या पिढीचे ज्ञान पुढच्या पिढीला हस्तांतरित वा पादांतरित करणारे क्लासेसही त्यांना उपलब्ध नसणार. की, कधीतरी त्यांचा एखादा भाऊबंद बसखाली चिरडला गेलेला त्यांनी पाहिला असेल आणि ती स्मृती त्यांचे ज्ञान झाली असेल ? पण सगळ्यांच्या बाबतीत हे कसे शक्य आहे ? की, स्वसंरक्षणाचे ज्ञान त्यांना उपजतच येत असेल ? माणसाच्या मुलांना शिकवावे लागते – आगीजवळ जाऊ नकोस, भाजेल ! या अशा कुत्र्यांसारख्या प्राण्यांची ज्ञानयंत्रणा कशी विकसित होत असेल ? सामूहिक की व्यक्तिगत पद्धतीने ?

बुद्धिवादी निर्बुद्ध असतात
कारण त्यांना हे समजत नाही
की
सगळेच समर्थनीय असते !

JUNE 14

प्रकाश पवार या विश्लेषक लेखकाला मनःपूर्वक सलाम ठोकण्यासाठी ही पोस्ट आहे. आजच्या पुणे लोकसत्तेतला त्यांचा, ' दलित राजकारण : समीकरणाचे पेच ' हा लेख मला ललित लेखनातलाही एक मास्टरपीस वाटतो ! मानवी जगण्यातली ॲब्सर्डिटी इतक्या छोट्या लेखात, इतक्या प्रभावीपणे व्यक्त झालेली मी कुठेही पाहिलेली नाही. निरनिराळ्या समीकरणांसाठी त्यांनी वापरलेली लघुरूपे तर मी अशा अभिव्यक्तीतले उत्तुंग षटकारच समजतो ! ग्रेट लेख ! ( या पद्धतीने हा लेख वाचून पाहा – तुडुंब हसाल ! )
एखाद्या चांगल्या नाट्यदिग्दर्शकाने या लेखावर आधारित एक नाट्यप्रयोग बसवावा, असे मी इथे सुचवेन.
तसेच, या लेखकाला, जमल्यास, ललित लेखनाला, विशेषतः नाट्यलेखनाला, प्रवृत्त करावे, असेही मी सुचवेन.
इतके इंटरेस्टिंग लेखन मी गेल्या काही वर्षांत वाचले नव्हते !
मी हा लेख संग्रही ठेवतोय !

विचारसरण्यांमुळेही माणसांत भेदभाव येऊ नये, असे काही घटना म्हणत नाही, त्यामुळे, ते ठीक आहे. पण, जात, धर्म, वर्ण अशा कोणत्याही कारणाने समाजात भेदभाव होऊ नये, अशी अपेक्षा आहे. तरीही, ‘ बहुजनसमाज ‘ हा शब्द एखाद्या चलनी नाण्याप्रमाणे अनेक लोक वेगवेगळ्या अर्थांनी वापरताना दिसतात. हा शब्द वापरणारे लोक बहुतेक वेळा स्वतःला पुरोगामी वा बुद्धिवादी म्हणवून घेणारे असतात. बहुजनसमाज आणि अल्पजनसमाज ही विभागणी, हे लोक कोणत्या आधारावर करतात, ते कधीच स्पष्ट करत नाहीत. कारण या शब्दाचे फक्त फायदे मिळावेत, तोटे नकोत, अशी यांची पळपुटी आणि भिकारडी अपेक्षा असते. सामान्यतः या शब्दाचे अर्थ असे दिसतात --

१ – तिलक, तराजू और तलवार हे वगळून इतर सर्व.

२ – हिंदुत्ववादी सोडून इतर सर्व.

३ – ब्राम्हण सोडून इतर सर्व.

-- या सर्व अर्थांमध्ये, धार्मिक अल्पसंख्याक हे बहुजनसमाजात समाविष्ट आहेत, असे दिसते.

ते काहीही असले तरी हा भेदभाव विचारसरणीमुळे येणारा नाहीय. घटनेच्या भक्तांनी या भेदभावाचा फायदा घेऊ पाहणे, हे त्यांच्या ब्रीदाला कसे काय शोभून दिसते ?

‘ बहुजनसमाज ‘ या शब्दाचा नेमका अर्थ स्पष्ट न करता तो शब्द वापरत राहणारे लोक हे निव्वळ आपमतलबी, ढोंगी, पळपुटे, प्रतिगामी आणि घटनाद्रोहीही आहेत, असे ( जरा बळ एकवटून का असे ना ) का म्हणू नये ?

( आजच्या लोकसत्तेतला प्रकाश पवार यांचा लेख वाचताना हे प्रश्न मनात आले. )

JUNE 12

अनुभव-क्षेत्र हे व्यक्तिगत क्रिया-प्रतिक्रिया, भूमिका आणि पूर्वग्रह यांनी युक्त असते.

ते प्रत्येक व्यक्तीचे वेगळे असते. कुणाचेच दुसऱ्याला सत्य नसते.

कुणाचेही आजचे उद्या बदललेले असते.

सत्य म्हणजे अनुभव-क्षेत्राचे भान -- जे पूर्वग्रहबद्ध नसते.

चांगल्या कलेत सत्याचा अनुभव-क्षेत्राला स्पर्श होतो.

चांगल्या कलेचा निर्माता कधी सत्ययुक्त तर कधी अनुभव-क्षेत्रात भटकणारा असतो.

अनुभव-क्षेत्रात तो समाजनियमांप्रमाणे गुन्हेगारही असू शकतो.

पण, त्यामुळे त्याची कला निकृष्ट ठरत नाही.

कारण ती कला प्रत्येकाच्याच अनुभव-क्षेत्राला सत्याचा स्पर्श घडवणारी असते.

माणसांचे एकत्र जगणे शक्य करणारी म्हणजेच मौल्यवान असते.

सतत सत्यमय नसणे हे चांगल्या कलावंताचे ‘ शापित ‘ जगणे असते.

किंचितही धोका नको असेल

आणि

घट्ट धरलेले स्टेशन सोडायचेच नसेल

तर

नावीन्याची आस बाळगण्यात काय अर्थ आहे ?

JUNE 11

एकटेपणाची भीती टाळण्याचा प्रयत्न दोन प्रकारांनी चालु असतो --

१. कोणत्या ना कोणत्या समूहात सामील होणे.

२. धर्म, विचारसरणी, भाषा, विभूती यांच्या अस्मिता बाळगणे.

-- या दोन मार्गांनी मानसिक स्थैर्य आणण्याचे प्रयत्न चालु असतात.

एकटेपणाची अस्थिरता यातून टाळली जाईल, अशी श्रद्धा बाळगली जाते.

JUNE 10

आजच्या लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीतला ' डान्स बार -- एक कटाक्ष ' हा मंगला सामंत यांचा लेख जरूर वाचवा. उद्बोधक आणि विचारप्रवर्तक आहे. ही लेखिका नेहमीच असे महत्त्वाचे काही लिहीत असते.

JUNE 9

आपले संरक्षक कवच हे दुसऱ्याच्या बाबतीत आक्रमक तलवार ठरू शकते. उदाहरणार्थ, अध्यात्मात इंटरेस्ट असलेले सगळेच काही भक्तिमार्गी वा नामस्मरणवाले नसतात – काही, प्रश्न विचारत समजून घेणारेही असतात. तुम्ही सारखेच उठताबसता, “ जय श्रीराम ! ‘ किंवा ‘ माउली ! ‘ म्हणत राहिलात तर इतरांना ते डिस्टर्ब करणारे ठरू शकते – लोक त्रासू शकतात. ( ज्यांना अध्यात्मात इंटरेस्टच नाही, ते तर वैतागणारच! ) तसेच तुमची उदासी, उत्साह, सारखेच आनंदी असण्याचा प्रयत्न वा देखावा किंवा निराशा यांना मोठ्याने अभिव्यक्ती देत राहण्याचेही असते. सारखेच ‘ वा वा ‘ म्हणणे

वा उसासे टाकणे वा मरगळ, थकवा वा कंटाळा व्यक्त करत राहणे याने इतर लोक त्रासले जाऊ शकतात. अशा सर्व अभिव्यक्ती या त्या त्या व्यक्तींची स्वतःचा इतरांपासून बचाव करण्याची संरक्षक कवचे असू शकतात, पण, इतर अनेकांना त्या तलवारी वाटून त्यांचे जगणे डिस्टर्ब होत राहू शकते. यात कुणीच कुणाची फिकीर करत नाही, त्यामुळे, माणसे सततच एकमेकांवर त्रासलेले जिणे जगत राहतात.

' उपरोधाला प्रचार समजू नये ' --

खूप विचारानंतर तो थकून पडून राहिला --
#mysixwordstory

JUNE 7

ओशोंनी केलेली दोन कवितांची तुलना वाचनात आली -- खूप इंटरेस्टिंग वाटल्याने इथे देत आहे --

Osho Quote: On Poetry
Osho talks on poetry. As an example he takes a haiku by Basho and a poem by Tennyson.

Just the other night I was reading the famous haiku of Basho, the Zen mystic and master. It does not look like great poetry to the Western mind or to the mind which has been educated in a Western way. And now the whole world is being educated in the Western way; East and West have disappeared as far as education is concerned. Listen to it very silently, because it is not what you call great poetry but it is great insight – which is far more important. It has tremendous poetry, but to feel that poetry you have to be very subtle. Intellectually, it cannot be understood; it can be understood only intuitively.

This is the haiku:

When I look carefully,

I see the nazunia blooming
By the hedge!

Now, there seems to be nothing of great poetry in it. But let us go into it with more sympathy, because Basho is being translated into English; in his own language it has a totally different texture and flavor.

Osho-with-flowersThe nazunia is a very common flower – grows by itself by the side of the road, a grass flower. It is so common that nobody ever looks at it. It is not a precious rose, it is not a rare lotus. It is easy to see the beauty of a rare lotus floating on a lake, a blue lotus – how can you avoid seeing it? For a moment you are bound to be caught by its beauty. Or a beautiful rose dancing in the wind, in the sun… for a split second it possesses you. It is stunning. But a nazunia is a very ordinary, common flower; it needs no gardening, no gardener, it grows by itself anywhere. To see a nazunia carefully a meditator is needed, a very delicate consciousness is needed; otherwise you will bypass it. It has no apparent beauty, its beauty is deep. Its beauty is that of the very ordinary, but the very ordinary contains the extraordinary in it, because all is full of God – even the nazunia flower. Unless you penetrate it with a sympathetic heart you will miss it.

When for the first time you read Basho you start thinking, "What is there so tremendously important to say about a nazunia blooming by the hedge?"

In Basho's poem the last syllable – 'kana' in Japanese – is translated by an exclamation point because we don't have any other way to translate it. But kana means, "I am amazed!" Now, from where is the beauty coming? Is it coming from the nazunia? – because thousands of people may have passed by the side of the hedge and nobody may have even looked at this small flower. And Basho is possessed by its beauty, is transported into another world. What has happened? It is not really the nazunia, otherwise it would have caught everybody's eye. It is Basho's insight, his open heart, his

sympathetic vision, his meditativeness. Meditation is alchemy: it can transform the base metal into gold, it can transform a nazunia flower into a lotus.

When I look carefully…. And the word 'carefully' means attentively, with awareness, mindfully, meditatively, with love, with caring. One can just look without caring at all, then one will miss the whole point. That word 'carefully' has to be remembered in all its meanings, but the root meaning is meditatively. And what does it mean when you see something meditatively? It means without mind, looking without the mind, no clouds of thought in the sky of your consciousness, no memories passing by, no desires… nothing at all, utter emptiness.

When in such a state of no-mind you look, even a nazunia flower is transported into another world. It becomes a lotus of the paradise, it is no longer part of the earth; the extraordinary has been found in the ordinary. And this is the way of Buddha: to find the extraordinary in the ordinary, to find all in the now, to find the whole in this – Buddha calls it tathata.

Basho's haiku is a haiku of tathata: this nazunia, looked at lovingly, caringly through the heart, unclouded consciousness, in a state of no-mind… and one is amazed, one is in awe. A great wonder arises, How is it possible? This nazunia – and if a nazunia is possible then everything is possible. If a nazunia can be so beautiful, Basho can be a buddha. If a nazunia can contain such poetry, then each stone can become a sermon.

When I look carefully, I see the nazunia blooming by the hedge! Kana…. I am amazed. I am dumb. I cannot say anything about its beauty – I can only hint at it.

A haiku simply hints. The poetry describes, the haiku only indicates – and in a very indirect way.

A similar situation is found in Tennyson's famous poetry; comparing both will be of great help to you. Basho represents the intuitive, Tennyson the intellectual. Basho represents the East, Tennyson the West. Basho represents meditation, Tennyson mind. They look similar, and sometimes the poetry of Tennyson may look more poetic than Basho's because it is direct, it is obvious.

Flower in the crannied wall
I pluck you out of the crannies
Hold you here, root and all, in my hand,
Little flower – if I could but understand
What you are, root and all, and all in all,
I should know what God and man is.

A beautiful piece, but nothing compared to Basho. Let us see where Tennyson becomes totally different. First: Flower in the crannied wall I pluck you out of the crannies….

Basho simply looks at the flower, he does not pluck it out. Basho is a passive awareness: Tennyson is active, violent. In fact, if you have really been impressed by the flower, you cannot pluck it. If the flower has reached your heart, how can you pluck it? Plucking it means destroying it, killing it – it is murder! Nobody has thought about Tennyson's poetry as murder – but it is murder. How can you destroy something so beautiful? But that's how our mind functions; it is destructive. It wants to possess, and possession is possible only through destruction.

Basho looks carefully, just looks, not even gazes concentratedly; just a look, soft, feminine, as if afraid to hurt the nazunia.

Tennyson plucks it out of the crannies and says: … I hold you here, root and all, in my hand, little flower…. He remains separate. The observer and the observed are nowhere

melting, merging, meeting. It is not a love affair. Tennyson attacks the flower, plucks it out root and all, holds it in his hand. Mind always feels good whenever it can possess, control, hold. A meditative state of consciousness is not interested in possessing, in holding, because all those are the ways of the violent mind.

And he says: Little flower…. The flower remains little, he remains on a high pedestal. He is a man, a great intellectual, a great poet. He remains in his ego: Little flower….

For Basho, there is no question of comparison. He says nothing about himself, as if he is not. There is no observer. The beauty is such that it brings a transcendence. The nazunia flower is there, blooming by the hedge – kana – and Basho is simply amazed, is struck to the very roots of his being. The beauty is overpowering. Rather than possessing the flower, he is possessed by the flower, he is in a total surrender to the beauty of the flower, to the beauty of the moment, to the benediction of the herenow.

Little flower, says Tennyson, if I could but understand…. That obsession to understand! Appreciation is not enough, love is not enough; understanding has to be there, knowledge has to be produced. Unless knowledge is arrived at Tennyson cannot be at ease. The flower has become a question mark. For Tennyson it is a question mark, for Basho it is an exclamation point. And there is the great difference: the question mark and the exclamation point.

Love is enough for Basho – love is understanding. What more understanding can there be? But Tennyson seems to know nothing of love. His mind is there, hankering to know… But if I could understand what you are, root and all, and all in all…. And mind is compulsively perfectionist. Nothing can be left unknown, nothing can be allowed to remain unknown and mysterious. Root and all, and all in all… has to be understood. Unless mind knows everything it remains afraid – because knowledge gives power. If

there is something mysterious, you are bound to remain afraid because the mysterious cannot be controlled. And who knows what is hidden in the mysterious?

The scientific insistence is that we will not leave anything unknown, and we cannot accept that anything can ever be unknowable. Science divides existence into the known and the unknown. The known is that which was unknown one day, now it is known; and the unknown is that which is unknown today but tomorrow or the day after tomorrow it will be known. The difference is not much between the known and the unknown; just a little more endeavor, a little more research, and all unknown will be reduced to known.

Science can feel at ease only when everything is reduced to the known. But then all poetry disappears, all love disappears, all mystery disappears, all wonder disappears. The soul disappears, the God disappears, the song disappears, the celebration disappears. All is known… then nothing is valuable. All is known… then nothing is of any worth. All is known… then there is no meaning in life, no significance in life. See the paradox: first the mind says "Know everything!" – and when you have known it the mind says, "There is no meaning in life."

You have destroyed the meaning and now you are hankering for meaning. Science is very destructive of meaning. And because it insists everything can be known, it cannot allow the third category, the unknowable – which will remain unknowable eternally. And in the unknowable is the significance of life.

All the great values of beauty, of love, of God, of prayer, all that is really significant, all that makes life worth living, is part of the third category: the unknowable. The unknowable is another name for God, another name for the mysterious and the miraculous. Without it there can be no wonder in your heart – and without wonder, a heart is not a heart at all, and without awe you lose something tremendously precious.

Then your eyes are full of dust, they lose clarity. Then the bird goes on singing, but you are unaffected, unstirred, your heart is not moved – because you know the explanation.

The trees are green, but the greenness does not transform you into a dancer, into a singer. It does not trigger a poetry in your being, because you know the explanation: it is chlorophyll that is making the trees green… so nothing of poetry is left. When the explanation is there the poetry disappears. And all explanations are utilitarian, they are not ultimate.

And you can go on searching for God and you will not find him anywhere, because he is everywhere. The mind is going to miss him, because the mind would like him to be an object and God is not an object.

God is a vibe. If you are attuned to the soundless sound of existence, to the mysterious, you will know that only God is, and nothing else. Then God becomes synonymous with existence.

But these things cannot be understood, these things cannot be reduced to knowledge – and that's where Tennyson misses, misses the whole point. He says: Little flower – if I could but understand what you are, root and all, and all in all, I should know what God and man is. But it is all 'but' and 'if'.

Basho knows what God is and what man is in that exclamation mark, kana: "I am amazed, I am surprised… Nazunia blooming by the hedge!" Maybe it is a full-moon night, or maybe it is early morning – I can actually see Basho standing by the side of the road, not moving, as if his breath has stopped. A nazunia… and so beautiful. All past is gone, all future has disappeared. There are no more questions in his mind but just sheer amazement.

Basho has become a child: again those innocent eyes of a child looking at a nazunia, carefully, lovingly. And in that love, in that care, is a totally different kind of understanding – not intellectual, not analytical.

Osho, The Dhammapada: The Way of the Buddha, Vol 3, Ch 3

JUNE 6

आपण कसे चांगले, साधकबाधक विचार करणारे, सर्वांच्या हिताचे पुरस्कर्ते आणि नीतिमान आहोत, या भ्रमात आपल्याला जगता येण्यासाठी सतत कुणाची ना कुणाची हेटाळणी करत राहणे भाग असते !

ड्रेसच्या नेकलाईनप्रमाणे नेकलेस – या विषयावरची माहिती पाहिली !
हे प्रकार परवडणाऱ्या सर्वच स्त्रियांनी यात असा वेळ घालवावा ?
की हे फक्त मॉडेल विभागातल्या स्त्रियांनाच ठीक आहे ?
चपला, सँडल्स, ड्रेस, साड्या आणि त्यांचे
आकार, रंग, ते वापरण्याच्या वेळा आणि प्रसंग !
की नीटनेटके असणे म्हणजे हे इतके सगळे लागतेच ?

JUNE 4

रवींद्र लाखे यांनी दिग्दर्शित केलेल्या माझ्या ‘ वस्तू ‘ या नाटकाचा प्रयोग पाहायला सुलभा देशपांडे आणि रोहिणी हत्तंगडी या दोघी आल्या होत्या. प्रयोग झाल्यावर, “ कसे वाटले ? बरे वाटले का नाटक ? “ असे मी विचारले. “ बरे ? डोके ढवळून निघाले सगळे ! “ – सुलभा देशपांडे म्हणाल्या ! -- हे पूर्ण टीमचे कौतुक होते !
त्यांच्या स्मृतीला अभिवादन !

खानोलकरांच्या ‘ सगेसोयरे ‘ ची तालीम बघायला गेलो होतो. त्या दिवशीची तालीम सुलभा देशपांडे घेत होत्या. एका नटाला अमुक एक वाक्य बोलत डाव्या कडेपर्यंत जायचे होते. त्यानंतर काही क्षणांनी वळून तो पुढचे वाक्य म्हणतो, असे होते. तो नट तसे करत होता. सुलभा देशपांडे म्हणाल्या, असे नाही, मी सांगितलेय म्हणून तसे करायचे नाहीय. पहिले वाक्य

बोलत तू तिथपर्यंत गेलास, त्यानंतर तुझ्या मनात काही घडले, म्हणून तू वळलास आणि पुढचे वाक्य बोललास, असे हवे. त्या मधल्या दोन क्षणांचे तुझ्या मनात घडायला हवे. ----- का नाही कलाकार तयार होणार अशा व्यक्तींच्या सान्निध्यात ? त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

JUNE 3

एखादी गोष्ट सहजच आपल्या लक्षात येते. आपण जरा चकित होतो. असे असेल खरेच ? – या प्रश्नामुळे आपण अधिक निरीक्षण करू लागतो. आणि आश्चर्य म्हणजे ते आपल्या लक्षात आलेले बरोबर असल्याचे जणू सिद्धच होत जाते. जणू एखादा शास्त्रीय शोधच आपण लावलाय की काय, अशा आनंदात आपण खुश होत राहतो !

झाले असे की एकदा असे लक्षात आले की चालताना पुरुषांचे हात मागे-पुढे हलतात तर स्त्रियांचे हात मागेपुढे थोडे पण पुढच्या बाजूला आडवे जास्त हलतात ! ( अर्थात, परेडमधल्या स्त्रिया सोडून. खरे तर परेडमध्येही त्यांच्या हातांना त्यांच्या नैसर्गिक हालचालीच द्यायला हव्यात, असे वाटले. )

काय असावे याचे रहस्य ?

गती आणि तोल यांचे नियम स्त्रियांना आणि पुरुषांना वेगवेगळे असतात की काय ?

JUNE 2

माणसाला वर्चस्व, व्यक्तिगत आणि स्वसमूहाची सुरक्षितता, व्यक्तिगत सुखे आणि याबरोबरच समता, स्वातंत्र्य, बंधुभाव -- असे हवे आहे ! बुद्धिवाद्यांना हे घडेल असे वाटते ! अशांना निर्बुद्ध बुद्धिवादी का म्हणू नये ? ( इथे कोणताही अधिक्षेप नसून, सरळ प्रश्न आहे. )

Just giving everyone fair warning . . . □ Almost all the accounts are being hacked. The profile picture and your name are used to create a new face book account. And then they want your friends to add them, your friends think it's you and accept. From this moment, the pirates can write what they want under your name!! ..... I want you to know I have NO plans to open a new account, so please do not agree to a 2nd invitation

from me!! Copy this message on your wall so that all your friends will be warned! Do not forward or press share. Hold your thumb down on the text until the word "copy" then paste to your status.

JUNE 1

आधी झाडांचे शेंडे सोनेरी होतात, मग, जग लखलखते
आणि मग, तलखते !
यात अमुक हे असे हवे आणि ते तसे नको
असे म्हणण्याला शून्य किंमत असते !

काटकसर ही आर्थिक गरज असू शकतेच, पण, मुख्यत ती आरोग्याचीही गरज आहे !

MAY 31

मनाच्या एका भागाने मनाच्या दुसऱ्या भागाला ताणहीन करायचा प्रयत्न करणे म्हणजे रिलॅक्सेशन नव्हे -- पूर्ण मनाने पूर्ण मनाला ' जाऊ देणे ' – लेट गो करणे -- म्हणजे रिलॅक्सेशन --

May 2016
MAY 31

एक ओळखीचे सज्जन : ( घरात प्रवेश करत -- ) मी खूप गडबडीत आहे ! वा ! भेटलात ! छान वाटले ! वेळ नाहीय, निघतोय लगेच ! तुम्हाला भेटावे, बोलावे, गप्पा माराव्यात, अशी इच्छा होतीच ! छान वाटले ! भेटलात ! चला, मी गेलो हं -- भेटू पुन्हा ! ( जातात. )

MAY 30

कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या ' एक शून्य बाजीराव ' या अजरामर नाटकात बाजीराव या पात्राच्या तोंडी एक स्वगत आहे, त्यात तो त्याच्या प्रिय काठीला म्हणतो, " काठे, इतर कुणाचाही हट्ट चालेल, पण, तुझा नाही चालणार – " ! तसेच,

दुकानदार बिल्डर, इंजिनियर, राजकारणी अशा कुणाचाही हट्ट चालेल, पण, डॉक्टरांचा नाही चालणार, असेच असते ! डॉक्टरांचा हट्ट हा मुख्यतः मानवी जीवित आणि आप्तेष्टांच्या भावना या क्षेत्रांत परिणाम करणारा असतो ! – हे लक्षात घेऊन डॉक्टर आणि आरोग्य उत्पादने यांची समाजाने आणि पर्यायाने, सरकारने विशेष निगराणी करायला हवी.

MAY 28

गरिबांना आहेत का आधुनिक आरोग्यसुविधा उपलब्ध ?
आर्थिक स्तराने जरा बरे वा चांगले असलेल्यांना, कापून-लुटून खाण्याचे बकरे नाही समजले जात ?
एका हिंदी सिनेमातले वाक्य आठवले – परेश रावल या नटाच्या तोंडी ते एक गंमतीची लकब म्हणून दिलेले होते – लोक हसत – ( तो कोणता सिनेमा, हे कुणाला आठवले तर सांगावे. ) वाक्य असे होते –
" भारतमाता तुझे कुछ नही आता ! "

ऍलोपथीतली एम डी करायला तीन कोटी लागतात, असे कळले ! इस्पितळांच्या इमारती, मशिनरी आणि इतर आस्थापन खर्च, हेही प्रचंड आहेत ! अशा परिस्थितीत तुम्हाला सर्दी झाली तरी मेंदूचे ऑपरेशन करायचाच सल्ला मिळणार ! पूर्वी लोक गावठी झाडपाल्याची औषधे घेत बसत, आता शास्त्र प्रगत झाले आहे, वगैरे बोलले जाते – सध्याच्या परिस्थितीत जनतेला कितपत लाभ मिळतो या शास्त्रीय ज्ञानाचा ? ऍलोपथीचे फॅमिली डॉक्टर आता उपलब्धच नसतात, कुठे असल्यास व्हिजिटला येत नाहीत, काही ठिकाणी तर एम डी झालेलेही जनरल दवाखाने घालुन बसतात -- त्यांचा रुबाब वेगळा असतो ! काही पेशंट वयाने वा दुर्धर आजाराने घरीच वारतात – त्यांच्या नातेवाईकांना डॉक्टरांचे सर्टिफिकेट, जे मृत्यूच्या दाखल्यासाठी लागते ते, मिळणे महामुश्किल होते, हे मी पाहिलेले आहे. जणू काही इथली जनता घरोघरी आपल्या आप्तेष्टांचे खूनच करत असते, असेच समजले जाते. एखादी व्यक्ती औषधे, अन्नपाणी वर्ज्य करून इच्छामरणाने मेली तरी त्या व्यक्तीच्या वारसांचा पिच्छा पुरवला जातो ! जगायलाही बंदी आणि मरायलाही बंदी, अशी अवस्था आहे !

सगळ्याच क्षेत्रांत असेच आहे ( कारण माणूस हा एक जातिवंत हलकट प्राणीच आहे ), एक उदाहरण घेऊ – आरोग्य-क्षेत्र. तुम्हीआम्ही बुद्दू नसतो – हे आपल्याला लुटताहेत, आपली गांड मारताहेत, हे सगळे आपल्याला कळत असते. एकूण प्रकारातले आरोग्याचे प्रश्न आणि संबंधित पेशंटबाबतचे आपले भावनिक प्रश्न यांचा जमेल तसा ( खरे तर न जमणारा ) समतोल साधत आपण निर्णय घेत असतो. विशेषतः आरोग्यविमा नसलेल्यांच्या बाबतीत. रोज थैलीभर औषधे ! त्यांच्याच दुकानातून ! अरे च्युत्या, औषधे सोड, नुसते पाणी तरी घेईल का एवढे, हा पेशंट ? एका दिवसात ? असे रोज ? कशासाठी या पेशंटला आयसीयू मध्ये नेण्यात आले ? नीट चौकशी केली तर सगळ्या इस्पितळवाल्यांच्या गांडी फाटतील ! पण, अर्थातच साटेलोटे आहे ! तुम्ही आणि मी सरकारी ऑफिसांतून कामे करतो – तिथे आपण हेच करतो !

मानवी मन हे तत्त्वे , विचारसरण्या, नीती या सर्वांना तुडवून काढणारेच असते ! हे सगळ्यांना नुसते माहीतच नव्हे तर मान्यही असते ! आपल्या आरोग्यव्यवस्थेचे पूर्ण ऑडिट करून यात काही सुधारणा करता येईल का, असा विचारही करण्यात अर्थ वाटत नाही, कारण, आपण सगळेच हलकट आहोत !

MAY 25

हे लोक साम्यवादी विचारांनी समाजात फूट पाडताहेत --
हे लोक हिंदुत्ववादी विचारांनी समाजात फूट पाडताहेत --
हे, जात, भाषा या पायांवर समाजात फूट पाडताहेत --
-- हे असे सगळे होऊ नये, समजा --
-- तर आपल्याला फूट न पाडता आदर्श पद्धतीने
सर्व समाजाचे एकत्रित भले व्हावेसे वाटते ! वा ! फारच छान !
तर अशी एकात्मिक भले करणारी पद्धत कोणती ?
आणि ती कुणी अंगीकारायची ?

I don’t have ambitions or desires.
Being a poet isn’t my ambition,
It’s my way of being alone.
-- PESSOA.

माणूस निर्लज्ज असतो हे सर्वांना मान्य असते -- उदाहरणार्थ, बँकेत कम्युनिस्टप्रणीत युनियनचा सभासद माणूस हा बाहेर संघाचा कार्यकर्ता असतो -- हे मी पाहिलेले आहे ! मी स्वत:ही तत्त्वबित्त्व ढगात फेकून हव्या तशा युनियन्स बदलत आलेलो आहे ! तत्त्वाला धरून वागणारयांचे नेते, अनुयायांची फिकीर न करता भलतीकडेच गेलेलेही पाहिलेले आहेत ! मग, काय प्रोब्लेम आहे ? सर्वांनी याच मार्गाने जायचे, मग जे होईल ते होईल !

MAY 24

करुणा ही आपल्याला चांगल्या वाटणाऱ्या माणसांपुरतीच मर्यादित असते
की

आपल्याला वाईट वा दुष्ट वाटणाऱ्या माणसांचाही तीत समावेश असतो ?

१. एकदोन सीन्समध्ये प्रेक्षकांना कळले पाहिजे की अ हा वाईट माणूस आहे आणि ब हा चांगला माणूस आहे.

२. अभिनेत्याला त्याची भूमिका कळायची काही आवश्यकता नाही.

-- हे मंजुळेजींचे विचार आहेत. ( टीव्ही मुलाखतीत ऐकलेले. )

-- यांवर मते यावीत.

MAY 23

आज चंद्रकांत पाटलांची कवितेबाबतची माझी पोस्ट रिपीट केली, त्यानंतर, जगात इतर कोण काय म्हणून गेले आहेत, ते बघू – हे पाहात असताना खालील महत्त्वाची कोटेशन्स सापडली --

Poetry is an act of peace. – Pablo Neruda

The poet is the priest of the invisible. — Wallace Stevens

Genuine poetry can communicate before it is understood. – T.S. Eliot

Poetry is nearer to vital truth than history. – Leonardo da Vinci

There is not a particle of life which does not bear poetry within it. — Gustave Flaubert

Poetry is not a turning loose of emotion, but an escape from emotion; it is not the expression of personality, but an escape from personality. But, of course, only those who have personality and emotions know what it means to want to escape from these things.
T. S. Eliot

--- ०००---

MAY 22

चंद्रकांत पाटील यांनी सांगितलेली अस्सल कवितेची लक्षणे --

" कविता जगण्यातील सूक्ष्म आणि गुंतागुंतीच्या अनुभवांवर आधारित पाहिजे. तिचा गाभा भावात्मक आणि ज्ञानात्मकही पाहिजे. कविता अतःप्रेरणेतून आली पाहिजे. कवितेने व्यक्तीकडून समष्टीकडे, खाजगीपणातून सार्वजनिकतेकडे, जगण्यातून जीवनाकडे जाताना विचार, चिंतन, आधिभौतिकता, तात्त्विकता यांचा आश्रय घेतला पाहिजे. कवितेने माणूस आणि

अचेतन, माणूस आणि निसर्ग, माणूस आणि जीवसृष्टी, माणूस आणि माणूस यांच्यांतील व्यामिश्र नात्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कवितेने भाषेच्या अतःस्तराचा वेध घेतला पाहिजे. कवितेच्या भाषेने विस्मित केले पाहिजे. कवितेतील शब्द संघटन व रचना अकल्पनीय असली पाहिजे. कवितेतील सूचकतेने आणि संदिग्धतेने वाचकांच्या कल्पनाशक्तीला आवाहन केले पाहिजे. कवितेचा सुरुवातीपासून शेवटपर्यंतचा प्रवास अनुमान करता येण्यासारखा असू नये. " – ' प्रिय रसिक ' – मे २०१४.

MAY 21

कळणे इतके सरळ असून लोकांना
कळत का नाही, हेच त्याला कळत नसे.
तो सदोदित विद्ध आणि कसावीस असे.
अन्यायाबाबत सात्त्विक संताप,
खोटेपणाबाबत जहरी क्रोध,
अज्ञानाबाबत सहानुभूतीयुक्त राग –
असा तो जगे ...
माणसाला खरे तर नीट जगणे
इतके सोपे असताना, का लोक
सगळा असा विचका करतात –
असा त्याला प्रश्न पडे ...
खूप माणसे एक तर मूर्ख किंवा
आपमतलबी असल्याचे भाव
सतत त्याच्या चेहऱ्यावर असत –

त्याच्या स्टॉकमध्ये सगळी उत्तरे असत ...

तरीही -- देशात काय – जगात काय
करोडो लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करत
जगत राहात ...

शेवटी त्याला त्यांची दया येई ...

आता मात्र तो

पुरता थकून

कंटाळला आहे ...

--- ००० ---

MAY 20

काळ्या पैशाची जशी समांतर अर्थव्यवस्था

तसेच

गैरसमजांचे समांतर जग !

शोध लावण्यासाठी वा माझ्या एखाद्या समस्येसाठी

करत नाहीय मी विचार – मी करतोय तो,

विचार किती त्रासदायक आहे यावर.

माझ्या आठवणी सांगतात की ही माझी जुनी सवय आहे

-- बालपण सरल्यानंतर पुढे कधीतरी सुरू झालेली.

बालपणी मला तिखट खूप आवडायचे पण ते तसे का होते,

याचा मला विचार करावासा वाटला नाही.

माझे विचार वाढले कसे, कधी, हेही मला आठवत नाही.

भावनोद्रेकात न सापडता आणखी एक विचार

मला सुचत असे – गुणवत्ता काय माझ्या विचारांची ?

हे विचार मला त्यांच्या लायकीचाच माणूस करणार

हे स्पष्ट होते. तरीही, त्याच विचारांनी मला

माझी लायकी वाढवायचे विचार करणेही भाग पडे.

कधी वाटे, असू दे जे जसे आहे ते तसे – नकोच

अमुक एक नसल्याचा त्रागा करायला – एकूणात

विचार हा एक त्रासच असल्याचे मला अनेकदा वाटे.

विचारांबद्दल विचार न करता त्यांचा फक्त उपयोग
करत राहणेच बरे, असेही अनेकदा माझ्या लक्षात येई.
दुसरा विचार म्हणे – मग, हे तर अंध होऊन जगणे
होईल ! हवेय काय मला, असेही मी मला विचारे.
एकदा तर, उत्तर म्हणून, आपल्याला प्रसिद्ध व्हायचेय,
याच विचाराने माझा ताबा घेतला. फक्त ते घडण्यायोग्य विचार
आपल्या डोक्यात येण्यासाठी काय करायला हवे – हे सुरू झाले.
खरे तर प्रसिद्ध व्यक्तींबद्दल आदर वाटण्याचीच मला
सवय होती. सगळ्यांचे सगळे असे अशा सवयींवरच
चालत असेल तर मरू दे, कशाला बदलत बसायचे ते,
असे म्हणून निपचित पडून राहणेच मग मला बरे वाटे …
--- ००० ---

MAY 19

काल रात्रीपासून पुण्यात जोरदार मस्त वारे !
घरातल्या वस्तू उडताहेत!
बाहेर खूप हलचल !

आपला स्वभाव हळूहळू अधिकाधिक
हेकट आणि घट्ट होत चालला आहे
हे त्याच्या लक्षात येई – आपण त्यामुळे
लोकांपासून दुरावत चाललो आहोत
हेही त्याला कळे –

त्याचे वृद्ध वडील आजारी झाल्यावर --
अशक्तपणाने तोल जाणे, कमी दिसणे,
कमी ऐकू येणे, भास होणे, पडून
जखमा आणि फ्रॅक्चर होणे, अन्न नको

वाटणे, औषधे नको वाटणे, मलमूत्रावर
ताबा न राहणे, माणसे ओळखू न येणे,
कुणाला अचानक काही भलतेच बोलणे,
कधी आवाजच क्षीण होणे – असे हे
हे सगळे त्यांना सर्वांपासून तोडत चालले आहे,
एक अंतर – एक दुरावा निर्माण करत चालले आहे
-- हा हळूहळू येत चाललेला मृत्यूच आहे –
हे त्याच्या लक्षात येत गेले – जणू त्यांच्या
आप्तस्वकीयांना अचानक त्यांच्या मृत्यूचा
धक्का बसू नये यासाठीच हे घडत होते –

हे पाहून -- आपल्या स्वभावामुळे आपलाही असाच
मृत्यूच तर होत चाललेला नाही ? – असा प्रश्न
त्याला निकराने पडला – म्हणजे आपण गेल्यावर
लोक म्हणतील – बरे झाले, सुटला बिचारा एकदाचा
त्या स्वभावातून –

--- ००० ---

MAY 18

ललित साहित्य लेखनातली सगळ्यात अवघड आणि आव्हानात्मक
बाब म्हणजे
बोधप्रद न होता लिहिता येणे.

MAY 17

नकोसा विचार घालवण्याच्या प्रयत्नापेक्षा
नवा विचार सुरू करणे सोपे !

shared a memory.

' ए, आपण चहा घ्यायचा ? ' -- या माझ्या, ' अभिनय ', कल्याण ने सादर केलेल्या, नाटकातला फोटो.

MAY 15

एकाचे वास्तवही दुसऱ्याच्या वास्तवासारखे असू शकत नाही तर एकाची फँटसी कशी काय दुसऱ्याच्या फँटसीसारखी असू शकेल ? साहित्यात वा कलेत या सर्वाला मुक्त वाव असतो.

तिच्या मुलांसह माहेरी आलेली मुलगी परत सासरी जायला निघाली की पूर्वी थोडीफार रडारड करायची पद्धत होती -- हल्ली ती पद्धत लोप पावत चालल्याचे दिसते --

मी जेव्हा अडथळा नाही करत
पक्ष्यांच्या आवाजांना
तेव्हा ते आवाज
माझ्या जखमा बऱ्या करतात --
--- ००० ---

MAY 14

May 13, 2016 12:16pm
किंग लिअर -- राजा लिअर.

' प्रत्यय ', कोल्हापूर या संस्थेने शेक्सपियरचे ' किंग लिअर ' हे नाटक, म्हणजे विंदा करंदिकरांनी अनुवादित केलेले ' राजा लिअर ' हे नाटक, सुमारे वीस वर्षांपूर्वी रंगभूमीवर आणले होते आणि भारतभर गाजवले होते. तेच नाटक आता शेक्सपियरच्या ४०० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांनी पुन्हा एकदा आपल्या समोर आणलेले आहे. या नाटकातली वैचारिक-भावनिक घुसळण, त्यातली कट-कारस्थाने आणि अनेक पात्रांचे भरगच्च जग यांचा डोलारा उभा करणे, हे सोपे काम नाही. तेव्हा आणि आताही डॉ. शरद भुथाडिया यांच्या समर्थ नेतृत्वाखाली ते शक्य झालेले आहे. भुथाडियांचेच दिग्दर्शन असून राजा लिअरची भूमिका त्यांनीच साकारलेली आहे. म्हातारपण, कन्याप्रेम, भ्रमनिरास, वेडेपणा, पश्चात्ताप, राग-संताप, हतबलता आणि प्रचंड शोक -- अशा असंख्य मानसिक अवस्थांतून जाणारी ही भूमिका साकारणे हे एक मोठेच आव्हान

आहे. भुथाडिया, त्यांच्या सखोल अभिनयक्षमतेने हे आव्हान लीलया पेलताना दिसतात ! इतर पात्रांमधून अभिनय करणाऱ्या सर्वच व्यक्तींची आणि तंत्रज्ञांची त्यांना उत्तम साथ मिळतेय.

कालच्या पुण्यातल्या प्रयोगाच्या वेळी ध्वनियंत्रणेचा काही प्रश्न झाला होता, असे समजले. दुसऱ्या अंकात सुधारणा झाली. या नाटकातले संवाद हे या नाटकाचे महत्वाचे वैशिष्ट्य आणि बलस्थान असल्याने, असे काही मुळीच होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी. यातला प्रत्येक शब्द प्रत्येक प्रेक्षकाला सार्थपणे नीट पोचणे अत्यावश्यक आहे. अशा नाटकाची सुरुवातीची घोषणाही अधिक स्पष्ट आणि सशक्त असायला हवी.

या किरकोळ त्रुटी दुरुस्त होतीलच. पण, भारतीय रंगभूमीवर पुन्हा एकदा ' प्रत्यय ' चे किंग लिअर आणि ' किंग लिअर ' चा प्रत्यय हे समीकरण घुमत राहील हे निश्चित ! अशी संधी मिळणे खूप अवघड असते, हे ओळखून कालच्या प्रयोगाला खूप गर्दी होती ! मला विशेष आनंद होण्याचे आणखी एक कारण म्हणजे मी ' प्रत्यय ' या संस्थेचा संस्थापक सभासद आहे ! हा प्रयोग पाहण्याची संधी कुणी चुकवू नये, ही एक दुर्मीळ गोष्ट आहे, हेच शेवटी सांगेन.

माझे जुने मित्र आणि इथलेही अनेकांचे मित्र

नाटककार प्रेमानंद गज्वी -- Premanand Gajvee

यांना, त्यांच्या विपुल लेखनाबद्दल,
महाराष्ट्र साहित्य परिषदेचा यंदाचा जीवन-गौरव पुरस्कार
जाहीर झालेला आहे !

त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

आज आमच्या ' प्रत्यय ', कोल्हापूरचे

किंग लिअर

रात्री ९-००, बालगंधर्व, पुणे
पाहायला जाणार आहे.

या आपल्या खोलीत अनेकांचे येणेजाणे
कुठे आहे खाजगीपणा ? भांडणेही चालतात
कुणाच्या मृत्यूचे दुःखही चालते, कधी कुणाला
आपणच उपरे वाटतो, कुणी हसतात आपसात
सगळेच आपल्याला नगण्य करतात
तरीही आपण प्रेमात असतो

इस्पितळातले वास असतात, माणसे
एकमेकांना दिलासे देतात, उसासे, सुस्कारे
टाकत हवालदिल होतात, नोंदी करतात
नंबर काढतात, कागद घेऊन बाकावर
तासंतास बसून असतात, तारवटतात
तरीही, हे कविते, आपण प्रेमात असतो

काही वेडे चवताळून आपल्यावरच
येतात धावून, जखमा करतात, अस्वस्थतेच्या
बोगद्यातून जातोच आपण, खुनांची नसते
काळजी, मरणाचे नसते भय, वियोग नको
एवढेच असते, हात आपले हातात असतात
असे आपण सतत, अविरत, अखंड प्रेमात असतो –
--- ००० ---

MAY 11

मेंदूवरचे सुखक्षेत्र समजा
पाच चौरस इंचांचे --
त्यात या क्षणी पाच सुखवाहिन्या चालु --

संबंधित पेशी, रसायने मिळून
तयार झालेला एक सुखमूड
ज्यात मेंदू खुश !
हे पूर्ण आपले कर्तृत्व थोडेच आहे
मेंदू विचारात पडतो –
त्या सुखवाहिन्या समजा व्यक्ती आहेत --
त्यांना या मेंदूत सुखसंवेदना द्याव्यात
असे वाटायला त्या व्यक्ती कशा घडल्या
हे समजायला हवे --
शिवाय या काळात त्यांनी अविक्षेप असणे
हेही महत्त्वाचेच आहे –
त्यांच्या पेशी, रसायने अमुक एक
अशी का वागली असतील
तेही पाहायला हवे –
कर्तृत्व निश्चित करायला ते लागणारच !
त्यांची वाढ, त्यांच्यावरचे प्रभाव
हे सगळे लागेल !
म्हणजे विश्व सुरूच कसे झाले
इथे ते पोचणार ! विश्व सुरू झाले
असेल तर आधी काहीच नसायला हवे --
काहीही नसण्यातून काहीतरी कसे येईल --
म्हणजे असणार काहीतरी – तसे
असल्यास ती सुरुवात नाही ठरत !
-- हे पाहून मेंदू कर्तृत्वाचा विचार सोडून
आहे ते सुख उपभोगायचे ठरवतो –
--- ००० ---

आज माझा वाढदिवस होता.

शुभेच्छांचा पाऊसच पडला.

खूप जणांशी थेट संपर्क झाला !

काहींना मी माझे आभार व्यक्तिशः कळवू शकलो असलो

तरीही, अनेकांना ते कळवायचे राहिलेले आहे.

सर्व फ्रेंडसच्या शुभेच्छांबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

या निमित्ताने माझ्याही सर्व फ्रेंडसना भरपूर शुभेच्छा !

MAY 10

अशी कशी आली ही अचानक

काहीच नसण्यातून ? की प्रगटच झाली ?

मी विचारात असताना ती मला पेन्सिल देते.

काय करू ? मी विचारतो.

चित्र काढ, कविता लिही – तुझी मर्जी --

ती म्हणते. टोचावीशी वाटतेय तुला --

मी म्हणतो. ती हसते. तुझी मर्जी, म्हणते.

असलीस तर रक्त येईल, मी म्हणतो.

ती काही म्हणत नाही.

मी लिहू जातो माझे नाव

तिच्या मनावर तर ती सापडतच नाही.

मी व्याकूळ होतो.

काय हवेय ते माहीत असल्यासारखा

सैरभैर होतो.

तिला फिकीरच नसावी

असे समजत असतानाच समजते --

ती तर आहे माझ्या मनातच

माझ्या नावामागचे

काहीच नसणे असलेली --

आता मात्र

मला हसू येते.

माझे ओठ उद्युक्त होतात --

--- ००० ---

MAY 9

एखाद्या विषयात आपण मुळीच तज्ञ वा अभ्यासू नसल्याने आपल्याला काही प्रश्न पडत असतात. तसाच एक प्रश्न विचारतोय.

‘ बहुजनसमाज ’ या शब्दाच्या अर्थात अल्पसंख्याक समाज येतो की नाही ? हिंदूंमध्ये ब्राम्हण सोडून बाकीचा सगळा बहुजनसमाज असतो का ? तसे असेल तर भारतात बहुजनसमाज एक तर ९७ टक्के आहे किंवा ७५ टक्के आहे. ९७ टक्के असेल तर सारखा तो शब्द इतका वापरात ठेवायची गरज नाही. आणि ७५ टक्के असेल तर उरलेल्या २५ टक्क्यांपुढे असे सारखे शक्तिप्रदर्शन करणे कितपत योग्य आहे ? शेवटी आपण इथे एकत्र जगणार आहोत, हेच महत्वाचे नाही का ? -- हे सगळे सोडून देऊनही, ‘ बहुजनसमाज ’ या शब्दाचा नेमका अर्थ सांगितला तरी बरे होईल.

भ्रष्टाचारविरोधी जनशक्ती संघ – हे नाव कसे वाटतेय ? तर अ हा याच्या सरचिटणीसपदी निवडून आला. त्या पदाचे महत्त्व त्याच्या लक्षात आले. तो त्याचा गैरवापर करून, निरनिराळे ठेकेदार, रस्तेदुरुस्तीवाले, केबल्स टाकणारे यांना, त्यांचा भ्रष्टाचार बाहेर काढण्याच्या धमक्या देऊन, त्यांच्याकडून पैसे मिळवू लागला. ब हा त्याचा मित्र. ब ने त्याला एका मोठ्या जमीनव्यवहाराची माहिती दिली आणि तिथून बरेच घबाड मिळेल, हे सांगितले. त्याप्रमाणे, अर्थातच, अ ने कारवाई आणि कार्यवाही करून मिळवायचे ते मिळवले. पण, पाठपुरावा करूनही तो ब चा हिस्सा त्याला देत नव्हता. त्यावरून त्यांचे भांडण झाले. त्याचे पर्यवसान शेवटी ब कडून अ चा खून होण्यात झाले ! ( आजच्या पुणे मटामधली पान ४ वरील बातमी. ) यावरून एक दिसतेय – संपत्तीचे विकेंद्रीकरण होईल तेव्हा होवो, पण, भ्रष्टाचाराचे विकेंद्रीकरण करण्याचे प्रयत्न तरी नक्कीच चालु आहेत !

MAY 8

आमच्याच सोसायटीत एक नॉन-व्हेज हॉटेल आहे. मी तिकडे गेलो नव्हतो. पूर्वी इथल्या छोट्या हॉटेलांचा अनुभव होता. ते साले रबरासारखे जून चिकन देत. इथे दर्जा चांगला आहे, असे कळल्याने गेलो. आधीच सांगितले -- मी इथेच राहतो, चांगले असले तरच पुन्हा येईन. मालक निश्चिंत होता -- बघा, म्हणाला. खरेच, दर्जा चांगला होता. मधेच, त्याने मला एक स्पेशल लेग-पीस पाठवला ! एकूण मस्तच झाले ! निघताना आनंद व्यक्त केला, तर तो खूपच खुश झाला ! आपला चेहराच तर तज्ञ आणि प्रभावी दिसत नसेल ? साहित्याच्या क्षेत्रात काहींचा तसा गैरसमज होऊ शकतो, हे समजण्यासारखे आहे – पण, बाहेरही ? आपण खरे आहोत की सगळीकडेच फसवाफसवी करतोय – असा विचार मनात आला. फसवत नाहीय – खरेच सांगतोय --

एखादी भूमिका व्यक्त करणारी कलाकृती उपयुक्त असू शकते पण अभिजात असू शकत नाही कारण ती एका बौद्धिक साच्यात बद्ध असते. तिला सांस्कृतिक जगणे नसते. सांस्कृतिक जगणे म्हणजे मनाच्या रचनेचे, कृतींचे आणि मानवी संबंधांचे भान घेत जाण्याची प्रक्रिया. ती प्रक्रिया उपयुक्त नसली तरी मौल्यवान असते म्हणजेच अभिजात असते. ( निष्कर्षापासून सुुरू होणारी कला आणि निष्कर्षच नसलेली कला -- असा हा फरक आहे. )

MAY 7

कधीकधी माझ्या विचारासाठी काढलेले मुद्देच मी इथे फ्रेंडसच्या विचारासाठीही देतो – तसेच हे --

१ विवाहानंतर पतिपत्नींनी एकनिष्ठेने संसार करून, जन्माला घातलेल्या मुलांना भारताचे उत्तम नागरीक बनवावे.
२ कोणतीही विषमता त्याज्य समजावी, स्वतःच्या वा दुसऱ्याच्या वागण्यातून विषमतेला बढावा मिळू देऊ नये.
३ जिंकण्यासाठी नैतिक मार्गांनीच प्रयत्न करावेत.
४ भ्रष्टाचार करू नये, करणाऱ्यांना शिक्षा होईल, हे पाहावे.
५ व्यक्तिगत संबंधांत न्याय असणे अवघड असले तरी सामाजिक न्यायासाठी सतत कार्यरत राहावे.
६ आपला अहंकार वा फायदा यांसाठी कुणाला नष्ट करणे वा तसे प्रयत्न करणे हे वाईट समजून ते टाळावे.
७ जातीभेद, गरीब-श्रीमंत भेद, कामामुळे वा प्रसिद्धीमुळे येणारे भेद, सत्तेमुळे मिळणारे श्रेष्ठत्व हे त्याज्य समजावे.
८ सशक्ताने अशक्तावर कुरघोडी करून त्याच्यावर अन्याय करू नये.
९ एकमेकांसाठी त्याग करत समाजजीवन समृद्ध करावे.
१० समता म्हणजेच नैतिकता, न्याय आणि स्वातंत्र्य या समजुतीतूनच जगणे होत राहावे.

-- अशी समजा आणखी ८-१० कलमे येऊ शकतील. यातले अमुक पटत नाही किंवा ते चुकीचे आहे, असे कुणीच म्हणणार नाही. तरीही, मानवी जगणे मात्र मुळीच या कलमांप्रमाणे चाललेले नाही, हे स्पष्ट दिसते.

-- यांतल्या एका वा अनेक कलमांना उजाळा देण्यासाठी, त्या बाबतीत डोळे उघडावेत म्हणून वा डोळ्यांत अंजन घालण्यासाठीच कलेची निर्मिती व्हायला हवी, असा आग्रह धरणे कितपत योग्य आहे ? यांतल्या कोणत्याच कलमाप्रमाणे जगणे का घडत नाही, बोलणे व वागणे यांत द्वंद्व का आहे -- असेही विषय असू शकत नाहीत ? किंवा आणखीही वेगळ्या आकलनातून दिसणारे काही ?

कोणत्याही बौद्धिक कलमाचा झेंडा उंचावण्यासाठी कलानिर्मिती करायची झाल्यास तिला ढोबळपणा येतो -- मानवी जगण्यातली गुंतागुंत दुर्लक्षावी लागते -- पात्रनिर्मिती ही नायक-खलनायक, चांगला-वाईट, सहानुभूतियोग्य-हेटाळण्यायोग्य – अशी कृष्णधवल होते. थोडक्यात, ती कलाकृती सपाट आणि खुजी होते.

जगण्याच्या आकलनाची प्रक्रिया – हे कलेचे मूल्य मानल्यास त्या मूल्याचा अशा कलाकृतीत अभाव असतो.

MAY 6

एखाद्या कलाकृतीतले अनुभवद्रव्य धारावीच्या झोपडपट्टीतले आहे की कारकुनाच्या जीवनातले आहे की वैमानिकाच्या वा एखाद्या उद्योगपतीच्या जीवनातले आहे की शेक्सपियरवाले जुन्या ऐतिहासिक राजेरजवाड्यांचे आहे की पौराणिक आहे यावर त्या कलाकृतीचे श्रेष्ठत्व अवलंबून नसते.

MAY 5

उन्हाचा कडाका ही तर ओळखच आपली
पाऊस आला मधेच की घ्यावे वाहून
मधेच येणारा हा सुखवर्षाव
करेल आपली ओळख सुसह्य –
--- ००० ---

प्रेम समजा नैसर्गिक असते -- मग, प्रतिष्ठेच्या कल्पना अनैसर्गिक असतात का ? -- प्रेम आणि प्रतिष्ठा दोन्ही सुखासाठीच असतात ना ? प्रेमी युगुल आणि प्रतिष्ठावाले पालक यांत न्यायाची बाजू कशी ठरवावी ?

MAY 4

सैराट

' सैराट ' पाहिला. काहीजण असे म्हणाले की याला जातवास्तवावरचा चित्रपट म्हणून पाहू नका – एक चांगला व्यावसायिक चित्रपट म्हणून पाहा. मला वाटते, हा एक जातवास्तवावरचा चांगला व्यावसायिक चित्रपट आहे. " हाही एक पाटीलच आहे " असे वाक्य झाल्यावर, " असू दे की – पाटलाला तहान नाही लागत का ? " अशा येणाऱ्या वाक्यातून ते वास्तव अधोरेखित होते.

पण, व्यावसायिक चित्रपट करायचा असल्याने, त्या जातवास्तवाची दाहकता सारखी जाणवत राहू नये, याची काळजी घेण्यात आलेली आहे. ते प्रेमिक पळून जाऊन दुसऱ्या गावातल्या झोपडपट्टीतले अत्यंत हालअपेष्टांचे जीवन जगत असतानाही मधे मधे त्यांच्या हसण्याचे, मजा घेण्याचे तुकडे आहेत. पतिपत्नीतल्या संशय-प्रश्नाचे तुकडेही आहेत.

हुशार, तडफदार, देखणा नायक आणि सुंदर नायिका यांच्यांतल्या आकर्षणाची -- प्रेमाची ही कथा आहे. नायक खालच्या जातीतला आणि नायिका समजा पाटील म्हणजे मराठा जातीतली समजू. राजकीय ताकद, हिंसक गुंडगिरीची ताकद हे नायिकेच्या वडिलांकडे आहे. स्टोरीतला पीळ म्हणजे अर्थातच त्यांचा या प्रेमाला विरोध असणे. प्रेमाची सुरुवातीची प्रक्रिया मजेत, छान चालते, पण, नायिकेच्या वडिलांना कळल्यावर प्रश्न सुरू होतात. सुशिक्षित-अशिक्षित, श्रीमंत-गरीब, भाषाभेदाचे वा धर्मभेदाचे प्रश्न, अशा सर्व शक्यतांचा विचार केला तर जातिभेदाचा प्रश्न घेणे कमी उपद्रवकारक आणि जास्त सनसनाटी होऊ शकते, हे आहेच.

हा नायक काही २०-२० जणांना लोळवणारा नाहीय. तरीही, त्याच्यावर संकटे तर येणारच. उदाहरणार्थ दोनदा त्याला आणि त्याच्या मित्रांना बेदम मारले जाते. अगदी ' नटसम्राट ' मध्ये पुलाखाली राहणाऱ्यांना लाथा-बुक्या-लाठ्यांनी पोलीस मारहाण करतात, तसेच आवाज येतात. पण, तिथल्यासारखेच, इथेही कुणाला फारसे काही लागत नाही. कुणाचा हातपाय मोडला तर इस्पितळात नेणार कोण, पैशांचे काय, आणि हे करू तरी दिले जाईल का, शिवाय अनावश्यक फाटे फुटतील -- त्यापेक्षा, इतका मार खाऊनही ते सगळे, चालु, पळू शकतात. तसेच परगावात असताना काहीजण वाईट उद्देशाने त्यांना एका बाजूला नेतात -- तिथे मारामारी सुरू होताच संतोषी मातेप्रमाणे एक दयाळू पण कडक भवानी बाई येऊन त्यांना

वाचवते. संकटे तर यावीत पण फारशी इजा न होता त्यांनी त्यांतून सहीसलामत बाहेर पडावे, अशी योजना दिसते. अशा प्रकारच्या हिंदी सिनेमात हल्ले जरा अधिक आणि अधिक हिंसक होत असतात आणि नायक-नायिका त्यांतून पार होत राहतात. ते इथे शक्य नाही – इथे ते परिस्थितीशी झगडत, तिला तोंड देत राहतात.

शेवट कसा करायचा आणि तो कसा परिणामकारक करायचा हे ठरलेले असल्याने – एक इकडचे दृश्य, एक तिकडचे दृश्य असे घेतलेले नाही. तो सूडाग्नी वा क्रोधाग्नी धगधगतच होता हे शेवटी कळणारच आहे. ते दाखवत राहिल्यास अपेक्षित धक्का बसणार नाही, हा विचार दिसतो. योग्य वेळी शेजारीण मुलाला घेऊन जाते आणि सर्व झाल्यावर आणून सोडताना, लांबूनच, जा आता घरी, म्हणते. वास्तवाच्या अंगाने चालल्यासारखा वाटणारा चित्रपट एकदम प्रतीकात्मक होतो. मुलगा निर्मनुष्य जगात बाहेर येणे आणि त्याच्या पावलांचे ते रक्त-ठसे. निष्पापांच्या हानीचे वाईट वाटणे, अरेरे वाटणे, कीव वाटणे, माणूस किती क्रूर असतो, असे वाटणे, असे कधीच कुणी वागू नये, असे वाटणे -- असे सगळे यातून घडू शकते.

उत्तम दृश्ये, संगीताचा दणका, नाच -- हे सगळे आहेच. चित्रपट तसा घटनात्मकच आहे – प्रश्नाच्या गांभीर्याच्या जास्त खोलात तो जात नाही. जातवास्तव वाईट, प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना वाईट, हिंसा वाईट -- हे एरवीही पटू शकणारे पुन्हा एकदा पटते. हा एक चांगला व्यावसायिक चित्रपट आहे, पण, व्यावसायिक होण्याच्या हव्यासामुळेच तो फार ग्रेट वगैरे काही होऊ शकलेला नाही. “ हे बघा कसे वाईट आहे “ असे म्हटले जाणे आणि आवश्यक त्या गांभीर्याने त्या ‘ वाईटा ‘ बाबतची सखोल चिंतनात्मकता व्यक्त होणे, यांत फरक असणारच. तशा सखोलतेचा इथे अभाव आहे.

हा चित्रपट पाहून आपण एक चांगला व्यावसायिक -- करमणूकप्रधान चित्रपट पाहिल्याचे समाधान नक्कीच मिळते.

--- ००० ---

MAY 3

बुरा जो देखन मै चला
बुरा न मिलिया कोय
जो दिल खोजा आपना
मुझसे बुरा न कोय

-- कबीर.

Neuro Linguistic Progamming -- हा एक प्रकार ढोबळपणे मला माहीत झालाय. मी जमवलेल्या माहितीवरून मला जे समजले, त्यावरून बोलतोय. मुलांना अनेकदा सांगितले जाते की मोठ्या माणसांची चरित्रे वाचा आणि ते सगळे आदर्श समजून स्वतःला घडवा. NLP हा त्याच्या पुढचा प्रकार आहे. जगाच्या बाजारात यशस्वी झालेल्या व्यक्तींचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढले गेलेले आहेत. त्या व्यक्तींचे स्वभाव, भाषा, संपर्कपद्धती यांबद्दल काही सत्ये समजा सापडलेली आहेत. भाषा आणि विशेषतः विचारपद्धती ही सरावाने त्या यशस्वी लोकांप्रमाणे घडवता येते, असे यांचे गृहीत आहे. नाही तरी जगात यशस्वी होण्यासाठी माणूस इंजिनियर होतो वा डॉक्टर वा आणखी कुणी होतो, तसेच हे का समजू नये, असा प्रश्न आहे. एन एल पी हे एक लोकप्रिय होत चाललेले प्रकरण आहे. मला वाटते यात शारीरिक, मानसिक, जनुकीय अवस्थांच्या कुवतीचा प्रश्न येईलच. तरीही, असे सराव आणि संमोहन या मार्गाने यशस्वी होण्याची कास धरणे कितपत श्रेयस्कर असेल ? तज्ञांनी व फ्रेंडसनी मते सांगावीत --

MAY 1

साळुंखीच्या आवाजाचा अडथळा नको म्हणून
त्याला अटकाव केला – उकाडा फार वाटला तरच
सूर्याची दखल घ्यावी, असे ठरवले
साहेबाचा त्रास, सहकाऱ्यांतली गटबाजी,
पत्नीची सहलीसाठी चाललेली भुणभुण
असे खूप होते अग्रक्रमाचे
शिवाय एका मित्राची आई गेली होती
त्याला भेटायला जायलाच हवे होते
बुद्धी सशक्त ठेवण्यासाठी
प्रोटीन्सचा खुराक चालुच होता
-- कंट्रोलमध्ये होते सगळे –
--- ००० ---

माझ्या नातवाने ( मुलीचा मुलगा ) मराठीत पाडलेली एका शब्दाची भर --
' पोटजबरी '
उदाहरणार्थ -- माझे पोटजबरी खाणे झालेय -- आता मला काहीही नकोय --

भिंतींचे रंग ठरवताना
उजेड, परावर्तन, आवड आणि अपेक्षित मूड
यांचा विचार झाला --
संबंधितांत खूप चर्चा झाली, मतभेद झाले,
वाद झाले, म्हटले तर भांडणेही झाली –
-- एकत्र तर राहायचे आहेच हे समजून
शेवटी सगळेजण तडजोडींकडे झुकत गेले --
सर्वांनीच थोडी थोडी आपापली मते मुरडून
निर्णयाच्या दिशेने प्रगती केली --
-- शेवटी निवडले गेलेले रंग
आधी कुणीच सुचवलेले नव्हते, तरीही
सगळ्यांच्या सहभागाने अंतिम निवड झाली --
-- अर्धवट समाधानाने सगळ्यांनीच
ते नवीन रंग स्वीकारले –
-- समाधान म्हणजे -- हक्क आणि न्याय
यांचा मान राखला गेला –
--- ००० ---

shared Lalit Prabhakar's post.
'आज रात्री ८:३० वाजता
गडकरी रंगायतन, ठाणे

ढोलताशे

भेटूया मग'
आज रात्री ८:३० वाजता
गडकरी रंगायतन, ठाणे

ढोलताशे

भेटूया मग

APRIL 30

आज पुण्यात प्रथमच सकाळी पेपर्स टाकणारी मुलगी पाहिली !

आक्टिव्हावर पायांशी पेपर्सचा मोठा गठ्ठा घेऊन पेपर्स टाकत चालली होती !

ते अर्थातच धोक्याचे होते -- अशी गाडी चालवणे --

पण, मुलेही तेच करतात !

चला, धोक्यात तरी, विनाचळवळ समानता आहे !

April 2016

APRIL 30

ठाम राहा तुम्ही

समुद्र लांब आहे इथून

मतांचा नको त्रास

हे मांजर ठेवा जवळ

साधकबाधक सगळे झालेय

आता झोपाळे नकोत

अहो, खात्री प्रत्येकालाच असते

घ्या थोडे खाऊन घ्या

उद्या म्हणाल खूनच करू

ती पडली बघा चांदणी

पाचपन्नास वर्षांचा तर प्रश्न

आज घाला गळ्यात चेन

आत्मविश्वास शाबूत ठेवायचा

कुंपण दुरुस्त करून घ्या

समविचारी लोकांत राहा

सिंथेसायझर शिका

सगळे असेच जगतात

ही घ्या फुलदाणी

निवांत राहा निश्चिंत राहा

--- ००० ---

APRIL 29

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली.

शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली.

शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.

माझी कविता वस्तूंची
वजने, मापे वा द्रव्ये नाही जोखत
ती त्यांना असू देते
मीही कवितेला असू देतो
तिच्यात माझ्या भावना मिसळून
मी तिच्याशी प्रतारणा नाही करत
माझा वस्तूंना वा कवितेला नकार नसतो
त्यांचे असणे खरे तर माझ्यावर अवलंबूनही नसते
परस्पर असणारे ते वास्तव सवयीतले नसते
त्याला प्रगट होण्याला मी फक्त वाव देतो
कविता वा वस्तू यांना मी पूर्ण स्वातंत्र्य दिलेले असते
इतके की जणू नाहीच काही अस्तित्वात
माझी कविता माझ्या भूतकाळाने,
माझ्या प्रतिक्रियांनी वा माझ्या चारित्र्याने
डागाळलेली नसते, मी फक्त तिला
जरा नटवतो, जरा धारदार करतो
जरा उठाव आणून तिला तिच्याकडे
तुमचे लक्ष जावे असे प्रयत्न करतो, पण,
तुम्हाला आवडणारा हळवेपणा न मिसळता
जगण्याचा अर्थ सांगण्याचा आव न आणता
तुमच्या व्यक्तिमत्वात बदल करण्याचा

हेतू न ठेवता, तुम्हाला कलेचे शौकीन आणि जाणकार

बनण्याच्या मोहात न पाडता

सकृद्दर्शनी तुम्ही फसाल, तिला रुक्ष म्हणाल

जरा तिला वाव द्या, तिला आहे तशी असू द्या

मग बघा कशी ती द्रवरूप होऊन नदीसारखी

वाहू लागते ते, जे आहे ते सगळेच वितळवून

असण्यानसण्याचे बांध तोडून फुसांडत जाते ते

--- ००० ---

APRIL 28

shared Lalit Prabhakar's post.

'Borivali 4:30 vajta

Prabodhankar thakre rangamandir

Dholtashe'

Borivali 4:30 vajta

Prabodhankar thakre rangamandir

Dholtashe

wrote on Prabhakar Bhatlekar's Timeline.

खूप शुभेच्छा !

श्वासाबरोबर तो आत घेतो समुद्र, अरण्ये,

अंधार, रक्त, प्रेम आणि संताप – तो

उच्छ्वास क्वचितच टाकतो –

किनारे सोडायला तो खूप घाबरतो –

सगळेच वस्तीला राहिल्याने

काही सुखाचे असले तरी

काही सडतही असते, काही

जखमा दुखत असतात
मनाच्या हिरड्या सुजून
घाण वास येत राहिल्याने काही
माणसे दुरावलीही जातात –
जाहिरातीत तो तजेलदार, सुगंधी
असतो आकर्षक, मनकवडा, लंपट
-- खूप जागा असते त्याच्यात –
उच्छ्वासाचा एखादाच सेक्सी क्षण
सतत टिकावा वा वारंवार यावा
असे त्याला वाटते – तरीही
अनुभवसमृद्धतेमुळे तो
संयमी आणि सुखी
असण्याची अवस्था निरलसपणे
टिकवत राहतो –
--- ००० ---

स्त्री-पुरुष संबंधांत स्वामित्व भावनेचा अडसर काढला तर एकनिष्ठेची गरज संपेल का ?

फक्त एकाच व्यक्तीशी बांधील नसलेले पण तसे असल्याचे भासवले गेलेले स्त्री-पुरुष प्रेम ( म्हणजे आकर्षण वा आसक्ती ) ही फसवणूकच असते का ?

आकलने वेगवेगळीच असणार -- म्हणूनच हा प्रश्न घ्यायला हवा समोर --
प्रेमात वा नात्यात एकनिष्ठ असणे म्हणजे काय ?

shared Bhadrakali Productions's photo.
'"ढोलताशे" #नाटक #मराठी
शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली.
शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.
रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली.

शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.

काही इस्पितळांच्या परिसरात

काही तीव्र धार्मिक भोंगे

अंगे फेकत नाचणारे –

रुग्ण तरी जगतील

किंवा हे तरी --

जगायचेय सर्वांनाच –

--- ००० ---

APRIL 27

एखाद्याला घरातल्या लोकांवर सारखेच चिडावे लागत असल्याने त्याच्या बोलण्यात कायमचाच एक चिडखोर टोन स्थिर होत जातो ! बाहेरचे त्याला ओळखणारे समजून घेतात. " त्यांची बोलायची पद्धतच अशी आहे, पण माणूस मनाने खूप चांगला आहे ! " -- असे म्हणतात.

पण, मनाची सततची चिडखोर अवस्था नॉर्मल असू शकते ?

ती अवस्था धारण करणाऱ्याला तिचा त्रास होत नसेल ?

त्या देशातल्या लोकांनी या देशातल्या लोकांना लाच दिल्याचे त्या देशात सिद्ध झालेय म्हणून या देशातल्या लोकांना पकडण्यापेक्षा -- या देशात त्या व्यवहारात कुणी लाच घेतल्याचे सिद्ध झालेले नसल्याने त्या देशातल्या लोकांना सोडून देणे, हेच न्यायाचे नाही का होणार ?

APRIL 26

अनुकविता

प्रगल्भ आणि विदग्ध व्यक्तिमत्व म्हटले की माझ्या डोळ्यांसमोर दोन व्यक्ती हमखास येतात – एक, ६०-७० च्या काळात मुंबई विद्यापीठात इंग्रजीचे नंबर वन प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध असलेले प्रा. बॅनर्जी आणि आपले आदरणीय त्र्यं. वि. सरदेशमुख. माझा काही संबंध नसताना प्रा. बॅनर्जींचा एक तास मी गुपचुप अटेंड केला होता. सरदेशमुख सरांची आणि माझी तीनदा भेट झाली होती. या दोन्ही व्यक्तींच्या असण्यात आणि त्यांच्या भोवती एका गहनगूढ चिंतनशीलतेचे वलय जाणवत असे. वागणे, बोलणे सहज, साधे असे. हा विषय निघायचे कारण म्हणजे आशय परिवारचा २३ एप्रिल २०१६ चा अनुकविता विशेषांक. हा अंक ग्रंथदिन अंक म्हणून काढलेला असून नितीन वैद्य, पुरुषोत्तम नगरकर आणि जयंत राळेरासकर यांनी संपादित केलेला आहे. यात सरदेशमुख सरांनी इंग्रजीतून मराठीत अनुवादित केलेल्या अनेक कवींच्या बऱ्याच कविता देण्यात आलेल्या आहेत. अंकाचे सादरीकरण दर्जेदार असून मुद्रित शोधनाकडेही नीट लक्ष दिलेले आहे. ‘ प्रदेश साकल्याचा ' लिहिणाऱ्या सरदेशमुख सरांचे असलेले असे हे काम या अंकात आहे. अंकाच्या शेवटी सरांच्या कवितांची सूचीही देण्यात आलेली आहे.

या सर्व कविता महान कविता म्हणून निवडलेल्या आहेत, असे वाटत नाही. पण, वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव-वैभव जाणवल्याने त्या निवडलेल्या असणार. कवितांच्या मराठी रूपांत, भाषावैभवात सहज पोहणे जाणवते. यांतल्या मला आवडलेल्या कविता – ‘ मजल दरमजल ‘ आणि ‘ तुझ्याविना ‘ ( हरमान हेसे ), तसेच ‘ निरोप ‘ ( वॉल्टर डि ला मेयर ) या आहेत. अनुवादित कवितांमधल्या काही विशेष ओळी --

पण माझ्या परित्यक्त एकलेपणाला
माझ्याच वैराण स्वप्नांनी तडे जातात ( पृ १ )

म्हणून सख्या
तुझ्या ठायी तू, माझ्या ठायी मी
असेच भेटत राहू या :

मधला दरवाजा
उघडा असू दे. ( पृ ४)

माझ्या आतली हाक वेगळीच होती

त्याच्यातल्या हाकेइतकीच सत्य आणि निर्मळ
मला प्रश्न पडतो
दोन्ही हाकांचा उगम एकच असेल काय ? ( पृ ७ )

ज्या वस्तुमात्राची गुणप्रशंसा
करीत आलास
त्या वस्तुवैभवानं आपलं सौंदर्यसर्वस्व,
त्यावर प्रेम करणाऱ्या,
एकेका जिवंत असणाऱ्या भावसंपन्नाकडून
घेतलेलं असतं हे लक्षात ठेव. ( पृ २७ )

नितीन वैद्यांनी ‘ संवादा ‘ त म्हटले आहे – अनुवाद ( गद्य वा पद्य ) त्यांना शब्दशः अपेक्षित नव्हता … मुळात खोल अर्थाने पाहता सर्व लिखित वाङ्मय हे मनःस्तरावरील भासरचनांचे शब्दरूप असते, त्यामुळे अनुवाद कसा असावा-नसावा याविषयी ठोस काही बोलणे वाया जाते. एका जीवाने दिलेल्या उद्गाराचा कोण्या दुसऱ्याने तिसऱ्यापर्यंत पोचवलेला तो निरोप असतो, असे त्यांनी म्हटले आहे.

एका प्रगल्भ मनाच्या शब्द-क्रीडा म्हणून या अनुकविता जरूर वाचाव्यात अशा आहेत.

जे जे घडते त्या त्या कशावरच
कुणाचेच नसते पूर्ण नियंत्रण
या अर्थाने सगळेच निरर्थक
जे जे घटना म्हणून जमा होते
स्मृतीत – सर्वच घटना ओझी बनणाऱ्या
नाकारायच्या असतील तर जन्मापासून
घडलेले सर्वच – राहील फक्त स्मृती होऊन
घटना न राहता – जिथे स्मृतीची घटना घडते
ते तसे मनच नसेल –
प्रेम, हिंसा, अपघातांची थारोळी

समारंभ, आतषबाजी, भाषणे आणि कविता

सगळेच विलीन होईल

घटनाहीनतेत –

--- ००० ---

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली

शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार  १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

शुक्रवार २९ एप्रिल दुपारी ४:३० वा. प्रबोधनकार बोरीवली

शनिवार ३० एप्रिल दुपारी ४:३० वा. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी.

रविवार १ मे रात्री ८:३० वा. गडकरी, ठाणे.

संगीतकार शंकर-जयकिशन या जोडगोळीतल्या शंकर यांची आज पुण्यतिथी. हिंदी चित्रपट संगीत हा भारतातला एक अमूल्य सांस्कृतिक खजिना आहे. संगीताबाबत शेक्सपियरने तर गौरवोद्गार काढलेलेच आहेत, शिवाय, शास्त्रानेही हे सिद्ध केलेले आहे की मानवी मेंदूतली अनेक केंद्रे तजेलदार ठेवण्याचे काम संगीत करते. हिंदी सिनेसंगीतात सम्राट म्हणावे असे अनेकजण होऊन गेले -- एकेका वेळी अनेक सम्राट आणि सम्राज्ञी, असेही घडून गेले ! त्यांतले हे शंकर-जयकिशन ! अनेक वर्षे पूर्ण भारताला सर्जक वेडात गुंतवून ठेवणारे महान संगीतकार ! माझ्या स्वत:च्या जगण्याचाही बराच भाग या लोकांनी व्यापलेला आहे याबद्दल मी कृतद्न्य आहे !

' बिनाका गीतमाला ' ऐकणे हे तर माझ्यासारख्या अनेकांचे धर्मकर्तव्यच झालेले होते !

' आये बहार बनके लुभा कर चले गये ' ( महंमद रफी – राजहठ ) असे म्हणून

शंकर यांच्या स्मृतीस अभिवादन !

आपापल्या पद्धतीने आपापल्या व्यक्तिमत्वाला

व्यग्र ठेवण्याचाच फक्त प्रश्न ?

APRIL 24

विचारांची लढाई विचारांनी लढायला हवी -- म्हणजे काय, लोकशाहीत ?

-- लोकांनी सगळ्या विचारांचा दिवसरात्र अभ्यास करून निर्णय घेणे ?

-- मग, पैसा, मिंधे करणे, दहशत आणि धुवांधार प्रचार -- यांचे काय ?

APRIL 22

आकाश असणे, त्यात

चंद्र-सूर्य-तारे-पृथ्वी असणे

असणे माझे मनही साश्चर्य

दैनंदिन व्याप-संताप-आनंदयुक्त

-- माझ्या मनासाठी हे सगळे ?

निव्वळ वेडेपणा ! – कदाचित

माझे मन स्वतःला या

सगळ्यातून वेगळे

समजत असल्याने असे होत

असेल

मनही त्या सगळ्याचा भागच

असे झाले तर काहीच नाहीय

असे तर होणार

नसेल ?

--- ००० ---

The emotion of art is impersonal. It has its life in the poem and not in the history of poets. So, honest criticism and sensitive appreciation is directed not upon the poet but upon the poetry. The biography of the poet is not to be studied; the structure of the poem and its evocation powers are important. ( -- T S Eliot ).

जरासा सरकला थर

तर आतला डाग दिसला

प्रतिमाच बदलली

दुरावा आला -- अश्रू दिसले

तिकडचे की इकडचे

ते कळले नाही -- म्हणजे

आता हीच की काय

होणार खरी प्रतिमा ?

--- ००० ---

APRIL 21

Just giving everyone a warning . . . . . Almost all FaceBook accounts are being hacked. The profile picture and your name are used to create a new face book account. And then they want your friends to add them, your friends think it's you and accept. From this moment, the pirates can write what they want under your name!! ..... I have NO plans to open a new account, so please do not agree to a 2nd invitation from me!! Copy this message on your wall so that all your friends will be warned! Do not forward or press share. Copy this. Next go to your status and "paste". Next, press "post.

आज शांततेत चाललीय हनुमान जयंती -- ' एकमुखानं बोला -- ' वगैरे काहीही दणका नाहीय --

जगातला विषमतेचा शेवटचा कणही नाहीसा होईपर्यंत सर्व कला आणि कोणतीही सांस्कृतिक कृती त्याच एका प्रश्नावर ( चळवळ म्हणून ) केंद्रित असायला हवी, असे मानणारे जे पुरोगामी असतील ते गधडे आहेत. साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, सिनेमा -- या सर्व कला हजार प्रकारांनी सखोल आशय देऊ शकतात – देत असतात -- तो आशय विषमतेला थारा देणारा मुळीच नसतो – संकुचित पुरोगाम्यांना हे समजत नाही ---

APRIL 20

संवेदनशीलता -- २.

एकाचे निसर्गसौंदर्यातून मानवी जगण्याबाबत चिंतन होत राहते
एकाला स्त्री-पुरुष प्रेमातून जगण्यातल्या गुंतागुंतीचे आकलन होत राहते
एक मधुरा भक्तीतून जगणे समजून घेत राहतो आणि
एकाची संवेदनशीलता ही विद्रोह रूपातच व्यक्त होत राहते
-- हे सर्व पाहता –
संवेदनशीलतेचे विभाग असतात का
अमुक प्रकारची संवेदनशीलता असणे ही व्यक्तिगत निवड असते का
संवेदनशीलतेत अमुक श्रेष्ठ, तमुक कनिष्ठ असे काही असते का
-- हे प्रश्न पडतात. हे टाळू नयेत असे वाटते --

संवेदनशीलता -- १.

एक उत्सुकता म्हणून विचारतोय
कृपया कुणीही एकदम क्रोधाविष्ट होऊ नये –

निसर्गसौंदर्याच्या बाबतीत संवेदनशील असणारा असा
डाव्या विचारसरणीचा कवी असू शकतो का ?
मराठीत असे कोण कोण आहेत ?

अगदीच शून्य

शून्य हे लहान असो, मोठे असो, महा असो की अगदीच असो, शेवटी ते शून्यच ! इथे थोडी निराशा, थोडे वैफल्य, थोडा उद्वेग मिसळून त्याला ‘ अगदीच शून्य ‘ म्हटले जाते ! हा दीर्घांक सुरू होताना ते आपण त्याचे ते नाव म्हणून ऐकतो – तो

संपतानाही सांगितले जाते की सादर झालेला दीर्घांक ‘ अगदीच शून्य ‘ ! स्वतःलाही तेच म्हणवून घेणे ! या दीर्घांकाला निरर्थाची यशोगाथा किंवा उद्वेगाचे साम्राज्य म्हणता येईल.शेकडो विषयांची एका दमात हजेरी घेणारे – महत्त्वाचे आणि बिनमहत्त्वाचे सारख्याच पद्धतीने तोलणारे हे आजच्या पिढीच्या एका मोठ्या भागाचे प्रातिनिधिक नाटक आहे.

डाव्यांची एक ठरलेली ठरलेली खेळी असते. आधी बुद्धिप्रामाण्यवाद गळी उतरवायचा आणि मग आता भूमिका घ्या म्हणायचे ! भूमिका म्हणजे ‘ डावी ‘ च घ्यावी लागणार याची त्यांना खात्री असते ! इथे हा दीर्घांक बुद्धीनेच थेट या निरर्थकाला येऊन पोचलेला आहे ! म्हणजे, फार तर, ही ‘ निरर्थकतावादाची ‘ भूमिका आहे, असे म्हणता येईल !

कुणी एक पंत आणि एक राव असे दोन मित्र. काहीच चार्म नसलेले रटाळ आयुष्य जगणारे. अगदीच शून्य ! त्यांतल्या रावाचा शून्यापासून एकाकडे प्रवास होतो, त्यामुळे, पंताची मान जोरात दुखू लागते ! बास ! स्टोरी म्हणाल तर ही एवढीच आहे ! अर्थहीन, मूल्यहीन जगण्याचा सगळा पसारा मांडणारा हा दीर्घांक आहे. यात सीरिया, अफगाणिस्तान अशा जागतिक विषयांपासून एका वेटरचा एक मोठा पुढारी होणे -- हे सगळे आहे.

असा विषय, त्यातली नाट्यमयता पकडून रंगमंचावर सादर होणे, ही सोपी गोष्ट नाही. हे शक्य झालेय कारण पूर्ण टीमच छान जमून आलीय ! अक्षय शिंपी, अमोल कुलकर्णी आणि ऋतुराज फडके या तीनही कलावंतांनी कमाल केलेली आहे ! अभिनयाचा एक वस्तुपाठ म्हणून या तिघांच्या इथल्या टीमवर्ककडे पाहता येईल. याला अर्थातच मकरंद धर्माधिकारी यांची प्रकाशयोजना आणि प्रीतीश खंडागळे यांचे संगीत यांचा मोलाचा हातभार आहे. अत्यावश्यक तेवढेच ' आशयाला साजेसे ' मोजके नेपथ्य हेही या नाटकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

यातले काही संवाद, त्यांतल्या ‘ कब्जा करण्याच्या ‘ पूर्ण अर्थासह दिग्दर्शक रवींद्र लाखेंच्या आवाजात येतात आणि वाचिक अभिनयाचा एक प्रभावी नमूना पेश करून जातात. लाखेंचे दिग्दर्शन हा या दीर्घांकाचा प्राण आहे ! इथला रटाळपणाही तुम्हाला एखाद्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटाप्रमाणे पकडून ठेवतो ! आशयाबाबत मर्मदृष्टी असणारा आणि नाट्यकलेबाबत सखोल चिंतन आणि जाण असणारा दिग्दर्शकच हे करू शकतो. ( गंमत म्हणून बोलायचे तर, उद्या लाखे, रेल्वेचे टाईमटेबलही रंगमंचावर सादर करू शकतील ! )

युगंधर देशपांडे हा अलिकडे समोर आलेला एक चिंतनशील, सर्जक नाटककार आहे. नुसत्या करमणुकीच्या स्टोऱ्या सांगण्यापेक्षा जगण्यातल्या महत्त्वाच्या प्रश्नांनाच तो हात घालतो. आजच्या प्रायोगिक रंगभूमीवरचे हे एक महत्त्वाचे नाटक त्याने दिलेले आहे.

एकूण टीम, मिती चार आणि अस्तित्व यांचे अभिनंदन आणि असा एक चांगला सघन ‘ निरर्थपूर्ण ‘ प्रयोग पाहण्याची संधी दिल्याबद्दल आभार !

( कोणत्याही अनुभवाचे परिपूर्ण भान येणे म्हणजे त्या अनुभवाच्या बंधनातून सुटणे, अशी माझी एक थियरी -- उपपत्ती -- आहे -- ती इथे लावता येते ! )

APRIL 19

तिचाही गोंधळ

माझाही गोंधळ असणे

परंपरेचा थोडा अडथळा

थोडे हवे-नको असणे

थोडे ईगो-प्रॉब्लेम्स

थोडे समज-गैरसमज

असूनही आकर्षणही

असल्याचे माहीत असणे

कदाचित दुतर्फी स्वीकार असूनही

काही हवे ते न घडणे

कपड्यांचे रंग वा दिलेले स्मितही

काहीच पाहिलेही न जाणे

-- हे सर्व होऊनही स्नेह असणे

राग नसणे पण दुरावा असणे

याचा अर्थच ‘ प्रेम ‘

कमी पडणे –

छोड दो !

आज नाही लिहिता येणार

कविता –

--- ००० ---

रन्स होत राहतील, सामना आपल्या मनाप्रमाणे होईल, असे वाटत असते, पण, समाजाची आणि परिस्थितीची फील्डिंग इतकी टाईट असते की ते घडत नाही. हे सगळे ओलांडून सनासन सिक्सर मारण्याचीही हिंमत होत नाही. मग, एक वेळ अशी येते की सामना हातातून गेल्याचे लक्षात येते. उरलेला सामना खेळून सन्मानाचा पराभव स्वीकारणे, इतकेच शक्य असल्याचे गळी उतरते --

तुम्ही विचार करू शकता

वेगळाच असणारा

आतासारखा समूळ नसणारा

केंद्र तुमच्यात नसेल

बाहेर असेल

नसेलच खरे तर

ज्यामुळे माणसांचे स्वभाव

होतील नजरेआड

अस्तित्वच नसलेले खरे तर

मूडहीन झालेले तुमचे मन

आधी घाबरून मग

आश्वस्त झालेले

असेल निभ्रांत निरागस

विचार म्हणजे द्वंद्व नसेल

स्वसंरक्षणही नसेल प्रसंगी

प्रतिकार असला तरीही

अथांग पाण्यातून जहाजे जातील

अनंत आकाशाला विमाने भेदतील

रूटीन असेल अन नातीही असतील

( कधी आधीच्याही विचारात )

निसर्गसौंदर्य पूर्ण दिसले तरी सौंदर्य

असण्यासाठी काहीच लागणार नाही

आपोआप जुळवून घेतील स्वतःला

तुमचे स्नायू, तुमच्या पेशी

शरीरातले ताण तुमच्या समोर

विलय पावतील

झाडांची पाने संवाद साधतील

त्या विचाराशी

--- ००० ---

APRIL 18

आयबीएन--७ या चानेलवर ५-६ धर्मगुरू

हातभट्टीची भरपूर मारून आल्याप्रमाणे दंगा करताहेत !

विषय -- साईबाबा !

( साईबाबांची पूजा बंद करायला हवी -- शंकराचार्य. )

आचार्य प्रमोद कृष्णम म्हणताहेत --

कोणत्याही श्रीमंत देवळातला ९० टक्के चढावा

हा काळा पैसाच असतो !

आजवर एकूण चोवीस घरांत राहिलो

स्वतःच्या वा भाड्याच्या मिळून

भोवतीच्या भिंती, खिडक्या बदलत गेल्या

बाहेरची दृश्ये बदलत गेली

परिसर, माणसे, रस्ते बदलत गेले

भोवताली काही ना काही येतजात गेले –

खरेच घडले हे सगळे की ते सगळे

तिथेच होते आणि मी फक्त त्यातून

येतजात गेलो ?

--- ००० ---

दुःखी माणसाला दुःखमुक्त व्हायचेच असते

कारण दुःख त्रासदायक असते – पण

दुःख गेले तर त्याची ओळखच जाणार – आणि

उरणार काय मग ? – फक्त दुःखमुक्ती –

असलीच तर असणारी

परस्पर – हे समजून तो

अधिक शहाणी इच्छा ठेवतो मनात – की तो

आहे तसा दुःखी राहून दुःखमुक्त व्हावा –

--- 000 ---

APRIL 17

मौल्यवान कलाकृतीतून येणारे मानवी जगण्यातल्या प्रश्नांचे भान हे कोणत्याही बौद्धिक निष्कर्षांच्या स्वरुपात असत नाही -- तरीही ते न्याय आणि समता या तत्त्वांना उपकारकच असते.

APRIL 16

संवेदनशीलता म्हणजे हळवेपणा आणि कविता म्हणजे भावभावनांचा खेळ असा समज अजूनही बऱ्याच जणांत रूढ असल्याचे दिसते. माझी कविता भावनाप्रधान नसते. मी व्यक्तिगत सुखदुःखांना अभिव्यक्ती देण्यासाठी वा ते अनुभव इतरांच्या डोक्यांत घालण्यासाठी लिहीत नाही. या एकूणच विषयावर मी ' कवितेतील अ-भाव ' हा एक सविस्तर लेख लिहिला होता आणि काही वर्षांपूर्वी तो ' सत्यकथे ' त आला होता. माझ्या वेबसाईटवर माझ्या ' कोरी कविता ' या संग्रहाच्या प्रस्तावना-रूपात तो उपलब्ध आहे. चॉसर, अलेक्झांडर पोप, मेटॅफिजिकल कविता वगैरे अनेक ठिकाणी हा भावनाप्रधानतेचा समज खोटा पडत गेलेला आहे. आणि, आता तर, जे नेटवरही पाहता येते, एकूण जगातच असा ' भावनिक ' पणा कलेत अपरिहार्य मानला जात नाही, हे सहज दिसू शकते. विचारक्रियेच्या माध्यमातूनही उत्तम कविता लिहिली जाऊ शकते. कवितेची प्रमुख लक्षणे -- अर्थसंपृक्त शब्द, सूचकता, अनेक अर्थवलये देण्याची क्षमता, शब्दांचे आणि ओळींचे एकमेकांवर प्रभाव पडून येणारी अर्थपूर्णता आणि आशय-मांडणीतले सौंदर्य -- अशी सांगता येतील. अनुभवांच्या आणि संबंधांच्या रचनेचे जिवंत समग्र भान महत्त्वाचे मानणारी कविता ' भाव ' कवितेच्या मर्यादा ओलांडणारीच असते. कविताच काय, एकूण कलाच, भावनेच्या जगात बंदिस्त करण्यामुळे आपण कलेच्या खूप मोठ्या विश्वाला आणि तिच्या सांस्कृतिक अर्थपूर्णतेला मुकत असतो, हे समजून घ्यायला हवे.

एक अगदी वेगळाच नाट्यप्रयोग पाहिला. एका फ्लॅटच्या हॉलमध्ये !
डी एन ए ( दीर्घांक ). प्रयोग क्रमांक – २७.
श्री. नीलेश व श्रद्धा कुंभोजकर यांचे घर.
मूळ ग्रीक लेखक – जिओर्गोस निओफायटू, मराठी भाषांतर – डॉ. श्यामला वनारसे,
संगीत – समीर दुबळे, रंगभूषा व वेषभूषा – आदिती वेंकटेश्वरन,
संकल्पना आणि दिग्दर्शन – डॉ. प्रसाद वनारसे,
कलाकार – ऋजुता सोमण, निखिल गाडगीळ, सुरभी नातू.
घरचा माणूस सैन्यात भरती होऊन युद्धावर गेलेला आहे. घरात आई आणि मुलगा आहेत. मुलाला एक जवळची मैत्रीण असून तिला वडील नाहीयत. मैत्रिणीची आई पुनर्विवाह करते पण या मुलाच्या आईला तिचे पती परत येणार याची खात्री

आहे. काही वर्षे उलटूनही त्या भ्रमातून ती बाहेर पडू इच्छित नाही. जेव्हा मृत सैनिकांच्या आणि त्यांच्या मुलांच्या डी एन ए चाचण्या घेऊन कोण मेले हे नक्की ठरवायची वेळ येते तेव्हा मुलगा म्हणतो, " आता असं कोणतं सत्य असणार आहे की जे इतक्या जुन्या भ्रामक सत्यावर मात करेल ? ! "

खरेखोटे, जगणे-मरणे, भूतकाळ-वर्तमान काळ – या सर्व गोष्टींची घुसळण असलेले हे एक उत्तम नाटक आहे. हे विचारप्रधान आणि संवादप्रधान असे सखोल-सूक्ष्म नाट्याचे नाटक असल्याने यात फार हालचालींची गरजच नव्हती. हे नाटक एका घरात चालले आहे हे विसरलेच गेले. संगीत विशेष परिणाम साधणारे पण छान, सौम्य होते. रंगभूषा-वेषभूषा उत्तम.

माझा जुना मित्र प्रसाद वनारसे याने नाटकाची जातकुळी लक्षात घेऊन ते उत्तम बसवलेले होते. नाटकाच्या चिंतनशीलतेबरोबर हळुवारपणे प्रेक्षकांना सामील करून घेण्याचे कसब खास प्रसादचे होते.

आणि अर्थातच डॉ. श्यामला वनारसे यांचा उत्तम अनुवाद !

अशा प्रकारचे काहीसे गंभीर नाटक पाहण्याचे महत्त्व वाटणाऱ्या कुणाच्याही घरी जाऊन हे नाटक सादर करायला तयार असलेला हा समूह आहे.

नक्कीच एक वेगळा, समृद्ध नाट्यानुभव !

--- ००० ---

APRIL 15

मैत्रीण म्हणाली, तिला रोमँटिक कविता हवीय
मैत्रीण म्हणाली, तिला कवितेत स्माईल हवेय
कविता म्हणजे मीच असे तिला वाटत असावे
कवितेबाहेरचे माझे सगळे जगणे तीच असूनही
कवितेत मी तिचे ऐकू शकलो नाही –
मग, तीच झाली रोमँटिक आणि तिनेच
दिले स्माईल -- कवितेबाहेरच्या माझ्यामुळे --
माझी कविता माझी नसते हे तिला समजेल
तेव्हा समजेल, असे म्हणून मी ते स्वीकारले !

--- ००० ---

मी इथे फेसबुकवर घालवलेला वेळ वाया घालवला असे मला मुळीच वाटत नाही -- उलट, क्षणात बऱ्याच मित्रमैत्रिणींशी संपर्क साधता येणे, आपल्या ताज्या कविता झटक्यात काहीजणांपर्यंत पोचणे -- हे मला खूपच अर्थपूर्ण वाटते !

APRIL 14

अभिनयाचा दर्जा वगैरे ठीक, पण, मराठी अभिनेत्री हिंदी चित्र जगतावर जशा सहज स्वार होताना दिसतात -- तसे अभिनेते का ' हीरो ' होत नसावेत ? कोणती कारणे असतील ? चेहरे फारच सभ्य-सोज्ज्वळ वाटणे, बेफिकीर न वाटणे, नाचात कमी पडणे, तगडेपणात मार खाणे की आणखी कोणती ?

वाढत्या अनुभवाबरोबर वागण्याबोलण्यात बदल होत जाणे तसेच घटना व माणसे यांना दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रिया बदलत जाणे ( की सौम्य होत जाणे ), यालाच माणूस ‘ परिपक्वता ‘ म्हणत असणार, बहुतेक. की दुसराच काही असेल त्या शब्दाचा अर्थ ?

दोन उपप्रश्न --

१. वाढत्या वयाबरोबर सगळेच परिपक्व होत जातात का ? हो वा नाही -- कशामुळे ?

२. तरुण वयात कुणी परिपक्व असू शकतो का ? हो वा नाही -- कशामुळे ?

shared Bhadrakali Productions's photo.

Thank you @[100002306922093:2048:Mumbai Times]'

सोशल मिडीयावर प्रसिद्धीचे 'ढोलताशे'

भद्रकाली प्रॉडक्शनच्या 'हा शेखर खोसला कोण आहे'

आणि 'ढोलताशे' नाटकांची मुंबई टाईम्स ने घेतली अशी ही दखल

Thank you Mumbai Times

APRIL 13

काही प्रश्न मूलभूत स्वरूपाचे असतात. उदाहरणार्थ न्याय म्हणजे काय, न्यायाने वागणे म्हणजे काय, आपण न्यायाने वागतोय, असे आपल्याला वाटणे पुरेसे असते की ज्या व्यक्तीशी वागतोय तिलाही तसे वाटायला हवे, बरोबर कृती म्हणजे काय, दु:ख म्हणजे काय, दुःखाशिवाय जगता येऊ शकते का, प्रत्येक मानवी संबंधात संघर्ष का असतो, वगैरे. अशा प्रकारचे

कोणते ना कोणते प्रश्न प्रत्येकाच्या आयुष्यात येतातच. पण, माणूस सश्रद्ध असो की अश्रद्ध, या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे वा ते टाळणे वा त्यांपासून पळून जाणे असेच काहीतरी तो सामान्यतः करत जातो. हे प्रश्न टाळूनही, यांतूनच उद्भवणारे इतर अनेक प्रश्न सोडवता येतील या आशेवर माणूस अनेक वर्षे जगत राहतो. असे जगणे म्हणजेच आशावादी जगणे ! आणि मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करूनच , काहीच चांगले घडणे शक्य नाही, असा सारांश काढून जगणे म्हणजे निराशावादी जगणे ! दोन्ही प्रकारचे जगणे हे मार खात जगणेच असते ! या अशा जगण्याचा एकूणात मूलभूत प्रश्नांशी काही संबंध असावा अशी मधून मधून शंका मात्र येत राहते !

-- विचारासाठी दिलेली ही एक ' अंदाजे ' पोस्ट आहे --

यापुढे, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत कोणताही निर्णय वा आदेश देताना
कोर्टाला एक करावे लागेल --
" सदर आदेश कोणत्याही अटी वा शर्तींविना पाळायचा आहे "
असे स्पष्ट नमूद करणे !

APRIL 12

काही वर्षांपूर्वी काही शिल्पकारांबद्दल वाचले होते. ते शिल्पकार वाळूची वा बर्फाची शिल्पे घडवीत. त्यांचे तत्त्वज्ञान असे होते की शे-पाचशे वा दोनपाच हजार व्यक्तींनी पाहिली ना ही शिल्पे – झाले त्यांचे काम ! आणि ती नष्ट होण्याची वाटही न पाहता पुढची नवी शिल्पे घडवण्यासाठी ते मार्गक्रमण सुरू करत ! मला ती पद्धत प्रचंड ग्रेट वाटते ! ते जमायला सदोदित ताजे असणारे आभाळा एवढे काळीज हवे !

कविता म्हणजे कवीच्या वास्तव स्वची अभिव्यक्तीच असते, असे न समजता, तो एखादे पात्र निर्माण करून त्यातूनही अभिव्यक्ती देऊ शकतो -- हे लक्षात घ्यावे --

आत्ता तरी माझ्यावर तुटून पडायला
कुणी टपून बसलेय, असे मला वाटत नाहीय --
ना मी माझे स्नायू ताणून एखाद्या हल्ल्याची वाट
पाहतोय ना एखाद्या आंदोलनात बळी जाण्याची --
नुसत्या जगण्याला कोण शौर्य म्हणेल ?
मी शूरही नाहीय आणि भित्राही नाहीय --

थोडक्यात म्हणजे माझ्याबद्दल काहीच
ना शाबीतही होऊ शकत ना नाशाबीतही --
ते पाहा आले कुणी बंदुका घेऊन, ते पाहा
आले माझे शब्द छाटणारे, माझ्या उद्रेकाला
घाबरणारे आणि त्यामुळेच क्रूर होणारे --
अशा कल्पनाही मी करत बसत नाही --
माझे ना खूप बरे चाललेय ना खूप वाईट –
मी जर तिरस्कृत असतो, बहिष्कृत असतो
तर मलाही कदाचित सुचल्या असत्या
शौर्याच्या कल्पना ओळखून त्या मतलबी, क्रूर
अमानुष लोकांचे डावपेच – जे असू शकले असते
माझेही आज मला माहीत नसलेले नकळत –
सगळ्यांच्या क्रियाप्रतिक्रिया आणि ताकदी
यांतून जगभर आणि इथेही ठरत जातेय
हत्यारे कुणाकडे असणार आणि कोण निहत्ते
असणार ते – उपासमारीने वा रोगांनी मरण्यापेक्षा
धोके पत्करून आपल्या माणसांसाठी
का मरू नये, असेच वाटले असते मलाही !
पूर्ण व्यवस्थाच बदलायचे विडे उचलणारेच
झाले असते माझेही प्रियजन ! -- पण, माझा
गोंधळच खरा असल्याने सध्या तोच मला तातडीचा
वाटतोय – मला तर माझा शत्रू मीच वाटतोय …
--- ००० ---

APRIL 11

दुःखी न होणारे, अपमानित न होणारे, सूडाने पेटून न उठणारे, हर्षाने बेभान न होणारे, आपल्यांसाठी जिवाचे रान न करणारे – असे मन हवेय कुणाला ? तरीही, त्याला, मूल्यात्मकतेबद्दल बोलायला आवडतेच !

युद्धविरोधी भूमिका घ्यायची ? त्यासाठी आपले मन कसे असायला हवे ?

बौद्धिक मार्ग योग्य वाटणारे आणि श्रद्धेचे मार्ग योग्य वाटणारे असे लोक असतात. ही सर्व मतेच असतात. इतर सर्व शक्यता अजमावून सिद्ध झालेले असे सत्य कुणाकडेच नसते. कुणी कुणाला गाढव वा वेडे म्हणावे ? साईबाबांची पूजा केल्यामुळे दुष्काळ पडतो असे म्हणणे वा शनीची पूजा महिलांनी केल्यामुळे बलात्कार वाढतील असे म्हणणे आणि साम्यवादामुळे स्वर्ग अवतरणार आहे, असे म्हणणे, यांत गुणात्मक फरक काय ?

APRIL 10

आधी आपण आकर्षित होण्याच्या आणि मोहात पडण्याच्या सवयीचे गुलाम होतो. त्याचा जाहिरातदार फायदा घेतात. विशेषतः, पुरुषासाठीचे असो की स्त्रीसाठीचे, सौंदर्यप्रसाधनाच्या जाहिरातीत एक तरी सुंदर स्त्री असतेच. रामदेवबाबांनीही सौंदर्यप्रसाधने काढलेली आहेत. पण, त्यांचा प्रॉब्लेम वेगळा आहे. त्यांनीही अशी मॉडेल्स वापरायला सुरुवात केली तर लोक काय म्हणतील ? हेही, मोहात पडायच्या आमच्या सवयीला प्रोत्साहन देऊन तिचा फायदा घेताहेत ! याचा विचार त्यांनी केला असणार. त्यामुळे, बाबा बिचारे स्वतःच येऊन ‘ प्राकृतिक सौंदर्य बढाओ ‘ म्हणून जाहिरातीत सांगतात ! हे जाहिरात क्षेत्रातले समूळ परिवर्तन म्हणावे की ‘ लोक काय म्हणतील ‘ या भीतीच्या सवयीला बळी पडणेच म्हणावे ? आणि याच भीतीने जगायचे असेल तर संत होऊन उपयोग तरी काय आहे मग ?

APRIL 9

जगभरच
गावी लागताहेत आंदोलन-महतीची गाणी
घुमवावी लागतेय
दुःख, अन्याय, गुलामी यांची विद्रोही वाणी
कितीही सत्तापालट झाले तरीही
हे पाहून
मुळातच तर काही खोट नसेल
या प्रश्नाच्या कविता लिहिणारे साधे कवी
ढकलले जातात कलावाद्यांच्या क्षुद्र

पक्षात विद्रोह्यांच्या उदात्त पक्षाकडून

त्यांना प्रतिगामी ठरवत …

योग्य उदात्ततेसाठी थोडा अन्यायीपणा,

थोडा खोटेपणा लागणारच …

--- ००० ---

एक महाशय म्हणत होते की ज्या संताने आयुष्यात कधी स्त्री-स्पर्श स्वीकारला नाही त्याच्या समाधीला वा स्मृतिस्थळाला स्त्रीने स्पर्श करणे योग्य नाही ! वा ! हे तर स्त्रीप्रेमी संतांना प्रोत्साहनच झाले ! समता हवी असेल तर संत स्त्री-प्रेमी असायला हवेत ! किंवा, अर्थात, स्त्री-संत पुरुषप्रेमी !

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

उद्या रविवार १० एप्रिल सकाळी ११ वाजता प्रबोधनकर ठाकरे नाट्यगृह, बोरीवली. #DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

उद्या रविवार १० एप्रिल सकाळी ११ वाजता प्रबोधनकर ठाकरे नाट्यगृह, बोरीवली. #DholtaasheNatak

दुःख नसणे

एकाकीपणा नसणे

संताप, द्वेष नसणे

आसक्ती, आकर्षण नसणे

या नुसत्या कल्पना --

घटनांची साखळीच

सत्य ...

--- 000 ---

APRIL 8

बोधप्रद् नसणे, हे सर्जक कलेचे एक महत्त्वाचे लक्षण असते.

निदान-केंद्रात बसून असतो
एकेका तपासणीचा नंबर लावत
अधीरपणे -- माहीत सगळे असते
महत्त्वाकांक्षा हवी पण मापात
कामाचा ताण हवा -– “ –
नात्यांचे ताण हवे – “ –
भेसळीचे अन्न नको
प्रक्रियाकृतही नको
घाई नको, सावकाश जेवा
घरचे साधे अन्न, भाज्या, फळे
अमुक इतके पाणी अमुक वेळी प्या
जेवल्याबरोब्बर झोपू नका
किमान सात तास झोप घ्याच
हवा स्वच्छ हवी, व्यायाम हवाच
निर्व्यसनी राहणे तर महत्त्वाचेच

रिपोर्टस घेऊन डॉक्टरांकडे जातो
तर ते म्हणतात, ध्यान हवेच
त्याशिवाय सगळे फोल आहे !
( त्यांची तब्येत बरी दिसतेय ! )
तो वैतागतो – करायचीय काय
नुसती चांगली तब्येत ?
मरू दे तिकडे, म्हणतो

हे सगळे संभाळणारी

चिंप मिळेल ना बसवून मेंदूत --

" मरू दे म्हणालो ना – "

तो ओरडतो.

--- ००० ---

मैने कविताका बाजार बनाया मगर बाजारकी कविता नही लिखी !

-- डॉ. कुमार विश्वास. ( टीव्ही मुलाखतीत. )

shared Bhadrakali Productions's photo.

'ढोलताशे #नाटक #मराठी

शनिवार ९ एप्रिल घाणेकर नाट्यगृह - दुपार ४

रविवार १० एप्रिल प्रबोधनकार नाट्यगृह - सकाळी ११ वाजता'

ढोलताशे #नाटक #मराठी

शनिवार ९ एप्रिल घाणेकर नाट्यगृह - दुपार ४

रविवार १० एप्रिल प्रबोधनकार नाट्यगृह - सकाळी ११ वाजता

APRIL 7

झाला एकदाचा संगणक तयार -- आज ही एक कविता --

सहजच ही अप्राप्य शिखा

जगण्यात आली

अडथळे आपोआप रद्द होऊन

अविरोध आत्मसात झाली

आधी शब्द, मग अर्थ

अशी अनपेक्षित आली

मनात कल्लोळ करत

क्षणात सत्य होत

सहज ...

मूर्त की अमूर्त

हा मुद्दाच रद्द झाला …

--- ००० ---

APRIL 4

आई ९२ वर्षांची आहे -- गेले सुमारे सहा महिने ती घराबाहेर पडली नव्हती -- आज तिला तिच्या श्रद्धेच्या मंदिरात नेऊन आणले ! ती खुश, आम्ही समाधानी !

APRIL 3

ढोलताशे

९ एप्रिल -- घाणेकर -- दुपारी ४ वाजता.

१० एप्रिल प्र. ठाकरे -- बोरीवली -- सकाळी ११ वाजता.

shared Bhadrakali Productions's photo.

'आजचा लोकमत पुणे आवृत्ती

ढोलताशे #नाटक #मराठी

शनिवार ९ एप्रिल घाणेकर नाट्यगृह - दुपार ४

रविवार १० एप्रिल प्रबोधनकार नाट्यगृह - सकाळी ११ वाजता'

आजचा लोकमत पुणे आवृत्ती

ढोलताशे #नाटक #मराठी

शनिवार ९ एप्रिल घाणेकर नाट्यगृह - दुपार ४

रविवार १० एप्रिल प्रबोधनकार नाट्यगृह - सकाळी ११ वाजता

संगणक सारखाच बंद पडतोय -- आज दुरुस्तीला जाईल --

तो नीट होऊन येईपर्यंत इकडे सुट्टी --

APRIL 2

तुमचे फोटो म्हणजे तुमच्या अभिनयनिपुणतेची खात्री असू शकत नाही -- स्वत:च्या जगण्याला तुम्ही कितपत सामोरे जाता, हेच महत्त्वाचे --

APRIL 1

" तो ? चांगला प्राध्यापक ? -- हुं ! -- अनेकदा दारू पीत बसलेला असतो बारमध्ये -- " -- म्हणजे प्राध्यापक, डॉक्टर, कवी यांनी कसे जगले पाहिजे ते आधीच ठरलेले असते का ?

मूड नसणे म्हणजे
अंधाऱ्या रात्रीत बैलगाडीतून
निर्मनुष्य रस्ता काटत राहणे
एक कंदील आणि थोडी
चाकांची खडखड...
रस्ता बैलांच्या सवयीचा असल्याने
ते जात राहतात...
--- ००० ---

MARCH 31

कलाकृतीचा अत्युच्च दर्जा म्हणजे काय ते समजा समजलेय – तर –
अत्युच्च दर्जाची कविता -- १२ ओळी
अत्युच्च दर्जाची कथा -- २० पाने
अत्युच्च दर्जाची कादंबरी -- ३०० पाने
अत्युच्च दर्जाचे नाटक -- ६० पाने
-- यांत काय फरक असणार आहे ?
वाचायला किती वेळ लागतो याला काय महत्त्व आहे ?

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #मराठी #नाटक

शनिवार २ एप्रिल संध्याकाळी ५ वाजता

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे.'

"ढोलताशे" #मराठी #नाटक

शनिवार २ एप्रिल संध्याकाळी ५ वाजता

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे.

March 2016

MARCH 31

किंचित पडदा विलगला आणि मिटला

जे झाले दर्शन ते जे हवे होते तेच असावे

हलकेच पुन्हा हालचाल जाणवली

तेव्हा कुंडीतल्या रोपावरचे छोटे फुलपाखरू उडाले

हवेतला गारवा त्याला खुशावत होता ...

सकाळ होऊनही शहर स्तब्ध होते

जणू

मला हवे ते घडल्याशिवाय काळ पुढे सरकणारच नव्हता

मीही शांत होतो

वाटही पाहात नव्हतो...

--- ००० ---

MARCH 30

डान्साश्रम !

As a member of society, a novelist is entitled to his own stance and viewpoint; but when he is writing he must take a humanistic stance, and write accordingly. Only then can literature not just originate in events, but transcend them, not just show concern for politics, but be greater than politics.

-- MO YAN.. ( Nobel Prize -- 2012. )

साहित्य हे राजकारणापेक्षा मोठे वा महत्त्वाचे असू शकते का आणि कशासाठी ते तसे असायला हवेय ? -- यावरही मते यावीत.

तसे घडले काहीच नाही
नागरी कर्तव्य म्हणून गेलो
पोलिसांबरोबर पंचनाम्याला
तर तिथे त्यांना खूप काही सापडले
घरे, सायकली, चटया, पतंग,
काही बागा, तीन मोडके मोबाईल, वगैरे.
कधी हसू आले, कधी रडू आले.
तरीही, मी सह्या केल्या आणि घरी आलो.
तेवढ्यात मला धमकीचा फोनच आला –
हसण्यारडण्याचे हे गुन्हेगारी
एकपात्री प्रयोग बंद करायचे –
मुख्य म्हणजे स्वतःला पोलीस समजण्याचे.
अन्यथा
मेंटलमध्ये टाकू.
खा, पी, राहा मग तिथेच –

कोण असेल हा धमकी देणारा ?

--- ००० ---

MARCH 29

आपले असो की दुसऱ्याचे --
निर्दोष आणि बिनचूक जगणे म्हणजे काय ?

तुम्ही काहीही, कसेही लिहा, तुम्हाला ' रद्दड ' पासून ते ' महाग्रेट ' पर्यंतचे सर्व तऱ्हेचे अभिप्राय येऊ शकतात. तात्पुरते तुम्ही खट्टू होऊ शकता वा हुरळूनही जाऊ शकता -- पण, लिहिण्याचे महत्त्व वाटत असेल तर ते सगळे भिरकावून फेकून देता यायलाच हवे.

shared Paresh Agencies's album.
नाटके आणि एकांकिका मिळण्याचे पुण्यातले नंबर वन दुकान ! यांनी अनेक एकांकिका व नाटके प्रकाशितही केलेली आहेत. माझ्या सर्वच एकांकिका इथे प्रकाशित झालेल्या आहेत. यांसह मराठीतली सर्व प्रकारची पुस्तके मिळण्याचे आणि सौजन्ययुक्त, तत्पर सेवा देणारे वाचकांचे प्रिय दुकान !

shared Bhadrakali Productions's photo.
'"ढोलताशे" #मराठी #नाटक
शनिवार २ एप्रिल संध्याकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे.'
"ढोलताशे" #मराठी #नाटक
शनिवार २ एप्रिल संध्याकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड, पुणे.

MARCH 28

" विज्ञान, तत्त्वज्ञान, कलाकृतीची निर्मिती आणि आस्वाद इ. हे भिन्न प्रकारचे मानवी व्यवहार आहेत असे आपण मानतो. प्रत्येक प्रकारच्या व्यवहाराची विशिष्ट स्वरूपाची साध्ये असतात आणि त्या साध्यांच्या स्वरूपाशी निगडित असे त्या प्रकारच्या व्यवहाराच्या यशस्वितेचे निकष असतात. ह्याचा अर्थ असा की, इतर व्यवहारप्रकारांप्रमाणे साहित्यकृतीची निर्मिती आणि आस्वाद हा स्वायत्त व्यवहार असतो, त्याची स्वतःची साध्ये त्याचे दिग्दर्शन आणि नियमन करीत असतात. साहित्यविषयक व्यवहाराची ही स्वायत्तता नाकारण्याचे मार्क्सवादाला कारण नाही. आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानाकडून,

विशेषतः कांट आणि हेगेल यांच्यापासून, मार्क्सवादाने ही दृष्टी स्वीकारली आहे. ह्याचा दुहेरी परिणाम होईल, होतो. एकतर आशय आणि आकार ह्यातील सौंदर्यात्मक, ' रसमय ' सुसंवादाची वेगवेगळी रूपे साहित्याच्या परंपरेत बहरली आहेत त्यांचा मुक्त आस्वाद तो घेऊ शकतो, मार्क्सवादी कलावंत त्यांना स्वतःचा वारसा म्हणून स्वीकारू शकतो. ही अनैतिहासिक दृष्टी आहे, इतिहासाच्या दडपणापासून येथे इतिहासांतर्गत मुक्ती आहे. माणसाच्या भावी मुक्तीचे हे प्रसादचिन्ह आहे. दुसरा परिणाम असा की, कलाकृतीच्या घडणीचे आणि निर्मितीचे सम्यक स्वरूप ध्यानी घेणारा मार्क्सवादी आदर्श साहित्यकृतीच्या रचनेचा आराखडा बनवून तो साहित्यिकांच्या मार्गदर्शनासाठी त्यांच्यापुढे ठेवणार नाही. साहित्याचे नियोजन व नियंत्रण करणारा कुणी कामिसार त्याच्या दृष्टीने असू शकत नाही. "

---- मे. पुं. रेगे – ' प्रस्तावना ' – ' गांधीवाद ' – संपादक डॉ. दत्तात्रय पुंडे.

-- हे दिसतेय तर छानच ! प्रत्यक्षात, विशेषतः मराठीतल्या वातावरणात, हे खरे वाटण्यासारखे आहे ?

कदाचित अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा बराच गहजब झालेला असल्यामुळेही असेल, काँग्रेस आणि बीजेपी यांचा कलाक्षेत्रातल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला फारसा धोका दिसत नाही. ( सामाजिक, राजकीय क्षेत्रे वेगळी समजा ). कलेच्या क्षेत्राबाबत त्यांचा फारसा अभ्यास नाही आणि ते क्षेत्र, राजकीय सत्तेच्या दृष्टीने निरुपद्रवी वा फारसे उपयोगी नाही, असे त्यांनी गृहीत धरलेले असावे. त्यामुळे, कलेच्या क्षेत्रात सत्ता मिळवण्याचा ते फारसा प्रयत्नही करत नाहीत. हिंदुत्ववाद वा गांधीवाद यांच्या प्रभावाखाली इथल्या कलाक्षेत्रात फारसे उल्लेखनीय काम झालेले नाही. गांधीवाद हे काँग्रेसचे पायाभूत तत्त्व मानले तर, ' गांधीवाद ' या पुस्तकात गो. म. कुलकर्णी जे म्हणतात, " आजवर अनेक कारणांनी गांधीवादाला संवादी वा समानधर्मी साहित्यकृती निर्माण झाली नाही हे खरे " – हे लक्षात घ्यावे लागते. कोणत्याही क्षेत्रातले सत्ताधारी आपल्या लोकांना बढावा देणे आणि इतरांना चेपणे, ही कामे करत असतातच. ( हे साधे सत्यही न समजणारे ' उद्ध्वस्त धर्मशाळा ' हे भाबडे नाटक इथे का ग्रेट ठरले, त्याचाही आज ना उद्या विचार होईलच. ) मराठीतल्या साहित्य क्षेत्रात आता कुणाला दबवण्याइतकी प्रभावी सत्ता कुणाकडे आहे, असे वाटत नाही. मराठी लेखक-कवींच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याला कुणापासून धोका आहे आणि आहे का धोका कुणापासून ? बक्षीसांबाबत थोडी बेफिकिरी ठेवली तर मराठीत अभिव्यक्ति-स्वातंत्र्य चांगलेच आहे, असे का म्हणू नये ?

MARCH 27

दुसऱ्याच्या हलगर्जीपणामुळे तुम्हाला एखादे काम, ते तुम्ही करणे अपेक्षित नसूनही, करावे लागते. तेव्हा तुम्ही ते चिडून, वैतागून करता ! तुम्ही चिडल्याचे त्या संबंधित व्यक्तीला बऱ्याचदा कळतच नाही, पण, तुम्हीच कुठेतरी धडपडता किंवा स्वत:चे नुकसान करून घेता ! ते काम लक्षपूर्वक न केल्याने !

shared Bhadrakali Productions's post.

प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादासोबत...

नाशिककरांनी गोड भेटवस्तू देऊन " ढोलताशे " टिमच्या कलाकारांना सन्मानित केलं.

धन्यवाद नाशिककरहो!!!

सेल्फी

लेखक – शिल्पा नवलकर आणि दिग्दर्शक – अजित भुरे.

आज पाहिले. ‘ चारचौघी ‘ नंतर बहुतेक हेच असावे असे स्त्री-प्रश्न-केंद्रित नाटक. स्त्रियांच्या प्रश्नांचे समाजात एकूण भानच कमी असते, असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे, शिल्पा नवलकर यांनी या प्रश्नांना अभिव्यक्ती देणे आणि त्या प्रश्नांवर स्त्री पात्रांनाच साधक-बाधक बोलायला लावणे महत्त्वाचे ठरते. रेल्वे स्टेशनवरच्या एका महिला वेटिंग रूममध्ये पाच स्त्रिया एकत्र येतात आणि त्यांच्या एकमेकींशी होणाऱ्या संभाषणातून हे नाटक घडते. हळूहळू त्या एकमेकींशी मोकळेपणाने बोलु लागतात आणि प्रत्येकीचेच आयुष्य कसे या ना त्या प्रकारे समस्याग्रस्तच आहे ते समोर येते. स्वतःची समस्या नीट सोडवू न शकलेल्या या स्त्रिया इतर स्त्रियांना मात्र आपुलकीने ' योग्य ' सल्ले देतात. एकमेकींबाबत सदभावना बाळगतात. अशा प्रश्नांवर ‘ बोधप्रद ‘ असे काही सापडू शकत नसते, हे खरे असले तरी, काहीजणी सावरतात, इतर सावरतील अशी आशा निर्माण होते आणि नाटक संपते. माझा मित्र अजित भुरे याचे उत्तम दिग्दर्शन आणि सर्वच स्त्री कलाकारांचा उत्तम अभिनय यांमुळे प्रयोग छानच होतो. या अशा प्रश्नांचे समाजात भान वाढणे हे समाजाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मला हे नाटक आवडले.

MARCH 26

ममता दीदी म्हणताहेत -- काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्या भूमिका ठरलेल्या असतात -- त्यांचे मतदार एकमेकांच्या उमेदवारांना मतदान करणार नाहीत -- त्याचा फायदा तृणमूलला होईल ! -- काय ही शोकात्मिका भूमिकांची ! आपल्या भूमिकेचा फायदा शत्रूला होणे !

अमेरिकेतला निवडणूक प्रचार खूपच रंगतदार आणि तीव्र होत चाललेला आहे ! ट्रम्प आणि क्रुझ यांनी एकमेकांच्या पत्न्यांचे पारदर्शक फोटो प्रकाशित केलेले आहेत ! त्यांवरून अमेरिकन लोक मतदान कुणाला करायचे ते ठरवतील, बहुतेक ! म्हणजे

ट्रम्प निवडून आले तर क्रुझ यांच्या पत्नीचे ते श्रेय असेल आणि क्रुझ निवडून आले तर ट्रम्प यांच्या पत्नीचे ! आपणच अडाणी असून भलत्याच कारणांनी मतदान करतो, असा न्यूनगंड आपण बाळगायचे कारण नाही ! पण, याही क्षेत्रात तेच पुढे आहेत, हे मान्यच करावे लागेल !

( आजच्या मटातली बातमी. )

या मनाने दिलीय अनेकांना
हद्दपारी, जन्मठेप वा फाशी
जशी इतर अनेक मनांनी यालाही –
सगळीच मने न्यायाधीश आणि गुन्हेगार
सगळ्यांचे आपापले सुभे-मनसुबे –
मने हिशोब नाही ठेवत
दिलेल्या शिक्षांचा अथवा
रखडलेल्या खटल्यांचा –
मनांसमोर खूप माणसे असतात
विल्हेवाट लावण्यासाठी
आप्तजनांच्या प्रेम-भोगातून वेळ काढत –
आप्त आणि पर यांची अदलाबदलही
सोसत मनांना जगत राहावे लागते –
कधी माफी मागत, कधी जखमा करत
आब राखून राहतात न्यायाधीश
कारण काहीच अमर नसते वा
काहीच नसते कायमचे बरोबर –
मनाला कायदे तर मिळतात
रेडीमेड त्याच्या समूहाकडून
जे पाळत असल्याचे दाखवतच
त्याला द्यावे लागतात
उलटे-सुलटे निकाल --पटणे न पटणे
दुर्लक्षून – मन कधी आश्वस्त, कधी समाधानी,
कधी अस्वस्थ, कधी उदासीन,

कधी बेफिकीर आणि कधी

तरल, नाजुक नाइलाजाच्या अवस्थेत

आतल्या आत रडत राहणारे –

आपल्या प्रिय व्यक्तीचेही आपण

न्यायाधीश ?

या विचाराने मन हळुवार होऊन

घेते एक चुंबन प्रेयसीचे – तेही

अर्धवट अनिश्चिततेत –

म्लानपणे –

--- ००० ---

अलिकडेच एक बातमी पाहिली की अमुक अमुक ९८ व्या वर्षी वारले. तशी माझी न त्यांची थोडी ओळख होती. संध्याकाळी आम्ही काही मित्र गप्पा मारत चहा पीत बसतो तिथे ते येत. हातात काठी घेऊन का असे ना, एकटे फिरत. त्यांचाही एक ग्रुप असे, अर्थात. बातमी वाचल्यावर कळले की आयुष्यभर ते अमुक एका संघटनेचे कार्यकर्ते होते. त्यानंतर, मला त्याच संघटनेचे आणखी काही कार्यकर्ते आठवले. तेही छान तब्येत टिकवलेले होते. यातून एक विचार आला – अमुक भावना वा अमुक विचार यांनी मेंदू व्यापून टाकला तर तब्येत नीट राहात असणार. मनाची लवचिकता, तरलता, अनिश्चितता पूर्ण नाहीशी झाल्यावर गोंधळ हा प्रकारच बंद होत असणार ! त्याचा हा फायदा असावा. यावर कृपया कुणीही चिडू नये. सहिष्णुतेने, आपापल्या अनुभवातून यावर बोलावे. प्रश्न असा आहे की मनाच्या तरलतेचा बळी दिला तर त्या बदल्यात दीर्घायुष्य, तेही ठणठणीत, मिळत असेल का ?

MARCH 25

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार २६ मार्च

रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर...

#DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार २६ मार्च

रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर...

#DholtaasheNatak

MARCH 24

पुणे महानगरपालिका

बंद झाल्यावरसुद्धा

वाहत राहणारा नळ

ताबडतोब दुरुस्त करून घ्या

एक नवीन विभागणी सापडलीय –

अर्धा देशभक्त – अर्धा गद्दार !

पण होतेय काय, तर भूमिका घेताना

अर्ध्या गद्दारालाही पूर्ण गद्दारच म्हणावे लागतेय !

प्युवर, शुद्ध असायला हवीत माणसे !

देशाचे काम टाळून पगार खाणे वा

भ्रष्टाचाराच्या मार्गाने देशाचे पैसे खाणे

असलेही सगळे गद्दारीतच मोडणार ना !

देशभक्त या शब्दासाठी वेगवेगळ्या

पक्षीय व्याख्या समोर येताहेत !

आपापल्या व्याख्यांप्रमाणे भूमिका घेऊन

एकमेकांच्या उरांवर बसणे

यासारखी देशभक्ती नाही –

-- आजच्या देशाचे नंतर पाहता येईल –

आधी या भूमिका पक्क्या करू --

आणि त्यांवरच्या मारामाऱ्या पूर्ण करू --

MARCH 23

आता ए बी पी न्यूज हिंदी कविसंमेलन ! चालु आहे --

झी न्यूजवरचे हिंदी कविसंमेलन बघा – धूम धमाल आहे !

खेल हमारे लिये देश है

देश हमारे लिये खेल है !

-- -- असे कवी मराठीतही ऐकायला मिळोत --

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

२६ मार्च रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर

#DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

२६ मार्च रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर

#DholtaasheNatak

‘ परिवर्तनाचा वाटसरू ‘ १६ ते ३१ मार्च २०१६ च्या अंकात ‘ आंबेडकर आणि आधुनिक बौद्ध धर्म -- सातत्य आणि वेगळेपण ‘ – हा प्रदीप गोखले यांचा लेख आहे. त्यात ‘ इहवाद ‘ हे एक आंबेडकरी बौद्ध धर्माचे वैशिष्ट्य म्हणून सांगितलेले आहे. त्याच लेखात असे एक वाक्य येते की – " आंबेडकरांनी असे मानले की, अष्टांगमार्गाची साधना करून माणूस निर्वाणाचे जीवन जगू शकतो. " त्यामुळे, प्रश्न असा पडला की आंबेडकर ‘ निर्वाण ‘ ही संकल्पना मानत होते का आणि मानत असल्यास तिचा ‘ इहवादी ‘ अर्थ कसा लावत होते ? ( मी नेटवर याबाबत काही मिळते का ते शोधून पाहिले -- नाही मिळाले. )

MARCH 22

इहवादी धर्म म्हणजे काय ?

काही यमनियम ? काही बौद्धिक कलमांचा संच ?

साधारण एक ३-४ ओळींची अशी पोस्ट सांगा की जीवर मुळीच मतभेद वा वाद होणार नाहीत -- सगळ्यांना दिलासा वाटेल, शांत वाटेल आणि विश्रांती मिळेल -- प्रयत्न तर करा --

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

२६ मार्च रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर

#DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

२६ मार्च रात्री ८:०० वाजता,

शिवाजी मंदिर, दादर

#DholtaasheNatak

MARCH 21

एके काळी ' निर्भय बनो ' हे एक घोषवाक्य होते

आणि ते अनेकांना आवडतही होते.

आताचे घोषवाक्य आहे, ' कट्टर बनो ' !

सतत आक्रमक राहणे, हे आता सर्वांनाच मान्य आहे.

यातून वातावरण सतत हिंसक राहणार, हे समजायला

खूप मोठ्या विद्वत्तेची गरज नाही.

स्वतः तर कट्टर बनाच, शिवाय, आपापल्या

मुलांनाही त्याच कट्टरतेच्या मुशीत घालुन

त्यांना खलास करायची व्यवस्थाही करा.

कोणती कट्टरता निवडायची, एवढेच फक्त तुम्हाला

स्वातंत्र्य आहे, असे समजा !

बाहेर हिंसा घडेल तेव्हा घडेल, पण, आधी

आपल्या स्वतःच्या मनाची वाट लावण्याचा हिंसकपणा तर घडेलच !

दुसऱ्याच्या त्या हिंसकपणापेक्षा आपला हा हिंसकपणा
कसा सर्वांच्या हिताचा आहे, याचे तत्त्वज्ञान तयार ठेवा म्हणजे झाले !

आज कविता दिन आहे म्हणे -- ही घ्या एक कविता --

मनाला जेव्हा डोक्याबाहेर जाऊ दिले
तेव्हा ऐकू आली ती साधीशी झुळुक
शिवाय खूप -- इतके काही असते बाहेर
हे माहीतच नव्हते
माझ्या भरगच्च मेंदूला
कितीही फिरलो तरी
डोक्यातल्या डोक्यात जगायची
पक्की सवय होती --
संदर्भ देणे, वाद घालणे, जिंकणेही
नेहमीचेच होते --
दूरवरच्या कावळ्याचा आवाज
आपल्या जगण्याचाच भाग आहे
हे माहीतच नव्हते --
वाटायचे, न वाचलेली पुस्तके,
न घेतलेले अनुभव
एवढ्याच आहेत त्रुटी --
डोक्याबाहेर गेलेल्या
मनाला अस्तित्वच नाही
-- किती परिपूर्ण
ही छोटीशी झुळुक –
असणे आणि नसणे
एकच करणारी –
--- ००० ---

MARCH 20

आडपडद्याने वा बिचकत बोलणे नकोच. खुलेपणाच ठेवू. ‘ भूमिका घ्या ‘ हा कंठाळी धोशा सारखा कुणाचा चालु असतो ? तर समाजवादी आणि साम्यवादी यांचाच. एकीकडे ते म्हणत असतात की प्रत्येक लेखक भूमिका घेतच असतो ! मग, तरीही ते असे का म्हणत राहतात ? त्याचे स्पष्ट कारण हेच आहे की जगातल्या इतर कोणत्याही भूमिका अहितकारक आणि त्याज्य असून सर्व लेखकांनी समाजवादी वा साम्यवादी भूमिकेतूनच लिहायला हवे, असे त्यांचे म्हणणे असते. मानवी संबंध समजून घेणारी कलानिर्मिती ही अशी एखाद्या ठरलेल्या भूमिकेतून होऊ शकते का, हा मुद्दा तूर्त सोडून देऊ. पण, सगळ्यांची समज आणि सर्जकता दडपून एकाच भूमिकेत कोंबण्याचा हा प्रयत्नच अहितकारक आहे. काही एक काळ ते समर्थनीयही वाटले असेल, पण, कायमच ? आता शिकलेल्या, स्वतःची बुद्धी असलेल्या तरुणांवर विश्वास का नाही टाकत ? त्यांच्या सर्जकतेच्या वाटा त्यांनीच शोधाव्यात, असे का नाही म्हणत ? यांची सत्ता येणार नाही, हा भाग वेगळा, पण आली तर अभिव्यक्तिस्वातंत्र्याची वाटच लागेल !

प्रत्येक गंभीर लेखक एक भूमिका घेऊनच लिहीत असतो, असे समजा काहींचे म्हणणे आहे आणि तरीही एखादा गंभीर लेखक म्हणत असेल की तो नाही घेत अशी एखादी भूमिका – तर म्हणे ना का तसे त्याला ! सगळ्या कलाकृती विचाराच्या स्तरावर समजतात, असे वाटणाऱ्यांकडे त्या लेखकानेही दुर्लक्ष करावे, वाटल्यास ! -- हा बरा आहे का तोडगा ?
-- प्रत्येक लेखक हा समाजवादी वा साम्यवादीच असला पाहिजे, असे कुणी म्हणू नये, म्हणजे झाले !

उगीच गुळमुळीतपणा आणि एकमेकांबद्दल उपरोधाने बोलणे – असले काही कामाचे नाही.
ज्यांना साहित्य हे भूमिका आणि बांधिलकी यांनी युक्त असेच असायला हवे, असे वाटते, त्यांनी, त्यांच्या मते, मराठीतल्या श्रेष्ठ साहित्यिकांची नावे सांगावीत.
तसेच
खानोलकर ( आणि आरती प्रभू ), जीए, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, नेमाडे, पु शि रेगे, ग्रेस, मनस्विनी लता रवींद्र, धर्मकीर्ती सुमंत आणि सध्याचे विखंडित वास्तव व्यक्त करणारे गोंधळात असलेले अनेक लेखक -- यांबद्दल त्यांचे काय मत आहे, तेही सांगावे.
कुणाचे तरी बरोबर वा चूक हे ठरवण्यासाठी नव्हे तर विषय स्पष्ट होण्यासाठी.

साहित्य कसे असायला हवे ते सतत हॅमर करणारे फारच सोकावत चाललेले आहेत.
त्यांना उडवून लावावेच लागेल – सहिष्णूपणे --

मानवी जगण्याचे जिवंत भान घेण्याची प्रक्रिया ज्यात नाही ते साहित्य रटाळ होते.
बांधिलकीचे साहित्य तसे असते.
तिथे शंभर कवी एकच कविता लिहीत राहतात.

पुस्तकी अभ्यासक आणि निर्भेळ विचारवंत यांनाच ' भूमिकांची ' काळजी दिसते ! प्रत्यक्ष रणभूमीवर तर सगळ्याच भूमिकांचे सपाटीकरण चालु असलेले दिसते !

प्रत्येक मनाची एक वेगळी प्रभावयुक्तता ( वाटल्यास ' प्रभावग्रस्तता ' म्हणा ) असते. त्याला त्याचे कंडिशनिंग वा प्रोग्रामिंगही म्हणता येईल. यालाच काही लोक ' भूमिका ' म्हणतात. प्रत्येक माणसाची वा लेखकाची एक भूमिका असते, असे ते म्हणतात, तेव्हा त्यांना हेच म्हणायचे असते. तरीही ते ' भूमिका घ्या -- भूमिका घ्या ' असा धोशा लावत सगळीकडे अधीरपणे फिरत असतात ! ते असे का करत असावेत ? तर त्यांची भूमिका ही जगातली सर्वात आदर्श भूमिका आहे -- तीच सर्वांनी घ्यावी, असे त्यांना म्हणायचे असावे. की आणखी काही असतात कारणे ?

MARCH 19

shared a link.

loksatta pune, 20-03-2016 : readwhere
readwhere.com
http://epaper.loksatta.com/754575/loksatta-pune/20-03-2016#page/17/1
आजच्या लोकसत्तेत वृत्तांत पुरवणीत
' ढोलताशे ' चे परीक्षण --

कोणत्याही विचारसरणीच्या भक्तांना त्या विचारसरणीचे ' अंधश्रद्ध ' भक्त का म्हणू नये, याची करणे सांगा --

" आता किती टक्के बिघडलेयत तुमचे संबंध ? ७० टक्क्यांच्या पुढे बिघडले तरच घटस्फोटाचा विचार करा -- "

एखाद्या विचारसरणीचे अंधश्रद्ध भक्त आणि तिरुपतीचे तसेच भक्त यांत काहीच फरक नसतो – दोघांनाही वाटत असते की सर्व मानवी प्रश्न हमखास सुटण्याची गुरुकिल्ली आपल्या श्रद्धेतच आहे !

प्रत्येक कलाकार हा राजकीय भूमिका घेऊनच लिहीत असतो, असे म्हणणार्यांनी हे दाखवून द्यायला हवे की कोणत्या राजकीय भूमिकेला मानवी संबंधांतले प्रश्न आदर्शपणे समजू शकलेले आहेत ? की ते समजण्यात अशी कोणतीही भूमिका हाच अलंघ्य अडथळा असतो ?

आता भारतात मध्यमवर्ग लोकसंख्येच्या ३०-४० टक्के झालाय म्हणतात. तरीही, त्या वर्गाला कुचकामी म्हणणे चालुच आहे ! मध्यमवर्गीय अनुभवातून कुठली येणार ग्रेट कलाकृती ? -- असे म्हणायला आवडतेच अनेकांना ! बरे ठीक, समजा नाही येणार -- मग, कुठून नक्की येऊ शकेल ? गटाराजवळच्या झोपडीत जगणार्याकडून की अंबानीम्पैकी कुणाकडून ? भारतातल्या आदिवासीनकडून की त्याहूनही अधिक घाणेरडे जगणे असलेल्या देशातून ? तसे काही नसते. काहीजण म्हणतात की आपल्याकडे महायुद्धाचा अनुभव नाहीय म्हणून चांगल्या कलाकृती निर्माण होत नाहीत ! म्हणजे चांगली कलाकृती निर्माण होण्यासाठी खूप विध्वंसाचा अनुभव मिळायला हवा ! अरे, नको ना बाबा मग चांगली कलाकृती, असे असेल तर !

एखादे नाटक राजकीय आहे म्हणून महत्त्वाचे ठरत नाही. ते वर्णन फक्त माहोल कोणता आहे, हे संगण्यापुरतेच उपयोगाचे असते -- जसे ऐतिहासिक वा पौराणिक वा सामाजिक, वगैरे. माहोल कोणताही असो, नाटक मानवी संबंधांचेच असावे लागते. काही लोक मराठीत राजकीय नाटक नाहीय याचा शोक करताना दिसतात -- म्हणून हे मांडले.

MARCH 17

आज आणि उद्या -- सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या नामदेव सभागृहात
दोन्ही दिवशी सकाळी १०-३० ते दुपारी ०४-०० पर्यंत
तीन नाटककारांवर परिसंवाद --
-- माझ्या नाटकांवर आज दु. २ ते ४ --
उद्या दु. २ ते ४ नाटककारांची मनोगते.

shared Bhadrakali Productions's photo.
'"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च दुपारी ४:३० वाजता,

आचार्य अत्रे नाट्यमंदिर कल्याण. #DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च दुपारी ४:३० वाजता,

आचार्य अत्रे नाट्यमंदिर कल्याण. #DholtaasheNatak

काही काम नाहीय

तर काय करावे ?

कविता असते

तिच्या परीने

मलाही असू देते ...

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च दुपारी ४:३० वाजता आ. अत्रे कल्याण... #Dholtaashe'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च दुपारी ४:३० वाजता आ. अत्रे कल्याण... #Dholtaashe

MARCH 15

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च

दुपारी ४:३० वाजता

आचार्य अत्रे नाट्यमंदिर, कल्याण

#DholtaasheNatak'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार २० मार्च

दुपारी ४:३० वाजता

आचार्य अत्रे नाट्यमंदिर, कल्याण

#DholtaasheNatak

MARCH 13

मी लिहिले त्या मार्गाने समजून घेऊन खूपच समृद्ध नाटक सादर करणारी टीम मिळणे, हे लेखकाचे ( दुसरे काय म्हणणार ) भाग्यच म्हणायला हवे ! माझेच नाटक पाहून मीच खुश !

' ढोलताशे '

आजचा पुण्यातला प्रयोग !

या नाटकात हे असे इतके काही रिच असेल हे मलाही म्हणता नसते आले --

प्रसाद कांबळी, विजय केंकरे आणि सर्व टीम !

( ' आविष्कार ' ची टीमही तोडीस तोड होती ! )

मराठी नाट्य-चित्रपट क्षेत्रांतल्या अनेक व्यक्ती हे नाटक आवर्जून पाहत आहेत !

' लोकसत्ता ' ची संपादक-शिफारस आहे !

या नाटकात ' अश्विनी ' या पात्राला आपल्याकडून कमी संवाद, कमी स्कोप दिला गेला असे मला वाटायचे -- इथे अमृता संत या अभिनेत्रीने या भूमिकेत ज्या अनेक जागा घेतल्या आहेत त्या केवळ लाजवाब आहेत !

आज मुख्यत: मी गेलो ते राहुल रानडेने संगीतात काही अधिक मजा आणलीय, हे माहीत होते म्हणून !

दिल खुश हुआ !

MARCH 12

shared Lalit Prabhakar's post.

'Aaj punyat Dholtashe

5 vajta Yashwantrao kothrud

Yetay na mag?'

Aaj punyat Dholtashe

5 vajta Yashwantrao kothrud

Yetay na mag?

shared Bhadrakali Productions's photo.

आज पुण्यात --------------

मते मर्यादित आणि जुनी असतात.

नवे जगणे अमर्याद असते.

मतांचा पराभव अटळ असतो.

मते घट्ट धरून बसणारा वेडा होत जातो.

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार १२ मार्च रात्री ८:३० वाजता

दीनानाथ, पार्ले! #DholtaasheNatak

उद्या सायं ५ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज शनिवार १२ मार्च रात्री ८:३० वाजता

दीनानाथ, पार्ले! #DholtaasheNatak

उद्या सायं ५ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड

थंडीत कुडकुडत तो म्हणाला
अशा वेळी अर्थ हवा कवितेला
त्याने उपरोध पाहिलाच नव्हता
तो सरळमार्गी होता –
एकाला हवी होती प्रतिमा
अर्थ न बदलणारी
तिचे नग्न चित्र जसेच्या तसे
पाहत राहता येईल अशी --
काम थांबवून सवयीचे तो
कवितेकडे पाहू शकत नव्हता

तर एकाने अनुभवाचा

आग्रह धरला – त्याला

न मिळालेले अनुभव वा

मिळालेलेच पुन्हा त्याला

चाळायचे होते – मला

माझीच शंका आहे तर मी

उगीचच तुमचे डोके का

गुंतवू कुत्र्याच्या शेपटीत

असे माझे विचारणे त्याला

आवडले नाही – यावरून

आपले वाचकही आपल्या

कविता वाचत नाहीत हे

समजून मी गप्प झालो --

माझीच कविता मलाही

वाचता येत नसावी

असेही वाटले

-- निरथक सगळे –

--- ००० ---

MARCH 11

The Last Toast - Poem by Nicanor Parra

Whether we like it or not,

We have only three choices:

Yesterday, today and tomorrow.

And not even three

Because as the philosopher says

Yesterday is yesterday

It belongs to us only in memory:
From the rose already plucked
No more petals can be drawn.

The cards to play
Are only two:
The present and the future.

And there aren't even two
Because it's a known fact
The present doesn't exist
Except as it edges past
And is consumed...,
like youth.

In the end
We are only left with tomorrow.
I raise my glass
To the day that never arrives.

But that is all
we have at our disposal.

Nicanor Parra

Poems by Nicanor Parra : 4 / 7

( -- मित्रवर्य Ravee Lakhe -- यांच्याशी बोलताना सापडलेला हा माझा भाऊ ! तो आता हरवू नये म्हणून त्याची एक कविता इथे घेऊन ठेवली आहे ! )

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी
उद्या १२ मार्च रात्री ८:३० वाजता
दीनानाथ, पार्ले! #Dholtaashe'
"ढोलताशे" #नाटक #मराठी
उद्या १२ मार्च रात्री ८:३० वाजता
दीनानाथ, पार्ले! #Dholtaashe

स्वभावाचा कंटाळा !

सश्रद्ध असणे आणि अश्रद्ध असणे
हे दोन्ही मानसिक-वैचारिक पवित्रेच असतात.
दोन्ही प्रकारचे लोक सारखेच शहाणे वा वेडे असतात.
सुखी वा दुःखी असतात.
प्रसंगी सारखेच हिंसक असतात.
सश्रद्ध अश्रद्धांची कीव करतात आणि
अश्रद्ध सश्रद्धांची टवाळी करण्यात धन्यता मानतात.
कीव आणि टवाळी दोन्ही तथ्यहीन असतात.

धर्माच्या नावावर हिंसा करणारे वा विचाराच्या नावावर हिंसा करणारे
यांत
(१) फरक काय ? (२) हितकारक कोण ?

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, उपजीविका – हे नाहीच आहेत प्रश्न ! त्यांना त्यांच्या धर्मतत्त्वांचे राज्य आणायचे आहे जगावर ! अशा प्रकारे जगाचे भले करणे हे त्यांचे धर्मकर्तव्यच आहे ! मग, याच्या आड येणारी माणसे मारावी लागली तरी हरकत नाही ! त्याला त्यांचा इलाज नाही. ( टीव्हीवर पाहिलेल्या एका आतंकवादावरच्या कार्यक्रमाचा मला समजलेला हा सारांश आहे. )

MARCH 10

निरनिराळी परदेशी चॅनेल्स पाहिली की दिसते, जगात किती असंख्य प्रश्न आहेत, केवढे प्रचंड विध्वंस चालु आहेत, त्यांत कितीजणांचे किती विचार आणि हितसंबंध गुंतलेले आहेत, सर्वच वयांच्या स्त्रीपुरुषांचे कसे हाल होत आहेत, जवळचे मरताहेत, कुणी हरवताहेत, आणि पुढच्या क्षणाचीही कसलीच खात्री राहिलेली नाही ! तरीही माणसाला वाटतेय – विचार करकरून करकरून जागतिक शांतता प्रस्थापित होईल ! – असे वाटणे, हा मात्र एक अ-बौद्धिक चमत्कारच म्हणावा लागेल !

MARCH 9

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज १० मार्च दुपारी ४:३० वाजता

प्रबोधनकार, बोरीवली! #HSKKA'

"ढोलताशे" #नाटक #मराठी

आज १० मार्च दुपारी ४:३० वाजता

प्रबोधनकार, बोरीवली! #HSKKA

मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक यांची मते तर हवीतच – त्याशिवाय यश अशक्य !

त्यासाठी मार्ग दोन – एक म्हणजे सवलती देणे, फायदे करून देणे ( ज्याला सत्तेत नसलेले लोक लांगुलचालन म्हणतात ! ).

आणि दुसरा मार्ग म्हणजे द्वेषभावना चेतवून आम्हीच तुमचे रक्षणकर्ते अशी त्यांची भावना घडवणे.

पहिला मार्ग फारसा धोक्याचा नाही पण दुसरा प्रचंड धोक्याचा आहे. नीच आणि धोक्याचा !

मोठ्या वा छोट्या ( स्थानिक ) प्रमाणावर हे घडू शकते.

निवडणुकांच्या काळात भारतीयांनी या बाबतीत विशेष सावधगिरी बाळगणे अत्यावश्यक आहे.

कोन्ग्रेस वा डावे सत्तेत नसले तरी दुसर्या प्रकारच्या नीच मार्गाने जाणार नाहीत, असे वाटते.

' अवतार ' ही संकल्पनाच ज्याला मान्य असणे शक्य नाही

त्याला तशाच अवतारहीन लोकांनी अवतार समजू नये --

एकदम श्रद्धेपेक्षा सबुरीच बरी --

टीव्हीवरच्या चर्चा, वाद पाहिले की एक स्पष्टपणे लक्षात येते --
माणसे बदलतात, सुधारतात, शहाणी होतात --
यावर कुणाचा विश्वासच नाहीय --
सारखे जुने काहीतरी काढून एकमेकांवर चिखलफेक करत असतात !
-- असली माणसे काय देशाचे भले करणार ?
जातीय वा धार्मिक अस्मिता बाळगून इतरांना कमी लेखणारे
आणि हे, जुने शिक्के मारत इतरांना कंडेम करणारे
सारखेच नाहीत का -- कायमची दुही हवी असलेले ?

खाजगी भांडवल, खाजगी उत्पादन-साधने, खाजगी मालमत्ता
अशी सर्व तत्त्वे स्वीकारलेल्या देशात
डावे े आणि उजवे यांत नेमका फरक कसा करावा ?

MARCH 8

लोकेच्छेचा मान राखत सर्वच कायद्यांची पुनर्रचना करावी
म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था नीट राहू शकेल --

उद्या
गुरुवार १० मार्च दुपारी ४:३० वाजता
प्रबोधनकार, बोरीवली!
' ढोलताशे '
अवश्य पहा --

गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव यांसाठी उभारल्या जाणाऱ्या अवैध मंडपांवर
महानगरपालिका जर काही कारवाई करत नसेल तर
या बाबतीत आम्ही काही करू शकत नाही --
असे उच्च न्यायालयाने म्हटल्याची बातमी आजच्या पुणे सकाळमध्ये आहे !

चला, सुटला हा प्रश्न !

चालु द्या आता बिनधास्त !

भारतात सत्ता मिळवायची असेल वा मिळालेली टिकवायची असेल तर

मागासलेले, गरीब, शेतकरी आणि अल्पसंख्य

यांतल्या कुणाही विरुद्ध धोरण वा अजेंडा असून चालणार नाही,

एवढे तर सर्वांनाच समजत असेल ना ?

MARCH 7

रविवार दिनांक १३ मार्च २०१६ संध्याकाळी ०५=०० वाजता

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पुणे इथे

ढोलताशे

जमेल त्यांनी अवश्य पहा.

काल संध्याकाळी पाच वाजता झी न्यूज चॅनेलवर एक विशेष चर्चा ऐकली. अशी चर्चा मी यापूर्वी कधीच ऐकली नव्हती. दोन मुस्लिम महिला आणि दोन मुस्लिम धर्मगुरू यांच्यांत झाली ती चर्चा। विषय होता मुस्लिम स्त्रियांना मानवाधिकार मिळण्याबाबत. तीन वेळा तलाक म्हणून हाकलुन देणे, पुरुषाला अनेक विवाह करण्यास मान्यता असणे ( मग, स्त्रीने अनेक पती का करू नयेत, असाही प्रश्न होता ), बुरखा पद्धत, शिक्षण, महिलांना मशिदप्रवेश – असे अनेक मुद्दे होते. शरीयतपेक्षा वेगळे असलेले फौजदारी कायदे कसे तुम्ही स्वीकारलेत, मग स्त्रियांबाबतच्या कायद्यांबाबतच असा दुराग्रह का – असे प्रश्न त्या महिला विचारत होत्या. ( चोरी केल्यावर हात तोडणे, बलात्कार केल्यास मुंडके उडवणे, दगडफेक करून मारणे – असे कायदे आता इथे अस्तित्वात नाहीत. ) त्या स्त्रियांचे म्हणणे होते की मुस्लिम जजांनीच, शरीयतला धरूनच दिलेले न्याय तुम्ही का मानत नाही ? त्यावर ते धर्मगुरू म्हणत होते की ऐसे बहुत होते हैं जज दुनियामे – हमारे शरीयतके सामने वह कुछ भी नही हैं ! नुसते कुराण वाचून पुरेसे कळत नाही, हदीत वाचले पाहिजेत, असे त्यांचे म्हणणे होते. मध्येच एका धर्मगुरूने चढ्या आवाजात काही म्हटले तर त्या दोघींतली एक महिला त्यांना म्हणाली की धमकी नका देऊ, आम्ही घाबरणार नाही आहे !

याही चर्चेतून निष्कर्ष काही नाहीच निघाला, पण, अशा चर्चा घडताहेत, हेही महत्त्वाचे आहेच !

कालची ती चर्चा आजच्या महिला दिनानिमित्तच झाली असणार.

सर्वच महिलांच्या बाबतीत योग्य, न्याय्य ते घडो आणि त्यांनाही छान, स्वतंत्र जगण्याचा आनंद मिळो, हीच या निमित्ताने हार्दिक सदिच्छा !

प्रत्येक चॅनेलचा मालक त्या त्या चॅनेलचे धोरण ठरवणार.

प्रत्येक नियतकालिकाचा मालक त्या त्या नियतकालिकाचे धोरण ठरवणार.

तसेच प्रत्येक दैनिकाचेही असणार.

त्या त्या ठिकाणी नोकरी करणाऱ्या पत्रकारांना

ते ते धोरण पाळावेच लागणार.

एकूणच पत्रकारांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे काय होत असेल ?

MARCH 6

मानवी जगण्याबाबतचे आकलन वाढवणारा interesting मजकूर --

" थोडी अतिशयोक्ती करून असे म्हणता येईल की एसेम हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा मुखवटा होते. समितीचा चेहरा डांगे होते. पण, जनसामान्यातील प्रतिमेचा विचार करता एसेमना नेता म्हणून प्रोजेक्ट करणे कम्युनिस्टांनाही सोयीचे होते. चळवळीचे धोरण ठरविण्यासाठी होणाऱ्या बैठकांमध्ये काय होई याचे वर्णन प्रबोधनकारांनी आत्मचरित्रात केले आहे. वेगवेगळ्या विचारसरणींचे समितितील नेते एकमेकांशी कडाक्याचा वाद घालीत. वाद करून थकून जात. निर्णय होत नसे. हे घडत असताना डांगे शांतपणे बसून असत. सर्वांचे बोलुन झाल्यावर ते शेवटी हळूच आपला मुद्दा पुढे आणत आणि तो मान्य होई.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती होईपर्यंत समाजवाद्यांनी हे खपवून घेतले. नंतर हे शक्यच नव्हते. ते समितीतून बाहेर पडले. मुंबईचा गड सर झाला होताच. आता लढाई त्याच्यासाठीच होती. या वेळीही कम्युनिस्ट त्यांना वरचढ ठरू लागले. शेवटी समाजवाद्यांनी आपले उरलेसुरले वजन नव्याने स्थापन झालेल्या शिवसेनेच्या पारड्यात टाकले. त्यामुळे, मुंबईतून कम्युनिस्टांची सद्दी संपली हे खरे, पण समाजवादी तरी कुठे राहिले ? "

-- ' भाई विरुद्ध साथी ! ' – डॉ. सदानंद मोरे – ' सप्तरंग ' पुरवणी – पुणे रविवार ' सकाळ ' – दि. ०६-०३-१६.

“ आपण जणू काही नवे राजकीय तत्त्वज्ञानच मांडत आहोत या थाटात हा कन्हैया काहीही बरळत गेला. या त्याच्या विचारपरिप्लुत भाषणात त्याने भांडवलशाहीवरही काही दुगाण्या झाडल्या. वास्तविक ही भांडवलशाही आहे म्हणून या आणि अशा कन्हैयाकुमारांचे बरे चालले आहे. ज्या भांडवलशाहीच्या विरोधात हा कन्हैया बरळला ती नष्ट केल्याचा दावा करणाऱ्या रशिया आदी देशांत काय सुरू आहे, हे या कुमारास माहीत असावयास हवे. जेथे खासगी भांडवलदार नसतात तेथे सरकार भांडवलदाराच्या भूमिकेत शिरते आणि अशी सरकारी भांडवलशाही अधिक असहिष्णू असते, हे भांडवलशाही नष्ट करण्याचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या रशिया आणि चीनमध्ये पाहावयास मिळते. तिआनमेन चौकात जे काही घडले तो फार जुना इतिहास नाही. तेव्हा, भांडवलशाहीविरोधातली कालबाह्य पोपटपंची तरुण कन्हैयाने करण्याने त्याच्यातील आकलनशक्तीचा अभाव समोर येतो. “

-- ‘ दे रे कान्हा ... ‘ हे आजच्या लोकसत्तातले संपादकीय.

-- या संदर्भातच या कन्हैयाकुमाराचे हे वाक्य किंवा सुभाषित विचारात घ्यायला हवे – “ जो गलतको गलत कहता है वह वामपंथी होता है ! “

‘ बादलोंसे दूर और भी है एक जहाँ

चलो हम दिखायें क्या है जिंदगी वहाँ ‘

( -- गाणे – ‘ ये हसीन रात, ये बहार, ये समां ‘

-- चित्रपट ‘ गर्ल्स हॉस्टेल ‘ )

-- तिला माहीत असते, याचा हेतू वेगळाच आहे, हा बंडल मारतोय, असा काही जहाँ वगैरे नाहीय –

पण, त्यावर विश्वास ठेवल्याचा आभास निर्माण करणे तिलाही आवडते !

-- याला म्हणतात रोमँटिसिझम

अशा पोस्ट मी तज्ञ, मास्टर लोकांसाठी देत नाही -- काही फ्रेंडसना उपयोग होऊ शकेल, असे वाटल्यामुळे देतो -- तज्ञांनी हा त्यांचा अपमान समजू नये, ही नम्र विनंती ! --

प्राशन झालेल्या दारूचा पूर्ण परिणाम एक तासाने होतो -- तोवर, अजून चढली नाहीय, असे वाटून माणूस आणखी पीत राहतो -- आणि मग, एकूणात ती जास्त होते ! त्यामुळे, स्वत:ची नेमकी गरज ओळखता येणे बरे !

MARCH 5

डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या ‘ कोसला ‘ ( कादंबरी ) आणि ‘ देखणी ‘ ( कवितासंग्रह )

यांवर आधारित नाट्याविष्कार

‘ मी पांडुरंग सांगवीकर ‘

मूळ संकल्पना – अनिल कांबळे, रंगावृत्ती आणि दिग्दर्शन – मंदार देशपांडे, प्रमुख भूमिका – पद्मनाभ बिंड

एकाच लेखकाच्या दोन वेगवेगळ्या कलाकृतींचा मिलाफ करणारा असा नाट्याविष्कार, मला वाटते, हा प्रथमच घडतो आहे. त्यासाठी, मुळात या संकल्पनेला दाद द्यायला हवी. कादंबरीही आत्मचरित्रात्मक आणि कविताही व्यक्तिगत प्रतिक्रियांच्याच, त्यामुळे, ही संकल्पना सार्थ आणि यशस्वीही झालेली आहे.

कादंबरीतल्या प्रसंगांची निवड – पुण्यात येणे, वसतिगृह-जीवन, उंदीर मारणे, रात्री एक वाजता पाच वाजल्याचे पटवून एका साध्या मित्राची केलेली फजिती, नऊ हजार साली आताचा इतिहास कसा लिहिला जाईल त्याबाबतचे संभाषण, बहिणीचा मृत्यू, घरी परतणे, वगैरे – योग्यच आहे. कवितांची निवडही योग्य आणि चपखल वाटली.

पांडुरंगाचा सटरफटरपणा, गंमतीशीरपणा आणि भावुकपणा – हा आलेख नीट मांडला गेला नाही कारण पद्मनाभचे फारसे अधोरेखन झाले नाही. तो सहायक अभिनेत्यांत मिसळून गेला. कादंबरीतले प्रसंग त्या काळात खूप वेगळे, मजेशीरही वाटले तरी आता त्यात फारसा चार्म वाटला नाही. बहीण वारल्याचा प्रसंग पद्मनाभने त्याच्या ताकदीने केला..कवितांच्या बाबतीत फारच प्रश्न आले. सगळे भावनिकपणे सादर करायच्या नादात कवितांचे शब्द हरवत होते. प्रत्येक शब्द सुटा पण सलगपणे पोचत राहिला पाहिजे याची मुळीच काळजी घेतलेली नव्हती. एक कविता तर मुळीच नीट ऐकू न येता ती म्हणणाऱ्या नटाच्या ऊरबडवेपणालाच टाळ्या खाऊन गेली ! एकूणच हा प्रयोग दिग्दर्शनात कमी पडला, असे वाटले.

नेमाड्यांच्या गाजलेल्या कलाकृती वेगळ्या माध्यमातून सादर करणारा हा प्रयोग वैशिष्ट्यपूर्ण आहे, पण, अधिक विचार आणि, विशेषत: कवितांच्या बाबतीत अधिक कौशल्य आणि सफाई यांची आवश्यकता आहे, असे वाटले.

नेमाड्यांच्या लोकप्रियतेमुळे गर्दी खूप होती !

MARCH 4

shared Bhadrakali Productions's photo.

'''भद्रकाली''ची ५२वी कलाकृती

''ढोलताशे'' #नाटक #मराठी

रविवार ६ मार्च दुपारी ४:३० वाजता

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'

"भद्रकाली"ची ५२वी कलाकृती

"ढोलताशे" #नाटक #मराठी

रविवार ६ मार्च दुपारी ४:३० वाजता

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

चाँदसी मेहबूबा हो मेरी कब ऐसा मैने सोचा था

हाँ तुम बिलकुल वैसी हो जैसा मैने सोचा था

-- म्हणजे ती चंद्रासारखी असावी अशी कल्पना मी केलेलीच नव्हती ( खूपच कमी दर्जाची कल्पना केलेली होती ! ) आणि मी जशी कल्पना केली हॊती तशीच तू आहेस ! – हे प्रेमाने तोंडावर सांगणारा प्रियकर !

चहूंबाजूंनी सर्वस्व-वर्षाव

आणि मी

अस्तित्वातच नसलेला

अशा वेळी

मोर आठवतो

अस्तित्वात नसलेला

पाऊस आठवतो

अस्तित्वात नसलेला

आणि असंख्य

आठवणी आठवतात

अस्तित्वात नसलेल्या

त्या वर्षावात

वर्षावही नसलेल्या –

--- ००० ---

समजा, पूजापाठ ही एक गलत गोष्ट आहे --

समजा, गलतला गलत म्हणणारे वामपंथी असतात --

समजा भारतात कोट्यवधी लोक गलत आहेत --

स्वस्त दारू कमी शुद्ध असल्यामुळे शरीराचे अधिक निर्जलीकरण ( लघवीमुळे ) करते, असे वाचनात आले. भरपूर पाणी पिणे अत्यंत महत्त्वाचे दिसते.

अमुक प्रभाव चांगले, तमुक वाईट
हे प्रत्येकाचे ठरलेले असते
ते प्रत्येकाचे वेगवेगळे असते
त्या सर्वांतूनच त्या त्या वेळी
घडायचे ते घडत राहते --
मधेच कुठेतरी, सत्याचा विजय झाला
असे बरळण्यात अर्थ नसतो --

MARCH 3

न्याय म्हणजे कायदा, न्यायालय, वाद-प्रतिवाद आणि मग न्याय देणारा निकाल – असेच फक्त नसते. दोन्ही पक्षांच्या पूर्ण जगण्याच्या व ताकदीच्या संदर्भातच न्याय मिळणे वा न मिळणे अवलंबून असते. एखादी बाजू कायद्याने चूक वा कमकुवत असली तरीही, न्यायालयात जाऊन वाद चालु ठेवता येतो. ( काही अनपेक्षित तपशीलांनी बाजू पालटूही शकते. ) प्रतिपक्षाला जगण्यात इतर अनेक प्रश्न वा व्यवधाने वा त्रास असतील तर कंटाळून, वैतागून तो तडजोडीला तयार होऊ शकतो ! त्याच्या जगण्यातला हा कोर्टबाजीचा त्रास ( आणि खर्च ) कमी करून मिळणे हाही त्याला मिळणारा एक न्यायच आहे, या समजुतीला तो येऊ शकतो ! माघार घेऊन अन्याय मान्य करणे व स्वीकारणे हाही योग्य न्यायच असल्याचे त्याला पटू शकते !

भाषा हा माणसाच्या जगण्यातला एक अति-महत्त्वाचा विषय आहे. विचार हा भाषेतूनच होत असतो. खुरटलेल्या भाषेच्या माणसांचे विचारही खुरटणार. पूर्ण समाजच जर असा झाला तर तो किती निर्बुद्ध होईल याची कल्पना करावी.

कोणती ना कोणती
दिशा पकडून त्या दिशेने

जाऊ शकणारे मेंदू पाहून
आश्चर्य आणि असूया
वाटावी असा गोंधळ
एकाच ठिकाणी प्रचंड
असंख्य आवाजांचा

एक काहीतरी ठरवून
वेडे व्हावे
हाच शहाणपणा ठरेल
फुकट मरण्यापेक्षा
मारत मारत मरणे
हे उदात्त तरी ठरेल ----
--- 000 ---

अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा खरा अर्थ
म्हणजे
कुणीच कुणाचेही न ऐकणे
आणि
गोंगाट वाढवत नेणे
जणू
राजकीय चर्चा चालु असलेली सगळी चॅनेल्स
एका वेळी चालु ---

MARCH 2

मुख्यमंत्र्यांच्या मनगटावर सत्तर लाखांचे घड्याळ !
ते म्हणतात की ते त्यांना सप्रेम भेट मिळालेले आहे !
एकजण म्हणतोय की ते चोरलेले घड्याळ आहे !
कुणी म्हणतेय की ते सत्तर नाही, फक्त चौदा लाखांचे आहे !

अहो, हे एकच नाही – अशी आणखी दोन आहेत – आणखी कुणी !

वरच्या लेव्हलवर मोठ्या लोकांची जी चाललीय
एकमेकांवर आरोपांची बरसात
त्यापुढे हे काहीच नाही !

जनता सहिष्णू आहे !

तुम्हाला खूप राग आलाय
हे पाहणाऱ्याला खरे वाटले पाहिजे
तरच तो खरा आणि न्याय्य
ठरू शकतो --
( बरोबर-चूक चा प्रश्न नाही. )

MARCH 1

" हळूहळू सुधारेल सगळे. "
" नाही, क्रांतीच हवी. "
-- सहिष्णू राहात !

विचारबाह्य, अजेंडाबाह्य मार्गांनी निवडणुका जिंकल्या जातात.
ते तसे न जमणार्यांनी सहिष्णू राहायचे असते !

१ मने बदलुन नीट झाली की सगळे चांगले होईल.
२ तसे काही होत नसते – सक्तीने बाह्य परिस्थिती नीट करायची, की
मने आपोआप जुळवून घेतील.
-- अशा दोन शक्तींत तुंबळ ताणतणाव चालु असतात, पण,
दोन्ही समूह सहिष्णुतेचे महत्त्व अधोरेखित करत राहतात !

FEBRUARY 29

अन्याय, अन्यायाचा प्रतिकार करणे, अन्याय सहन करणे, अन्यायाची परिस्थितीच बदलायचा प्रयत्न करणे – हे सगळे सर्व मानवी संबंधांत असतेच. शिवाय, एकटेपणा, उदासी, भीती, इच्छा, आत्महत्येचे विचार, सौंदर्यासक्ती, आनंद, हास्य, सूडभावना, अपमानित वाटणे – हे आणि असे खूप काही – हेही असते. असे हे सगळे असणार कलेत आणि साहित्यात – आणि या सगळ्याबाबतच्या विचाराची आणि चिंतनाची त्याला पार्श्वभूमी असणार. – असे ज्या विचारसरणीच्या पचनी पडत नाही ती मानवी जगण्यापासून तुटलेली आणि म्हणून घातक विचारसरणी समजावी.

" तू सारखाच कुणाला ना कुणाला ' दांभिक ' का म्हणत असतोस ? "

" खरे सांगू का – त्यात माझा एक फायदा असतो – "

" कोणता ? "

" मी खूप सज्जन आणि प्रामाणिक आहे, ही माझी भावना – माझा फील – टिकवायला मला त्याचा उपयोग होतो – "

February 2016

FEBRUARY 29

मी, गोंदवलेकर महाराज, निसर्गदत्त महाराज, रमण महर्षी, विवेकानंद, जे. कृष्णमुर्ती, ओशो, तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर -- हे वाचलेले आहेत -- अभ्यास म्हणून नव्हे -- माझ्या जगण्यातली तातडी म्हणून ! मी मुळीच अंधश्रद्ध नाही ! मी एक महादु:खी तर होतोच, शिवाय, कायमचा स्खलनशील आहे ! आता मी एक फालतू आणि मौल्यवान माणूस आहे ! पूर्ण निरर्थक !

' तेज ' चॅनेलची कल्पकता --

बजेटवर रुक्ष चर्चा चालु असताना मध्येच

' मिस मेरी ' सिनेमातले

' पहले पैसा फिर भगवान '

हे गाणे लावले !

ओम प्रकाशाचा उत्तम अभिनय !

FEBRUARY 28

गृहिणी -- ( नाराजीने -- ) आजही उशीर झाला ?

कामवाली -- हो ना --

१ -- ( फोनवर -- ) साहेब आहेत का ?

साहेबपत्नी -- ते पूजेत आहेत -- एक तासाभराने कराल का फोन ?

१ -- ठीक ठीक, करतो --

आणि या ऐवजी --

१ -- ( फोनवर -- ) साहेब आहेत का ?

साहेबपत्नी -- ते कवितावाचनात आहेत -- एक तासाभराने करता का फोन ?

१ -- ठीक -- ( मनात -- ) माजलाय भोसडीचा -- कविता वाचतोय च्युत्या !

जरा बालिश असण्याची शक्यता असलेली एक शंका विचारतोय -- तज्ञांनी लगेच रागावू नये, ही विनंती करून -- अर्थात --
स्वत: कविता न लिहू शकणारा एखादा विद्वान कवितेचा उत्तम समीक्षक असू शकतो,
त्याचप्रमाणे,
स्वत: खूप मोठ्या पोस्टवर नसलेला वा पैशात मोठे खेळ न करणारा
असा एखादा आर्थिक विद्वान, बजेटवरच्या चर्चेत येऊ शकतो की नाही ?
की यासाठी फक्त श्रीमंत विद्वानच लागतात ?

भयानक !!!!!
डोक्यावर आठ टाके आणि कोलर बोन तुटलेले, असा भारतीय रेस्टलर खली
भयंकर सामन्याला तयार --
झी न्यूजवर आत्ता सुरु होतोय तो सामना --

FEBRUARY 27

खरा नायक नेहमी अपघातानेच बनतो ; अन्यथा तो इतरांप्रमाणे एक प्रामाणिक भेकड बनण्याचेच स्वप्न पाहतो.
-- इटालियन कादंबरीकार उम्बेर्तु एको. ( पुणे टाइम्स पृष्ठ २. )

केंद्रात कुणाचेही सरकार असो, त्याच्याकडून देशाचे वा देशातल्या जनतेचे फारसे भले होऊ नये याची विरोधकांना काळजी घ्यावी लागते. सत्तापालटाची शक्यता जिवंत ठेवण्यासाठी हे अत्यावश्यक असते.

आपण जिंकलेले असलो किंवा
१०० टक्के जिंकणार असलो तरीही
नम्र राहणेच बरे -- माणसाचे जगणे
असंख्य आणि अकल्पित शक्यतांनी युक्त असते
याची जाणीव हरपू नये --

ज्याला, जगणे समजून घेण्याची प्रक्रिया अभिव्यक्त करण्यासाठी लिहायचे आहे, त्याने पुरस्कार, पुस्तके अभ्यासाला लावली जाणे -- असल्या भिकारड्या प्रकारांपासून लांब राहायला हवे.

फ्रेंडस, माझेही मन असंख्य विचारांचे गोंधळस्थान आहेच -- त्यातला एक महत्त्वाचा विचार असा आहे की -- माझ्याबरोबर जगणाऱ्यांशी वा कुणाशीही बोलायचे होते -- ते किती घडावे हे माझ्या हातात नव्हते -- जे, जिथे, जेवढे झाले, ते झाले ! पूर्ण झाले सगळे !

FEBRUARY 26

Ganesh Dighe च्या एका पोस्टवरून प्रेरित --
माझ्या लेखनकारकीर्दीत समीक्षक हा प्रकार अस्तित्वातच नाही.
( नाटकांची वर्तमानपत्री परीक्षणे आहेत. )
बाकी, काही आत्ममग्न, ज्येष्ठ युगपुरुष असतात --
त्यांच्या मला आवडलेल्या लेखनाचे मी उल्लेख करत आलो.
पण, त्यांच्या लेखी अजून माझा जन्मच झालेला नाहीय.
( तेंडुलकरांकडे दिलखुलास दाद देण्याची कुवत होती. )
नावे द्या सोडून --
या निमित्ताने नवीन लेखकांना हे सांगावेसे वाटते --
आवडीनिवडी, हितसंबंध, वगैरे असणारच --
डटे रहो -- आपले काम करत राहा --

माझा म्हणावा असा नाट्यग्रुप माझ्याकडे नव्हता.

ज्यांनी माझी नाटके सादर केली तेच माझे झाले.

माझे नाटक करू इच्छिणाऱ्या कुणालाही मी नकार दिला नाही.

अमुक एवढ्या मानधनासाठी कधी अडवले नाही.

अटी घालाव्यात असा ' मोठा ' लेखक मी कधी झालोच नाही.

FEBRUARY 25

बोलण्याची वेळ संपलेला वक्ता -- " भारतका किसान, भारतका गरीब, "

" हं ठीक है, चलो -- "

" भारतका दलित, "

" हं हो गया, चलो अब -- "

" कितने लोग -- "

" चलो, अब बस हो गया -- "

" यहां कितने लोग -- "

" बैठ जाओ अब -- चलो, नेक्स्ट -- "

FEBRUARY 24

( उद्दामपणे -- ) " तो कसला मला घाबरतो -- मीच त्याला घाबरतो ! "

अविश्वास ठरवावरच्या चर्चेची सभा चालु होती. त्यात एक तरतूद अशी असते की उपस्थित सभासदांतल्या बहुमताने -- बहुसंख्यांच्या सह्या घेऊन -- पॉइंट ऑफ ऑर्डर आणून ती चर्चाच थांबवता येते आणि सभा बरखास्त होते. तसे शक्य असल्याने ते केले गेले. तो सह्यांचा कागद सभेच्या अध्यक्षाकडे दिला गेला. अध्यक्ष दाक्षिणात्य होता. तो म्हणाला, " पॉइंट ऑफ ओर्डर आलेला आहे आणि तो फाईल करून घेतला आहे, त्यामुळे, ही सभा संपली आहे. " ती गोष्ट कोर्टात गेली. कोर्टाने निकाल दिला की अध्यक्षाने ती पॉइंट ऑफ ऑर्डर सभेने ' स्वीकारली आहे ' असे म्हटलेले नाही, त्यामुळे, ती सभाच बेकायदेशीर झालेली आहे.

सारांश : -- तुम्ही नुसते बरोबर आणि न्याय्य असणे पुरेसे नसते -- तुम्ही कायद्याच्या रचनेप्रमाणेही बरोबर आणि न्याय्य असणे आवश्यक असते !

FEBRUARY 23

आपल्या, नात्यातल्या, शेजारच्या वा ओळखीच्या घरात
एखादे संकट असायलाच हवे !
चघळणार काय नाहीतर ?

मानवी बुद्धीने तयार केलेली कोणतीही रचना ही पूर्ण भविष्य सामावून घेणारी असूच शकत नाही. उदाहरणार्थ, कायद्याचे क्षेत्र. एखादा नवा, वेगळाच, अद्वितीय प्रश्न समोर येतो. त्या वेळी स्वत:चे बरोबर वाटणाऱ्या व्यक्तीने वा समूहाने धडाडीने कृती करणे आवश्यक असते. तिथे सारखे भूतकाळाचे दाखले शोधत बसण्यात अर्थ नसतो.

FEBRUARY 22

आपण आहे ते सगळे गृहीत धरू इच्छितो,पण, सगळी स्वप्ने मात्र त्याविरुद्ध बघतो !

संघर्षहीनता, युद्धहीनता, भेदभावहीनता, विषमताहीनता, दु:खहीनता, हिंसाहीनता -- असे जर माणसाला जगता आले तर ते फारच कंटाळवाणे होईल, असे काहींना वाटते ! कोणतीही आदर्श विचारसरणी याच दिशेने जाण्याच्या प्रयत्नात नसते ? आणि कोणताही धर्म ? -- याचा अर्थ, बिगरकंटाळवाणे, इंटरेस्टिंग जगायचे असेल तर कोणतीही आदर्श विचारसरणी वा धर्म, हे काहीच नसावे ! ( आपल्या स्वत:च्या आयुष्याच्याही यामुळे चिंधड्या उडू शकतात, हे आलेच यात ! )

" मी अद्वैतवाद मानतो ! "

( अशी ही एकाच वाक्याची पोस्ट आहे. अवतरण चिन्हात आहे, हे लक्षात घ्यावे. इथे काहीही लिहिले की ते व्यक्तिगत आहे, असे समजणारे काही फ्रेंड आहेत -- म्हणून हा खुलासा. )

FEBRUARY 21

अन्नग्रहण असो की जगणे

बऱ्याचदा त्याला

उरकण्याचे स्वरूप येतेय --

कोणत्याही मताला विरोध असणारच.

गोंधळ, विध्वंस, जाळपोळ, हिंसा हे सगळे सगळ्यांनाच करावेसे वाटतेय, अशी सगळ्यांचीच मन:स्थिती दिसतेय ! खरे तर याची परवानगी सर्व सत्ताधार्यांनाही असायला हवी ! मग, राहता राहतील कोण ? पोलीस आणि सैन्यातले लोक ! त्यांनाही देऊन टाकावी परवानगी ! मस्त मनासारखे होईल सगळ्यांच्या ! एकदाच काय ते मने मोकळी, स्वच्छ होऊन जातील !

FEBRUARY 20

काही हॉटेल्स, आस्थापने, घरांचे दिवाणखानेही – अशा अनेक ठिकाणी ‘ मॉडर्न ‘ टाईप – आकार, आकृती ओळखता येणार नाहीत अशा रचना, चित्रे लावलेली दिसतात. ती खूप उंची आणि महागही असतात. जनतेची अभिरुची उंचावली असावी का ?

FEBRUARY 19

गंभीर आणि विनोदी यांतला फरकच पुसून टाकायच्या कामाला लागलेत सगळे !

ब्लॅक ( black ) कॉमेडी म्हणतात ती हीच की काय, कोण जाणे !

हा घ्या मानवी बुद्धिमत्तेचा एक उत्तुंग षटकार --

कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्याच्या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनात

विध्वंस आणि जाळपोळ !

१ कितीही आरडाओरडा केला तरी ज्याचे बीपी आटोक्यात राहते

तो चर्चेसाठी योग्य प्रतिनिधी समजावा.

२ आपण माथेफिरू आहोत अशी स्वतःची प्रतिमा स्थापित करणाऱ्याशी

सगळे सहिष्णुतेने वागतात.

३ नुसते विचार मांडणे वा विरोधकांच्या टिंगलटवाळ्या करणे

याने आपापल्या गोटात जरा बरे वाटते, इतकेच.

-- ही तत्त्वे लक्षात घेऊन सर्वांनीच माजुर्डेपणाच करत राहावे – असे --

हो, आहोत आम्ही संकुचित !

हो, आहोत आम्ही हिंदुत्ववादी !

हो, आहोत आम्ही साम्यवादी !

हो, आहोत आम्ही देशप्रेमी !

हो, आहोत आम्ही भाषावादी !

हो, आहोत आम्ही काँग्रेसवाले !

हो, आहोत आम्ही संघवाले !

हो, आहोत आम्ही पुरस्कार-वापसीवाले !

हो, आहोत आम्ही अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते !

आणि शेवटी --

हो, आहोत आम्ही सहिष्णुतावादी !

-- सतत माजुर्डेपणानेच बोलायचे !

-- या उपायाने माजुर्डेपणाचा रोग आटोक्यात येईल !

-- आणि सहिष्णुतेचे राज्य अस्तित्वात येईल !

--- ००० ---

इथे जगण्यातली अब्सर्डीटी मांडलेली आहे --

इथे आंतरद्वंद्व --

इथे शोकात्मता --

इथे निरर्थकता --

-- असे पोस्टखाली लिहीतच जावे की काय --

विचारसरणी कोणतीही असो, ती यशस्वी व्हायला हवी असेल तर भलेबुरे, नैतिक-अनैतिक सर्व मार्ग वापरायला हवेत ! प्रसंगी ते त्या विचारसरणीच्या विरुद्ध असले तरी चालेल ! तुम्हाला नैतिक राहायचेय म्हणून तुम्ही एक चांगली विचारसरणी फेल ( अयशस्वी ) होऊ देणे, हे योग्य नाही !

काही जणांना जे दिसते ते त्यांना इतके सरळ, निर्विवाद सत्य वाटते की
आपले बोलणेच खुंटते !
आपल्याला दिसणारे दुसरे काही बोलणे म्हणजे गुन्हाच वाटायला लागतो !

आपण त्याची ( गाय ) मारण्याचे महत्त्व मानणारे असलो आणि उलट त्यानेच आपली ( गाय ) मारली तर तक्रार करण्यात अर्थ नाही !

आपल्याला विचारस्वातंत्र्य नव्हे, विचारवर्चस्व हवे असते -- आणि हे असे सगळ्यांचेच असते !
मग राहतो शक्तीचा खेळ ! तोच खरा निर्णायक !

झी न्यूजवर जे एन यू बद्दल चर्चा चालली होती. तिथेच शिकवणाऱ्या एक प्राध्यापिका होत्या सहभागी. त्या म्हणत होत्या की तिथे काही बौद्धिक उद्दाम / घमेंडखोर लोकांचा खूप दबाव आहे. निवडसमितीवरही त्यांचा प्रभाव असतो. आता काही लोक म्हणताहेत की सरकार विचारांवर दबाव आणतेय. तसे घडत असेल तर ते वाईटच आहे. पण, मग, त्या आधीचा दबाव कुणाचा आहे ? ते बौद्धिक उद्दाम कोण असावेत ? की तसे काही नसेलच ? त्यावर कुणी बोलताना तर दिसत नाहीय --

शाळांमध्ये होणाऱ्या सामूहिक हत्यांच्या गोळीबारांपासून पासून बचाव व्हावा या हेतूने आता ०१-०८-१६ पासून अमेरिकेत विद्यार्थ्यांना शाळेत पिस्तूल नेण्याची परवानगी मिळणार आहे ! यावर घमासान चर्चा चालु आहेच -- मुख्यत: शिक्षकांचे धाबे दणाणले आहे !
माणूस हा एक बुद्धिमान प्राणी आहे, हेच खरे !

FEBRUARY 17

" हिंदुस्तानका हर एक आदमी अगर तय करेगा कि मै हिंदुस्तानको गंदा नही करूंगा तो दुनियाकी कोई भी ताकद हिंदुस्तानको गंदा नही कर सकती ! "
मला एक कळत नाही -- प्रत्येक वेळी दुनियेतल्या ताकदींना ललकारायची गरज काय आहे ?

मनाची तरलता / लवचिकता, सहानुभूती, आपल्या अनुभवात नसलेल्या गोष्टींना खुले राहणे, नुसते आत्मकेंद्री जगण्यातले वैयर्थ्य दिसणे, निसर्गातले / जगण्यातले सौंदर्य जाणवणे, सर्वांबाबत सदभावना राहणे -- या आणि अशा गोष्टींची जोपासना आणि संवर्धन करणे, हे कलेचे कार्य असते. या गोष्टी नष्ट झाल्या तर माणसे स्वयंचलित रोबो होऊन एकमेकांना नष्ट करून

टाकतील. कलेचीे ही व्यापक सांस्कृतिक अर्थपूर्णता समजून न घेता, कला म्हणजे करमणूक, एवढेच समजणे, हे आत्मघातकीपणाचे आहे.

मनाची लवचिकता, तरलता नष्ट होणे म्हणजे मृत्यूच की !
कडक विचारसरणी, कर्मठ मते वा कोणतीही अस्मिता
-- यांतले वा इतरही, काहीही असो कारण !

FEBRUARY 16

"ढोलताशे"
शनिवार २० फेब्रुवारी रात्री ८:३० वाजता...
प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, बोरीवली

मला राजकारणातले काही कळत नाही.
ते कळावे म्हणून मी खास काही प्रयत्नही करत नाही.
तरीही, मला एका मताचा अधिकार आहे -- कुणाही तज्ञाइतकाच !
त्या अधिकारात बोलतोय --
विरोधात असताना बीजेपी / जनसंघवाले वा कोन्ग्रेसवालेही
कम्युनिस्टांचा उपयोग करून घेतात, असे दिसते !
यात कोण मूर्ख, हलकट, नीच वा आपमतलबी असते ?
की जनतेसह सगळ्यांनाच हा भंगार खेळ आवडतो ?

ज्याला स्वत:च्या कलानिर्मितीचे महत्त्व असेल
त्याने पुरस्कारांसाठी फील्डिंग न लावणेच चांगले !
फील्डिंग लावल्याचे लोकांना कळते आणि
त्याचा तुमच्या कलानिर्मितीवर धब्बा येतो !

अमका

म्हणजे, अरुण महादेव काकडे या पूर्ण नावातली अद्याक्षरे समजा किंवा अमका-तमका मधला ' अमका ' समजा ! काकडे काकांचे आत्मचरित्र. सुरुवातीलाच काका म्हणतात की नाटक ही एक सामुदायिक कला आहे, त्यात माझे योगदान किती ते रसिकांनीच ठरवावे. पुढे ते लिहितात, माधव वाटवे नेहमी म्हणायचा, "अरुण, तू नसतास तर रंगायन, आविष्कार, छबिलदास असतं का ? – तू अथकपणे आमच्यामागे उभा राहिलास म्हणून हे घडलं. " आणि पुढे ते लिहितात – जी कामं केल्याशिवाय संस्था उभी राहात नाही, नाटक उभं राहात नाही, कलाकार उभा राहात नाही, चळवळ उभी राहात नाही – ती सर्व कामे करण्यात हयात गेली. काका स्वतः एक उत्तम नट असूनही नाट्यक्षेत्रात त्यांनी प्रामुख्याने एका निरलस संयोजकाची भूमिकाच बजावली. या संस्थांच्या २०० हून अधिक नाट्यकृती, त्यांचे ५००० हून जास्त प्रयोग आणि छबिलदास चळवळीतले २००० हून अधिक इतर संस्थांचे प्रयोग – असा हा प्रचंड नाट्यसंसार काकांनी केलेला आहे ! नाट्यकर्मींच्या चरित्रांत आपण विजया मेहता आणि श्रीराम लागू यांच्या आत्मचरित्रांकडे खूप अपेक्षेने जातो. अमुक नाटके का निवडली, आशयदृष्ट्या तुम्हाला कसे नाटक महत्त्वाचे वाटते, एखादी भूमिका का आव्हानात्मक वाटली, त्या बाबतीत काही प्रश्न पडले का, समस्या आल्या का, त्यांना कसे तोंड दिले, अमुक प्रकारची काही कमतरता राहूनच गेली, असे कधी वाटले का, नाटकाचा आणि जगण्याचा संबंध कसा वाटतो, नाटकाचे सांस्कृतिक काम कोणते – अशा प्रश्नांबद्दल त्यांत काही असेल म्हणून आपण ती पुस्तके वाचतो. पण, निराशा पदरी पडते. पुढच्या पिढ्यांना नाटक आतून समजायला मदत व्हावी असा मजकूर फारसा सापडतच नाही. त्या फक्त त्यांच्या यशोगाथा असल्याचे दिसते ! काकडे काकांनी मुख्यतः संयोजक-सूत्रधार या रूपात काम केले. नाटकाच्या बाह्य अंगांशी, व्यवहारांशी, नियोजनाशी त्यांचा संबंध आला. त्या बाबतीतले अनुभव समजावेत याच प्रमुख उद्देशाने आपण हे ' अमका ' वाचतो, आणि आपल्या त्या अपेक्षा इथे नक्कीच पूर्ण होतात. या पुस्तकातल्या २६८ पैकी पहिली सुमारे १०० पाने काकांच्या व्यक्तिगत घडणीची आहेत. पुढे अनेक प्रमुख नाट्यकृतींच्या घडत जाण्याच्या ' बाह्य ' प्रक्रियांबद्दल काका बोलतात. त्यांतही ' तुघलक ', ' एक शून्य बाजीराव ', आणि ' शांतता कोर्ट चालु आहे ' यांबद्दल काका विशेष आत्मीयतेने बोलतात. या एकूण प्रकारात काकांच्या स्मरणशक्तीला दादच द्यायला हवी ! त्यांच्याकडे काही नोंदी ठेवलेल्याही असतील, पण, इतके तपशील, इतक्या घटना अशा आठवणे हे काकांच्या एकनिष्ठ नाट्यप्रेमाचे निदर्शक आहे ! मराठी रंगभूमीच्या एकूण इतिहासातला हा एक मोठा आणि अति-महत्त्वाचा भाग काकांच्या परिश्रमांमुळेच घडत गेलेला आहे. अशा प्रकारच्या या कामाला कुठे कुणी प्रसिद्धी वा ग्लॅमर देत नसते ! तरीही काका ते निष्ठेने करत राहिले ! तसे ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित तर झालेले आहेतच, शिवाय ते नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवणारेही ठरले आहेत !

' आपल्या अपेक्षा पूर्ण करणारे नाट्यकर्मींचे आत्मचरित्र ' हा निकष लावला तर काकांचे हे पुस्तक मला नंबर वन वाटते. आणखी बऱ्याच नाट्यनिर्मितींच्या कथा यायच्या राहिलेल्या आहेत, त्या पुढल्या भागात येतील, अर्थातच.

काकांनी हे एक मोठे काम करून ठेवल्याबद्दल त्यांना, तसेच, हे एक महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल ' आविष्कार ' आणि ' मौज प्रकाशन ' यांना धन्यवाद !

--- ००० ---

FEBRUARY 15

१ इतकी असहिष्णुता असूनही जनतेने त्यांनाच कशी मते दिली -- याचे रहस्य शोधावे लागेल --
२ असहिष्णुतेचा प्रचार खोटा आहे, हेच जनतेने दाखवून दिलेले आहे !

पराभवमीमांसा --
आमची व्यूहरचना कुठेतरी चुकली असावी आणि प्रचारात आम्ही जरा कमी पडलो.

Super duper fun watching DHOL TASHE. A fabulous play. I love the thought, sarcasm, performances, set, direction. Had seen the earlier one. This one is at power. 'Timing' cha purna sense...
Shevti changla naatak te changla naatak.

Rock on Navnath Prasad Kambli Abhijit Guru Rajan Bhise Amruta Sant rahul Rahul Ranade kshitee jog ujwala jog lalit prabhakar vijay kenkre

shared Abhijit Guru's post.
'Thank you so much Samirji..
Awaaj tar honarach..
DHOL TASHE
Udya dupari 3.30 vajata Shivaji mandir dadarla.'
Thank you so much Samirji..
Awaaj tar honarach..
DHOL TASHE
Udya dupari 3.30 vajata Shivaji mandir dadarla.

shared Prasad Oak's photo.

'आस्तिकतेमधला दांभिकपणा आणि नास्तिकतेवरची श्रद्धा यावर अप्रतिम भाष्य करणारं नाटक "ढोल ताशे". "दर्शन" न बघताही होऊ शकतं पण आपण त्याचं प्र"दर्शन" मांडतो. सण साजरे करण्याचं फॅड, ध्वनी प्रदूषण, हिंदुत्ववाद, परंपरा, संस्कृती, माणसाला लागलेली उत्सवांची लागण, नवतावाद, प्रवाहाविरुद्ध वागणाऱ्यांची होणारी घुसमट या आणि अशा अनेक विषयांवर आपली ठाम मतं मांडत

"चं प्र" आपल्याला विचार करायला भाग पाडतातच..

सर्व तांत्रिक बाबीत हे नाटक उत्तम आहेच.

पण त्याच बरोबर अत्यंत उत्तम कलाकारांमुळे ते अधिक रंगत जातं.

@[100001097463592:2048:Abhijit Guru] , राजन भिसे, उज्वला जोग आणि क्षिती जोग या सर्वांनीच अप्रतिम कामं केली आहेत. पण या नाटकामुळे "ललित प्रभाकर" हा एक अत्यंत देखणा आणि हुशार अभिनेता मराठी रंगभूमीला मिळाला.. त्याचं आपण मनापासून स्वागत करायला हवं..

विजय केंकरे अभिनय आणि दिग्दर्शन दोन्हीत बाजी मारून जातात.

"भद्रकाली" तर्फे पून्हा एक उत्तम नाटक दिल्याबद्दल मित्रवर्य @[100000057308223:2048:Navnath Prasad Kambli] याचं मनःपूर्वक अभिनंदन...'

बाकी सगळे जाऊ द्या -- आकर्षणाशिवाय प्रेम म्हणजे काय, ते सांगा -- शुद्ध प्रेम म्हणजे काय?

तुर्की लोकांनी कुर्दिश लोकांवर हल्ले करणे म्हणजे अतिरेक्यांना पाठिंबा देणेच आहे -- असे सीरियन सरकार म्हणतेय ! यात आणखी अनेक पार्टी गुंतलेल्या आहेत -- त्या प्रत्येकाचे असेच काही गुंताड्याचे म्हणणे आहे ! तरी किती शांत, सहिष्णू आहेत सगळे ! शांतपणे, नीट बोलतात -- अजिबात आरडा ओरडा नाही ! सगळ्यांचे हात-पाय असे गुंतलेत एकमेकांत की कुठला कुणाचा हात आणि कुठला कुणाचा पाय हे कळणारच नाही ! फारच भले आणि बुद्धिमान लोक !

FEBRUARY 13

आपुलकी, आस्था, आकर्षण,

वासना, इच्छा, स्वामित्व,

आवड-निवड, मतभेद,

समज-गैरसमज,

रागालोभांचे हेलकावे,

भांडणांच्या शक्यता,

वियोगाचे वा तुटण्याचे दुःख

-- हे असे काहीच नसलेले

हवेय ना पवित्र प्रेम ?

-- या घ्या लाख शुभेच्छा !

हे प्रश्न सुटू देत, मग

तो गोंधळ शमू दे, मग

मी जगून दाखवेन

सर्जक आणि श्रेयस्कर

बनून --

कोट्यवधी प्रश्न आणि गोंधळ आहेत

क्ष ला सर्वांवरची उत्तरे माहीत आहेत

बहुसंख्य लोक त्याचे ऐकत नाहीत

हाच खरे तर आहे मुख्य प्रश्न

-- असे बरेच आहेत वेगवेगळे

क्ष !

shared Bhadrakali Productions's post.

Thank you !!!

Mihir Nishith Rajda

#DholtasheNatak is neat, sleek, simple with a powerful impact.

Loved it to the core!

Great ensemble!

For great performance can't name one but all...Such is the impact of all the characters performed.

Vijay Kenkre no doubt is an institute rather a university we can learn a lot from.

Set and Music were never less than characters on stage.

Hats off to #Bhadrakali productions.....

A soulful experience it was.

Thank you so much! Regards n best wishes to the whole team. Take a bow!!!

" मेरे सवालका जवाब दो -- "

" आपही दो मेरे सवालका जवाब -- "

" आप टाल नही सकते -- "

" उस बातको आप भूल गये क्या ? "

" आप झूठ बोल रहे हो -- "

" पहले मुझे ये बताइये -- "

बोंबाबोंब, आरडाओरडा, आणि नैतिक आणि सात्त्विक संताप !

चर्चा संपली !

FEBRUARY 12

shared Lalit Prabhakar's post.

'आज ४:३० वाजता दिनानाथ, पार्ले

ढोलताशे

नक्की या'

आज ४:३० वाजता दिनानाथ, पार्ले

ढोलताशे

नक्की या

shared a link.

loksatta pune, 13-02-2016 : readwhere

readwhere.com

http://epaper.loksatta.com/720400/loksatta-pune/13-02-2016#page/10/2 -- पृ १० या पानावर ' ढोलताशे ' बाबतची बातमी आहे--

" तुम इतने डरपोक हो की तुम्हे मौका मिला तो भी तुम फायदा नही उठा पाओगे ! "

हे वाक्य नायिका नायकाजवळ ( विनालग्न ) झोपत असताना म्हणते ! चित्रपट --

सनम रे

सरळ साधा मस्त रोमांटिक चित्रपट. सर्व तर्हेच्या नयनसुखाने युक्त !

वास्तवाची, पटण्या न पटण्याची चिंताच नाही ! वाटल्यास गावच्या गाव निर्मनुष्य -- हवे तर हवी तीच तेवढीच माणसे असणार !

एकदा स्वप्नरंजनाचा मूड पकडला की कुछ भी करते जाओ !

असे स्वप्नील चित्रपट जर लोकांना हवे आहेत तर तशा कादंबर्याही हव्या असतील --

का नाही लिहिल्या जात तशा कादंबर्या ?

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे"

आज शुक्रवार १२ फेब्रु. २०१६   दुपारी ४.३० - प्रबोधनकार ठाकरे बोरीवली

#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav'

"ढोलताशे"

आज शुक्रवार १२ फेब्रु. २०१६ दुपारी ४.३० - प्रबोधनकार ठाकरे बोरीवली

#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे"

शुक्र १२ फेब्रु. २०१६ - दुपारी ४.३० प्रबोधनकार ठाकरे बोरीवली

#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav'

"ढोलताशे"

शुक्र १२ फेब्रु. २०१६ - दुपारी ४.३० प्रबोधनकार ठाकरे बोरीवली

#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav

FEBRUARY 11

बोचकारणाऱ्या, बोचणाऱ्या वा भोसकणाऱ्याही कॉमेंटस येऊ शकतात.

फेसबुक तुम्हाला सहनशील आणि समजूतदार बनवते !

( खरे तर मैत्रीत भोसकणेे अपेक्षित नसते -- )

shared Amruta Sant's post.

Amruta Sant's photo.

Amruta Sant's photo.

Dhol Tashe in theatres tomorrow Borivali Prabodhankar Thakre 4.30 pm

13th Dinanath parla 4.30pm

15th shivaji mandir Dadar 4pm

Nakki yaaa

Book your tickets now

आय डी ( ओळख )

दोन अंकी नाटक, निर्मिती -- ' अभिनय ' कल्याण, लेखक – प्रणव सखदेव, दिग्दर्शक – अभिजित झुंजारराव.
खरी ओळख विदीर्ण असणे, त्यातून एक आभासी ओळख तयार करणे – तीही खऱ्याशी जुळती न करता खोटेपणा मिसळून करणे, नंतर खरी ओळख चोरली जाणे आणि फक्त आभासी ओळख टिकणे, मग काही काळ दुसऱ्याचीच ओळख स्वीकारावी लागणे आणि शेवटी मूळची ओळख परत मिळणे आणि पुन्हा आभासी ओळखीकडे जाण्याचा मार्ग मोकळा होणे – अशा टप्प्यांनी हे नाटक घडलेले आहे. नाटकासाठी विषय तसा अवघड आहे आणि त्या विषयाची हाताळणीही सरळ त्यातल्या तात्त्विक प्रश्नांना भिडतच केलेली आहे. आयडेंटिटी ( ओळख ) हा प्रकारच जर त्रासदायक, उपरा, खोटा असेल तर काय ? आणि नकोच ती ' ओळखी ' ची भानगड, असे म्हटले तर तुमचे जगणे ' तुमचे जगणे ' होणार कसे ? आधाराला, धरून ठेवायला काय असेल ? – अशा प्रश्नांचे हे नाटक आहे. नव्या लेखकांमध्ये जे आश्वासक, चांगले लेखक आहेत, त्यांतला प्रणव हा एक आहेच. आजच्या जगण्यातली गिचमिड आणि गोंधळ आणि त्यातून येणारी विदीर्णता आणि अस्वस्थता यांना भिडायचा त्याचा हा प्रयत्न नक्कीच धाडसाचा म्हणायला हवा. अभिजितने या वैचारिक-चिंतनात्मक नाटकाला उत्तम दृश्य कोंदण दिलेले आहे. कलाकारही सगळे आपापली कामे समजून करतात. ओळख-चोर मात्र एनर्जी कमी ठेवत होता, त्याचे काही संवादही नीट ऐकू आले नाहीत. बाकी, प्रयोग चांगला झाला, मला नाटक आवडले. एक मात्र असे वाटले की हे नाटक जरा लांबते आहे. आटोपशीर करून हे दीर्घांक रूपात सादर व्हावे.
नवे लेखक अशा चिंतनात्मक विषयांना हात घालताहेत हे नक्कीच स्वागतार्ह वाटते. आणि त्याचबरोबर त्यांना चांगले दिग्दर्शकही मिळताहेत.
माझ्या मते स्वागतार्ह नाटक !

सध्या, आदरणीय काकडे काकांचे ' अमका ' वाचतोय --

FEBRUARY 10

सारखा उपरोधाचा वापर करत इतरांना क्षुद्र लेखण्याची सवय, ही एक गंभीर मानसिक विकृती असते. भीती आणि वैफल्य यांना आक्रमक आत्मविश्वासाचे रूप देण्याचा तो एक केविलवाणा प्रयत्न असतो.

समजा एखाद्याला पु. शि. रेग्यांची कविता आवडत असेल तर त्यावर दुसरा असे म्हणू शकतो -- या भोसडीच्याला ना कसला त्रास, ना कसले दु:ख, ना याच्यावर कसला अन्याय -- कविता एन्जॉय करत बसतो भडवा !

खूप डेड तपशीलांची स्टोरी नको -- प्रत्यक्ष जगण्याशी संबंधित बोल -- थोडक्यात --

खूप अनुभवसमृद्ध असण्याचा गर्व, खूप अभ्यास असण्याचा गंड वा खूप लौकिक यश मिळाल्याचा माज -- असे काही असलेल्या माणसाची आकलनशक्ती कमी होते -- त्याला साधी साधी सत्येही समजेनाशी होतात.

FEBRUARY 9

समीक्षक वा कुणीही वाचक आपापल्या मूल्यधारणा , आवडीनिवडी व अपेक्षा यांसहच साहित्य वाचतात.
( कोऱ्या मनाचा वाचक असे काही नसते. )
उदाहरणार्थ -- सामाजिक बांधिलकीयुक्त वा भक्तिरसयुक्त.
काय, कशा, कोणकोणत्या असतात या धारणा व आवडीनिवडी-अपेक्षा ?

shared Bhadrakali Productions's photo.
'"ढोलताशे"
शुक्र १२ फेब्रु. २०१६ - दुपारी ४.३० प्रबोधनकार ठाकरे बोरीवली
#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav'
"ढोलताशे"
शुक्र १२ फेब्रु. २०१६ - दुपारी ४.३० प्रबोधनकार ठाकरे बोरीवली
#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav

FEBRUARY 6

जे. कृष्णमूर्ती शाळा.

सतत कोणत्या ना कोणत्या महापुरुषाची महती विद्यार्थ्यांच्या डोक्यांवर हॅमर करत त्यांची स्वतःची सर्जनशीलता ठार मारण्याच्या निरलस प्रयत्नात असलेल्या आपल्या एकूण शाळांच्या पार्श्वभूमीवर जे. कृष्णमूर्ती शाळा वेगळेपणाने लक्षात येण्यासारख्या आहेत. कुठेही जेकेंचा फोटो नाही, त्यांची महती सांगत बसणे नाही. जेकेंचे निधन झाले त्या दिवशीही या शाळांना सुट्टी दिलेली नव्हती.
या शाळांबाबत चांगली माहिती देणारा हेरंब कुलकर्णी यांचा एक उत्तम लेख आजच्या पुणे सकाळच्या सप्तरंग पुरवणीत आलेला आहे. हा लेख खास वाचनीय आहे.
नासिरुद्दिन शहा यांचा मुलगा या शाळेचा विद्यार्थी होता ही एक महत्त्वाची ‘ धर्मातीत ‘ बाब आहे. आपल्या इथल्या फ्रेंड सुषमा फडके -- Sushama Phadke -- यांची कन्याही त्या शाळेत शिकलेली आहे. आपला एक बुद्धिमान नाट्यकर्मी सुनील शानबाग हा जेकेंच्या राजगुरुनगरजवळच्या वाडा इथल्या शाळेत मुलांना नाटक शिकवतो.
या लेखातल्या अनेक गोष्टी पालकांनीही समजून घ्याव्यात अशा आहेत. उदाहरणार्थ, रोज संध्याकाळी सूर्यास्त पाहणे !

मानवी संबंध मतांच्या स्तरावर समजतात, असे व्यक्त करणारी कला, फालतू असते.

कोपनहेगन

‘ कोपनहेगन ‘ या नाटकाचे अभिवाचन. कोल्हापूरचा ‘ प्रत्यय ‘ हा आमचा ग्रुप. अनुवादक माझे मित्र डॉ. शरद नावरे. अभिवाचक सागर तळाशीकर, डॉ. शरद भुथाडिया आणि मेघना. अभिवाचन उत्तमच ! दोन ग्रेट शास्त्रज्ञ आणि त्यांतल्या वरिष्ठ शास्त्रज्ञाची पत्नी, अशी तीनच पात्रे. सापेक्षतावाद आणि अनिश्चिततेचे तत्त्व यांवर प्रामुख्याने चर्चा. त्यांच्या उपयोजिततेबद्दलच्या नैतिक प्रश्नांसह. खूपच किचकट. शेवटी, मानवी संबंधांच्या प्रश्नांबद्दल काय – हेच महत्त्वाचे ठरते कलेत. ते सापडणे खूपच अवघड जावे, असे हे नाटक. त्यामुळे, माझ्या मते, नाटक म्हणून मुळीच न जमलेले काम. शेवटी, हायझेनबर्ग म्हणतो – प्रत्येक माणसाचे वेगळे नैतिक मूल्यमापन शोधावे लागेल ! हेही एक बौद्धिक मत असणार का , बरोबर वा चूक असा शिक्का मारणारेच असणार का, यावर हे नाटक चूप राहते ! ही पात्रे सगळे बौद्धिकच बोलताहेत आणि त्याच कक्षेत समजणे वा न समजणे असणार आहे, हे त्यांचे पक्के ठरलेले दिसतेय ! मानवी संबंध हे मतांच्या स्तरावरच

समजतात, असे जर या नाटकाचे म्हणणे असेल तर हे एक ‘ हुशार ‘ फालतू नाटक आहे. आपल्या मित्रांच्या कामाबद्दल तर खरेच आकलन व्यक्त करायला हवे. आणि आम्ही ‘ प्रत्यय ‘ वाले तर जबरदस्त वादांची परंपरा संभाळून आहोत !
--- ००० ---

FEBRUARY 5

काल संध्याकाळी साडेसहाला फिरायला गेलो होतो तेव्हा एका ठिकाणी एक ओळखीचे निवृत्त सज्जन उभे असलेले दिसले. " काय, कसे काय," वगैरे झाले. मग, मी परत आलो. आज सकाळी साडे अकराला मी त्याच बाजूला गेलो होतो तर तेव्हाही ते तिथेच भेटले ! " अरे, अजून तुम्ही इथेच उभे, कालपासून ? काय विशेष ? " मी म्हणालो. ते गडबडलेच जरा. " नाही नाही -- आत्ताच आलोय -- " त्यांनी ईमानदारीत सांगितले ! मग, हसले !

विद्वान इतिहासकार म्हणजे मेंटल हॉस्पिटलच्या बाहेर जगणारा वेडा !

इतिहास कसा शिकवावा --

चारपाच वेडपट अतिरेकी विद्वानांनी लिहिलेले इतिहास घ्यावेत आणि त्यांतले फरक का, कशामुळे आहेत, हे शिकवावे. म्हणजे माणूस हा कसा महामूर्ख प्राणी आहे, ते विद्यार्थ्यांना कळेल.

इतिहासाचे विद्रूपीकरण

इतिहासाचा अर्थ लावणे, त्याबाबत निरूपण करणे -- हे प्रत्येकजण आपापल्या हेतूने आणि वर्चस्वाच्या इच्छेनेच करत असतो -- याचा अर्थच, त्यात विद्रूपीकरणाशिवाय दुसरे काही असूच शकत नाही. मग, प्रश्न कोणता उरतो ? वर्चस्व तुमचे की माझे, हाच ! आपापली प्रभावग्रस्तता आणि वर्चस्व-इच्छा यांतून कुणीच मुक्त असू शकत नाही. आणि हे नुसते इतिहासाच्या बाबतीतच असते, असे नाही. प्रत्येकाचे जगणेच तसे असते. म्हणजे, मला नको वाटणारे प्रभाव नष्ट करणे, याचा अर्थ, ती माणसेच नष्ट करणे ? होय, हेच आहे सगळ्यांचे तत्त्वज्ञान ! सगळेच आहेत अतिरेकी ! निर्बुद्धतेचा कळस हा की अशा प्रभावाग्रस्ततेशिवाय जगता येऊ शकते का, हा प्रश्नही विचारला जाताच कामा नये, हे सगळ्यांना मान्य असते !

फुलांना हात नाहीत
ती सांत्वन नाही करू शकत

फक्त व्यक्त करत राहतात

सांत्वनाशिवाय जगणे –

--- ००० ---

इतिहास घडवा, भविष्य बुडवा !

FEBRUARY 4

ती देत काहीच नव्हती

तरीही स्वीकारत होती सर्व

स्वीकारणेही देणेच होतेय

हे तिला समजत नसेल ?

अंतिम स्वीकारात

देव-घेव नष्टच झाली

तो क्षण तिचा वा त्याचा

नव्हता –

--- ००० ---

समाजमान्य साच्यात मन घट्ट बसवून टाकणाऱ्यांना सर्जक कलानिर्मितीचे दरवाजे बंद होतात
आणि कदाचित सर्जक कलास्वादाचेही --

FEBRUARY 3

संगीत, नृत्य, साहित्य अशा कलाक्षेत्रांत मोठी, मौल्यवान निर्मिती करणाऱ्या व्यक्ती बऱ्याचदा त्या निर्मितीचे श्रेय गुरु वा देव यांना देताना दिसतात. ' बोलविता धनी वेगळाची ' असे त्यांचे म्हणणे असते. ' याचे श्रेय मी घेणे चुकीचे ठरेल ' अशी

त्यांची प्रामाणिक भावना दिसते. यांतले गुरु, देव हे शब्द सोडून दिले तरी श्रेय त्या व्यक्ती घेत नाहीत, असे दिसते. असे का घडत असेल ?

आता, या ठिकाणापासून स्वारगेट आणि शिवाजीनगर अशा दोन्ही बसेस सुटतात. शिवाजीनगर बस खूप पुढे लांब जाते, पण, स्वारगेटवरूनच जाते. एक साधी अक्कल हवी की आधी स्वारगेटची बस सोडावी आणि मग शिवाजीनगरची. म्हणजे स्वारगेटवाल्यांची शिवाजीनगरच्या बसमध्ये गर्दी होणार नाही. अन्यथा, बरेच स्वारगेटवाले शिवाजीनगरच्या बसमध्ये घुसल्याने स्वारगेटच्या पुढे जाणार्यांना बस मिळणार नाही ! आणि मागून येणारी स्वारगेट मोकळी जाईल !

FEBRUARY 2

विषयाचे सखोल ज्ञान आणि लोकांबद्दलची आस्था यांशिवाय हे शक्यच नव्हते ! शेवटी कोर्टाने केले ते अशक्य काम ! आदेशच दिला ! मुंबईतल्या लोकल प्रवाश्यांची सुरक्षितता विचारात घेऊन, रुळांजवळ असणाऱ्या धोक्याच्या खांबांच्या जागा बदलायच्या ! ग्रेट ! सुरुवात तरी होईल सुरक्षेची !

shared Bhadrakali Productions's video.

"ढोलताशे" IBNलोकमत वर

"ढोलताशे" नाटकाची IBN लोकमत ने घेतलेली खास दखल...

#KsheetiJog #LalitPrabhakar #IBNLokamat #Natak #Marathi #BhadrakaliProductions #VijayKenkare #RajanBhise #AmrutaSant #RahulRanade #AbhijitGuru #ChampraDeshpande #PrasadKambali #SachinSureshGurav #AmolParchure #VirajMule

shared a link.

Show Time on Dhol Tashe (Natak)

youtube.com

आय बी एन लोकमत वर ' ढोलताशे ' -- त्याची लिंक --

FEBRUARY 1

' झाकली मूठ सव्वा लाखाची ' या म्हणीचा कोणत्याही चांगल्या लेखकाला फारसा उपयोग होत नाही. उघडे पडत जाणेे, हेच तर त्याचे काम असते ! एरवी, म्हणजे लेखनबाह्य जगात, तो लपून बसला तरी लेखनातून त्याला व्यक्त व्हावेच लागते.

‘ सूर्याची साक्ष ’ हे शब्द खूप वर्षे होते डोक्यात --
मग, अंधाराची साक्ष का नसावी, असा प्रश्न आला --
तिथूनच साक्षी पेरण्याच्या कलेची सुरुवात झाली --
साक्ष म्हणजे सत्य असलेच पाहिजे, असे नाही --
ग्राह्य असले की झाले, असे झाले --
खरेखोटे जग एक झाले -- कुणाच्याही
सोबत अंधार असला की जमून जाते सारे
हे पाहून, अमर्याद आकाश काळवंडू लागले --
यावरून एकच आले लक्षात --
माणसाचे मनच ठरवते
आकाशाचे भवितव्य –
याला साक्षी-पुरावे
नसले तरी –
--- ००० ---

ढोलताशे

स्वत:च लिहिलेल्या नाटकाबद्दल लिहायला जावे तर ते समजावून दिल्यासारखे होण्याचा धोका असतो. त्यामुळे, आपणच ते मर्यादित केल्यासारखे होऊ शकते. हे नाटक मानवी संबंध, जगण्यातले व विचाराचे स्वातंत्र्य, प्रदूषण , ढोंगबाजी आणि मुख्यत: धर्म आणि धर्माच्या नावाखाली चालणारे सगळे -- या सगळ्याच गोष्टींबद्दलचे आहे. सध्या त्याच्या होत असलेल्या प्रयोगांबद्दल मी अत्यंत समाधानी आहे. प्रयोग समजून तर होताहेतच, शिवाय ते सगळे अत्यंत सहज आणि रंजकपणेही.छान पोचते आहे. एकूण टीमच जमून आलेली आहे. सर्व तांत्रिक अंगे तसेच अभिनय, दिग्दर्शन यांसह असणारी भद्रकालीची निर्मिती -- हे सगळेच अप्रतिम जमून आलेले आहे. प्रेक्षक नुसती मनोरंजनाची स्तुती करत नसून काही दर्जेदार पाहिल्याचे समाधान व्यक्त करताहेत. ललित हा एक उत्तम अभिनेता असल्याचे, तो मालिकेत जाण्याच्या

पूर्वीपासून आम्ही अनेकजण समजून होतो. त्याचे पहिले व्यावसायिक नाटक हे असावे याचाही एक आनंद वाटतो. बाकी सगळे अनुभवी, कसलेल्या लोकांचे मनापासून केलेले सुंदर काम आहे !

प्रसाद कांबळीने कुठेही कसर राहू दिलेली नाही.

अशा टीमवर्कमुळे, आपण लिहिलेय त्यापेक्षा खूपच समृध्द काही घडू शकते याचा हा आनंददायक अनुभव मला मिळतो आहे !

जरूर बघा --

shared Sameer Sanjay Vidwans's post.

चं.प्र. देशपांडे लिखित 'ढोलताशे' हे माझं अत्यंत लाडकं नाटक आहे. जवळपास १२ ते १५ वर्षापुर्वी हे नाटक रंगभुमीवर पहिल्यांदा आलं. आणि आता प्रसाद कांबळी ते परत घेऊन आलाय. हे नाटक पाहिल्यावर लक्षात येतं की दिवसेंदिवस हे नाटक अजूनच रेलेवंट होत जातय. नाटकाचा प्रयोग कडक गोळीबंद होतो. सर्व कलाकार कमाल काम करतात. जागचं हलु देत नाहीत. संहितेशी प्रामाणिक राहून अत्यंत सहज प्रयोग सादर होतो. नाटक विचार करायला लावतं आणि प्रयोग संपल्यावर आपल्याला दर्जेदार काहितरी पाहिल्याचं समाधान मिळतं.

हा नाट्यप्रयोग चुकवू नकाच.

Navnath Prasad Kambli Lalit Prabhakar @abhijeet guru Amruta Sant @ rajan bhise @ujwala joag @kshitii joag. Congratulations and all the best □□□

shared Bhadrakali Productions's photo.

'"ढोलताशे "

आज पुण्यात शुभारंभ

सायं. ५ वाजता कोथरूड, पुणे'

"ढोलताशे "

आज पुण्यात शुभारंभ

सायं. ५ वाजता कोथरूड, पुणे

JANUARY 31

विशेषत: हिंदी चित्रपट सृष्टीतल्या अनेक नायक-अभिनेत्यांचे आणि इतरही काही अभिनेत्यांचे एका बाबतीत कौतुकमिश्रित आश्चर्य वाटते -- पैसा आणि सर्व तऱ्हांची सुखे सहज उपलब्ध असूनही ते वर्षानुवर्षे मापात राहतात -- बोजडही होत नाहीत वा स्वत:ची नासाडीही करून घेत नाहीत ! एक प्रकारची स्थितप्रज्ञताच असणार ही !

कविता निर्मितीची प्रक्रिया ? --

आपले जगणे, असंख्य प्रभाव, ते जगताना आपल्याला पडलेले प्रश्न, त्यांना आपण कितपत सामोरे गेलो, कलेची-अभिव्यक्तीची प्रगत होत गेलेली आपली समज व कुवत -- हे सगळे मिळून घडते कवितेची निर्मिती. बाकी, थोडक्यात म्हणजे, शब्द मनात येत जातात आणि आपण ते लिहीत जातो.

एका बारमध्ये --

२-३ मित्र व २-३ मैत्रिणी. मित्र पिताहेत, मैत्रिणी नाही.

मित्र नीट शांतपणे बोलताहेत पण दोन मैत्रिणी, न पिता,

किक बसल्यासारख्या सारख्या मोठमोठ्यांदा हसत बोलताहेत !

काय असेल याचे रहस्य ?

January 2016

JANUARY 31

shared Chamundeswari Janardhana's photo.

'You and nothingness are one

You are nothing. You may have your name and title, your property and bank account, you may have power and be famous; but in spite of all these safeguards, you are as nothing. You may be totally unaware of this emptiness, this nothingness, or you may simply not want to be aware of it; but it is there, do what you will to avoid it. You may try to escape from it in devious ways, through personal or collective violence, through individual or collective worship, through knowledge or amusement; but whether you are asleep or awake, it is always there. You can come upon your relationship to this nothingness and its fear only by being choicelessly aware of the escapes. You are not related to it as a separate, individual entity; you are not the observer watching it; without you, the thinker, the observer, it is not. You and nothingness are one; you and

nothingness are a joint phenomenon, not two separate processes. If you, the thinker, are afraid of it and approach it as something contrary and opposed to you, then any action you may take towards it must inevitably lead to illusion and so to further conflict and misery. When there is the discovery, the experiencing of that nothingness as you, then fear -which exists only when the thinker is separate from his thoughts and so tries to establish a relationship with them- completely drops away.

J. Krishnamurti, The Book of Life'

JANUARY 30

shared Bhadrakali Productions's photo.
'भद्रकाली प्रॉडक्शन ची ५२ वी कलाकृती "ढोलताशे"
#DholTasheNatak
आज पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग
रविवार, दिनांक ३१ जानेवारी २०१६
संध्याकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड.'
भद्रकाली प्रॉडक्शन ची ५२ वी कलाकृती "ढोलताशे"
#DholTasheNatak
आज पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग
रविवार, दिनांक ३१ जानेवारी २०१६
संध्याकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड.

कलावंताने ' तयार ' सामाजिक विचार द्यायचा नसतो, तर समाजाची संवेदनशीलता जागी करायची असते.
-- द. भि. कुलकर्णी ( संदर्भ – आजच्या मटातला नीलिमा गुंडी यांचा लेख. )

झोप असो वा उत्साह नसणे
ग्लानीमुळे समोरची रोषणाईही म्लान
दिसतेय – आलेय कुणी नटूनथटून
अशाही वेळी मी झालोय अंधुक
काय वाटेल तिला
अपमान वाटला तर
हाच ठरेल शेवट

इलाजच नाहीय
आता दिसतेय ती पाठमोरी
तिच्या पाठीवर दोन मुंडकी
लटकलेली हेलावती
त्यांतले एक माझेच दिसतेय
दुसरे कुणाचे असेल

ती तरंगतेय
अदृश्य होत
जातेय लांब
मी असहाय
माझे
विघटन होतेय

घालवूनच बसलोय संधी
आता झोपी जावे
मरगळलेय मन
इलाजच नसलेला
आणखी एक क्षण
संपलाय
--- ००० ---

JANUARY 29

ढोलताशे

पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग

UDYA

रविवार, दिनांक ३१ जानेवारी २०१६ ला संध्याकाळी ५ वाजता

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड.

काल, अमृता सातभाई यांनी सादर केलेला ' अलौकिक रोमँटिक महानायिका मधुबाला ' हा कार्यक्रम पाहिला. तुडुंब गर्दी ! खूप लोक जागा न मिळाल्याने परत गेले. आता हा कार्यक्रम पुन्हा दिनांक २५ फेब्रुवारीला होणार आहे. मधुबालाचे चरित्र उलगडत जाणारा हा कार्यक्रम खूप मेहनतीने तयार केलेला आहे. तिच्या चित्रपटांतल्या गाण्यांचे तुकडे दाखवत दाखवत हा उत्तम कार्यक्रम सादर होतो. हृदयाच्या आतल्या पडद्याला छिद्र असण्याचा आजार असलेली ही सौंदर्यवती २० वर्षांत ७० चित्रपटांत भूमिका साकारून, त्याच आजाराने ३७ व्या वर्षी गेली !

किशोरकुमारबरोबर तिचे लग्न झालेले होते. त्याने तिला लंडनला नेऊन उपचार करून आणणे त्याच्या खर्चाने केले होते. शिवाय, तिच्या घरावर जप्ती आली तेव्हा आवश्यक ती रक्कम त्यानेच अदा केली होती. तिच्या दैनंदिन खर्चासाठीही तो पैसे देत असे. पण, तिला सतत साथ देत राहणे तो करत नव्हता. ती आजारी असली तरी तो खूप बिझी होता ना ! आणि दुसरी गोष्ट – त्या दोघांचे एकत्र असे चित्रपट असूनही त्या चित्रपटांतली गाणी न ऐकता ती तिच्या दिलीपकुमार बरोबरच्या चित्रपटांतली गाणी ऐकण्यात दंग असे – याने किशोरकुमार खवळतो, हे माहीत असूनही !

काही कौशल्ये जबरदस्त आत्मसात असलेल्या या व्यक्ती ! बाकी सगळ्या त्याच मानवी भावभावना !

गाणे हळूहळू फेड होणे आणि इकडे हळूहळू प्रकाश उजळणे, असे तंत्र जमले तर हा कार्यक्रम अधिकच उजळेल ! सध्या, सारखे दणके आणि धक्के बसताहेत ! ही दुरुस्ती जमावी --

हसू नका, खरेच सांगतोय –

एका बाईंच्या दोनतीन कविता ऐकून झालेल्या चर्चेनंतर

त्या म्हणाल्या, " मी खऱ्या कविता लिहिल्या तर

पती भडकतात – त्यांची बदनामी होते, म्हणतात --

म्हणून मी प्रभुचरणी लीन झाल्याच्या कविता लिहिते ! "

घटनेच्या आणि भारतीय कायद्याच्या कक्षेत राहूनच
भारतातली कोणतीही संस्था बहुमताने ठराव पास करू शकते
-- तसे नसणाऱ्या, त्या संस्थेतल्या बहुमताचीही किंमत शून्य असते !
-- हेही न समजणारे लोक दिलखुलास आग्रहीपणे लोकशाहीच्या निर्लज्ज गप्पा मारतात !

JANUARY 28

windows xp var ataparyant devanagari unikod nit chalat hote -- ata jodaksharanni honari phonetik akshare -- kh, bh, ksh -- hi yet nahiyat. gugal kromacha saport gelay mhanatat -- yavar upay kay ? phayarphoxmadhyehi ha prashn yetoch --

पानाफुलांच्या ना चंद्रचांदण्यांच्या
कविता मला सुचल्या ना
शहरे ना तंत्रे मला सापडली
मी समुद्राला का घ्यावे कवितेत
मनात मावत नाही म्हणून ?
मी आकाशाचे गोडवे का गावेत
मला अथांग वाटते म्हणून ?
मी मोठ्या अनुभवांसाठी
पर्यटनाला नाही गेलो
हिंसा कळण्यासाठी मी
तलवारबाजांना आव्हानेही दिली नाहीत
निव्वळ माझ्या आधी जन्मून गेले म्हणून
मी कुणाला मागास म्हटले नाही
भाषेची, विचारांची, भावनांची
शुद्धता म्हणजे काय, मी विचारले नाही

माझे दिसणे, माझे असणे, मी कुणाला काही वाटणे
हे नेहमीच मला अनिश्चित वाटत राहिले
अजूनही मी दुर्गुणी, दुराचारी, गुन्हेगार
का म्हटला गेलेलो नाही
मी एक तेजःपुंज वलयांकित स्टार
का झालेलो नाही
मला असाध्य रोग वा वेड
का लागलेले नाही, यांचा विचार मी केला नाही
मला कुणी ओळखत का नाही,
मी मला खुजा का वाटतो, मी गर्दीत आक्रसतो का,
मी वासनाधीन का होतो, मला
कोणकोणत्या भीती आहेत – हे काहीच मी
विचारले नाही – प्रश्नांची उत्तरे का नाहीत मिळत
हा एकच प्रश्न घेतला -- अनुभवाधारित --
त्याचेही उत्तर मिळाले नाही –
त्यामुळे , मी फक्त
निरुत्तर कविताच लिहिल्या --
--- ००० ---

JANUARY 27

मी स्वतः, फक्त आर्थिकच नव्हे, कोणत्याही प्रकारे भ्रष्टाचारी असेन तर याचा अर्थ, पूर्ण मानवजातीलाच, भ्रष्टाचारी असण्याला मी प्रोत्साहन आणि समर्थन दिलेले असते -- मग, बोलण्यात मी कितीही स्वच्छपणाचा आव आणत असो -- मला माझ्याहून जास्त भ्रष्टाचारी वाटणाऱ्यांना मी भ्रष्टाचारी म्हणत राहतो, इतकेच --

अत्यंत देखणा आणि अर्थपूर्ण होत असे माझ्या ' वस्तू ' नामक नाटकाचा प्रयोग ! त्याच नाटकातला हा फोटो आहे. याची डीव्हीडी करायचा विचार होता, पण, जमले नाही.. ' मिती-चार ' ची उत्तम टीम होती. एका प्रयोगाला सुलभा देशपांडे आणि रोहिणी हट्टंगडी होत्या -- " कसे, बरे वाटले का नाटक ? " -- मी त्यांना विचारले -- सुलभाजी म्हणाल्या, " बरे ? सगळे मन हलवून, हादरून टाकणारे आहे ! " लाख्यांच्या नेतृत्वाखाली या टीमने माझी तीन नाटके अत्युत्तम रीत्या सादर

केली. ' प्रेमच म्हणू याला हवं तर -- ' या माझ्या नाटकाच्या तीन प्रयोगांतही ललितने काम केले होते. ' मिती-चार ' ने सर्वप्रथम माझे ' समतोल ' हे नाटक सादर केले होते. ' वस्तू ' आणि ' समतोल ' या दोन्ही नाटकांत एकाच पात्राचे असलेले दोन दोन मोठे संवाद आहेत -- ते कधी सुरू झाले आणि कधी संपले, हे कळतही नसे !

JANUARY 26

सगंड जगणे हेच नॉर्मल म्हणून मान्यताप्राप्त आहे -- मग माणूस अध्यात्मवादी असो की बुद्धिवादी ! त्यामुळे, एका माणसाने वा समाजाने विविध गंडांनी जगणेच चालु असते, त्यांतला एक अध्यात्मगंड असू शकतो -- गंडमाळेतला एक. अगंड जगणे शक्य आहे का -- हा प्रश्न अध्यात्माकडे जाणारा असल्याने तुरंत त्याज्य असतो ! हा असा बंदिस्तपणा पाहिला की नियतिवादगंड मान्य होऊ शकतो !

बऱ्याचजणांनी स्वतःची एक समाजमान्य प्रतिमा फिट केलेली असते.
त्या प्रतिमेच्या क्षेत्रातच त्यांना कलानिर्मिती करायची असते.
नातेवाईक, शेजारी-पाजारी आणि लोक काय म्हणतील -- हे प्रश्न
त्यांचा पिच्छा सोडत नाहीत.
-- अशा, घिस्यापिट्या स्वप्रतिमेत दफन झालेल्यांना
कसली कलानिर्मिती शक्य आहे ?

' का रे दुरावा, का रे अबोला ' -- चित्रपट, ' मुंबईचा जावई '.
आशा भोसले, गदिमा आणि सुधीर फडके.
गाणे दिसायला दुराव्याचे आहे, पण, शब्द, चाल आणि आशाबाईंचा आवाज
या सर्वांतच एक सूक्ष्म चावटपणा आहे !
ती फारशी दुःखीबिख्खी न होता तिच्या त्याला मनवतेय !
नीट ऐकले तर चेहऱ्यावर स्मित आलेच पाहिजे !
आशाबाई ग्रेटच !

JANUARY 25

ढोलताशे

पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग

रविवार, दिनांक ३१ जानेवारी २०१६ ला संध्याकाळी ५ वाजता

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड.

shared Ravi da Lakhe's photo.

ही आमची ' ढोलताशे ' ची टीम --

shared Chitra Rajendra Joshi's post.

'लहानपणी गणपती-विसर्जनाची मिरवणूक बघण्यासाठी आई-वडिलांचा उत्साह कधीच नसायचा आणि आम्ही मात्र शेजाऱ्यांच्या नादाने त्यासाठी धडपडायचो. एक वर्ष वडिलांनी भर रस्त्यावरच्या बिल्डींगमध्ये, तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या त्यांच्या मित्राकडे आम्हांला 'गणपती बघायला' नेलं. त्यांच्या दोन छोट्या गॅलऱ्या, खिडक्या आमच्यासारख्या उत्साही पाहुण्यांनी गजबजलेल्या!

प्रत्येक गल्लीचा - वाडीचा गणपती... कुणाचा किती उंच, कुणाचा जास्तीत जास्त हार घातलेला, कुणाचा मोठाले देखावे असलेला, कुणाचा ढोल-ताशांचा, कुणाचा कच्छी-सनईचा, कुणाचा लेझिम-झांजांचा!

त्यावेळी इतके गणपती बघून घेतले की 'गणपती बघण्याची' हौस मिटली, ती कायमची! पुन्हा कधीही अशा मिरवणुकीला जाण्याची इच्छा झाली नाही.

हे सगळं आठवण्याचं कारण म्हणजे कालच बघितलेलं चं. प्र. देशपांडे लिखित, विजय केंकरे दिग्दर्शित, भद्रकाली प्रॉडक्शन निर्मित-- 'ढोलताशे' !

हे नाटक पुस्तकरूपात वाचलं होतं आणि काल शुभारंभाचा प्रयोग बघितला. नाटक वाचणं वेगळं आणि त्याचं सादरीकरण अनुभवणं वेगळं ह्याचा प्रत्यय आला.

प्रामुख्याने संवादांच असलेलं, सर्व कलाकारांनी समजून फुलवलेलं नाटक! साध्यासुध्या माणसांच्या साध्यासुध्या, तरीही, अनावर इच्छांची पूर्तता व्हावी म्हणून चाललेली धडपड असं ह्याचं स्वरूप. जो-तो आपापल्या मतांशी प्रामाणिक अन खरा. त्यामुळे ते नाटक न वाटता आपलीच गोष्ट असल्यासारखं वाटलं.

अनेक तऱ्हांच्या क्लृप्त्यांचा वापर करत, हवं असणारं काम करवून घेण्यासाठी, आपलं म्हणणं कसं व किती सयुक्तीक आणि योग्य आहे हे सांगत-समजावत रहाणं, त्याचप्रमाणे, आपलं म्हणणं एखाद्याच्या गळी उतरवण्यासाठी आवश्यक तो

सराईतपणा व सफाईदारपणा टिकवणं ह्या नाटकात यथार्थ व्यक्त झाला आहे. शेवटी काकूंनी खास ठेवणीतला आपला अधिकार वापरत, अंगाखांद्यावर खेळवलेल्या आपल्या पुतण्याला, अक्षयला आपलं म्हणणं ऐकायला भाग पाडणं हेही पटण्यासारखंच आहे.
मूळ संहितेतील बदललेला शेवट सूचक आहे आणि चं. प्र. देशपांडेंच्या नाटकांच्या 'नेहमीच्या' शेवटांपेक्षा थोडा वेगळाही! सहसा त्यांचे 'शेवट' कोणत्याही निष्कर्षाप्रत नेत नाहीत, तशी शक्यताही दर्शवत नाहीत.. इथे मात्र बाळाच्या डोक्यावरची पट्टी काढून त्याला ह्या सगळ्यापासून वाचवण्याचे सूचन करण्यात आले आहे. आजच्या घडीला हा शेवट अर्थातच ठीक व मानवणारा आहे.

'बाहेरून आत' आनंद मिळवत जगणं रेटण्याच्या माणसाच्या सवयीचा, वाढत्या आर्थिक उलाढालीच्या नावाखाली, कला-संस्कृती टिकवण्याची दांभिकता मिरवत उत्सवांचं उदात्तीकरण करण्याचा, खरपूस समाचार घेणारं हे नाटक....

लेकीने एका वाक्यात नाटकाचे सार सांगितले -- "आपल्या देशात मनाप्रमाणे जगता येणं अवघड आहे." मलाही ते तत्काळ पटलंच..
बाहेरचे धार्मिक-भावनिक-आर्थिक रेटे एवढे जबरदस्त आहेत की स्वत:च्या म्हणण्यावर ठाम राहता येणं कठीणच!
'ढोलताशे' मध्ये हे सर्वांगपूर्ण रितीने व्यक्त झालं आहे. अर्थातच, आम्हां तिघांनाही हे नाटक आवडलं आहे.
२५.१.२०१६'

Ravee Lakhe -- पूर्वीपासून म्हणताहेत की माझी नाटके व्यावसायिक रंगभूमीवर व्हायला हवीत ! कालचा ' ढोलताशे ' ला मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहता, ते खरे वाटू लागलेय -- न जाणो, घडेलही तसे --

shared Ravi da Lakhe's post.
ढोलताशे
कुठल्याही नाटकाचा पहिला प्रयोग मी पाहात नाही. Prasad Kambli च्या आग्रहामुळे ढोलताशेचा पहिला प्रयोग काल मी पाहीला. आणि तो पहिला प्रयोग असूनही पहिला वाटला नाही इतके त्याचे सादरीकरण चोख होते. हेच नाटक विजय केंकरेने पूर्वी प्रायोगिक रंगभूमीवर केले होते. परंतू सांप्रतचे त्याचे व्यावसायिक रूप मला ज्यास्त भावले आवडले.

आमचे मित्र चं.प्र. देशपांडें ह्यांच्या ह्या नाटकाचा विषयच सांगायचा झाला तर ( कि जो खरे तर सांगता येऊ नये ) धर्म आणि माणूस ह्यांच्यातले नाते असा आहे. धर्मवेडा माणूस हा माणूस राहात नाही. पण नुसता माणूस हा माणूस म्हणूनच जगतो. धर्मवेडाने माणसामाणसातील नाते संपुष्टात येऊ शकते किंवा ते नाते बिघडते.

संहिता दिग्दर्शन नेपथ्य प्रकाश संगीत रंगभूषा वेशभूषा सर्वच उत्तम. आणि कलाकारांचा अभिनय तर सर्वोत्तम. विजय केंकरे आणि राजन भिसेंबद्दल बोलायलाच नको. उज्वला जोग अमृता संत अभिजीत गुरू सर्वांनीच आपल्या भूमिका हाणल्या आहेत मस्तपैकी. मला विशेष कौतूक वाटते ते क्षिती जोगचे. तिच्या भूमिकेला कुठलीही ठळक वैशिष्ठ्ये नाहीयत. Subdued भूमिका आहे ती. ती तिने तिथेच राहू दिली आहे. डोळे (looks) आणि त्यांच्या वापरावर तिने ती व्यक्तिरेखा जिवंत केली आहे.

प्रायोगिक नाटकातल्या “अक्षय” पेक्षा ह्या व्यावसायिक नाटकातला Lalit Prabhakarने साकारलेला “अक्षय” ज्यास्त ग्रेट आहे, कारण तो माणूस वाटतो. Human being वाटतो. ललितला सॅल्यूट.

ह्या नाटकाची निर्मिती केल्याबद्दल प्रसादला अनंत धन्यवाद.

JANUARY 23

आपला जन्म इंग्लिश घरातला, आपण वाढलो इंग्रजीत, शिकलो इंग्रजीत, विचारही इंग्रजीतच करतो -- पण, आपल्याला मराठीचीही आवड असल्याने आपण मराठीत चित्रपट काढतो वा त्यांत कामही करतो -- त्यामुळे, एरवी बोलताना आपल्याला मराठी शब्द वा वाक्ये सुचत नाहीत, म्हणून, आपण इंग्रजी शब्द वा वाक्ये वापरतो ( तीही सुचायला खूप वेळ लागत असला आणि तरीही, तेही धड येत नसले तरीही -- ) -- अशी आपल्या बऱ्याच मराठी चित्रपटवाल्यांची अवस्था दिसते ! ही, चांगले इंग्रजी बोलु शकणाऱ्या हिंदीवाल्यांची भिकारडी नक्कल आहे का ? की यांना त्या हिंदीवाल्यांवर प्रभाव टाकायचा असतो ? की हे इंग्लंडमधूनच टपकलेयत इथे ? कशासाठी हे अशी केविलवाणी अवस्था करून घेतात स्वतःची ?

JANUARY 22

एक वकील भेटले होते.
ते म्हणाले की कुटुंबकोर्टात पाय ठेवायला जागा नाहीय,
इतके घटस्फोटांचे खटले आहेत !
-- हे सुचिन्ह की दुश्चिन्ह की प्रगती की अधोगती की नुसतीच गती ?

मी दोलायमान असल्यानेच
दुटप्पी, दुर्गुणी आणि
दुष्परिणामयुक्त
जगणे असलेला फक्त मनानेच
जग व्यापणारा आणि ठामपणे
नाकारणारा शक्यताही
एकसंध क्षणाची

तरीही
एक आशावाद म्हणून
उपासना करणारा
तशा अखंड मनाची
जिने मिळते मला ग्लानी
क्षणभराची

दोलायमानता
चेचून टाकलेले अतिरेकी
मला दोषी ठरवतील
असे मला वाटते
कदाचित नाहीही घडणार तसे
असेही वाटते

चंद्र पाहून मी थबकतो
थक्क होतो – असणारच
याचा काही हेतू – आज नाही
उद्या कळेल
असे मी मानतो

न जाणो, कळणारही नाही काहीच

असेही मानून चालतो

हेतूच नसणे

असा गधडेपणा कसा असेल

या विश्वात – असे म्हणत

मी अर्धवट झोपी जातो –

--- ००० ---

JANUARY 21

" मी तुझ्याशी खोटेपणाने वागलो हे तुला जाणवले असेल, हे जाणवत राहिल्याने हल्ली मी खट्टू असतो -- सॉरी -- "

" तसे काही नाही -- आणि जरी असलो तसे तरी एवढा काही माझ्या आयुष्यात तू महत्त्वाचा नाहीस -- डोंट वरी -- "

JANUARY 20

shared Navnath Prasad Kambli's post.

'3 days to go ....'

3 days to go ....

shared Prasad Walimbe's post.

'माणसाचं अस्तित्व पुसलं गेलं की, जी निर्माण होते ती सामसूम...

"Samsum"

Written by @[100000669434144:2048: ]

Directed by @[100000683267271:2048:Dilip Vengurlekar]

Artists - @[100009992922610:2048:Aashutosh Nerlekar], Dr. Varada Jadhav, Suraj Satav, Prasad Walimbe, @[100010129514210:2048:Meera Chandawad]

Set design - @[100006308624579:2048:Mangesh Chavan]

Music  -  @[100003354315882:2048:Pravin Kamble], @[100001057895755:2048:Prithvi D Quake]
#punetimes'
माणसाचं अस्तित्व पुसलं गेलं की, जी निर्माण होते ती सामसूम...

"Samsum"
Written by
Directed by Dilip Vengurlekar
Artists - Aashutosh Nerlekar, Dr. Varada Jadhav, Suraj Satav, Prasad Walimbe, Meera Chandawad

Set design - Mangesh Chavan

Music - Pravin Kamble, Prithvi D Quake
#punetimes

धर्माच्या बाबतीत, मी अमुक, तू तमुक -- याचा अर्थच संघर्ष ! धर्मवाद्यांप्रमाणेच, सगळे बुद्धिप्रामाण्यवादीही याला आणि अशा गोष्टींना बळ देणारेच असतात ! कारण मनाचा असा अलगतावादी वापर हा त्यांनाही अटळच वाटतो -- तो त्यांचा अंतिम निष्कर्ष असतो --

JANUARY 19

shared Navnath Prasad Kambli's post.
Navnath Prasad Kambli's photo.

यातले खरे-खोटे माहीत असलेले / समजलेले असे कोण किती असतील कोण जाणे

पण

क्षणाचे स्मरण होताच, जगण्यातल्या पूर्ण पापराशी नष्ट करणारा देव

ही भन्नाट महत्त्वाची कल्पना वाटते !

या शक्यतेसाठी तरी, देव म्हणजे काय, हे समजून घेण्याचे प्रयत्न

मनःपूर्वक चालुच राहतील --

JANUARY 18

सगळे घाईत आहेत -- शब्दांची लघुरूपे होताहेत -- वाक्यांचीही लघुरूपे होत जातील -- नंतर स्क्रीनकडे पाहणाऱ्या डोळ्यांतले विचार आणि भावना कॅच करून ते सगळे आपोआप कळवणे चालु होईल -- सविस्तर बोलावे लागले तर माणसे चिडतील-वैतागतील -- मानवी संबंधांतले सगळे, आपोआप होत राहील -- फक्त शास्त्रासाठी आणि तांत्रिक भाषा उरेल -- नंतर तिचीही गरज पडू नये असे काही सापडेल -- मग राग, लोभ, हसणे, रडणे, खून वा युद्धे करणे -- हे आपोआप घडत राहील --

आपल्या जगण्यात एक स्थायी भाव असतो.

तोच न्यूनगंड वा अहंगंड घडवतो.

तोच सगळे प्रश्न निर्माण करतो.

आणि विशेष म्हणजे

तोच सतत ते प्रश्न सोडवण्याच्या प्रयत्नात असतो --

भेदभाव करणाऱ्या, विषमता निर्माण करणाऱ्या, आत्मकेंद्री, वर्चस्ववादी, सतत संघर्षमय राहणाऱ्या मनाला बळकटी देणे -- हे कलेचे सांस्कृतिक कार्य म्हणता येईल ?

कलावंताला काय मिळाले ही कलेची एक बाजू --

कौतुक, आदर, पारितोषिके, ग्लॅमर, पैसा, प्रसिद्धी, सुखे, वगैरे.

दुसरी बाजू वाचक-प्रेक्षकांची -- त्यांना काय मिळाले, याची --.

करमणूक, न्यूनगंड, वैफल्य, स्वतःच्या रटाळतेची भावना, वगैरे.

की परिवर्तनासाठी कृतिशील होण्याची इच्छा मिळावी ?

काय असते, सांस्कृतिक म्हणावे असे, कलेचे कार्य ?

JANUARY 17

' आविष्कार ' चा महत्त्वपूर्ण उपक्रम.

पूर्वी पं. सत्यदेव दुबे यांनी नाट्यलेखकांसाठी एक कार्यशाळा घेतली होती. त्याच धर्तीवर अलिकडेच ‘ आविष्कार ‘ ने काकडेकाकांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदीप मुळे, जयंत पवार आणि शफाअत खान यांच्या मार्गदर्शनाखाली एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्यातून सहा नाटककारांच्या सहा संहिता सादरीकरणासाठी निवडल्या गेलेल्या असून त्यांचे दिग्दर्शनही नव्या तरुण दिग्दर्शकांनी करावे, असे त्यांनी योजलेले आहे. त्यांतली दोन नाटके, कै. अरविंद देशपांडे महोत्सवात पाहिली. एक होते, ‘ त्रिशंकू ‘ – लेखन, सौरभ पाटील आणि दिग्दर्शन, अभिजित झुंजारराव यांचे आणि दुसरे होते, ‘ अस्वस्थ समुद्रावर बैल मेलाय ‘ – लेखन, युगंधर देशपांडे आणि दिग्दर्शन, ललित प्रभाकर यांचे. दोन्ही नाटकांचे आशय आणि घाट पठडीबाह्य होते. या कार्यशाळेतून हे दोन लेखक मराठी नाटकाला ‘ मिळाले ‘ असे म्हणायला हरकत नाही. हा पूर्ण उपक्रम आणि या नाटकांचे प्रयोग निश्चितच स्वागतार्ह आहेत. महाराष्ट्रात एकूण पाच ठिकाणी या नाटकांचे प्रयोग होणार आहेत. ज्यांना संधी मिळेल त्यांनी अवश्य ही नाटके पाहावीत. ही नक्कीच ' आजच्या ‘ जाणिवांची नाटके आहेत.

shared Navnath Prasad Kambli's post.

'Lavkarach....'

Lavkarach....

वाचकाच्या मनात औदासीन्य, चीड, अपराधी भाव, सूडभावना, ज्वलंत अस्मिता, स्वश्रेष्ठत्वभाव -- असे काही निर्माण करणारे साहित्य हे कमी दर्जाचे असते. ते मूल्यात्मकतेच्या शक्यता रोखणारे आणि वाचकाला संकुचित करणारे असते. ते जगण्याचा आवाका वा समज वा भान देत नाही.

जुना कोणता तरी राग मनात धरून माझ्याशी वागणारी व्यक्ती
मी त्या रागाच्या कारणातून कधीच बाहेर पडू नये, उलट
कायम त्या कारणासहच जगावे, अशी अपेक्षा बाळगणारी असते !
माझ्यावरचा राग ही आता त्या व्यक्तीची ओळखच बनलेली असते !

मानवी नात्याचे हे एक विचित्र पण अतूट असे बंधन असते !

इतरांनी कसे वागले पाहिजे हे सांगत,
सारखे त्यांच्या नैतिक वागण्यावर फोकस
टाकून बोलणारा आणि त्यांना अपराधी भावनेत लोटणारा
लेखक, हा
स्वतःला करेक्ट वागणारा श्रेष्ठ,
असे समजण्याच्या भ्रमात असतो --

JANUARY 16

shared Dilip Vengurlekar's post.
'please attend on 22 nd jan2016 at 7 evening at sudarshan rangmanch ,shaniwar peth, pune.'

" स्त्रियांना मज्जाव करणारे देव मला आवडत नाहीत -- उदाहरणार्थ शनी आणि हनुमान -- मग, तिथे जाण्यात मतलबच काय, असे वाटते ! -- हा विचार धार्मिक नाही, हे कळतेच, पण, समतावादीही नाही, हेही मनोमन मान्य असते ! तेवढ्यात एका चॅनेलवर असे दिसते की माननीय ओबामासाहेब हे हनुमानभक्त आहेत ! बोंबला ! देव नाही, पण, ओबामा आपली वाट लावू शकतो ! स्त्रियांबद्दल आकर्षण वाटू न देणे, हाच आता बचावण्याचा मार्ग दिसतो ! म्हणजे मर्डर होऊन मरण्यापेक्षा वेडे होऊन मरा ! " ( माझे म्हणाल तर मी स्वतः कधीही कोणत्याही मंदिरात जात नाही -- हे अगदी कडक तत्त्वबित्त्व नाही -- किंवा जे जातात त्यांना मी नावेही ठेवत नाही -- )

माझ्या सगळ्या मर्यादा मान्य करूनही, सध्या मला एक गंमत वाटतेय आणि एक बालिश उत्सुकताही वाटतेय -- अध्यक्षांबद्दल चांगले बोलायचे वा वाईट बोलायचे, असे आधीच ठरवलेले जे असतील त्यांची अवस्था अवघड होईल, असे वाटतेय -- हे पुरोगामी की प्रतिगामी किंवा बीजेपीवादी की समाजवादी किंवा जातीवादी की जाती-अंतवादी आणि धर्माच्या बाबतीत काय -- हे कळणे जरा अवघडच दिसतेय -- जाणकारांनी जरा प्रकाश टाकावा --

ज्ञानेश्वरांचे पसायदान खूप महत्त्वाचे -- मौल्यवान आहे -- असे सगळेच, सगळे भेद विसरून, म्हणताहेत ! -- हा जर सर्वमान्य पाया असेल तर सहिष्णुतेची गरजच काय ?

टीव्ही मालिके इतकी परिवर्तनाची शक्ती कुठेच नसते.
मालिका संपता संपता का असे ना, तिच्यातल्या
सर्व दुर्जन व्यक्ती सज्जन होतात !
आपल्याला दुर्जन वाटणाऱ्या व्यक्ती
आज ना उद्या सुधारतील -- हा आशावाद
यातून जागवला जातो !
शेवटी एक
समतायुक्त म्हणा की समरसतायुक्त म्हणा
एक छानसा ग्रुपफोटो घेतल्याने
सुख निर्माण होते !

JANUARY 14

" मूळ गाव कोणते ? "
या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नाही.
जे गाव मी कधी पाहिलेही नाही ते कसे माझे मूळ गाव ?
मग, मी माझ्या जन्मगावाचेच नाव मूळ गाव म्हणून सांगतो --
मुंबई !

उगीचच हातपाय तोडून घ्या, नैतिक हनन करून घ्या किंवा सरळ मर्डरच करून घ्या -- नकोच ना ते -- ते टाळण्यासाठी, तशा सर्व वेडपटांना निमित्त मिळणार नाही, पण, जे बोलायचे तेच बोललेले असेल, असे बोला ! ते कुणालाच न कळण्याची शक्यता आहे, हाच यातला शोकात्म भाग ! पुरोगामी आणि प्रतिगामी दोघेही धोक्याचेच असतात ! बौद्धिक फिक्स असलेलेच सगळे !

कवितेबाबत लिहिताना -- " उगीच नाही समाजातली संवेदनशील आणि आकलनोत्सुक माणसे, या झपाटून मुक्त करणाऱ्या बयेच्या नादी लागत ! " -- असे लिहून बसलो ! -- स्त्रिया नाही का कविता लिहीत आणि तिच्या नादी लागत ? -- असा प्रश्न समोर आला ! -- माझे म्हणणे, सारखे कृत्रिमपणे समतेचे बोलायची गरज नाही -- स्त्रियांनीही हेच तत्त्व बाळगायला हरकत नसावी --

JANUARY 13

काही वर्षांपूर्वी जगण्याचा वेगच कमी होता. लोकांना थोडा निवांतपणा असायचा. प्रेमबीम घोळवायचे, जगण्यात, गाण्यात मेलडी आस्वादत राहायची आणि ‘ धीरे धीरे चल, चाँद गगनमे ‘ ( चित्रपट -- ' लव्ह मॅरेज ' ) असे म्हणत राहायचे, अशी पद्धत होती. प्रगती आणि शहरीकरण वाढत गेले तसा जगण्याचा वेगही वाढत गेला. विचारांचा, भावनांचाही वेग वाढत गेला. मनच वेगवान झाले. मेलडी, हळुवारपणा, वगैरे मागे पडत गेले. वेग हाच परवलीचा शब्द बनला. अशा मनाला रोजच्या कटकटींतून बाहेर काढायचे तर कलाही वेगवानच हवी, असे झाले. गाणी, सिनेमे, नाटके वेगवान झाली. तो वेग चालु असताना दुसरे काही सुचताच कामा नये, अशी तंत्रे आली. मनाचा वेग किती वाढू शकेल याला मर्यादा असणार, असे वाटते. विचारांनी निर्णय घेण्याला प्रक्रिया लागते, पायऱ्या लागतात, टप्पे लागतात. ते वगळून क्षणात कार्यक्षमता म्हणजे चमत्कारच लागतील ! इतक्या प्रचंड वेगात जावे लागले तर मन बधीर होईल किंवा कोलमडून पडेल ! पण, कलेतला हा वाढता वेग आजच्या जगण्याच्या पद्धतीचा प्रभाव आणि परिणाम असल्याने अटळही दिसतो आहे. या बाबतीत दोन प्रश्न पडतात – (१) हा वेग आणखी किती वाढत जाऊ शकेल ? (२) आज जगणाऱ्यांच्या आयुष्यात, काही वर्षांपूर्वीची कमी वेगाची कला अप्रस्तुत ठरते का ?

JANUARY 12

१९५८ च्या ' डिटेक्टिव्ह ' या चित्रपटातले ' दो चमकती आँखोमे ' हे गीता दत्तने गायिलेले गाणे ऐकले आणि आठवले -- त्या वेळी मी सहावी-सातवीत असेन. लहानपणी मी बराच आजारी असायचो. मी सिनेमासाठी हट्ट केला की ' जाऊदे, बघू दे -- ' अशा पितृप्रेमाने वडील पाच आणे देत असत. ( त्याहून जास्त शक्यच नसे -- वडील शिक्षक होते आणि माझ्या आजारपणाचा खर्चही बराच असे. ) पाच आणे हे त्या वेळचे सर्वांत कमी दराचे तिकीट. तसे मी बरेच चित्रपट पाहिले. मुंबईतल्या मालाडची कस्तुरबा आणि न्यू इरा ही ठरलेली चित्रपटगृहे. पाच आणेवाल्यांठी दोनच रांगा असत. खूप लौकर जाऊन रांगेत उभे राहावे लागे. मी रांगेत उभा राहिल्यानंतर थोड्या वेळाने आधीच्या चालु शोचे मध्यांतर होई ! पण आवड आणि चिकाटी ! मग ' डिटेक्टिव्ह ' असो की ' ब्लॅक कॅट ' असो ! नंतर मी माझ्या वयाच्या मित्रांना, पुढचा सिनेमा पाहीपर्यंत, न कंटाळता नव्हे तर उत्साहाने त्या ताज्या पाहिलेल्या सिनेमाची पूर्ण गोष्ट, बारीक-सारीक तपशीलांसह सांगत

असे ! मी स्वतः सांगताना त्यात प्रत्येक वेळी रंगून जाई ! माझी मित्रमंडळी बरीचशी तो चित्रपट न पाहिलेलीच असत ! तीही जिवाभावाने रंगून जात ! ते माझे पहिले श्रोते आणि माझ्या चेहऱ्यावरचे भाव विचारात घेता प्रेक्षकही ! मला थोडी का असे ना जी काही कला आत्मसात झाली असेल तिचे मूळ आणि श्रेय त्या पाच आणेवाल्या सिनेमांना आणि तेव्हाच्या माझ्या त्या मित्रांना आहे !

JANUARY 11

कलाकृतीतली अनुभववस्तू मध्यमवर्गीय आहे की दलित आहे की अंडरवर्ल्डची आहे की राजकारणाची आहे की युद्धाची आहे -- यावर तिचे मूल्य अवलंबून नसते. तसे असते तर अमुक ठिकाणच्या सर्वात गलिच्छ जगण्यातूनच जगातली सर्वोत्तम कलाकृती येणार, असे म्हणावे लागले असते. मानवी संबंधांचे सखोल भान म्हणजे मूल्यात्मकता.

जी कलाकृती माझा क्षुद्रपणा टाकल्याशिवाय मला समजत नाही ती मौल्यवान !
मी माझा क्षुद्रपणा टाकल्यावर
मला कुणाचे ग्लॅमर वाटायची गरजच काय ?
ग्लॅमर निर्माण करणाऱ्या कलाकृती मौल्यवान असू शकत नाहीत.

JANUARY 10

उदास वाटणे, दुःखी वाटणे, आनंदी वाटणे, एकटे वाटणे, ग्रेट वाटणे, लहान वाटणे -- अशा या सर्व अवस्था म्हणजे त्या त्या वेळची सत्ये समजाव्यात का ? ही सर्व सत्ये तर परिस्थिती-सापेक्षच असणार -- याचा अर्थ -- आपण फक्त अशा सत्यांची एक साखळी ?

किशोरी अमोणकर जर आपल्या संगीत-शिक्षणावर एवढ्या भडकल्या असतील तर
परिस्थिती खूपच गंभीर असणार ! " राग शिकवता की रागांची प्रेते ? " असे त्या म्हणाल्याचे वृत्त आहे ! संगीतातून माणसाच्या जगण्याला मूल्यस्पर्श होत असतो हे निर्विवाद आहे. ती शक्यता बिनमहत्त्वाची होत चाललीय का ? ( आजच्या मटात बातमी आहे. )

इतक्या सुंदर स्त्रिया अमुक एका देवासाठी नृत्य करताहेत, हे पाहिल्यावर त्या देवाचा हेवा वाटणारच हो -- आस्तिकाला नव्हे, नास्तिकाला --

जगणे समजून घेत राहणे ही भूमिका नाही असू शकत हो -- तो मान्य केलेला एखादा निष्कर्ष नसतो --

जे घडतेय आयुष्यात ते नुसते शब्दांतून बिनचूकपणे, अर्थाच्या जणू अदृश्य धारेवर मांडता आले तरीही माणूस त्यातून बाहेर पडतो -- सुरुवातीला, गंमत म्हणून हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे -- पुढची जबाबदारी ज्याचीत्याची --

काही वेळी आपल्याच चुकीमुळे समजा, आपण आपल्याला अत्यंत हव्याशा वाटणाऱ्या व्यक्तीपासून दुरावतो -- हे आपल्याप्रमाणेच त्या व्यक्तीलाही समजते -- गैरसमज नाहीतच, तर घालवायचे काय ? दुराव्यामुळे बोलणेही होत नाही -- हळूहळू अंतर वाढत राहते -- शांत राहणे, एवढेच, चांगले घडू शकणारे असते --

JANUARY 9

इथे कविता द्यायची असेल तर रविवारी द्यावी -- त्या दिवशी इथे फारसे कुणी पाहात वा वाचत नाही -- आणि दुसऱ्या दिवशी सोमवारी लोक गडबडीत असतात -- मागचे पाहात बसत नाहीत -- आपली कविता खपून जाते --

JANUARY 8

तुम्ही स्वतंत्र आणि सहिष्णू कधी असता ?
तुम्हाला कुणाकडूनही काहीही नको असते तेव्हा !
बाकी कुणीही यावर बोलणे ही आत्मवंचनाच !

अहो, मी खूप महिन्यांनी असले उद्योग करतोय -- मला रिकामटेकडा नका समजू. आज कर्तव्यपूर्ती झाली -- आता काही दिवस तरी, काहीही पाहणार नाही. आज ' बाजीराव-मस्तानी ' पाहिला ! दिपून गेलोच ना ! पण, खूप गोडधोड खाल्ल्यासारखे झालेय.
यावर एकच उपाय -- जुन्या बाजाराकडे जातो -- तिकडे माझा मित्र ' नटसम्राट ' रोज येतोच -- एक गप्पा मारण्याची छान जागा आहे तिथे ! तो मला हळू आवाजात काही स्वगते म्हणून दाखवतो -- मीही त्याचा खूप गौरव करतो -- आपला मित्रच तर आहे ! विशेष म्हणजे, माझी एक ओळही न वाचता, तो मला भाषाप्रभू म्हणतो ! मस्त वाटते !

देवाणघेवाणीशिवाय प्रेम, मैत्री, ग्रेट असणे, होऊ शकते का ?
त्याची एक मुलाखत येणार आहे छापून -- त्यात त्याने, पुलंनंतरचा एक महत्त्वाचा लेखक, असा माझा उल्लेख केलेला आहे !
" असं नाटक असतं, राजा -- "

JANUARY 6

‘ नटसम्राट ‘ पाहिल्यानंतर –

पाहिला एकदाचा !
दुःख एंजॉय करायला देणारी कलाकृती म्हणजे दर्जेदार, असे खूपजण समजतात. ‘ वाह ‘ म्हणता येईल असे दुःखाचे लशीसारखे छोटे छोटे डोस घुटक्याघुटक्याने घेत राहताना आपोआप दर्जेदार वाटत राहते. असेही मानले जाते की अशा कलाकृतींचे कलावंत हे थोडे वा बरेच असे मानसिक ‘ सरकलेले ‘ वा किंचित वेडे असतात आणि मानवी जगण्याबद्दल ते काही मौल्यवान, सांस्कृतिक बोलत असले तरी प्रत्यक्ष जगण्याचा आणि त्याचा काही संबंध नसतो – ते फक्त त्यांचे एक कौशल्य असते, इतकेच. एंजॉय करण्यापलिकडे आपण ते गंभीरपणे घेऊ लागलो तर आपण वेडे होऊ शकतो. त्या कलावंतांकडे असलेल्या कौशल्यामुळे त्यांना वाहवा मिळते, याचा त्यांना आनंद असतो – त्यासाठी ते बिचारे आयुष्य उधळून वेडे व्हायला तयार होतात ! म्हणजे लोकांसाठीच का म्हणानात ! याचे, अर्थात लोकांना कौतुक असते ! बरेच ‘ रसिक ‘ आणि कलावंतही अशा दर्जेदार विचारांचे असतात. ( हा सिनेमाही त्याच अर्थाने ‘ दर्जेदार ‘ आहे ! ) तर, असल्याच बावळट विचारांचा एक नट म्हणजे हा नटसम्राट ! तो स्वतः स्वतःला आणि इतरही सगळे त्याला नटसम्राट म्हणताना ऐकून ऐकून कंटाळा येतो. अहो, किंग लियरचे संवाद त्याच्या स्वतःच्या जगण्यातून येतात – या नटसम्राटाचे जगणे तसे किरकोळच आहे – एखाद्या साध्या कारकुनासारखे. फार विचारप्रवर्तक बोलायचे खरे तर त्याला कारणच नाही. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी. वडिलांच्या वाईट सवयी मुलांना चित्रपटातले प्रसंग घडल्यावर समजतात, हे पटत नाही. आपली आई किती सरळमार्गी आणि सोशिक आहे, हे दोघांनाही माहीत असणारच. ती मुलेही तशी निर्बुद्ध वा हायस्ट्रंग टाईप वाटत नाहीत. त्यामुळे, ती दोघेही त्यांच्या आईवडिलांशी असे वागतील, हेच पटत नाही. अचानक तुम्हाला वाटले म्हणून तुम्ही हे प्रसंग घडवताय, असेच वाटते. या अर्थाने या सिनेमाचा पायाच कच्चा आहे. लाखो लोकांसमोर सम्राटगिरी केलेल्या या माणसाला नंतर फक्त एक तो रामच भेटत राहतो ? बरे, तो काही विकलांग वा अधू झालेला नाहीय. या सिनेमात त्याला प्रभावी काम करता यावे म्हणून त्याला चांगला टुणटुणीत ठेवलाय ! ही एक गोचीच झालीय इथे. इतका भरभक्कम नट काम करायचा थांबला ? कधीपासून ? सुमारे ४५ व्या वर्षीच ? ( याच्या मुलीचे लग्न व्हायच्या आधीपासून हा रिकामा फिरतोय, हे लक्षात घ्या -- ) त्याचे नुसते यशच गृहीत धरायला लावले आहे. एखादी भूमिका समजून घेण्यासाठी

त्याने काय केले, कसा विचार केला, हे दाखवले तर तालीम दाखवावी लागेल आणि मग हे सगळे लोक गेले कुठे, असा प्रश्न येईल ! हा ४५ / ४७ चा आहे म्हणजे याच्या जुन्या प्रेयस्या ३५-४० च्या असतील – त्यांचा उल्लेख – त्या म्हाताऱ्या झाल्यात, असा येतो ! हे ' बनवलेले ' बंडल पिक्चर वाटते ते अशा कारणांमुळे. असा एवढा मोठा असा हा नट असेल तर याचे काही वाचनबिचन असेल ना – काहीच नाही ! नुसते पाठ केलेले संवाद दिसतात ! नोकरीचा कंटाळा आला म्हणून ती सोडून देऊन हातभट्टीची पीत रस्तोरस्ती फिरणारा हा एक साधा अल्पशिक्षित मुकादम वाटतो. मुळातच सगळे खोटेच असल्याने पाटेकरांच्या अभिनयाचे विशेष कौतुक राहात नाही. त्यातही बऱ्याच वेळी त्यांच्या संवादफेकीवर लागूंचा प्रभाव जाणवतो. यातला मला आवडलेला अभिनयाचा क्षण म्हणजे, रामची बायको मरत असताना त्याला वाटणारी मृत्यूबाबतची अगतिकता आणि एकटेपणाची भीती – हे जे विक्रम गोखल्यांनी दाखवले आहे, ते विशेष आहे ! असो. ती मुले नसती हो वागली अशी, काहीतरी समंजस मार्ग नक्कीच काढला असता त्यांनी – किती छान दिसतात बिचारी ! त्या मुलांच्यावर अन्याय करून आपली पोळी भाजून घेणारा असा सिनेमा काढणे, हे काही बरे नाही झाले – असेच वाटत राहते ! ( ता. क. -- यातले पोलीसही जरा सटकलेले कलावंतच वाटतात. दोन वेळा त्या पुलाखाली येऊन तिथे राहणाऱ्या त्या गरीब लोकांना ते लाथा-बुक्क्या-लाठ्यांनी बडवून काढतात ! त्या वेळच्या आवाजांचा नाट्यमय इफेक्ट मस्त येतो ! असे काही इफेक्ट हवेच होते मधे मधे ! पण, कुणाला फारसे काही लागत नाही, हेच एक त्यातले बरे म्हणायचे ! असे आणखीही काही इफेक्टस आहेत. लहान मुले कसे ' भो ' करून दचकवतात त्याप्रमाणे हा नटसम्राट एकदम मोठ्या आवाजात काही स्वगते वगैरे बोलायला सुरुवात करून लोकांना दचकवतो ! ही दचकवण्याची ट्रिक तो वारंवार वापरतो ! )

किबे थियेटर

पुण्यातले प्रभात चित्रपटगृह बंद झाले म्हणून पुणेकर खूप हळहळले होते. ते बंद नव्हते झाले. मूळ मालकाने ते ताब्यात घेऊन त्याचे नूतनीकरण करून आता ते किबे या नावाने पुन्हा सुरू झाले आहे. मराठी चित्रपटांचे आणि मराठी प्रेक्षकांचे हे खास थियेटर. तुलनेने स्वस्तही ! तिथे काल ' नटसम्राट ' पाहिला. म्हटले, नूतनीकृत थियेटरही पाहून होईल. निराशा झाली. फक्त खुर्च्या आणि ध्वनियंत्रणा बदललेली आहे. खुर्च्या बदलायच्याच होत्या तर दोन रांगांत अंतर किती असावे याचे काही शास्त्र विचारात घेता आले असते ना ! अत्यंत कमी आहे अंतर ! लोक स्थानापन्न होण्याच्या प्रयत्नात असताना थियेटर मालकाला आणि एकमेकांना शिव्या देत असतात ! एवढे कुठले चित्रपट असे सारखे ओसंडून वाहाणार आहेत की जास्तीत जास्त खुर्च्या कोंबाव्यात ? आतल्या पायऱ्याही अशा आहेत की प्रत्येक वेळी काही लोक तरी धडपडावेत ! मराठी माणसाला स्वस्त द्याच हो थियेटर, पण, त्याला इतका फालतूही नका ना समजू ! सुखाने घेऊ द्या की त्याला करमणुकीचा आनंद --

परेश एजन्सीज

पुण्यातल्या अप्पा बळवंत चौकातले हे पुस्तकांचे दुकान. नाटके आणि एकांकिका सापडण्याचे आणि मिळण्याचे तर नंबर वन दुकान ! शिवाय ते एकांकिका आणि नाटके प्रकाशितही करतात. माझ्या सगळ्या एकांकिका सुट्या -- एकेक स्वरूपात, त्यांनी प्रकाशित केलेल्या आहेत. आमचे जुने संबंध आहेत. अनेकदा, त्या भागात गेलो की त्यांच्याकडे थोडा वेळ गप्पा मारून येणे, हा एक माझा कार्यक्रम असे. तर, त्या दुकानाला २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून अनिरुद्धने मला बोलावले होते. ( आधी त्याचे वडील दुकानाचा पूर्ण कारभार पाहात असत. ) त्याला म्हटले की तेवढ्या एकाच कारणासाठी येण्यापेक्षा समोरच असलेल्या किबे थियेटरमधून माझे ' नटसम्राट ' चे एक तिकीट काढून ठेव. त्याने तसे केले, म्हणून जाऊन आलो. दुकान मस्त, आत फिरून पुस्तके पाहता येतील, असे छान आहे ! शुभेच्छा दिल्या, त्याने मला एक स्मृतिचिन्ह दिले, आमचे एकत्र फोटो काढले. थोडा वेळ होतो तिथे. तेवढ्यात तिथे एक ग्राहक आला. " प्रेमाची काही कादंबरी असली तर हवीय " म्हणाला ! अनिरुद्धला असे काही लगेच सांगता येई ना -- त्याच्या सहायकाला त्याने दुकानातला अमुक भाग यांना दाखव, असे सांगितले. नंतर, त्यावर आम्ही बोललो. खरेच, च्यायला, नुसतीच प्रेमाची अशी कुठाय रोमँटिक कादंबरी ? अरेरे ! एवढे रुक्ष झालोय आपण ? फडके होते तेव्हा हे दालन नीट असायचे -- आता कोण आहेत ?

JANUARY 5

‘ नटसम्राट ‘ पाहण्यापूर्वी –

हे नाटक मी पूर्वी पाहिले होते, पण, मला फारसे आवडले नव्हते. त्यामुळे, त्याचे गुणगान, वगैरे माझ्या मनात नाही.

१ एखादा माणूस स्वतःच स्वतःला ‘ वादळ ‘ वा ‘ सम्राट ‘ का म्हणून घेत असेल ?

२ “ मी आहे मॅक्बेथ, मी आहे ऑथेल्लो, मी आहे हॅम्लेट, मी आहे किंग लियर – मी नटसम्राट ! “ – असे जर असेल तर याचा अर्थ शेक्सपियरने नाटके लिहिली नसती तर हा नटसम्राट होऊ शकला नसता का ? तमाशांमध्ये कामे करून माणूस नटसम्राट होऊ शकतो की नाही ?

३ “ मी आहे सुधाकर, मी आहे लखोबा लोखंडे, मी आहे विद्यानंद, मी आहे सखाराम बाइंडर – मी नटसम्राट ! “ – असे होऊ शकते का ? तसे होऊ शकत नसल्यास का नाही होऊ शकत ? नटसम्राट होण्यासाठी राजेरजवाड्यांच्या उत्तुंग भूमिकाच कराव्या लागतात का ? की वेगळेच काही लागते ?

४ निळू फुल्यांनी सखाराम बाइंडरची भूमिका ‘ ग्रेट ‘ म्हणावी, अशी केली होती – त्यांना नटसम्राट म्हणता येईल की नाही ?

५ आता उत्तुंग भूमिकांची नाटके फारशी येत नाहीत – म्हणजे, आता नटसम्राट होण्याच्या शक्यता संपल्याच, असे म्हणावे का ?

हे रोजच सतत भेटणारे
झाड, कपाट, घर, टॉयलेट, माणसे
आपल्याला जवळून ओळखतात
हे पूर्णच खोटे असते –
जाणीवपूर्वक आपण त्यांना
डिस्टर्ब करणे टाळतो –
आपले बरेच पापुद्रे त्यांना
अज्ञात असतात – तसा त्यांना
संशयही असू शकतो
त्यामुळे, ते पूर्ण अमुक असे
आपल्याला गृहीत धरत नसावेत –
तरीही, अर्थात, धोका असतोच
ते प्रचंड डिस्टर्ब होण्याचा ! जे
आपल्याला प्रचंड धक्कादायक
ठरू शकते ! पूर्ण काहीच नाही
अर्धजीवीच जणू सगळे --
आपण असे आणि तसेही
असूनही चालावे सगळेच
कपाटासारखे निर्जीव, हीच
असते आपली इच्छा – विशेष
म्हणजे माणसेही तशीच असावीत
निर्जीव या इच्छेमुळे तर आपला स्वतःचा
जिवंतपणाही धोक्यात येतो ! तरीही –
सगळेच निर्जीव का नसावे ?
अर्धजीवी असण्याचा फायदा काय ?
--- ००० ---

१ सभापतीने बोलायला परवानगी दिलेल्या व्यक्तीनेच फक्त दिलेल्या वेळातच बोलले पाहिजे.
२ अशी परवानगी दिलेल्या व्यक्तिखेरीज इतर कुणी मध्ये बोलु लागला तर तो घटनाद्रोह समजून खटला चालवावा. त्या खटल्याचा निकाल लागेस्तोवर आरोपीस सभागृहात प्रवेशबंदी असावी.
३ सभापतीसमोरच्या हौदात येणे वा तिथे येऊन आरडाओरडा करणे, हा राष्ट्रद्रोह समजावा.
४ मतदानाची वेळ आल्यास मत देणे वा घरी जाणे एवढेच करण्याचे स्वातंत्र्य ठेवावे.
-- मस्त चालेल लोकशाही ! लोकशाही म्हणजे, लोकशाही बंद पाडायचे स्वातंत्र्य, असे नसावे.

JANUARY 4

It is not a question of logical victory; victory is always for the woman. You can have logic, she will have victory. This is a simple division.
-- Osho.

ओशोंचाच आणखी एक विनोद --
Goldberg, the doctor said to him, "I am afraid it is bad news: your wife has only a few hours to live. I hope you understand there is nothing more to be done. Don't let yourself suffer."

"It is all right, doc," said Goldberg, "I have suffered for forty years, I can suffer a few more hours. It is not a big problem."

हे सांगून ते पुढे म्हणतात --

The findings of psychologists are that couples are nothing but intimate enemies. They both are sabotaging each other's lives, pulling at each other's legs, not allowing a single moment of peace.

ओशोंनी सांगितलेला एक विनोद --

"Will my husband be permitted to stay with me during the delivery?" Mary asked the doctor in the maternity ward.

"Ah, yes," replied the doctor, "I also believe the father of the child should be present at its birth."

"I don't think that's a good idea," said Mary, "he and my husband don't get along too well together."

JANUARY 3

जिल्हा वा राज्य वा राष्ट्र स्तरीय आणि पुढे आंतरराष्ट्रीय स्पर्धांत खेळणाऱ्या खेळाडूंचा दिनक्रम -- व्यायाम, सराव, आहार, वगैरे -- पाहता, त्यांना जिवंत रोबो केले जाते, हे स्पष्ट आहे. यावर कुणी म्हणेल की तसे तर कोणत्याही क्षेत्रातले विशेषज्ञ हे रोबोच तर असतात ! अर्थात, हे पूर्ण सत्य नसले तरी एकूण जगणे व्यापणारे सत्यच असते. म्हणजे यशस्वी होण्यसाठी रोबो व्हायलाच हवे ! असे जर असेल तर, पुढेमागे, यांत्रिक रोबोंनीच मानवी जगण्याचा ताबा घेतला तर त्यात काय वाईट म्हणता येईल ? मग सेलेब्रिटी कोण असेल ? सह्या कुणाच्या घेतल्या जातील ?

प्लीज, मन, बौद्धिक समारोपाच्या सवयीत न ठेवता,
भान येणे म्हणजे ' कळणे ' -- या तत्त्वाने वाचा माझ्या कविता --

शोध खरे तर एकाच किनाऱ्याचा होता
जरा अधिकच मिळाले – त्यांच्या अस्मिता झाल्या
आता बाळगणे आले जणू स्त्रियाच सगळ्या
उत्तेजकतांची बांधकामे होत राहिली
कधी ही कधी ती
शहरी जीवनाचा भाग म्हणून
स्वीकारून बसलो आणि चटावलोही
जसा सकाळचा चहा तशा या अस्मिता
निराशा जाऊन आशावादी झालो आणि हो

आत्मविश्वासही वाढला

-- हे सगळे माझे माझे चालु होते

कुणाला सांगायचा प्रश्नही नव्हता आणि मतलबही

-- मी अधिकाधिक तरुण होत चाललोय

हे दिसत असूनही सर्वांनी सोंग पांघरले

-- यात माझे कौतुक वा हेवा वा मत्सर वा संताप

काहीही असू शकणार होते --

-- हे सर्व दुर्लक्षून सध्या रममाणच होत राहायचे

असेच मी ठरवलेले आहे --

जे होईल ते होईल !

--- ००० ---

JANUARY 1

कलाकृती वा नाटक ' कळणे ' म्हणजे बातमीच्या वा माहितीच्या स्तरावर तिचा वास्तववादी समारोप झाला पाहिजे, असे काही नाही. मानवी नात्यांतले मानसिक गोंधळ आणि त्यांतले खरे-खोटे चकवे यांचे भान येणे हेही ' कळणे ' च असते. मराठी प्रेक्षकाने आता, एक परिपक्वता म्हणून कळण्याची ही व्याख्या स्वीकारायला हवी. असे जर घडले तर ' हा शेखर खोसला कोण आहे ' या नाटकाचा कलात्मक आनंद समृद्धपणे नक्कीच घेता येईल. मूळ गुजराती लेखक मधू राय यांचे हे एक उत्तम नाटक आहे. उत्तम नटसंच, उत्तम तंत्र आणि विजय केंकरे यांचे उत्तम दिग्दर्शन असलेल्या या नाटकाचा प्रयोग छानच होतो ! प्रेक्षकांनी थोडे मोकळे होऊन, सवयीच्या अपेक्षा सोडून हे नाटक जरूर पाहावे ! मी आज या नाटकाचा पुण्यातला पहिला प्रयोग पाहिला -- मला हे नाटक आवडले ! या वेगळ्या, नावीन्यपूर्ण निर्मितीसाठी ' भद्रकाली ' चे अभिनंदन !

DECEMBER 31

shared Leela Godbole's post.

How your bank account with internet banking facility can be hacked?

1. Hacker accesses your name and date of birth from Facebook.

2. With these details he goes to the IncomeTax site and updates them. From there he obtains the pancard and mobile numbers.

3. Then he gets a duplicate pancard made.

4. After this he lodges a mobile theft complaint in a police station.

5. With the duplicate pancard he gets another simcard from the mobile company.

6. Through internet banking he is now ready to access your account.

7. He goes to the site and uses the forgot my password option.

8. Now he easily gets past other options and gets the Internet banking pin on his simcard.

This information was issued by the Cyber Cell of Pune Police.

wrote on Siyaram Gupta's Timeline.
खूप शुभेच्छा !

wrote on Kirankumar B. Bhujbal's Timeline.
खूप शुभेच्छा !

एक जानेवारी आला की खरेच काही नवे घडतेय असे समजून मुबलक फटाके चालु आहेत ! प्रदूषणाने घुसमटून मरायची वेळ येईल तेव्हा मधलीच कुठली तरी तारीख असेल !